# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**बी. ए. भाग – २ : राज्यशास्त्र**

**सत्र–३ : Major Mandatory : महाराष्ट्र शासन**
**(Maharashtra Government)**

**सत्र–४ : Major Mandatory : महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया**
**(Political Process in Maharashtra)**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२५
बी. ए. (राज्यशास्त्र) भाग - २
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** २००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN - 978 - 93 - 49570 - 44 - 3

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र

**अध्यक्ष – डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश रामचंद्र पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अरुण मारुतीराव चव्हाण**
  भोगावती महाविद्यालय, कुरुकली, जि. कोल्हापूर
- **डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. कराड,
  जि. सातारा
- **डॉ. सचिन महादेव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. विक्रमराव एन. पाटील**
  शंकरराव जगताप जगताप आर्टस्, कॉलेज, वाघोली,
  जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मेघा संजय पाटील**
  कै. मालती व. पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूरर, जि. सांगली
- **डॉ. संतोष केशव खडसे**
  कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. श्रद्धा विनोद कोठावळे**
  सहकारभूषण मा. एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड,
  ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
- **डॉ. राहुल दत्ता मांडणीकर**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. बाळ अनंत कांबळे**
  धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा
- **डॉ. वासंती प्रतापचंद्र रासम**
  घरोंदा, ३८४/३८५, आ. के. नगर सोसायटी नं. ५,
  मोरेवाडी, कोल्हापूर.
- **डॉ. अनिल देवगौडा पाटील**
  आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. सिकंदर आप्पासाहेब जमादार**
  राजहंस हौसिंग कार्पोरेशन प्लॉट नं. ०९, विजय नगर,
  इस्ट सांगली मिरज रोड, सांगली
- **श्री. रमेश दिनगर डुबल**
  किसन वीर महाविद्यालय, वाई, जि. सातारा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली. याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहि:स्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

सत्र ३ – महाराष्ट्र शासन, सत्र ४ – महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया हे स्वयंअध्ययन साहित्य बी. ए. भाग दोन च्या राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सदर स्वयं अध्ययन साहित्यामध्ये सत्र ३ मध्ये राज्य विधिमंडळ, घटकराज्याचे कार्यकारी मंडळ, राज्य न्यायव्यवस्था, स्वायत्त संस्था व सत्र ४ मध्ये राजकीय पक्ष, दबाव गट, राजकारणातील समकालीन प्रश्न, राजकीय चळवळी या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे मा. कुलगुरू, प्र. कुलगुरू, मा. कुलसचिव यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार. राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र भणगे, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठमधील प्राध्यापक डॉ. प्रकाश पवार, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे आम्ही आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील, दूरशिक्षण केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार!

**■ संपादक ■**


**श्री. अनिल मोहिते**
म. ह. शिंदे, महाविद्यालय तिसंगी,
ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर

**प्रा. डॉ. संतोष खडसे**
कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज,
उरुण इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**'महाराष्ट्र शासन'**
**'महाराष्ट्र राजकीय प्रक्रिया'**
**बी. ए. भाग –२, सत्र – ३ व ४**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखकांचे नाव | घटक क्रमांक | |
|---|---|---|
| | सत्र ३ | सत्र ४ |
| **डॉ. खंडेराव खळदकर**<br>जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर,<br>ता. शिरोळ जि. कोल्हापूर | १ | – |
| **डॉ. वंदना सातपुते**<br>डॉ. पंतराव कदम कॉलेज सांगलवाडी, सांगली, जि. सांगली | २ | – |
| **डॉ. शरद पाटील**<br>न्यू कॉलेज, शिवाजी पेठ, कोल्हापूर, जि. कोल्हापूर | ३ | – |
| **डॉ. ऋषीकेश अंजली किरण इनामदार**<br>श्रीमती मिनलबेन मेहता कॉलेज, पाचगणी, जि. सातारा | ४ | – |
| **डॉ. आण्णासाहेब हरदारे**<br>शिवराज कॉलेज गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | – | १ |
| **डॉ. सुजाता पाटील**<br>देवचंद कॉलेज, अर्जुननगर, व्हाया निपाणी, ता. कागल,<br>जि. कोल्हापूर | – | २ |
| **डॉ. सुनिल गायकवाड**<br>आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा,<br>ता. जावळी, जि. सातारा | – | ३ |
| **प्रा. डॉ. संतोष खडसे**<br>कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज,<br>उरुण इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली | – | ४ |

**■ संपादक ■**

**श्री. अनिल मोहिते**
म. ह. शिंदे, महाविद्यालय तिसंगी,
ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर

**प्रा. डॉ. संतोष खडसे**
कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज,
उरुण इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | सत्र–३ : 'महाराष्ट्र शासन' | |
| १. | राज्य विधिमंडळ | १ |
| २. | घटकराज्याचे कार्यकारी मंडळ | ४८ |
| ३. | राज्य न्यायव्यवस्था | ७२ |
| ४. | स्वायत्त संस्था | १०० |
| | सत्र–४ : 'महाराष्ट्र राजकीय प्रक्रिया' | |
| १. | राजकीय पक्ष | ११८ |
| २. | दबाव गट | १४६ |
| ३. | राजकारणातील समकालीन प्रश्न | १५५ |
| ४. | राजकीय चळवळी | १९२ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना :**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२५-२६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक १

# राज्य विधिमंडळ

## (State Legislature)

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ विधानपरिषद – रचना, अधिकार आणि कार्ये

१.२.२ विधानसभा – रचना, अधिकार आणि कार्ये

१.२.३ विधानसभा व विधानपरिषद यांच्यातील संबंध

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

१.५ स्वयंअध्ययन प्रश्न व उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्टे :

राज्य विधिमंडळ (State Legistature) या प्रकरणाचा अभ्यास करताना पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहेत.

१. विधानपरिषदेची रचना, अधिकार व कार्ये यांचा सविस्तर अभ्यास करणे.

२. विधानसभेची रचना, अधिकार व कार्ये यांचा सविस्तर अभ्यास करणे.

३. विधानसभा व विधापरिषद यांच्यातील परस्पर संबंध समजून घेणे व अभ्यासणे.

## १.१ प्रस्तावना (Introduction) :

भारतीय संविधानकारांनी संघराज्य शासनव्यवस्थेचा स्वीकार केला असल्यामुळे केंद्र आणि घटक राज्ये असे शासनाचे दोन स्तर निर्माण करण्यात आले आहेत आणि शासनाच्या या दोन पातळ्यांवर, स्तरांवर संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. त्यामुळे या दोन्ही स्तरांवरील शासन संरचनेमध्ये अनेक बाबतीत सारखेपणा दिसून येतो. राज्याच्या राजकीय व्यवस्थेत राज्यविधिमंडळाचे (State Legistature) प्रभावी आणि मध्यवर्ती स्थान व भूमिका असते. भारतीय राज्यघटनेतील भाग-६, प्रकरण-३ मधील कलम-१६८ ते २१२ मध्ये राज्य विधिमंडळाचे संघटन, रचना, कालावधी, प्रक्रिया, विशेषाधिकार, अधिकार व कार्ये इत्यादींबाबत तरतूदी केलेल्या आहेत. भारतातील सर्व राज्यांमध्ये राज्य विधिमंडळाच्या संघटनाची वेगवेगळी पद्धत आहे. भारतातील बहुतेक राज्यांमध्ये एकगृही (Uni-cameral) विधिमंडळ आहे, तर काही राज्यांमध्ये द्विगृही (Bi-cameral) विधिमंडळे आहेत.

भारतीय राज्यघटनेतील कलम १६८ नुसार प्रत्येक घटक राज्यांसाठी एक विधमंडळ (Legislature) असेल. ज्यात राज्यपाल आणि एक किंवा दोन सभागृहांचा समावेश असेल. भारतात काही घटकराज्यांमध्ये एकगृही विधिमंडळ आणि काही घटक राज्यांमध्ये द्विगृही विधिमंडळ आढळून येते. ज्या घटक राज्यामध्ये विधिमंडळाची दोन सभागृहे आहेत तेथे कनिष्ठ सभागृहाला विधानसभा (Legislative Assembly) तर वरिष्ठ सभागृहाला विधान परिषद (Legislative Council) असे म्हणतात. सध्या देशात आंध्रप्रदेश, बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि तेलंगणा या सहा घटक राज्यांमध्ये विधानपरिषद हे विधिमंडळाचे वरिष्ठ सभागृह आहे. पूर्वीच्या जम्मू आणि काश्मीर राज्यात विधानपरिषद अस्तित्त्वात होती. मात्र संसदेने ५ आणि ६ ऑगस्ट, २०१९ रोजी 'जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना विधेयक, २०१९' पारित (मंजूर) केल्यामुळे राज्याचा दर्जा काढून केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा प्रदान (बहाल) करण्यात आला आणि जम्मू-काश्मिरसाठी विधानसभेची तरतूद करण्यात आली. परिणामी, या राज्यातील विधानपरिषदेचे अस्तित्व संपुष्टात आले आहे. सध्या भारतात २२ राज्यांमध्ये एकगृही विधिमंडळ आहे. येथील राज्यविधिमंडळात राज्यपाल आणि विधानसभेचा समावेश होतो. तर ६ राज्यात द्विगृही विधिमंडळ आहे. द्विगृही विधिमंडळ पद्धत असलेल्या राज्यांच्या राज्यविधिमंडळात राज्यपाल, विधानपरिषद आणि विधानसभा यांचा समावेश होतो. विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह (द्वितीय सभागृह) तर विधानसभा हे कनिष्ठ सभागृह (प्रथम सभागृह व जनतेचे सभागृह) असते. राज्याच्या विधिमंडळ सदस्यांना आमदार असे म्हणतात.

भारतीय राज्यघटनेतील कलम १६९ मध्ये राज्यात विधानपरिषद निर्माण (स्थापन) करण्याचा किंवा ती नष्ट करण्याचा अधिकार संसदेला असल्याची तरतूद आहे. घटकराज्यात द्विगृही सदन असावे किंवा नसावे याचा निर्णय तेथील विधानसभेलाच घ्यावा लागतो. परंतु संसद स्वत:हून अशी कृती करत नसते. संसद संबंधित राज्याच्या विधानसभेने ठराव मंजूर केल्यानंतर अस्तित्वात असलेली विधानपरिषद रद्द (बरखास्त) करू शकते, संपुष्टात आणू शकते किंवा अस्तित्वात नाही त्या राज्यात नवीन विधानपरिषद स्थापन (निर्माण) करू शकते. त्यानुसार राज्यविधानसभेने आपल्या एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने आणि विधानसभा या सभागृहांमध्ये उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी किमान दोन तृतीयांश (२/३) सदस्यांनी विधानपरिषद हे सभागृह स्थापन वा रद्द करण्याबाबत ठराव मंजूर (पारित/संमत) केल्यानंतर तो ठराव संसदेकडे पाठविला जातो. संसद साध्या बहुमताद्वारे कायदा संमत (मंजूर) करून त्याबाबत निर्णय घेते. संसदेने मंजुरी दिली की या ठरावाला अनुसरून त्याबद्दल राज्यात विधान परिषदेची निर्मिती होते अथवा राज्यविधिमंडळात अस्तित्वात असलेल्या विधानपरिषदेचे विसर्जन केले जाते. मात्र विधानपरिषदेची निर्मिती अथवा ती रद्द बातल करणे याबाबत निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार संसदेला असून राज्य विधिमंडळाच्या ठरावानुसार कृती करण्याचे बंधन संसदेवर नसते. विधानपरिषद स्थापन करणे वा रद्द करणे यासंदर्भात संसदेने केलेले कायदे मात्र कलम - ३६८ अंतर्गत केलेली घटना दुरुस्ती मानण्यात येणार नाही. ते सर्वसाधारण कायद्याप्रमाणेच साध्या बहुमताने पारित (संमत) केले जातील.

राज्यविधिमंडळाचे दुसरे सभागृह जनतेचे प्रतिनिधित्व करत नाही, या सभागृहामुळे कायदेनिर्मिती प्रक्रियेला विलंब होतो आणि या सभागृहाचे कामकाज चालवणे खर्चीक आहे. या मुद्द्यांवरून संविधान सभेने दुसऱ्या सभागृहाच्या संकल्पनेला विरोध केला होता. त्यामुळे राज्याच्या मर्जीनुसार व राज्याच्या आर्थिक शक्तीनुसार दुसरे सभागृह असावे किंवा नसावे हे ठरविण्यासाठी विधानपरिषद स्थापन वा विसर्जन (रद्द) करण्याबाबतची तरतूद राज्यघटनेत आहे. उदाहरणार्थ, आंध्रप्रदेश राज्याने सन १९५७ मध्ये विधानपरिषद स्थापन केली आणि १९८५ मध्ये विसर्जीत (रद्द) केली. पुढे आंध्र प्रदेश विधानपरिषद कायदा २००५ अंतर्गत सन २००७ मध्ये राज्यात विधानपरिषद पुन्हा स्थापन करण्यात आली. तामिळनाडू विधानपरिषद १९८६ मध्ये रद्द करण्यात आली. तर पंजाब आणि पश्चिम बंगालमधील विधानपरिषद या १९६९ मध्ये विसर्जीत (रद्द) करण्यात आल्या आहेत.

भारतात २८ घटकराज्ये आणि ९ केंद्रशासित प्रदेश आहेत. दिल्ली केंद्रशासित प्रदेशाला राजधानी राज्याचा (अर्ध-राज्याचा) दर्जा देण्यात आलेला आहे. २८ घटकराज्यांपैकी ६ घटकराज्यांमध्येच विधानपरिषद हे द्वितीय सभागृह आढळते. त्यानुसार घटकराज्यांच्या विधिमंडळातील सदस्य संख्या विचारात घेताना तेथील विधानसभांच्या सदस्यांची संख्या, विधानपरिषदेच्या सदस्यांची संख्या आणि संघराज्य क्षेत्रातील विधानसभांतील सदस्य संख्या विचारात घेणे आवश्यक आहे. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे -

## घटक राज्यांच्या विधानसभा व विधानपरिषदेतील सदस्य संख्या

| क्रमांक | घटकराज्य | विधानसभा सदस्य संख्या | विधानपरिषद संदस्य संख्या | एकगृही/द्विगृही राज्य विधिमंडळ |
|---|---|---|---|---|
| १. | आंध्र प्रदेश | १७५ | ५८ | द्विगृही |
| २. | अरुणाचेल प्रदेश | ६० | – | एकगृही |
| ३. | आसाम | १२६ | – | एकगृही |
| ४. | बिहार | २४३ | ७५ | द्विगृही |
| ५. | छत्तीसगड | ९० | – | एकगृही |
| ६. | गोवा | ४० | – | एकगृही |
| ७. | गुजरात | १८२ | – | एकगृही |
| ८. | हरियाणा | ९० | – | एकगृही |
| ९. | हिमालच प्रदेश | ६८ | – | एकगृही |
| १०. | झारखंड | ८१ | – | एकगृही |
| ११. | कर्नाटक | २२४ | ७५ | द्विगृही |
| १२. | केरळ | १४० | – | एकगृही |
| १३. | मध्य प्रदेश | २३० | – | एकगृही |
| १४. | महाराष्ट्र | २८८ | ७८ | द्विगृही |
| १५. | मणिपूर | ६० | – | एकगृही |
| १६. | मेघालय | ६० | – | एकगृही |
| १७. | मिझोराम | ४० | – | एकगृही |
| १८. | नागालँड | ६० | – | एकगृही |
| १९. | ओडिशा | १४७ | – | एकगृही |
| २०. | पंजाब | ११७ | – | एकगृही |
| २१ | राजस्थान | २०० | – | एकगृही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२. | सिक्कीम | ३२ | - | एकगृही |
| २३. | तमीळनाडू | २३४ | - | एकगृही |
| २४. | तेलंगणा | ११९ | ४० | द्विगृही |
| २५. | त्रिपुरा | ६० | - | एकगृही |
| २६. | उत्तराखंड | ७० | - | एकगृही |
| २७. | उतर प्रदेश | ४०३ | १०० | द्विगृही |
| २८. | पश्चिम बंगाल | २९४ | - | एकगृही |

**केंद्रशासित प्रदेशातील विधानसभांतील सदस्य संख्या**

खालील तक्त्यात ९ केंद्रशासित प्रदेशांमधील विधानसभा सदस्यांची संख्या देण्यात आली आहे. केंद्रशासित प्रदेशांपैकी फक्त दिल्ली, जम्मू आणि काश्मीर आणि पाँडिचेरी यांनाच विधानसभा आहे आणि कोणत्याही केंद्र शासित प्रदेशात विधान परिषद नाही.

| **क्रमांक** | **केंद्रशासित प्रदेश** | **विधानसभा सदस्य संख्या** | **विधानपरिषद संदस्य संख्या** | **एकगृही/द्विगृही विधिमंडळ** |
|---|---|---|---|---|
| १. | अंदमान व निकोबार | - | - | कायदेमंडळ/ विधानमंडळ नाही |
| २. | चंदीगड | - | - | कायदेमंडळ/ विधानमंडळ नाही |
| ३. | दादर व नगर हवेली | - | - | कायदेमंडळ/ विधानमंडळ नाही |
| ४. | दिल्ली (राष्ट्रीय राजधानी प्रदेश) | ७० | - | कायदेमंडळ/ विधानमंडळ नाही |
| ५. | दमण व दीव | - | - | कायदेमंडळ/ विधानमंडळ नाही |
| ६. | लक्षद्विप | - | - | कायदेमंडळ/ विधानमंडळ नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | पाँडिचेरी | ३३ (३० निवडून + ३ नियुक्त) | - | एकगृही विधिमंडळ |
| ८. | जम्मू-काश्मीर | ८३ | - | एकगृही विधिमंडळ |
| ९. | लडाख | - | - | कायदेमंडळ/ विधानमंडळ नाही |

**टिप्पणी :**

**१) द्विगृही विधिमंडळ (कायदेमंडळ) :** भारतातील फक्त सहा घटक राज्यांमध्ये द्विगृही विधिमंडळ/कायदेमंडळ आहे. आंधप्रदेश, बिहार, कर्नाटक, महाराष्ट्र, तेलंगणा आणि उत्तर प्रदेश.

**२) केंद्रशासित प्रदेश :** दिल्ली, जम्मू आणि काश्मीर आणि पाँडिचेरी यांनाच विधानसभा आहे आणि त्यांचे प्रशासन अंशत: राज्यांसारखे आहे. इतर केंद्रशासित प्रदेशात थेट केंद्र सरकारद्वारे प्रशासित केले जातात आणि त्यांच्याकडे (विधानसभा) विधिमंडळ/कायदेमंडळ नाही.

**३) सदस्य संख्या :** विधानसभेची सदस्यसंख्या राज्याच्या लोकसंख्येवर अवलंबून असते, तर विधान परिषदेची सदस्य संख्या विधानसभा सदस्यांच्या एक तृतीयांश ते अर्ध्या दरम्यान असते.

**टीप :** जम्मू आणि काश्मिर पुनर्रचना कायदा, २०१९ अंतर्गत जम्मू-काश्मीर या केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभेसाठी १०७ जाग निश्चित केलेल्या आहेत. परंतु २४ जागा या पाकव्याप्त काश्मिरमधील (POK) आहेत. या जागा रिक्त आहेत आणि विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येची गणना करताना त्या जागांचा समावेश केला जात नाही. त्याचबरोबर जम्मू आणि काश्मिर केंद्रशासित प्रदेशाचे लेफ्टनंट गव्हर्नर हे स्त्रियांना प्रतिनिधित्व देण्यासाठी दोन स्त्री सदस्यांची नियुक्त करू शकतात.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ विधानपरिषद – रचना, अधिकार आणि कार्य :

**(Vidhan Parishad - Composition, Power and Functions) :**

**महाराष्ट्र विधानपरिषद (Legislative Council of Maharashtra) :**

भारतीय संविधानाच्या कलम-१६८ नुसार द्विगृही कायदेमंडळ पद्धती स्वीकारली आहे. घटकराज्याच्या विधिमंडळातील वरिष्ठ सभागृहाला विधानपरिषद असे म्हणतात. संविधानाच्या कलम १६९ नुसार ज्या घटकराज्यात विधानपरिषद आहे ती रद्द (विसर्जित) किंवा ज्या घटक राज्यात विधानपरिषद निर्माण करावयाची आहे. तेथे ती निर्माण करणे यासंबंधीचे सर्व अधिकार संसदेला देण्यात आलेले आहेत. सध्या भारतात आंध्र प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि तेलंगणा या सहा घटकराज्यांमध्ये विधानपरिषद हे राज्यविधिमंडळाचे वरिष्ठ सभागृह आहे. महाराष्ट्रात विधान परिषद व विधानसभा अशी

राज्यविधिमंडळाची दोन सभागृहे आहेत. महाराष्ट्र विधानपरिषदेतील सदस्यांची संख्या ७८ इतकी आहे.

**महाराष्ट्र विधान परिषदेचा इतिहास :**

स्वातंत्र्यपूर्व काळात मुंबई प्रांतांच्या गव्हर्नरने १९३५ च्या भारत सरकारच्या कायद्यानुसार मुंबई विधानपरिषदेची स्थापना केली आणि हे कायमस्वरूपी वरिष्ठ सभागृह अस्तित्वात आले. त्यावेळी विधान परिषदेला 'अप्पर चेंबर' म्हणून ओळखले जात होते. मुंबई विधान परिषदेची पहिली ऐतिहासिक बैठक २० जुलै, १९३७ रोजी पुणे येथील कौन्सिल हॉलमध्ये भरवली. मुंबई विधानपरिषदेत त्यावेळी २९ सभासद होते. विधानपरिषदेचे अध्यक्ष म्हणून मंगलदास मंच्छाराम पकवासा यांची निवड करण्यात आली. पुढे सन १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. यानंतर कायद्यानुसार मुंबई विधानपरिषदेची जागा महाराष्ट्र विधानपरिषदेने घेतली. महाराष्ट्र विधान परिषदेचे पहिले सभापती म्हणून श्री. वि. स. पागे यांची निवड करण्यात आली.

**विधान परिषदेची रचना** (Composition of Legislative Council) **:**

विधान परिषद हे राज्य विधिमंडळाचे वरिष्ठ व स्थायी सभागृह असून ते स्थानिक स्वराज्य संस्थेचे तसेच शिक्षक, पदवीधर व राज्यपाल नियुक्त तज्ज्ञ व्यक्ती आदींचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह आहे. त्याची रचना पुढीलप्रमाणे -

**विधानपरिषदेची सदस्य संख्या :**

भारतीय संविधानाच्या १७१ व्या कलमानुसार विधान परिषदेची जास्तीत जास्त सदस्य संख्या त्या घटकराज्याच्या विधानसभेतील एकूण सभासद संख्येच्या १/३ पेक्षा अधिक असता कामा नये. विधान परिषदेत किमान ४० सदस्य असावेत असे ठरविण्यात आले आहे. या नियमानुसार महाराष्ट्रात विधानसभा सदस्यसंख्या २८८ असली तरी विधानपरिषदेत ७८ सदस्य आहेत. आंध्र प्रदेश ५८, बिहार ७५, कर्नाटक ७५, उत्तर प्रदेश १०० आणि तेलंगणा ४० ही सदस्य संख्या त्या राज्यांच्या विधान परिषदेची आहे. महाराष्ट्र विधान परिषदेतील ७८ सदस्यातील ३१ विधानसभेकडून, २१ स्थानिक स्वराज्य संस्थांकडून, शिक्षक व पदवीधर मतदारसंघाकडून प्रत्येक ७ आणि राज्यपाल नियुक्त १२ सदस्य असतात.

**विधानपरिषद सदस्यांची निवड :**

घटकराज्य विधानपरिषदेत पुढीलप्रमाणे विविध संस्थांकडून सदस्य निवडले जातात.

१) घटक राज्यांच्या विधान सभेच्या सदस्यांमार्फत १/३ सदस्य विधान परिषदेवर निवडले जातात. (विधानसभा सदस्यांची विधान परिषदेवर निवड केली जात नाही.)

२) राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या या स्थानिक स्वराज्य संस्थांकडून १/३ सदस्य निवडले जातात.

३) राज्यातील माध्यमिक शाळा आणि उच्च शिक्षण संस्था यामध्ये तीन वर्षापासून शिक्षकाचे काम करणाऱ्या शिक्षकांच्या मतदार संघातून १/१२ सदस्य निवडले जातात.

४) १/१२ सदस्य त्या राज्यातील कोणत्याही विद्यापीठामधून पदवीधर झालेल्या पदवीधरांमार्फत निवडले

जातात. मात्र ते पदवीधर त्या राज्यात राहणारा असावा व मतदार म्हणून नाव नोंदणी करताना पदवीधर होऊन ३ वर्षे झालेली असावीत.

५) उर्वरित १/६ सदस्य साहित्य, कला, विज्ञान, समाजकार्य (समाजसेवा) व सहकारी चळवळ या क्षेत्रातील अनुभव व ज्ञान असलेल्या नामवंत व्यक्तींना विधान परिषद सदस्य म्हणून राज्यपाल नामनिर्देशित (नियुक्त) करतात. राज्यपालांनी नामनिर्देशित केलेल्या सदस्यांच्या क्षमतेबाबत कोणत्याही न्यालयात प्रश्न उपस्थित करता येत नाही.

एखादी व्यक्ती कितीही वेळा विधान परिषदेची निवडणूक लढवू शकते किंवा नामनिर्देशित (नियुक्त) सदस्य होण्यास पात्र असते.

थोडक्यात, विधानपरिषदेच्या एकूण सदस्यांपैकी ५/६ सदस्य निवडणुकीद्वारे विधानपरिषदेवर येतात. तर १/६ सदस्य राज्यपालांकडून नामनिर्देशित केले जातात. वरील पहिल्या चार गटांच्या म्हणजे निर्वाचित सदस्यांच्या (५/६) निवडणूका संसदीय कायद्याने निर्धारित भौगोलिक मतदारसंघातून प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या तत्त्वावर आधारित एकल संक्रमणीय गुप्त मतदान पद्धतीनुसार घेतल्या जातात.

**विधानपरिषद सदस्य निवडणूक पद्धती / प्रक्रिया –**
**(प्रतिनिधित्वाची पद्धत आणि निवडणूक) :**

विधानपरिषद सदस्यांची निवडण करण्यासाठी राज्यसभेप्रमाणेच प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या तत्त्वावर आधारित एकल संक्रमणीय गुप्त मतदान पद्धतीचा अवलंब केला जातो. विधानपरिषदेची दर दोन (२) वर्षांनी १/३ सदस्य निवृत्त होतात व तेवढ्या जागा भरण्यासाठी निवडणुका होतात. त्याकरिता प्रादेशिक (भौगोलिक) आधारावर बहुप्रतिनिधी असलेल्या मतदारांच्या वर्गवारीनुसार मतदारसंघ पाडले जातात. शिक्षक, पदवीधर व स्थानिक स्वराज्य संस्था या तीनही मतदारसंघात मतदार यादी निर्माण केली जाते. चौथा मतदारसंघ विधानसभा सदस्यांचा आहे. त्यामुळे या मतदारसंघासाठी मतदारयादी निर्माण करण्याची गरज नसते. शिक्षक आणि पदवीधरांना मतदानात भाग घ्यावयाचा असेल तर प्रत्येक निवडणूकीपूर्वी मतदारयादीत आपले नाव नोंदवून घ्यावे लागते. वरील चारही मतदारसंघात मतदारांना मतदान करण्यासाठी मतपत्रिका दिली जाते. या मतपत्रिकेत उमेदवारांची नावे व त्यांच्या नावासमोर निवडणूक चिन्ह असते. विधानपरिषद सदस्यांची निवड करण्यासाठी मतदार उमेदवारांच्या नावासमोर आपल्या पसंतीचा क्रमांक लिहून मतदान करतो. जितके उमेदवार निवडणुकीला उभे असतील तितके पसंती क्रमांक देता येतात. मतदान झाल्यानंतर निवडून येणाऱ्या सदस्यांसाठी विशिष्ट सूत्राच्या आधारे आवश्यक कोटा (मतसंख्या) निर्धारित केला जातो. त्यानंतर मतमोजणीला प्रारंभ होतो. प्रथमत: सर्व उमेदवारांना प्राप्त झालेली पहिल्या पसंती क्रमांकांची मते मोजली जातात आणि आवश्यक कोटा (मतसंख्या) पूर्ण करणारा उमेदवार निवडून आल्याचे घोषित केले जाते.

पहिल्या पसंती क्रमांकाच्या मतमोजणीनंतर कोणताही उमेदवार आवश्यक कोटा पूर्ण करीत नसेल तर प्रथम क्रमांकाची सर्वात कमी मते असणारा उमेदवार मतमोजणीच्या प्रथम फेरीत बाद होतो. मतमोजणीच्या फेरीत बाद होणाऱ्या उमेदवारांच्या मतपत्रिकेतील दुसऱ्या पसंती क्रमांकांची मते मोजून ती उरलेल्या उमेदवारांच्या पहिल्या पसंती क्रमांकाच्या मतामध्ये संक्रमित (मिसळली) केली जातात. अशा रीतीने आवश्यक कोटा पूर्ण

करणारा उमेदवार निवडून आल्याचे घोषित केले जाते. अशाप्रकारे दुसऱ्या पसंती क्रमांकानंतर तिसऱ्या पसंती क्रमांकांची, त्यानंतर चौथ्या पसंती क्रमांकाची मते मोजली जातात. असा क्रम तोपर्यंत चालतो की, जोपर्यंत निवडून द्यावयाचे सर्व सदस्य (प्रतिनिधी) निवडले जात नाहीत.

विधानपरिषद सदस्य निवडण्यासाठी विशिष्ट सूत्राच्या आधारे आवश्यक कोटा निर्धारित (निश्चित) केला जातो. त्याचे सूत्र खालीलप्रमाणे -

$$\text{कोटा} = \frac{\text{एकूण वैध मतदान}}{\text{सदस्यांची संख्या + १}} + १$$

विधानपरिषदेच्या सदस्यांच्या प्रतिनिधित्वाची पद्धत ठरविण्याचा अधिकार संसदेला आहे.

**विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची पात्रता** (Qualifications) **:**

विधानपरिषदेच्या सदस्यांसाठी खालील पात्रता निश्चित करण्यात आली आहे.

१) उमेदवार भारताचा नागरिक असावा.

२) उमेदवारांचे वय ३० वर्षे पूर्ण असले पाहिजे.

३) संसदेने वेळोवेळी कायदे करून ठरविलेल्या अटी उमेदवारांने पूर्ण केलेल्या असाव्यात.

संसदेने सभागृहाच्या सदस्यत्वाबाबतच्या काही अतिरिक्त पात्रता 'लोकप्रतिनिधी अधिनियम, १९५१' या कायद्याद्वारे नमूद केल्या आहेत.

i) विधानपरिषदेमध्ये निवडून जाणारी व्यक्ती संबंधित राज्यातील कोणत्याही विधानसभा मतदारसंघात मतदार असावी.

ii) आरक्षित मतदारसंघासाठी निवडणूक लढवणार असेल तर उमेदवार संबंधित प्रवर्गातून आलेला असला पाहिजे.

iii) राज्यपालाद्वारे नामनिर्देशित (नियुक्त) व्यक्ती राज्याची रहिवासी असावी.

**अपात्रता** (Disqualifications) **:**

संविधानाच्या कलम १९१ नुसार काही व्यक्तींना विधानपरिषदेच्या सदस्यत्वासाठी अपात्र ठरविले जाते. ते पुढीलप्रमाणे -

१) भारत सरकार किंवा राज्य सरकार यामध्ये नोकरी किंवा प्राप्तीचे पदधारण केलेली व्यक्ती.

२) न्यायालयाने वेडी व दिवाळखोर किंवा नादार ठरविलेली व्यक्ती.

३) संसदेने ठरविलेल्या निवडणूक कायद्याचा भंग करणारी व्यक्ती.

४) सभागृहाच्या परवानगीशिवाय सतत ६० दिवस सभागृहाच्या बैठकींना गैरहजर राहणारी व्यक्ती.

५) एकाचवेळी दोनही सभागृहांचे सदस्यत्व असणारी व्यक्ती.

६) भारताचा नागरिक नसणारी व्यक्ती.

७) साठेबाजी, नफेखोरी, भेसळ, प्रतिबंधक कायद्याचा भंग इ. मुळे ६ महिन्यांपेक्षा जास्त तुरुंगवासाची शिक्षा झालेली व्यक्ती.

८) १९८५ च्या पक्षांतरबंदी (विरोधी) कायद्यानुसार पक्षांतर केलेला सभासद.

**विधानपरिषदेचा कार्यकाल** (Duration of Council) **:**

राज्यसभेप्रमाणेच विधान परिषद हे कायमस्वरूपी (स्थायी) सभागृह आहे. विधानपरिषदेतील प्रत्येक सदस्याचा कार्यकाल ६ वर्षाचा असतो. विधानपरिषदेतील १/३ सदस्य दर दोन वर्षांनी निवृत्त होतात आणि तेवढेच नवीन सदस्य निवडले जातात. हे कायम स्वरूपी सभागृह असल्यामुळे कधीही बरखास्त/विसर्जित होऊ शकत नाही. तरीपण राज्याच्या विधानसभेने 'वरिष्ठ सभागृह आम्हाल नको' अशा प्रकारचा विशेष ठराव बहुमताने मंजूर (संमत) करून संसदेकडे पाठविला तर संसद तसा कायदा करून विधान परिषद हे वरिष्ठ सभागृह रद्द करू शकते. या पद्धतीचा वापर करून पश्चिम बंगाल, तमिळनाडू, पंजाब इत्यादी घटक राज्यातील विधानपरिषद बरखास्त (रद्द) करण्यात आलेल्या आहेत.

एका घटक राज्याच्या विधानपरिषदेतील  सर्व सदस्य एकाचवेळी निवृत्त होत नाहीत.

**विधिमंडळाचे अधिवेशन** (Session of Legislative Council) **:**

विधिमंडळाचे अधिवेशन बोलविण्याचा अधिकार राज्यपालांना आहे. वर्षातून किमान दोन अधिवेशने बोलावली जातात. यात पहिल्या बैठकीचा शेवटचा दिवस व दुसऱ्या बैठकीचा पहिला दिवस यात सहा महिन्यांपेक्षा (१८० दिवसांपेक्षा) जास्त कालावधी असू नये असे बंधन आहे. प्रत्येक नवीन वर्षाच्या कामकाजाची सुरवात राज्यपालांच्या अभिभाषणाने होते.

विधानसभा विसर्जित (बरखास्त) झाल्यास राज्यपाल विधानपरिषदेची अतिरिक्त बैठक बोलावू शकतात. महाराष्ट्रात विधिमंडळाची अर्थसंकल्पीय, उन्हाळी, पावसाळी व हिवाळी अशी तीन अधिवेशने होतात. उन्हाळी व पावसाळी अधिवेशन मुंबईला तर हिवाळी अधिवेशन महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूरला होते.

**गणसंख्या** (Quorum) **:**

विधान परिषदेचे कामकाज चालविण्यासाठी सभासदांच्या किमान उपस्थितीला गणसंख्या म्हणतात. सभागृहाची गणसंख्या १० सदस्य अथवा सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येपैकी १/१० यापैकी जी संख्या अधिक असेल ती गणसंख्या मानली जाते. विधानपरिषदेची बैठक सुरू होण्यासाठी एकूण सभासदांच्या १/१० सभासद सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहेत. गणसंख्या आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी विधान परिषद अध्यक्षांची असते. महाराष्ट्र विधानपरिषदेचे किमान १० सदस्य उपस्थित असल्याशिवाय कामकाजाला सुरुवात होत नाही.

**वेतन व भत्ते :**

विधानपरिषदेच्या संदस्यांचे वेतन व भत्ते ठरविण्याचा अधिकार राज्यविधिमंडळास आहे. सदस्यांच्या कार्यकाळात त्यांचे वेतन व भत्ते कमी करता येत नाहीत. आवश्यकतेनुसार त्यात वाढ मात्र केली जाते. विधानसभा सदस्याप्रमाणेच विधान परिषद सदस्यांना मानधन, वेतन, भत्ते व इतर सर्व सेवा सवलती मिळत असतात.

**विधान परिषदेचे पदाधिकारी (सभापती व उपसभापती) :**

विधान परिषद आपल्या सदस्यांमधून अध्यक्ष (सभापती) आणि उपाध्यक्ष (उपसभापती) यांची निवड करते. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत सभागृहातील कामकाजाचे नियंत्रण उपाध्यक्ष करते. विधानपरिषदेचा मुख्य पीठासीन अधिकारी म्हणून अध्यक्ष व त्यांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष सभागृहाचे कामकाज पाहतात.

**विधानपरिषदेचा अध्यक्ष (सभापती)** (Chairman of Legislative Council) **:**

विधानपरिषदेचे सदस्य आपल्यामधून एकाची सभागृहाचा अध्यक्ष पीठासीन अधिकारी म्हणून बहुमताची निवड करतात. विधानपरिषदेच्या अध्यक्षांचे पद सन्मानाचे व प्रतिष्ठेचे समजले जाते. कारण सभागृहात अध्यक्षाचा अधिकार अंतिम व सर्वश्रेष्ठ समजला जातो. सभागृहाचे अंतिम अधिकार त्यांच्या हातात असतात. परंतु त्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग केल्यास अथवा त्यांच्या ठिकाणी अकार्यक्षमता आढळल्यास त्यांना विधानपरिषदेचे सदस्य बहुमताने पदावरून कमी करू शकतात. मात्र तत्पूर्वी तशा प्रकारचा ठराव करून १४ दिवस अगोदर पूर्वसूचना (नोटीस) द्यावी लागते. विधान परिषदेची सदस्यत्वाची सहा (६) वर्षांची मुदत संपुष्टात आली तर सभापती व उपसभापती यांना आपले अधिकार पद सोडावे लागते. तसेच सभापती व उपसभापती आपल्या इच्छेनुसार आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात. अध्यक्ष आपला राजीनामा उपाध्यक्षाकडे देतात. तर उपाध्यक्ष आपला राजीनामा अध्यक्षाकडे देतात.

विधान परिषदेच्या सभापती व उपसभापतीचे वेतन व भत्ते राज्यविधिमंडळ निश्चित करते. एकदा निश्चित केलेले वेतन व भत्ते त्यांच्या कार्यकाळात कमी केले जात नाहीत.

◆ **विधानपरिषद अध्यक्षांचे अधिकार व कार्ये :**

विधानपरिषदेच्या अध्यक्षाला विधानसभेच्या सभापती प्रमाणे अधिकार देण्यात आलेले आहेत. अध्यक्षांना पक्षभेद विसरून कार्य करावे लागते. अध्यक्ष पुढील कार्य पार पाडीत असतो.

१) विधान परिषदेचा अध्यक्ष या नात्याने अध्यक्षपद भूषवून सभागृहाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे.

२) विधानपरिषदेत शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करून सभागृहात शिस्त राखणे, कामकाज नियमानुसार चालविणे.

३) सभागृहात मांडण्यात येणाऱ्या प्रस्तावांना, ठरावांना संमती देणे किंवा नाकारणे.

४) सभागृहात गोंधळ उद्‌भवल्यास सभागृहाचे कामकाज काही काळ तहकूब ठेवणे.

५) सभागृहात सभासदांना पुरवणी प्रश्न विचारण्यास परवानगी देणे किंवा नाकारणे, तसेच त्यांना भाषण करण्याची परवानगी व वेळ ठरवून देणे.

६) सर्वसाधारण परिस्थितीत अध्यक्षाला सभागृहातील विधेयकावरील मतदानात भाग घेता येत नाही. मात्र सभागृहात एखाद्या विधेयकावर समान मते पडल्यास त्यावर अध्यक्षाला स्वत:चे निर्णायक मत देण्याचा अधिकार आहे.

७) सभागृहात राजकीय पक्षांची बसण्याची जागा ठरवून देणे.

८) गणपूर्ती (गणसंख्या) अभावी अथवा गोंधळाच्या स्थितीत सभागृहाचे कामकाज स्थगित करणे.

९) सभागृहातील सदस्यांच्या विशेषाधिकारांचे संरक्षण करणे.

१०) सभागृहाचे पावित्र्य आणि प्रतिष्ठा जपणे.

११) सभागृहात नियमांच्या अर्थाबाबत वाद निर्माण झाल्यास नियमांचा अर्थ लावणे.

१२) विधान परिषदेच्या सदस्यांचा राजीनामा स्वीकारणे.

अशा प्रकारे सभापती वरील अधिकारानुसार सभागृहाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवून सभागृहाची प्रतिष्ठा व दर्जा टिकविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत असतो.

**उपसभापती (उपाध्यक्ष)** (Deputy Chairman of Council) **:**

विधानपरिषद सभापतीच्या गैरहजेरीत सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालविण्याची जबाबदारी उपाध्यक्षाची आहे. विधानपरिषदेचे सदस्य अध्यक्षाप्रमाणेच आपल्यापैकी एकाची उपाध्यक्ष पदासाठी बहुमताने निवड करतात. अध्यक्षाप्रमाणेच उपाध्यक्ष निवडण्याची प्रक्रिया समान आहे. विधान परिषदेच्या उपाक्षाला – (१) सभागृहाचा अध्यक्ष या नात्याने काम करताना त्याला अध्यक्षपदाचे सर्व अधिकार प्राप्त होतात. (२) सभागृहात अध्यक्ष उपस्थित असताना अन्य सदस्यांप्रमाणेच त्याला सभागृहातील सर्व कामकाजात सहभागी होण्याचा अधिकार आहे. (३) सभागृहाच्या संसदीय समितीचा सदस्य म्हणून त्याची निवड झाली असल्यास तो त्या समितीचा अध्यक्ष बनतो. (४) उपाध्यक्ष या नात्याने तो सभागृहाच्या समितीच्या बैठकीला उपस्थित राहू शकतो आणि त्या समितीचे अध्यक्ष स्थान ग्रहण करू शकतो.

**बडतर्फी –** अध्यक्ष आणि उपाध्यक्षांना बडतर्फ करण्याचा करण्याचा अधिकार विधान परिषदेला आहे. त्यासाठी एकूण सभासद संख्येच्या बहुमताने बडतर्फीचा ठराव मंजूर होणे आवश्यक आहे.

◆ **विधान परिषदेचे अधिकार व कार्ये** (Powers and Functions of Legislative Council) **:**

**१) कायदेविषयक अधिकार :**

विधानपरिषद हे राज्यविधिमंडळाचे वरिष्ठ सभागृह आहे. आर्थिक स्वरूपाचे विधेयक वगळून इतर कोणतेही विधेयक प्रथम कोणत्याही सभागृहात मांडता येते. अर्थविधेयक सोडून अन्य कोणत्याही विधेयकास विधान परिषदेकडून मंजूरी मिळाल्याशिवाय त्याचे कायद्यात रूपांतर होत नाही. विधानसभेने मंजूर केलेले

विधेयक विधानपरिषदेत मंजुरीसाठी पाठवले जाते. अशा विधेयकाला विधानपरिषद मंजुरी देऊ शकते किंवा त्यामध्ये दुरुस्त्या, सुधारणा सुचवू शकते किंवा नाकारू शकते. विधान परिषदेला तीन महिन्यांच्या आत ते विधेयक परत पाठवावे लागते. विधानपरिषदेने सुधारणा सुचविलेले किंवा नाकारलेले विधेयक विधानसभेने पुन्हा दुसऱ्या वेळी मंजूर करून विधान परिषदेकडे पाठविले तर एक महिन्याच्या आत ते विधेयक परत आले नाही तर ते विधेयक विधान परिषदेला मंजूर आहे असे समजून राज्यपालांच्या संमतीसाठी पाठविले जाते. राज्यपालाने मंजूर केलेल्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते. विधान परिषद एखाद्या विधेयकाच्या मंजुरीसाठी जास्तीत जास्त चार महिने विलंब लावू शकते. थोडक्यात, कायदेनिर्मितीच्या अधिकारात विधान परिषदेपेक्षा विधानसभेला जास्त अधिकार असल्याचे दिसून येते.

**२) कार्यकारी अधिकार :**

राज्याच्या कार्यकारी मंडळावर (मंत्रिमंडळावर) नियंत्रण ठेवण्याचे सर्व अधिकार विधानसभेला आहेत. विधान परिषदेला मात्र मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवण्याचे मर्यादित अधिकार आहेत. घटनेनुसार मंत्रिमंडळ हे विधानसभेला जबाबदार असते. त्यामुळे मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवण्याचे सामर्थ्य विधान परिषदेजवळ नसते. प्रशासन कार्यासंबंधी मंत्रिमंडळाला प्रश्न विचारणे आणि त्याची लेखी किंवा तोंडी उत्तरे ठराविक मुदतीच्या आत मागविण्याचा अधिकार विधान परिषदेला आहे. काम रोको प्रस्ताव, बहिर्गमन, निंदाजनक ठराव पास करणे इत्यादी मार्गांनी विधान परिषद मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवते. मात्र कोणत्याही परिस्थितीमध्ये मंत्रिमंडळावर अविश्वास ठराव पास करण्याचा आणि त्याला पदच्युत (बडतर्फ) करण्याचा अधिकार विधान परिषदेला नाही. थोडक्यात, मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवण्याचे मर्यादित अधिकार विधानपरिषदेला असलेले दिसून येतात.

**३) आर्थिक (वित्त विषयक) अधिकार :**

धनविधेयकाबाबत (आर्थिक बाबत) विधानपरिषदेला अतिशय मर्यादित अधिकार आहेत. धनविधेयक कोणते हे ठरविण्याचा अधिकार विधानसभेच्या सभापतीला आहे. विधानसभेने मंजूर केलेले धनविधेयक विधान परिषदेकडे संमतीसाठी पाठवावे लागते. विधानसभेने पाठविलेल्या धनविधेयकाला १४ दिवसाच्या आत विधान परिषदेला मंजुरी द्यावी लागते. विधान परिषदेने १४ दिवसाच्या आत मंजूरी दिली नाही तर ते धनविधेयक दोन्ही सभागृहांनी मंजूर केले असे समजले जाते. थोडक्यात, धनविधेयकाबाबत फक्त १४ दिवसाचा विलंब लावण्याचा अधिकार विधान परिषदेला आहे.

**४) घटना दुरुस्तीचा अधिकार :**

भारतीय संविधानात घटनादुरुस्तीचा प्रस्ताव मांडण्याचा अधिकार संसदेला आहे. परंतु घटनादुरुस्तीच्या काही विधेयकांना संसदे बरोबरच निम्म्यापेक्षा जास्त घटक राज्यांची मंजूरी द्यावी लागते. उदा. केंद्र, राज्य अधिकारांची विभागणी, राज्यांचे राज्यसभेतील प्रतिनिधित्व इत्यादी विधेयके संसद राज्य विधिमंडळाच्या संमतीसाठी पाठविते. तेव्हा ती विधेयके विधानसभेप्रमाणेच विधानपरिषदेतही मांडली जातात. विधानपरिषद सदस्य त्यांना संमती देतात.

**५) निवडणूक विषयक अधिकार :**

राष्ट्रपतींच्या निवडणुकीत मतदान करण्याचा तसेच राज्यसभा सदस्यांची निवड करण्याचा अधिकार फक्त विधानसभेला असतो. यासंबंधी विधान परिषदेला कोणताही अधिकार नसतो. असे असले तरी विधान परिषदेला विधान परिषदेचे सभापती आणि उपसभापती यांची निवड करण्याचा अधिकार आहे. तसेच त्यांना अकार्यक्षमतेच्या कारणास्तव बडतर्फ (पदच्युत) करण्याचा अधिकार विधान परिषदेला आहे.

**६) इतर अधिकार :**

राज्यपालाच्या अभिभाषणावर चर्चा करून त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करणे, त्यांचे आभार मानणे, जनतेच्या तक्रारींकडे लक्ष देणे, त्याविषयी चर्चा सभागृहात करणे, सरकारचे दोष दाखवून देणे इत्यादी अधिकार विधानपरिषदेला आहेत.

अशा प्रकारे वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, राज्य विधिमंडळाच्या दोन सभागृहांपैकी विधानपरिषद या वरिष्ठ सभागृहाचे अधिकार अत्यंत मर्यादित स्वरूपाचे आहेत.

**◆ विधानपरिषदेची उपयुक्तता :**

भारतीय संविधानाच्या कलम १६८ नुसार घटक राज्यात द्विगृही कायदेमंडळ पद्धती स्वीकारली असली तरी सध्या फक्त सहा घटक राज्यात द्विगृही कायदेमंडळ पद्धती आढळते. आंध्र प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि तेलंगाणा या सहा राज्यातच वरिष्ठगृहाचे (विधानपरिषद) अस्तित्व आढळते. उर्वरित सर्व घटक राज्यांनी एकगृही कायदेमंडळ पद्धती स्वीकारलेली आहे. घटक राज्याच्या विधिमंडळात द्विगृहात्मक पद्धती असावी की नसावी याबाबत दोन मतप्रवाह आढळतात. मॉंटेग्यु चेम्सफोर्ड समितीने याबाबत असा निष्कर्ष काढला होता की, घटक राज्यात द्विगृही कायदेमंडळ निर्माण केल्यास गंभीर स्वरूपाचे परिणाम होतील. १९३५ चा कायदा करतेवेळी द्विगृही कायदेमंडळ पद्धतीवर टीका झाली होती. भारतीय संविधानकार वरिष्ठ गृहाच्या उपयुक्ततेबाबत काही प्रमाणात साशंक होते. संविधान समितीचे याबाबत एकमत होऊ शकले नाही. त्यामुळेच संविधान समितीने वरिष्ठ गृहाची निर्मिती आणि समाप्ती यासंबंधीचे अधिकार घटक राज्याच्या विधानसभेला आणि संसदेला दिले. भारतीय संविधानाच्या १६९ व्या कलमात यासंबंधी तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतुदीनुसार पश्चिम बंगाल, पंजाब, तामिळनाडू इत्यादी घटकराज्यांच्या विधानसभांनी आणि संसदेने बहुमताने तेथील विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह नष्ट (रद्द) केले आहे.

**विधानपरिषदेच्या समर्थनार्थ कारणे :**

**१) विधानसभेचा कार्यभार कमी होण्यास मतद :**

विधानपरिषदेमुळे विधानसभेवरील कामाचा भार अथवा तणाव कमी होतो. आधुनिक काळात विधिमंडळाच्या (कायदेमंडळाच्या) कार्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे कायदेमंडळावर कायदेनिर्मितीची जबाबदारी अधिक प्रमाणात पडू लागली आहे. विधानसभेत काही वेळा सर्वच विधेयकांवर वेळे अभावी सविस्तर चर्चा, विचारविनिमय होणे कठीण होऊन बसते. त्यामुळे कमी वेळेत घाईगडबडीने अनेक विधेयके मंजूर करून घ्यावी लागतात. अशा घाईगडबडीत मंजूर केलेल्या विधेयकांवर पुन्हा सविस्तर चर्चा, विचारविनिमय होण्यासाठी

विधान परिषद या दुसऱ्या सभागृहाची आवश्यकता असते. थोडक्यात, विधान सभेच्या तुलनेत विधान परिषदेची सदस्य संख्या मर्यादित असल्यामुळे विधानपरिषेत विधेयकावर सविस्तर चर्चा होऊन त्यातील उणीवा दूर होत असल्याने विधानसभेचा कार्यभार व तणाव कमी होण्यास मदत होते.

**२) कायदेनिर्मितीचे कार्य उत्तम व जबाबदारपणे होते :**

विधानपरिषद या वरिष्ठ सभागृहामुळे कायदेनिर्मितीचे कार्य उत्तम प्रकारे व जबाबदारपणे होऊ शकते. विधानसभेत घाईघाईने, भावनेच्या भरात विधेयकांना मंजुरी दिलेली असली तरीही विधानपरिषदेत त्या विधेयकावर सखोल सविस्तरपणे चर्चा, विचारविनिमय होऊन दुरुस्त्या सुचविल्या जातात. विधानसभेचे सदस्य लोकमताच्या पाठिंब्यावर निवडून आलेले असल्यामुळे त्यांच्याकडून नि:ष्पक्षपातीपणे विधिनिर्मितीचे कार्य होईल असे नाही. सत्ताधाऱ्यांकडून राष्ट्रविकासाच्या दृष्टिने घातक स्वरूपाचे व पक्षहिताच्या दृष्टीने कायदे मंजूर होऊ शकतील, परंतु विधान सभेकडून मंजूर होऊन आलेल्या प्रत्येक विधेयकावर विधानपरिषदेत सविस्तरपणे सखोल चर्चा होऊन त्यास मंजुरी किंवा नामंजुरी दिली जाते. थोडक्यात, विधान परिषदेमुळेच कायदेनिर्मितीचे कार्य जबाबदारीने व उत्तम प्रकारे पार पाडले जाते.

**३) लोकांमध्ये राजकीय जाणीव जागरूकता (सतर्कता) निर्माण होण्यास मदत :**

विधानपरिषद हे सभागृह लोकांमध्ये राजकीय सतर्कता जाणीव जागृती निर्माण करणे महत्त्वाचे ठरते. विधानसभेत जनहितविरोधी मंजूर झालेले विधेयक विधानपरिषदेकडे जेव्हा संमतीसाठी येते तेव्हा विधानपरिषद त्या विधेयकांना काही काळ स्थगित करू शकते. यामधल्या काळात विधानपरिषदेतील चर्चा प्रसार माध्यमांद्वारे जनतेपर्यंत पोहचते. यामुळे संबंधित विषयाबाबत जनतेमध्ये जाणीव जागरुकता, सतर्कता निर्माण होऊ शकते. संबंधित विधेयकाबाबत लोकमत जाणून घेत कायदा निर्मिती केली जाऊ शकते. थोडक्यात, लोकमतानुसार कायद्यांची निर्मिती होते.

**४) विधानसभेच्या बेजबाबदार वृत्तीवर आळा (विधानसभेच्या कार्यावर नियंत्रण) :**

विधान परिषदेमुळे विधानसभेच्या बेजबाबदार वृत्तीला आळा घालण्याचे कार्य घडते. एकगृही कायदेमंडळ असेल तेथे विधानसभा बहुमताच्या बळावर अविवेकी, अयोग्य कायद्यांची निर्मिती करू शकेल. परंतु विधिमंडळ द्विगृही असेल तेथे विधानपरिषद विधानसभेच्या कार्यावर नियंत्रण ठेवू शकते. त्यामुळे विधानसभा जबाबदारीने काळजीपूर्वक कायदेनिर्मितीचे कार्य करते.

**५) कायदेनिर्मितीच्या कार्यात अडसर ठरत नाही :**

विधानपरिषद हे वरिष्ठ गृह कायदेनिर्मितीच्या कार्यात अडसर (अडथळा) निर्माण करू शकणार नाही. काही काळ विधेयक थोपवून (स्थगित) धरणे या पलीकडे विधानपरिषद काहीही करू शकत नाही. विधानसभेच्या तुलनेत विधान परिषदेची सदस्य संख्या मर्यादित असते. घटना दुरुस्तीचे विधेयक विधान परिषदेत मांडले जात नाही. त्यामुळे विधान परिषद हे वरिष्ठ सभागृह कायदेनिर्मितीच्या कार्यात कोणताही अडथळा (व्यत्यय) आणत नाही. उलट ते सभागृह योग्य व चांगल्या प्रतीच्या कायद्यांची निर्मिती करण्यास उपयुक्त ठरते.

**६) विधानपरिषद स्थायीगृह – सदस्यांच्या ज्ञान व अनुभवाचा फायदा कायदे निर्मितीसाठी :**

विधानपरिषद कायम स्वरूपी (स्थायी) सभागृह आहे. त्यातील १/३ सदस्य दर दोन वर्षांनी निवृत्त होतात आणि तेवढेच नवीन सदस्य निवडले जातात. स्थायी सभागृहामुळे सदस्यांच्या ज्ञानाचा अनुभवाचा फायदा कायदे निर्मितीसाठी होतो.

**७) विशिष्ट हितसंबंधांना प्रतिनिधित्व :**

विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह विशिष्ट हितसंबंधांना प्रतिनिधित्व देण्यास आवश्यक आहे. शिक्षक, पदवीधर, स्थानिक स्वराज्य संस्था यासारख्या मतदारसंघातील लोकांना विधानपरिषदेत प्रतिनिधित्व मिळते. विविध गटांना व हितसंबंधांना प्रतिनिधित्व मिळते. हे शुद्ध लोकशाहीचे द्योतक आहे. विविध क्षेत्रातील अनुभवी, तज्ज्ञ आणि हुशार व्यक्तींची नियुक्ती विधानपरिषदेवर केली जात असल्यामुळे विशिष्ट हितसंबंधांचे संरक्षण होते.

**८) राज्यपालनियुक्त तज्ञ व्यक्तींच्या ज्ञानाचा लाभ प्रशासनाला :**

राज्यपालाद्वारे विधानपरिषदेत साहित्य, कला, विज्ञान, क्रीडा, समाजसेवा व सहकार चळवळ इत्यादी क्षेत्रांतील जाणकार तज्ञ असा ज्ञानी व अनुभवी लोकांची नियुक्ती केली जाते. त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा, सेवेच लाभ राज्य प्रशासनाला मिळते.

वरीलप्रमाणे अशी अनेक कारणे विधानपरिषदेच्या उपयुक्ततेसाठी दिली जातात. या विविध कारणांमुळे विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह राज्याच्या विधिमंडळात आवश्यक व महत्त्वाचे ठरले आहे.

◆ **विधानपरिषद विरोधी कारणे:**

विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह पुढील विविध कारणांमुळे अनावश्यक वाटते.

**१) दोन सभागृहांच्या मतभेदामुळे कायदेनिर्मितीचे कार्य ठप्प :**

फ्रेंच तत्त्वज्ञ लुईस यांच्या मते, ''लोकशाही ही नेहमी एकमुखी एक मार्गी असते. जेव्हा विधिमंडळात दोन सभागृहे स्थापन केली जातात, तेव्हा त्यांच्या कार्यात मतभेद व विभाजन होणे अटळ असते.'' एकगृही विधिमंडळ पद्धतीत परस्परविरोधी असे निर्णय घेण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. अमेरिकन विचारवंत बेंजामिन फ्रँकलिन यांच्या मते, टांग्याला दोन विरुद्ध दिशेने तोंड करून घोडे जुंपणे आणि टांगा ओढण्याचा प्रयत्न करणे अशी स्थिती द्विगृहात्मक विधिमंडळाची होते. विधानसभा व विधानपरिषद या दोन गृहांच्या मतभेदामुळे कायदेनिर्मितीचे कार्य ठप्प होते.

**२) विधानपरिषद विलंब लावणारे सभागृह :**

विधान परिषद हे विलंब लावणारे सभागृह आहे. सर्वसाधारण विधेयकाला चार महिने आणि धन विधेयकाला १४ विलंब लावून विधान परिषद कायदेनिर्मितीच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण करते. असे असले तरी विधान परिषद विधेयकाला विलंब लावण्यापलिकडे काहीही करू शकत नाही. विधान परिषदेने नाकारलेले विधेयक दुसऱ्या वेळी विधानसभेने मंजूर केले तर विधान परिषदेला दुसऱ्या वेळी त्यास मंजुरी

घ्यावी लागते. एक महिन्याच्या आत तशी मंजुरी दिली नाही तर ते विधेयक विधान परिषदेला मंजूर आहे, असे समजण्यात येते. एकंदरीत विधानपरिषद हे सभागृह विधेयकाला निरर्थक विलंब लावणारे सभागृह आहे. तसेच ते दुर्बल व कमकुवत स्वरूपाचे असल्यामुळे बहुतेक घटकराज्यांनी ते सभागृह निर्माण करण्याचे नाकारले आहे.

**३) कायदानिर्मितीवर पुन्हा चर्चा, विचारविनिमयाची अनावश्यकता :**

जनतेचे प्रतिनिधित्व करणारे विधानसभा हे जबाबदार सभागृह असताना राज्य विधिमंडळात विधान परिषद या दुसऱ्या सभागृहाची आवश्यकता असण्याची गरज नाही. कारण विधानसभेत विधेयकावर तीन वाचने, समिती अवस्था अशा प्रक्रिया होऊन कायदे निर्माण होतात. त्यामुळे त्या कायद्यावर पुन्हा चर्चा, विचारविनिमय करण्याची गरज नसते. विधानसभेत जनतेचे प्रतिनिधित्व खऱ्या अर्थाने प्रकट होत असते. प्रतिनिधी जबाबदारीने, जाणिवेने कायदेनिर्मितीचे कार्य करतात. याउलट विधान परिषदेत विविध गटांचे, हितसंबंधीयांचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य असतात. त्यामुळे ते सामान्य जनतेला जबाबदार राहून कार्य करतील याविषयी खात्री देता येत नाही.

**४) राज्यपालांकडून होणाऱ्या नियुक्तीमध्ये पक्षपातीपणा :**

राज्यपालांकडून विधान परिषदेत जे १२ सदस्य नियुक्त केले जातात ते विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व नामवंत अनुभवी व्यक्ती असतात. परंतु काही वेळा या नियुक्तीमध्ये पक्षपातीपणा झालेला आढळतो. केंद्रातील व राज्यातील सत्तारूढ पक्षाच्या नेत्यांच्या मर्जीनुसार हे सदस्य नियुक्त केले जातात. आपल्या पक्षातील काही लोकांची कायदेमंडळात वर्णी लावण्यासाठी वरिष्ठ सभागृहाचा उपयोग केला जातो. सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पराभूत झालेल्या व्यक्तीस मागील दाराने (बॅकडोअर एन्ट्री) प्रथम विधिमंडळात व नंतर मंत्रिमंडळात प्रवेश करण्यासाठीच विधान परिषद हे सभागृह मदत करताना दिसते. विधानसभेकडून जे १/३ सदस्य विधान परिषदेत निवडले जातात, त्यांच्या निवडीमध्ये पूर्णपणे पक्षपातीपणा आढळून येतो.

**५) पैसा आणि वेळेचा दुरुपयोग :**

विधानपरिषदेच्या सभासदांना वेतन, भत्ते व इतर सवलती ज्या द्याव्या लागतात त्याचा भार पर्यायाने जनतेवरच पडतो. तसेच विधेयकावर पुनर्विचार करून ते मंजूर करण्यास अनावश्यक वेळ खर्च होतो. त्यामुळे पैसा आणि वेळेचा अनावश्यक दुरुपयोग करणारे वरिष्ठ सभागृह काही घटकराज्यांनी संपुष्टात आणले आहे. उदा. पश्चिम बंगाल, पंजाब, तमिळनाडू इ.

**६) राज्यमंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवण्याचे मर्यादित अधिकार :**

विधान परिषदेला राज्यमंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवण्याचे मर्यादित अधिकार आहेत. विधान परिषद सदस्यांकडून मंत्रिमंडळातील मंत्र्यांना प्रश्न-उपप्रश्न विचारले जातात. परंतु विधान परिषदेत मंत्रिमंडळा विरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडता येत नाही. विधान परिषद हे गृह दुर्बल व कमकुवत सभागृह आहे. विधानसभेच्या सदस्य संख्येपेक्षा विधान परिषदेची सदस्य संख्या फारच कमी असते. विधान परिषद राज्य मंत्रिमंडळावर काही प्रमाणात नियंत्रण ठेवते. विधानसभेचे मंत्रिमंडळावर नियंत्रण असल्यामुळे विधान परिषदेच्या नियंत्रणाची गरज नसते.

**७) विधान परिषद  विधानसभेच्या बेजबाबदार वृत्तीवर नियंत्रण ठेवते म्हणणे अयोग्य :**

विधानसभेच्या बेजबाबदार वृत्तीवर विधानपरिषद हे गृह नियंत्रण ठेवते असे म्हणणे अयोग्य वाटते. कारण विधानसभा बेजबाबदार वृत्तीने कायदे निर्मितीचे कार्य करते असा आरोप करणे योग्य वाटत नाही. कारण विधानसभेतील प्रतिनिधी जागरुकपणे, जबाबदारीने कायदेनिर्मितीचे कार्य करीत असतात. लोकमताची कदर करून योग्य व लोकाभिमुख अशा कायद्याची निर्मिती केली जाते. विधानसभेच्या सदस्यांना पाच वर्षानंतर पुन्हा जनतेपुढे मतासाठी जावे लागते. त्यामुळे ते जनतेला जबाबदार राहून कार्य करतात. ते लोकमतानुसार कायदे निर्माण करतात आणि जनतेच्या विश्वासास पात्र ठरतात. म्हणून विधान परिषद विधानसभेच्या कार्यावर नियंत्रण ठेवते. तिच्या बेजबाबदार वृत्तीवर आळा घालते असे म्हणणे, अयोग्य वाटते.

**८) विधानसभेला विधान परिषदेपेक्षा जास्त अधिकार :**

विधानसभेला विधान परिषदेपेक्षा जास्त अधिकार देण्यात आलेले आहेत. विधानसभा मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वास ठराव मंजूर करू शकते. विधानसभेचे सदस्य राष्ट्रपतींच्या निवडणुकीत मतदान करतात, ते घटनादुरुस्ती विधेयकाला मंजुरी देऊ शकतात, असे अधिकार विधानपरिषदेला दिलेले नाहीत. विधानसभेला आर्थिक अधिकार देण्यात आलेले आहेत. विधान परिषदेला आर्थिक अधिकार दिलेले नाहीत. अर्थविधेयक प्रथम विधानसभेतच मांडले जाते. मंत्रिमंडळाची निर्मिती विधानसभेतील बहुमत प्राप्त पक्षाच्या नेत्याकडून होते. विधानपरिषदेला याबाबतीत काही अधिकार नाहीत. विधान परिषदेतील एखाद्या सदस्याला राज्यमंत्रिमंडळात मंत्री म्हणून घेता येते. अशा प्रकारे विधान परिषद हे कमकुवत व दुर्बल सभागृह असल्यामुळे त्याचे अस्तित्व बहुतेक घटक राज्यांत आढळत नाही. जेथे हे सभागृह आहे तेथे त्याला विधानसभेपेक्षा दुय्यम स्थान व अधिकार दिसून येतात.

वरील विविध कारणांमुळे विधान परिषद हे सभागृह अनावश्यक अथवा निरर्थक आहे, असे म्हटले जाते.

अशा प्रकारे वरील विविध कारणांमुळे विधान परिषद हे वरिष्ठ सभागृह अनावश्यक वा निरर्थक वाटत असले तरीही केंद्रसरकारने संसदेत राज्यसभा हे सभागृह आवश्यक व महत्त्वाचे म्हणून कायम ठेवले आहे. त्याचप्रमाणे घटक राज्यात विधानपरिषद अस्तित्वात असणे उपयुक्त ठरेल. घटकराज्यांमध्ये जेवढे अधिकार विधानसभेला दिलेले आहेत तेवढेच विधान परिषदेला देणे आवश्यक आहे. कारण अलिकडे म्हणजे १९८०-९० च्या दशकापासून भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांचे प्राबल्य मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसून येते. बहुपक्षीय आघाडी राजकारणामुळे राज्यकारभारामध्ये अस्थिरता निर्माण झालेली पाहायला मिळत आहे. अनेक घटक राज्यात स्पष्ट बहुमताअभावी, परस्पर विरोधी विचारधारा असणाऱ्या राजकीय पक्षांची आघाडी सरकारे (Coalition Govermnent) निर्माण होऊ लागली आहेत. त्यामुळे आघाडी सरकारची स्थापना व बरखास्ती, विघटन हा नेहमीचाच व्यवहार झालेला आहे. अशावेळी स्थिर शासनासाठी घटकराज्यात द्विगृही कायदेमंडळ पद्धती चालू ठेवून विधानसभा व विधान परिषद या दोन्ही सभागृहांना समान अधिकार दिले पाहिजेत आणि दोन्ही सभागृहांचे राज्यमंत्रिमंडळावर नियंत्रण असले पाहिजे. थोडक्यात, घटक राज्याच्या राजकारणातील स्थैर्य व राज्याच्या विकासाच्या दृष्टीने दोन्ही सभागृह असणे महत्त्वाचे व आवश्यक आहेत, असेच म्हणावे लागेल.

**विधानपरिषद अध्यक्ष व कार्यकाल**

| क्र. | अध्यक्ष / सभापतीचे नाव | पक्ष | कार्यकाल (पासून ते पर्यंत) | |
|---|---|---|---|---|
| १ | विठ्ठल सखाराम पागे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ११/७/१९६० | २४/४/१९७८ |
| २ | राम मेघे (कार्यवाहू) | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | १९/६/१९७८ | १५/६/१९७८ |
| ३ | रा. सू. गवई | रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया | १५/६/१९७८ | २२/९/१९८२ |
| ४ | जयंत श्रीधर टिळक | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २३/९/१९८२ | ७/७/१९९८ |
| ५ | भाऊराव तुळशीराम देशमुख (कार्यवाहू) | भाजप | २०/७/१९९८ | २४/७/१९९८ |
| ६ | ना. स. फरांदे | भाजप | २४/७/१९९८ | ७/७/२००४ |
| ७ | वसंत डावखरे (कार्यवाहू) | राष्ट्रवादी काँग्रेस | ९/७/२००४ | १३/८/२००४ |
| ८ | शिवाजीराव देशमुख | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | १३/८/२००४ | १६/०३/२०१५ |
| ९ | रामराजे नाईक निंबाळकर | राष्ट्रवादी काँग्रेस | २०/३/२०१५ | ७/७/२०२२ |
| १० | नीलम गोऱ्हे (कार्यवाहू) | शिवसेना | ८/७/२०२२ | १९/१२/२०२४ |
| ११ | राम शिंदे | भाजप | १९/१२/२०२४ | आजपर्यंत |

**स्वयं अध्ययन प्रश्न – १**

**खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

१. भारतीय संविधानातील कलम ............. मध्ये राज्यविधिमंडळाचे संघटन, पदाधिकारी, रचना, अधिकार व कार्ये इत्यादीबाबत तरतूदी केलेल्या आहेत.

अ) कलम १२ ते ३५ ब) कलम ३६ ते ५१

क) कलम ७९ ते १२३ ड) कलम १६८ ते २१२

२. भारतीय राज्यघटनेतील कलम .............. मध्ये प्रत्येक घटक राज्यांसाठी विधिमंडळ असेल अशी तरतूद आहे.

अ) १६८ ब) १६९ क) १७० ड) १७१

३. राज्यविधिमंडळाच्या कनिष्ठ सभागृहाला .............. म्हणतात.

अ) विधानसभा ब) विधान परिषद क) लोकसभा ड) राज्यसभा

४. राज्यविधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहाला .............. म्हणतात.

अ) विधानसभा ब) विधान परिषद क) लोकसभा ड) राज्यसभा

५. महाराष्ट्र राज्याचे विधिमंडळ (कायदेमंडळ) .............. गृही आहे.

अ) एकगृही ब) द्विगृही क) त्रिगृही ड) यापैकी एकही नाही

६. सध्या भारतात .............. घटक राज्यात द्विगृही विधिमंडळ पद्धती अस्तित्वात आहे.

अ) ५ ब) ६ क) ७ ड) २२

७. सध्या भारतात .............. घटक राज्यात एकगृही विधिमंडळ पद्धीती अस्तितत्वात आहे.

अ) ६ ब) २२ क) २८ ड) २९

८. आंध्र प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि तेलंगणा या घटक राज्यात .............. गृही विधिमंडळ पद्धत अस्तित्वात आहे.

अ) एकगृही ब) द्विगृही क) त्रिगृही ड) यापैकी एकही नाही

९. घटक राज्य विधिमंडळ (कायदेमंडळ) सदस्यांना .............. म्हणतात.

अ) आमदार (MLA) ब) खासदार (MP) क) नगराध्यक्ष ड) महापौर

१०. भारतीय संविधानाच्या कलम .............. मध्ये घटक राज्यांमध्ये विधान परिषद निर्माण किंवा रद्द करणेबाबतची तरतूद आहे.

अ) १६८ ब) १६९ क) १७० ड) १७१

११. भारतात सध्या .............. केंद्रशासित प्रदेश आहेत.

अ) ९ ब) २२ क) २८ ड) २९

१२. महाराष्ट्रात विधानपरिषदेची सदस्य संख्या .............. इतकी आहे.

अ) ४० ब) ७५ क) ७८ ड) १०

१३. महाराष्ट्र विधान परिषदेचे पहिले सभापती / अध्यक्ष .............. हे होते.

अ) वि. स. पागे   ब) राम मेघे   क) रा. सू. गवई   ड) राम शिंदे

१४. महाराष्ट्र विधान परिषदेचे सध्या .............. हे अध्यक्ष / सभापती आहेत.

अ) नीलम गोऱ्हे   ब) राम शिंदे   क) राहुल नार्वेकर   ड) रामराजे निंबाळकर

१५. विधान परिषद हे वरिष्ठ सभागृह .............. स्वरूपाचे सभागृह आहे.

अ) स्थायी/कायमस्वरूपी   ब) अस्थायी   क) तात्पुरते   ड) यापैकी एकही नाही

१६. विधानपरिषद सदस्यत्वासाठी उमेदवाराचे वय .............. वर्षे पूर्ण असावे लागते.

अ) २१   ब) २५   क) ३०   ड) ३५

१७. विधान परिषद सदस्याचा कार्यकाल .............. वर्षे इतका असतो.

अ) ४   ब) ५   क) ६   ड) ७

१८. विधान परिषदेतील १/३ सदस्य दर .............. वर्षांनी निवृत्त होतात.

अ) २   ब) ४   क) ५   ड) ६

१९. राज्यविधिमंडळाचे अधिवेशन बोलविण्याचा अधिकार .............. ला आहे.

अ) राज्यपाल   ब) मुख्यमंत्री   क) राष्ट्रपती   ड) सभापती

२०. महाराष्ट्र विधिमंडळाचे उन्हाळी (अर्थसंकल्पीय) व पावसाळी अधिवेशन .............. येथे होते.

अ) मुंबई   ब) नागपूर   क) संभाजीनगर   ड) पुणे

२१. महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन .............. येथे होते.

अ) नागपूर   ब) संभाजीनगर   क) मुंबई   ड) पुणे

२२. विधानपरिषद अध्यक्ष .............. कडे राजीनामा देतो.

अ) विधानपरिषद उपाध्यक्ष   ब) विधानसभा अध्यक्ष

क) मुख्यमंत्री   ड) राज्यपाल

२३. विधान परिषद धनविधेयक मंजूर वा नामंजूर करण्यासाठी .............. दिवस विलंब लावू शकते.

अ) ७   ब) १४   क) ३०   ड) ९०

२४. महाराष्ट्र विधानपरिषदेची बैठक (कामकाज) सुरू होण्यासाठी सभागृहात किमान .............. गणसंख्येची (सदस्य संख्या) उपस्थिती आवश्यक असते.

अ) ८   ब) १०   क) ५५   ड) २५

## १.२.२ महाराष्ट्र विधानसभा – रचना, अधिकार आणि कार्य :
### (Legislative Assembly of Maharashtra State) :

भारतीय संविधानाच्या १७० व्या कलमानुसार प्रत्येक घटक राज्यात विधानसभा निर्माण केलेली आहे. भारताने संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केलेला असल्याने मध्यवर्ती सरकारप्रमाणेच प्रत्येक घटक राज्याच्या शासनात विधानसभा हे कनिष्ठ सभागृह निर्माण केलेले आढळते. जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह म्हणून विधानसभेला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. विधानसभा हे जनतेचे प्रतिनिधित्व करणारे अस्थायी व कनिष्ठ सभागृह आहे. भारतीय संविधानाच्या भाग ६ प्रकक्षरण ३ मध्ये कलम १६८ ते २१२ मध्ये राज्याच्या विधिमंडळाविषयी तरतूद केलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्रात विधानसभा (कनिष्ठ गृह) आणि विधान परिषद (वरिष्ठ गृह) अशी द्विगृहात्मक कायदेमंडळ पद्धती स्वीकारून कायदेनिर्मितीचे आणि कायदे दुरुस्तीचे कार्य केले जाते.

**विधानसभेची रचना** (Composition of Legislative Assembly) **:**

**सदस्य संख्या :**

राज्याच्या विधानसभेत राज्यातील जनतेने प्रौढ मताधिकारानुसार निवडून दिलेले जनतेचे प्रतिनिधी असतात. विधानसभा हे जनतेचे प्रतिनिधित्व करणारे अस्थायी सभागृह आहे. सामान्यत: विधानसभेतील सदस्य संख्या ही त्या राज्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात (आधारावर) ठरविण्यात येते. प्रत्येक घटक राज्यात ७५,००० लोकांसाठी एक प्रतिनिधी या प्रमाणात प्रतिनिधी निवडले जातात. संविधानात राज्यविधानसभा सदस्य संख्येविषयी स्पष्ट उल्लेख नाही. परंतु कोणत्याही परिस्थितीत जास्तीत जास्त ५०० व कमीत कमी ६० सदस्य असावेत, असे नमूद केलेले आहे. ही सदस्य संख्या ६० ते ५०० यांच्या दरम्यान असते. म्हणजेच ही संख्या राज्याच्या लोकसंख्येवर अवलंबून असते. मात्र यास अरुणाचल प्रदेश, सिक्कीम आणि गोवा या राज्यांसाठी कमीत कमी सदस्य संख्या ही ३० तर मिझोराम आणि नागालँड राज्यांसाठी अनुक्रमे ४० व ४६ अशी सदस्य संख्या ठरविण्यात आली आहे. सिक्कीम व नागालँडच्या विधानसभांमध्ये काही सदस्य अप्रत्यक्षपणे निवडण्याची तरतूद आहे.

महाराष्ट्र राज्य विधानसभेची सदस्य संख्या २८८ आहे. त्यापैकी अनुसूचित जाती (SC) साठी २९ आणि अनुसूचित जमाती (ST) साठी २५ अशा एकूण ५४ जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. २०२० पूर्वी ॲग्लोइंडियन जमातीचा एकही सदस्य विधानसभेत निवडून न आल्यास एका सदस्याची नियुक्ती राज्यपाल करत असत. परंतु ही तरतूद १०४ वी घटना दुरुस्ती कायदा २०१९ ने बंद करण्यात आली आहे. २५ जानेवारी, २०२० पासून हा कायदा लागू झाला आहे. विधानसभेतील सदस्यांना ''आमदार'' (MLA) असे म्हणतात.

**प्रादेशिक मतदार संघ** (Regional Constituency) **:**

विधानसभेच्या सभासदांची निवड करण्यासाठी प्रादेशिक मतदारसंघ पाडले जावेत असे घटनेत नमूद केले आहे. त्यानुसार प्रत्येक मतदारसंघातील लोकसंख्या व निवडून येणारे प्रतिनिधी यांचे प्रमाण शक्यतो राज्यभर

सारखे असावे. सन १९५० च्या लोकप्रतिनिधीच्या कायद्याने प्रत्येक राज्याच्या विधानसभा सदस्यांची संख्या संसदेने कायदा करून ठरविलेली आहे. सन १९७१ च्या शिरगणतीप्रमाणे महाराष्ट्रात ती २८८ इतकी आहे. ॲंग्लोइंडियन जमातीचा एकही सदस्य प्रौढ मताधिकाराद्वारे जनतेकडून विधानसभा निवडणूकीत निवडून न आल्यास एका सदस्याचे नामांकन (नियुक्ती) राज्यपाल करत असत. तेव्हा महाराष्ट्र विधानसभेची सदस्य संख्या २८९ (२८८ + १ = २८९) एवढी होत असे. मात्र १०४ वी घटना दुरुस्ती कायदा-२०१९ ने ॲंग्लोइंडियन जमातीच्या एका सादस्याची विधानसभेत राज्यपालाद्वारे नियुक्त न करण्याची घटनात्मक तरतूद करण्यात आली आहे. २५ जानेवरी, २०२० पासून त्यासंबंधीचा कायदा आमलात आला आहे. म्हणून सध्या महाराष्ट्र विधानसभेत २८८ सदस्य प्रत्यक्ष जनतेद्वारे निवडून येतात.

१९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्ती कायद्याने १९७१ च्या शिरगणतीनुसार मतदारसंघाची जी आखणी करण्यात आलेली आहे ती २००० सालानंतर होणाऱ्या जणगणनेचे आकडे उपलब्ध होईपर्यंत राहील अशी तरतूद करण्यात आली होती. २००० साली केंद्र सरकारने कायदा करून सध्याची मतदारसंघाची संख्या २०२६ सालापर्यंत कायम राहील, असे ठरविले आहे.

**मतदान व निवडणूक पद्धती** (Votings & Election Method) **:**

विधानसभा सदस्यांची निवड गुप्त मतदान पद्धतीने प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वानुसार केली जाते. विधानसभा निवडणूकासाठी निवडणूक आयोगाने तयार केलेल्या मतदार यादीतील प्रत्येक स्त्री-पुरुष नागरिकाला मतदानाचा अधिकार असतो. मतदारासाठी वय व पात्रता संसद निश्चित करते. १८ वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याही स्त्री-पुरुष नागरिकाला विधानसभा निवडणूकीत मतदानाचा अधिकार प्राप्त होतो. (१९८८ च्या ६१ व्या घटनादुरुस्तीने लोकसभा व राज्यविधान सभेच्या निवडणूकीसाठी मतदानाचे वय २१ वर्षावरून १८ वर्षे केले आहे.) प्रत्येक मतदाराला एकच मत देण्याचा अधिकार असतो. प्रत्येक मतदार संघातून एकच प्रतिनिधी निवडला जातो. प्रादेशिक एक प्रतिनिधी मतदारसंघाची पद्धती विधानसभेच्या सदस्यांच्या निवडीसाठी स्वीकारली जाते. प्रत्येक मतदार संघात अनेक उमेदवार निवडणूक लढवू शकत असले तरी सर्वात जास्त मते मिळविणारा एकच उमेदवार विजयी म्हणून घोषित केला जातो. त्याला आमदार म्हणून ओळखले जाते.

**विधानसभा सदस्यत्वासाठी पात्रता** (Qualifications) **:**

विधानसभेची निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवाराच्या ठिकाणी पुढील पात्रता असणे आवश्यक असते.

१) तो उमेदवार भारताचा नागरिक असला पाहिजे.

२) त्याचे वय २५ वर्षे पूर्ण असले पाहिजे.

३) त्याने संसदेने वेळोवेळी ठरवून दिलेल्या पात्रता / अर्हता संबंधी अटी पूर्ण केलेल्या असाव्यात.

४) उमेदवाराचे नाव राज्यातील कोणत्याही विधानसभा मतदार संघातील मतदार यादीत असले पाहिजे.

५) राखीव जागेसाठी निवडणूक लढवणारी व्यक्ती (उमेदवार) संबंधित प्रवर्गातून आलेली असावी.

**अपात्रता** (Disqualifications) **:**

विधानसभेच्या सदस्यत्वासाठी काही अपात्रतेचे निकष पुढीलप्रमाणे ठरवून दिलेले आहेत.

१) भारत सरकारची अथवा घटक राज्य सरकारची नोकरी करत असेल किंवा आर्थिक प्राप्तीचे पद धारण केले असेल तर तो उमेदवार निवडणुकीस अपात्र समजला जातो. अशा व्यक्तीला निवडणुकीचा अर्ज भरण्यापूर्वी त्या पदाचा राजीनामा द्यावा लागतो आणि तो मंजूर व्हावा लागतो. तेव्हाच ती व्यक्ती निवडणुकीस पात्र ठरते.

२) न्यायालयाद्वारे वेडी म्हणून घोषित झालेली व्यक्ती तसेच दिवाळखोर व्यक्ती निवडणुकीसाठी अपात्र ठरते.

३) कोणतीही व्यक्ती एकाच वेळी राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे सभासदत्व स्वीकारू शकत नाही. एखाद्या व्यक्तीची निवड दोन्ही सभागृहावर झाली तर तिला कोणत्याही एका सभागृहाचे सभासदत्व सोडावे लागते.

४) एकाच वेळी दोन किंवा अधिक घटक राज्यांच्या विधिमंडळाचे सदस्यत्व व्यक्तीला स्वीकारता येत नाही. एक व्यक्ती एकाच घटक राज्याच्या विधिमंडळाच्या एकाच गृहाचे सदस्यत्व स्वीकारू शकते.

५) एखादा सदस्य सभागृहाच्या सर्व बैठकीस पूर्व परवानगी शिवाय सलग ६० दिवस गैरहजर / अनुपस्थित राहिला तर त्याचेही सदस्यत्व रद्द होऊ शकते.

६) भारताची नागरिक नसणारी आणि संसदेने कायद्याद्वारे अयोग्य ठरविलेली व्यक्ती अपात्र ठरविली जाते.

७) संविधानाच्या कलम १८८ मधील अटी पूर्ण न करता विधिमंडळाच्या सभागृहात बसेल अगर मत देईल किंवा सभासदत्वास अपात्र असतांनाही बसेल तिला संविधानाच्या कलम १९३ नुसार प्रतिदिन पाचशे रुपये दंड होईल.

८) संसदेने ठरविलेल्या निवडणूक कायद्याचा भंग केला किंवा निवडणूक खर्चाचा हिशेब वेळेत दिला नसेल तर त्या व्यक्तीचे सदस्यत्व रद्द होऊ शकते.

९) एखाद्या सदस्याने पक्षांतर केल्यास १९८५ च्या पक्षांतर बंदीच्या कायद्यानुसार त्याचे सदस्यत्व रद्द करता येते.

१०) विधानसभा सदस्य आपल्या इच्छेनुसार सदस्यत्वाचा राजीनामा सभापती/अध्यक्ष यांच्याकडे देऊ शकतो.

**विधिमंडळाचे अधिवेशन** (Sessions of Legislature) **:**

राज्यपालाला आवश्यक वाटेल त्यावेळी आणि राज्यातील त्याच्या दृष्टीने योग्य अशा ठिकाणी विधिमंडळाचे अधिवेशन बोलविण्याचा अधिकार आहे. परंतु राज्यपालावर असे घटनात्मक बंधन आहे की, त्याने विधिमंडळाची प्रत्येक वर्षातून दोन अधिवेशने बोलविली पाहिजेत. तसेच पहिल्या बैठकीच्या शेवटचा दिवस आणि दुसऱ्या

बैठकीचा पहिला दिवस ह्यामध्ये सहा महिन्यांपेक्षा (१८० दिवसापेक्षा) जास्त कालावधी असू नये हे बंधनही त्यांनी पाळलेच पाहिजे. संविधानाच्या कलम १७४ नुसार राज्यपाल विधिमंडळाचे अतिरिक्त अधिवेशनही बोलवू शकतात. तसेच संविधानाच्या कलम १७४ (२) नुसार राज्यपाल विधानसभा केव्हाही स्थगित करू शकतात. महाराष्ट्र विधिमंडळाची उन्हाळी, पावसाळी व हिवाळी अशी तीन अधिवेशने होतात. उन्हाळी (अर्थसंकल्पयीय) व पावसाळी अधिवेशन मुंबईला तर हिवाळी अधिवेशन महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूरला होते.

**गणसंख्या** (Quorum) **:**

सभागृहाची गणसंख्या १० सदस्य वा सभागृहाच्या एकूण सदस्यांपैकी १/१० यापैकी जी संख्या अधिक असेल, ती गणसंख्या मानली जाते. (कलम १८९ (३))

विधानसभेचे कामकाज (बैठक) सुरू होण्यासाठी एकूण सदस्यांच्या १/१० सदस्य सभागृहात हजर असावे लागतात. म्हणजे महाराष्ट्राच्या विधानसभेत किमान २९ सदस्य हजर (उपस्थित) असल्याशिवाय कामकाजास सुरवात करता येत नाही.

**विधानसभेचा कार्यकाल** (Duration of Assembly) **:**

लोकसभेप्रमाणेच विधानसभेचा कार्यकाळ निवडणुकीनंतरच्या पहिल्या बैठकीपासून पुढील पाच वर्षे असा असतो. पाच वर्षाचा कार्यकाळ संपल्यानंतर विधानसभा आपोआप विसर्जित होते. मात्र मुदपूर्व निवडणुका घेण्यासाठी राज्यपाल विधानसभा केव्हाही कोणत्याही वेळी (पाच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वी सुद्धा) विसर्जित (बरखास्त) करू शकतात.

आणीबाणीच्या काळात विधानसभेचा कार्यकाल संसदीय कायद्याद्वारे एकावेळी एक वर्षाने (कितीही वेळा) वाढविता येतो. आणीबाणी संपल्यानंतर हा कार्यकाल जास्तीत जासात सहा महिन्यांपेक्षा जास्त वाढवता येत नाही. आणीबाणीची परिस्थिती संपताच सहा महिन्यांच्या आत नव्या निवडणुका घेणे बंधनकारक आहे. एखाद्या घटक राज्यात जास्तीत जास्त तीन वर्षे राष्ट्रपती राजवट चालू ठेवता येते. एखाद्या घटक राज्यात राजकीय पेचप्रसंग निर्माण झाल्यास किंवा राज्यकारभारात अस्थिरता निर्माण झाल्यास राज्यपाल राष्ट्रपतीच्या सल्ल्याने तेथील विधानसभा विसर्जित (बरखास्त) करू शकतो. थोडक्यात, विधानसभेचा कार्यकाल सर्वसाधारणपणे पाच वर्षाचा असतो.

**वेतन व भत्ते :**

विधानसभा सदस्यांचे वेतन व भत्ते ठरविण्याचा अधिकार राज्य विधिमंडळास असतो. सदस्यांच्या कार्यकाळात त्यांचे वेतन व भत्ते कमी न करता वेळोवेळी आवश्यकतेनुसार त्यात वाढ केली जाते.

**विधानसभेचे पदाधिकारी (सभापती व उपसभापती) :**

◆ **विधानसभा सभापती** (Speaker of Assembly) **:**

विधानसभेच्या पहिल्या बैठकीत सदस्यांकडून विधानसभा सदस्यांपैकी एकाची सभापतीपदी निवड केली

जाते. सामान्यत: सभापतीची मुदत ही विधानसभेचा कालावधी संपेपर्यंत असते, परंतु पढील तीन परिस्थितीत कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वीच त्याला आपले पद रिक्त करावे लागते. १) जर त्याचे विधानसभेचे सदस्यत्व संपुष्टात आले असेल, २) जर त्याने आपल्या पदाचा राजीनामा उपसभापतीला दिला असेल. ३) जर त्याला पदावरून दूर करण्याचा ठराव विधानसभेने बहुमताने मंजूर केला असेल. मात्र चौदा (१४) दिवसांची पूर्वसूचना दिल्याशिवाय सभागृहात अशा प्रकारचा ठराव मांडता येत नाही.

वरील तीन परिस्थितीत सभापतीला आपला कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वीच पद रिक्त करावे लागते. विधानसभा सभापती व उपसभापतीला पीठासीन अधिकारी म्हणूनही ओळखले जाते. विधानसभा सभापती विधानसभा उपसभापतीकडे राजीनामा देतात.

सभापतीच्या गैरहजेरीत उपसभापती सभागृहाचे कामकाज पाहतो. सभापती व उपसभापती यांचे वेतन व भत्ते विधानसभा ठरविते. विधानसभेचे उपसभापतीपद विरोधी पक्षाला देण्याची प्रथा आहे.

**सभापती पदाचे महत्त्व :**

विधानसभेच्या सभापतीचे पद अत्यंत सन्मानाचे व प्रतिष्ठेचे समजले जाते. कारण विधानसभा सभागृहात त्याचा अधिकार सर्वश्रेष्ठ असतो. सभागृहाच्या मध्यभागी सभापतीचे आसन असते. सभागृहात प्रवेश करताना तसेच सभागृहातून बाहेर पडताना मुख्यमंत्री, मंत्रिमंडळाचे सर्व सदस्य आणि सभागृहाचे अन्य सर्व सभासद सभापतीला अभिवादन करीत असतात. सभापतीची अनुमती असल्याशिवाय कोणताही सदस्य सभागृहात स्वत:चे विचार व्यक्त करू शकत नाही. यावरून सभापतीपदाचे महत्त्व स्पष्ट होते.

**विधानसभेच्या सभापतीचे अधिकार व कार्ये :**

**१) सभागृहाच्या कामकाजावर नियंत्रण :**

सभागृहाचे अध्यक्ष स्थान भूषवून सभागृहाच्या कामकाजाचे नियमन (नियंत्रण) करणे हे सभापतीचे सर्वात महत्त्वाचे कार्य आहे. सभागृहाच्या कामकाजाचे नियमन करणे म्हणजेच सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालविणे, हे कार्य करण्यासाठी त्याला अनेक अधिकार प्राप्त होतात. उदा. विधानसभा सदस्यांनी सभागृहात मांडलेला प्रस्ताव वा ठराव स्वीकारणे अथवा नाकारणे, प्रत्येक विषयावर चर्चा करण्यासाठी सदस्यांना वेळेची मर्यादा ठरवून देणे, किती आणि कोणत्या सदस्यांना सभागृहात त्यांचे विचार मांडण्यासाठी संमती द्यावी हे ठरविणे इ.

**२) सभागृहात शिस्त राखणे :**

विधानसभेत शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करून शिस्त राखणे, सभागृहाची प्रतिष्ठा कायम राखणे, एखाद्या सदस्याने त्याच्या भाषणात अनुचित उद्गार काढले किंवा असंसदीय शब्द वापरले तर त्यावर प्रतिबंध घालण्याचा सभापतीला अधिकार आहे.

**३) अर्थविधेयक ठरविणे :**

एखादे विधेयक हे अर्थविधेयक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार सभापतीला आहे.

**४) विधेयकावर मतदान घेणे :**

विधानसभा सदस्यांच्या विनंतीवरून विधेयकावर सभागृहाचे मत अजमावणे, अशावेळी समान मते पडल्यास स्वत:चे निर्णायक मत (casting vote) देणे

**५) प्रस्तावांना, ठरावांना मान्यता देणे :**

विधानसभेत मांडण्यात येणाऱ्या प्रस्तावांना, ठरावांना मान्यता देणे, सदस्यांना पुरवणी प्रश्न विचारण्यास परवानगी देणे किंवा नाकारणे, अयोग्य, असंसदीय प्रश्नांना प्रतिबंध करणे.

**६) सभागृहाचे कामकाज स्थगित करणे :**

सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्यास, सभागृहाचे कामकाज काही काळ तहकूब करणे, स्थगित करणे.

**७) सदस्यांचा राजीनामा स्वीकारणे :**

विधानसभेच्या सदस्याने आपल्या सदस्यत्वाचा दिलेला राजीनामा दडपणाखाली दिला नाही याची खात्री करून घेण्याचा त्याला अधिकार आहे. अशी खात्री करून घेतल्यानंतर तो सदस्याचा राजीनामा स्वीकारतो.

**८) सदस्याच्या पक्षांतरासंबंधी निर्णय घेणे :**

एखाद्या सदस्याने पक्षांतर केले आहे किंवा नाही याविषयीचा निर्णय घेण्याचा अधिकार सभापतीला प्राप्त झाला आहे.

**९) विधानसभा सदस्यांच्या अधिकारांचे रक्षण करणे :**

विधानसभा सभासदांना संरक्षण देणे, त्यांच्या विशेष अधिकारांचे रक्षण करणे ही जबाबदारी सभापतीची असते.

**१०) विविध समित्यांच्या अध्यक्षांची नेमणूक :**

विधानसभेच्या विविध समित्यांच्या अध्यक्षांची नेमणूक करण्याचा अधिकार सभापतीला असतो.

**११) गणसंख्या अभावी बैठक स्थगित करणे :**

विधानसभेची बैठक (कामकाज) सुरू होण्यासाठी एकूण सभासदांच्या १/१० सभासद सभागृहात उपस्थित असणे आवश्यक असते. उदा. महाराष्ट्रात विधानसभेची बैठक सुरू होण्यासाठी २९ सदस्य उपस्थित असणे आवश्यक आहे. तेवढे सदस्य उपस्थित नसतील तर गणपूर्ती होईपर्यंत सभागृहाची बैठक सभापती स्थगित ठेवतो. एकंदरीत, गणसंख्या अपूर्ण असेल तर सभापती सभागृहाची बैठक स्थगित ठेवतो.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, सभापतीचे पद हे अत्यंत महत्त्वाचे आणि प्रतिष्ठेचे आहे. सभापती

हा संपूर्ण सभागृहाचे प्रतिनिधित्व करीत असतो. सभागृहाची प्रतिष्ठा, स्वातंत्र्य टिकविण्याची संपूर्ण जबाबदारी त्याच्यावर असते. नि:पक्षपातीपणे सभागृहाचे कामकाज चालवून तो कायदेनिर्मितीचे कार्य करीत असतो. सभापतीच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव सभागृहाच्या कामकाजावर पडत असतो.

◆ **विधानसभेचा उपसभापती** (Deputy Speaker of Assembly) **:**

सभापतीच्या गैरहजेरीत सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालविण्याचे कार्य उपसभापतीचे असते. त्यासाठी त्याची निवड झालेली आहे. सभापतीप्रमाणेच विधानसभेचे सदस्य आपल्यातूनच एकाची उपभसापती पदासाठी निवड करतात. उपसभापती पदासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची समानसंधी सर्व सदस्यांना दिली जाते. एकापेक्षा जास्त उमेदवारी अर्ज आल्यास मतदान घेतले जाते. उपसभापतीचा कार्यकाल पाच वर्षाचा आहे. कार्यकाळ संपण्यापूर्वी तो आपल्या पदाचा राजीनामा सभापतीकडे पाठवू शकतो. १४ दिवसांची पूर्वसूचना देऊन त्याचे विरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडला जाऊ शकतो. हा ठराव विधानसभेत बहुमताने मंजूर झाल्यास त्याला उपसभापती पदाचा त्याग करावा लागतो. विधानसभा सभापती विधानसभा उपसभापतीकडे राजीनामा देतो.

**उपसभापतींचे अधिकार व कार्ये :**

१) विधानसभा सभापतीच्या गैरहजेरीत सभागृहाचा सभापती म्हणून कार्य करतांना त्याला सभापती पदाचे सर्व अधिकार प्राप्त होतात.

२) विधानसभागृहाच्या समितीचा सदस्य म्हणून त्याची निवड झाल्यास तो त्या समितीचा अध्यक्ष बनतो.

३) उपसभापती या नात्याने तो सभागृहाच्या समितीच्या बैठकीत उपस्थित राहू शकतो आणि तो त्या समितीचे अध्यक्षस्थान ग्रहण करू शकतो.

४) विधानसभा सभागृहात सभापती उपस्थित असताना एक सदस्य म्हणून अन्य सदस्यांप्रमाणेच सभागृहाच्या कामकाजात सहभागी होण्याचा त्याला अधिकार आहे.

वरीलप्रमाणे विधानसभा सभापतीच्या गैरहजेरीत उपसभापतीला अधिकार व कार्ये करावी लागतात.

◆ **विधानसभेचे अधिकार व कार्ये :**

विधानसभागृहाला खालीलप्रमाणे अधिकार देण्यात आलेले आहेत.

**१) कायदेविषयक (विधिविषयक) अधिकार :**

विधानसभा हे राज्यविधिमंडळाचे कनिष्ठ सभागृह असून कायदे करणारी सर्वोच्च संस्था आहे. विधानसभेला राज्याच्या क्षेत्रामध्ये लागू होणारे कायदे बनवण्याचा अधिकार आहे. राज्सूची व समवर्ती सूचीतील विषयावर कायदे बनविण्याचा अधिकार विधानसभेला आहे. राज्यसूचतील सर्व ६६ विषयांवर कायदे करण्याचा, केलेल्या कायद्यात दुरुस्त्या करण्याचा अथवा तो रद्द करण्याचा अधिकार विधानसभेला आहे. तसेच सामाईक (समवर्ती) सामाईक सूचतील विषयावर कायदा करण्याचा केंद्र सरकार व राज्य सरकार या दोघांनाही समान अधिकार आहे. मात्र, समवर्ती (सामाईक) सूचीतील एकाच विषयावर केंद्र सरकार व घटक राज्य सरकार यांनी कायदा केला

तर केंद्रसरकारचा कायदा ग्राह्य प्रमाण (श्रेष्ठ) मानला जातो. तसेच समवर्ती सूचीतील एखाद्या विषयावर राज्याच्या विधिमंडळाने कायदा केला असेल तर त्याच विषयासंबंधी संसद कायदा करू शकते. परंतु संसदेने सामाईक सूचीतील एखाद्या विषयासंबंधी कायदा केला असेल व त्यास राष्ट्रपतीने संमती दिलेली असेल तर राज्याच्या विधिमंडळाला त्याच विषयासंबंधी कायदा करता येत नाही. एकंदरीत समवर्ती सूचीतील विषयासंबंधी कायदे करण्याचा राज्यविधिमंडळाला मर्यादित अधिकार असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रसारख्या द्विगृही कायदेमंडळ (विधिमंडळ) असणाऱ्या घटकराज्यामध्ये धनविधेयक सोडून कोणतेही विधेयक कोणत्याही सभागृहात प्रथम मांडता येते. विधानसभेने मंजूर केलेले विधेयक विधानपरिषदेत मंजुरीसाठी पाठवले जाते. अशा विधेयकाला विधानपरिषद मंजुरी देऊ शकते किंवा त्यामध्ये दुरूस्त्या, सुधारणा सुचवू शकते किंवा त्यामध्ये दुरुस्त्या, सुधारणा सुचवू शकते किंवा नाकारू शकते. विधानपरिषदेला तीन महिन्यांच्या आत ते विधेयक परत पाठवावे लागते. विधानपरिषदेने सुधारणा सुचविलेले किंवा नाकारलेले विधेयक विधानसभेने पुन्हा दुसऱ्या वेळी मंजूर करून विधानपरिषदेकडे पाठविले तर एक महिन्याच्या आत ते विधेयक मंजूर करून विधानसभेला परत पाठवावे लागते. एक महिन्याच्या आत ते विधेयक परत आले नाही तर ते विधेयक विधानपरिषदेला मंजूर आहे असे समजून राज्यपालांच्या संमतीसाठी पाठविले जाते. राज्यपालाने मंजूर केलेल्या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होते. राज्यपालाने नामंजूर केलेले विधेयक पुन्हा मंजूर करून राज्यपालाकडे दुसऱ्यावेळी सहीसाठी आले तर राज्यपाल त्यास मंजूरी देतो. विधानपरिषद एखाद्या विधेयकाच्या मंजूरीसाठी जास्तीत जास्त चार महिने विलंब लावू शकते. कायदे निर्मितीच्या अधिकारात विधानपरिषदेपेक्षा विधानसभेला जास्त अधिकार आहेत. धन विधेयकाशिवाय बहुतांश इतर विधेयकेही प्रामुख्याने विधानसभेतच मांडली जातात. कायदेनिर्मितीची प्रक्रिया सर्वसाधारणपणे संसदेप्रमाणेच म्हणजे प्रथम वाचन, द्वितीय वाचन आणि तृतीय वाचन अशा रीतीने कार्यान्वित होते, आमलात येते.

विधानपरिषद व विधानसभा या दोहोंत एखाद्या विधेयकाच्या मंजुरीबाबत मतभेद झाल्यास संयुक्त अधिवेशन बोलविण्याची घटनात्मक तरतूद नाही. विधानसभेचा निर्णय अंतिम असतो.

राज्यविधिमंडळाच्या कायदेविषयक अधिकारावर काही मर्यादा घालण्यात आलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे-

१) काही महत्त्वाची विधेयके विधिमंडळापुढे मांडण्यापूर्वी त्यांना राष्ट्रपतीची पूर्वसंमती घ्यावी लागते. उदा. दोन राज्यातील व्यापार, संचार स्वातंत्र्य इत्यादी विधेयके.

२) काही विधेयके राष्ट्रपतीच्या संमतीसाठी राखून ठेवण्यात येतात. कर्ज उभारणी, संपत्ती प्राप्त करणे अशी विधेयके, सामाईक सूचीमधील (Concurrent list) विधेयके राष्ट्रपतीच्या संमतीसाठी राखून ठेवली जातात.

३) आणीबाणीच्या काळात संसदेला राज्यसूचीतील सर्व विषयांवर कायदे करता येतात.

४) सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालय यांच्या कोणत्याही कामकाजाची चर्चा विधिमंडळात केली जात नाही.

५) राज्यसूचीतील एखाद्या विषयासंबंधी संसदेला कायदा करता येतो. परंतु राज्यसभेने बहुमताने तशा आशयाचा ठराव करावा लागतो.

**२) कार्यकारी अधिकार (राज्य कार्यकारी मंडळावर नियंत्रणाचा अधिकार) :**

घटनेनुसार राज्याच्या मंत्रिमंडळावर (कार्यकारी मंडळावर) नियंत्रण ठेवण्याचे संदर्भात विधानसभेलाच सर्व अधिकार आहेत. भारतीय घटकराज्यात केंद्राप्रमाणेच संसदीय लोकशाही शासनपद्धती अस्तित्वात आहे. या शासनपद्धतीत कार्यकारी विषयक (शासनविषयक) वास्तविक सर्व सत्ता आणि अधिकार राज्यमंत्रीमंडळाच्या हाती असते. मंत्रीमंडळाची निर्मिती विधानसभेतूनच होत असते. विधिमंडळाची म्हणजेच विधानसभेची मंजूरी मिळाल्याशिवाय राज्यमंत्रीमंडळाला आपल्या ध्येयधोरणांची व निर्णयांची अंमलबजावणी करता येत नाही. भारतीय घटनेच्या १६४ व्या कलमानुसार मंत्रीमंडळ हे नेहमी आपल्या कार्याप्रती सामूहिकरित्या विधिमंडळाला म्हणजेच विधानसभेला जबाबदार असते. विधिमंडळाच्या म्हणजे प्रामुख्याने विधानसभेचा विश्वास असेपर्यंत मंत्रिपरिषद (मंत्रीमंडळ) आपल्या पदावर राहू शकते. विधानसभेत मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वास प्रकट झाला तर मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. त्यामुळेच मुख्यमंत्री आपल्या सर्व मंत्र्यासह सामूहिकरित्या विधानसभेलाच जबाबदार राहून कार्यरत असतो. तो नेहमी विधानभेच्या विश्वासाथ पात्र राहण्याचा प्रयत्न करतो. एकंदरीत राज्य मंत्रिमंडळाच्या शासन कार्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार विधानसभेला असतो. यालाच विधानसभेचा शासनविषयक किंवा कार्यकारीविषयक अधिकार म्हणतात. कार्यकारी स्वरूपाच्या अधिकाराबाबत विधानपरिषदेपेक्षा विधानसभेला जास्त अधिकार आहेत.

राज्यविधिमंडळ (विधानसभा व विधानपरिषद) सदस्य वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब करून राज्य कार्यकारी मंडळाच्या (मंत्रिमंडळाच्या) शासनविषयक कार्यावर नियंत्रण ठेवतात. यामध्ये प्रामुख्याने विधिमंडळाच्या अधिवेशन काळात विधानसभेत मंत्र्यांना त्यांच्या खात्याचे धोरण, निर्णय व कामकाजासंबंधी प्रश्न-उपप्रश्न व माहिती विचारून त्यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवले जाते. एखाद्या अत्यंत महत्त्वाच्या तातडीच्या व सार्वजनिक दृष्ट्या महत्त्वाच्या विषयावर, प्रश्नावर (उदा. अपघात, दंगली, दहशतवादी हल्ला, भूकंप, पूर इ.) शासन आणि जणतेचे लक्ष केंद्रित करण्यासाठी स्थगन प्रस्ताव (तहकुबीचा ठराव, काम रोको प्रस्ताव, निंदा व्यंजक प्रस्ताव) मांडणे. मंत्र्यांच्या बेकायदेशीर कृत्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मंत्रिमंडळावर निंदाव्यंजक ठराव मांडणे. एखाद्या विषयावर शासनाची भूमिका जाणून घेण्यासाठी प्रशासकीय घटनेसंबंधी खुलासा मागविणे. मंत्रिमंडळाने मांडलेले अर्थविधेयक नाकारणे अथवा सरकारच्या अनावश्यक खर्चाला प्रतिबंध घालण्यासाठी कपात सूचना मांडणे किंवा मंत्रिमंडळाला नको असलेले विधेयक मांडून सरकार विरुद्ध विरोध दर्शविणे. मंत्रिमंडळाच्या कामासंबंधी किंवा मांडलेल्या विधेयकासंबंधी नाराजी व्यक्त करून विरोधी पक्षाचे सदस्य कामकाजावर बहिष्कार टाकतात. अकार्यक्षम शासनाच्या धोरणावर निर्णयावर टीका करणे. तसेच गरज भासल्यास मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडणे, अविश्वास ठराव मंजूर झाल्यास मुख्यमंत्र्यासह मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. अशा अनेक मार्गाचा अवलंब करून विधानसभा राज्यमंत्रिमंडळाच्या कार्यावर नियंत्रण ठेवते.

राज्यविधिमंडळासमोर अभिभाषण करण्याचा अधिकार राज्यपालाला असतो. राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे मंत्रिमंडळाचे ध्येयधोरण असते. राज्यपालाच्या अभिभाषणावर धन्यवाद व्यक्त करणाऱ्या ठरावा ला

असंमती किंवा विरोध दर्शवून विधानसभा कार्यकारी मंडळावर, शासनाच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत असते. थोडक्यात, विधानसभा वरील विविध संसदीय विधिमंडळीय आयुधांचा (साधनांचा/मार्गाचा) अवलंब करून कार्यकारी मंडळावर, मंत्रिमंडळावर सतत नियंत्रण ठेवत असल्यामुळे मंत्रिमंडळ जागरूकपणे व जबाबदारीने काम करत असते.

**३) आर्थिक अधिकार (वित्तविषयक अधिकार) :**

घटक राज्याच्या आर्थिक बाबींवर सर्वस्वी विधानसभेचाच अधिकार चालतो. त्यानुसार अर्थविधेयक (धनविधेयक) प्रथम विधानसभेतच मांडले जाते. कोणतेही अर्थविधेयक विधानपरिषदेत मांडता येत नाही. तर ते प्रथम विधानसभेतच मांडले जाते. धनविधेयक (Money Bill) कोणते हे ठरविण्याचा अधिकार विधानसभेच्या सभापतीला असतो. विधानसभेने जर अर्थविधेयक अमान्य केले तर मंत्रिमंडळाला पदत्याग करावा लागतो. प्रत्येक अर्थविधेयक हे सरकारी विधेयक मानले जाते आणि ते केवळ मंत्र्यामार्फतच मांडता येते. अर्थविधेयक म्हणजे सरकारच्या महसूल आणि खर्चाशी संबंधित प्रस्तावित कायदेशीर तरतुदींचे विधेयक असते. विधानसभेने पास केलेले अर्थविधेयक विधानपरिषदेकडे संमतीसाठी पाठविले जाते. अर्थविधेयक विधानपरिषदेकडे आल्यापासून १४ दिवसांच्या आत शिफारशींसह परत विधानसभेकडे पाठवणे गरजेचे असते. विधान परिषदेने केलेल्या शिफारशी विधानसभेने स्वीकारल्या पाहिजेतच असे बंधन नसते. विधानपरिषदेने १४ दिवसांच्या आत धनविधेयक परत पाठवले नाही तर तो कालावधी संपल्यावर विधानसभेने मूळ पाठवलेले विधेयक जसे पारित केले होते त्या स्वरूपात दोन्ही सभागृहांनी संमत केले आहे, असे मानले जाते व ते विधेयक राज्यपालाच्या संमतीसाठी पाठविले जाते. विधानपरिषदेला अर्थविधेयकाला १४ दिवसांचा विलंब लावण्याव्यतिरिक्त कोणताच अधिकार नाही. विधानसभेने मंजूर केलेले अर्थविधेयक राज्यपाल नाकारू शकत नाही. (कारण त्याच्या संमतीनेच ते सभागृहात मांडलेले असते.) त्या विधेयकाला त्याला मंजुरी द्यावीच लागते.

विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे अंदाजपत्रक मांडण्यात येते. विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहात अंदाजपत्रकावर चर्चा होते. परंतु अंदाजपत्रकाला मंजुरी देण्याचा अधिकार फक्त विधानसभेलाच आहे. विविध स्वरूपाच्या अनुदानाच्या मागणीसंबंधी दोन्ही सभागृहात वादविवाद होतो. परंतु मतदान फक्त विधानसभेत होते व त्याला मंजूरी दिली जाते. तसेच विधानसभेकडून अनुमान समिती व लोकलेखा समिती नियुक्त करून आर्थिक नियंत्रण ठेवले जाते. थोडक्यात, घटकराज्याच्या आर्थिक बाबतीत राज्ससूचीमध्ये नमूद केलेल्या विषयांबाबत नवीन कर लावण्याचा, करात बदल करणे, जुने कर रद्द करणे याबाबतीत अंतिम अधिकार विधानसभेला आहेत. असे अधिकार विधान परिषदेला नाहीत.

**४) घटनादुरुस्ती विषयक अधिकार :**

भारतीय संविधानात घटनादुरुस्ती करण्याचा प्रस्ताव मांडण्याचा अधिकार संसदेला आहे. परंतु घटनादुरुस्तीच्या काही प्रस्तावांना संसदेच्या संमतीशिवाय निम्म्यापेक्षा जास्त घटक राज्यांच्या विधिमंडळाची संमती (मंजूरी) आवश्यक असते. उदा. राष्ट्रपतीची निवडणूक, सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र, केंद्र-राज्य अधिकाराची विभागणी, राज्यांचे राज्यसभेतील प्रतिनिधित्व किंवा संविधानाची दुरुस्ती पद्धती याबाबत नियम (धोरण तरतूद) बदलणारी दुरुस्ती इत्यादींचा घटक राज्यांच्या हितसंबंधाशी महत्त्वाचा संबंध येतो. अशा

स्वरूपाच्या घटनादुरुस्तीच्या विधेयकाला एकूण घटक राज्यांपैकी निम्म्याहून अधिक घटकराज्यांच्या विधानसभांनी बहुमताने मंजुरी देणे आवश्यक असते.

संसदेने मंजूर केलेला घटना दुरुस्तीचा प्रस्ताव विधानसभेसमोर येतो. या ठरावावर सभागृहात चर्चा होते. घटनादुरुस्तीचा हा प्रस्ताव मंजूर करण्याचा किंवा फेटाळण्याचा अधिकार विधानसभेला आहे. मात्र या ठरावात (प्रस्तावात) दुरुस्ती सुचविण्याचा अधिकार विधानसभेला नाही. घटनादुरुस्तीचा अधिकार विधानसभेला देण्यात आलेला आहे, विधान परिषदेला हा अधिकार देण्यात आलेला नाही.

**५) निवडणुकीसंबंधीचा अधिकार (निर्वाचनविषयक अधिकार) :**

निवडणूक विषयक (निर्वाचन विषयक) अधिकारात विधानसभेला विविध क्षेत्रात आपले प्रतिनिधी निवडून देण्याचा अधिकार आहे. विधानसभेच्या निर्वाचन विषयक अधिकारामध्ये भारताच्या राष्ट्रपतीच्या निवडणुकीत मतदान करण्याचा, महाराष्ट्रातून राज्यसभेवर पाठविल्या जाणाऱ्या १९ सभासदांच्या निवडणुकीत मतदान करण्याचा, महाराष्ट्राच्या विधानपरिषद सभागृहावर १/३ सदस्य निवडून देण्याचा अधिकार फक्त विधानसभेच्या निर्वाचित सदस्यांना आहे. विधानपरिषद सदस्याला असे निर्वाचन विषयक अधिकार दिलेले नाहीत. याशिवाय विधानसभेच्या सभापती व उपसभापतीच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार विधानसभेच्या निर्वाचित सभासदांना असतो.

**इतर अधिकार :**

संसदेप्रमाणे राज्याच्या विधिमंडळाला (विधानसभा व विधानपरिषद) सदस्यांचे सभासदत्व स्थगित करण्याचा, विलंबित करण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार दिलेला आहे. सभागृहाच्या नियमांचा भंग करणे, सभापतीविषयी अनादर व्यक्त करणे, सभागृहाच्या कामकाजात अडथळे आणणे, सभागृहात गोंधळ माजविणे. अशा कारणाने एखाद्या सदस्याचे सभासदत्व स्थगित किंवा रद्द करण्याचा अधिकार संबंधित सभागृहांना आहे. तसेच एखादा सदस्य सलग ६० दिवस सभागृहात बैठकांना पूर्व परवानगीशिवाय गैरहजर, अनुपस्थित राहिला तर त्याचे सदस्यत्व रद्द करण्याचा अधिकार विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहांना देण्यात आलेला आहे. याशिवाय, जनतेची गाऱ्हाणी, तक्रारी व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाचे प्रश्न सभागृहात मांडण्याचे कार्य विधानसभा व विधानपरिषद सदस्य करत असतात. चौकशी आयोगाच्या आलेल्या अहवालावर चर्चा करण्याचा अधिकार केवळ विधानसभेला आहे. विधानपरिषदेला हा अधिकार नाही.

अशा प्रकारे वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, राज्य विधिमंडळाच्या दोन सभागृहांपैकी विधानसभा या कनिष्ठ व जनतेच्या सभागृहाला विधानपरिषद या वरिष्ठ सभागृहापेक्षा सर्व बाबतीत अधिक अधिकार असल्याचे दिसून येतात. तर विधान परिषदेला अत्यंत मर्यादित व दुय्यम स्वरूपाचे अधिकार असल्याचे दिसतात.

**विधानसभेचे स्थान व महत्त्व :**

विधानसभा हे घटक राज्यातील लोकांचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह असल्याने लोकशाही शासन

व्यवस्थेत या सभागृहाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. संसदीय शासन पद्धतीत / व्यवस्थेत घटक राज्यांच्या राज्यकारभाराची वास्तविक सत्ता राज्यमंत्रीमंडळाकडे असते. मंत्रिमंडळ आपल्या कार्याप्रती सामूहिकरित्या विधानसभेला जबाबदार असते. एखादे विधेयक धनविधेयक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार व त्याला प्रथम सभागृहात (विधानसभेत) मांडून मंजूर करण्याचा निर्णायक अधिकार विधानसभेलाच असतो. राज्यशासनाच्या ध्येयधोरणांना संमती देण्याचा व शासनाच्या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार विधानसभेला असतो. सार्वजनिक लेखा समिती, अंदाज समिती यासारख्या आर्थिक समितीच्या माध्यमातून शासनाच्या अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवणे व सार्वजनिक पैशाची उधळपट्टी थांबविणे या दृष्टिकोणातून विधानसभेचे महत्त्व मोठे आहे.

राज्यमंत्रिमंडळावर अविश्वास ठराव मांडण्याचा व तो मंजूर करण्याचा विशेष अधिकारामुळे राज्य शासनावरील विधानसभेचे नियंत्रण प्रभावी ठरते. यामुळे विधान परिषदेच्या तुलनेत विधानसभेचे स्थान उच्च दर्जाचे असल्याचे दिसून येते.

**विधानसभा विधानपरिषदेपेक्षा अधिक शक्तीशाली सभागृह :**

महाराष्ट्रसारख्या द्विगृही विधिमंडळ (कायदेमंडळ) असलेल्या घटक राज्यात विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहांच्या अधिकार व कार्याचा तुलनात्मक अभ्यास केल्यास असे निदर्शनास येते की, विधानपरिषदेपेक्षा विधानसभेला जास्त अधिकार प्राप्त झालेले दिसतात. त्यामुळे विधानसभा हे सभागृह विधानपरिषदेपेक्षा अधिक शक्तीशाली (प्रभावी, श्रेष्ठ) सभागृह बनलेले आहे. त्याची चर्चा खालीलप्रमाणे -

**सर्वसाधारण विधेयकाबाबत** (Ordinary Bills) **:**

सर्वसाधारण विधेयकाबाबत विधानसभेचे अधिकार विधानपरिषदेपेक्षा शक्तीशाली ठरलेले आहेत. उदा. एखादे विधेयक विधानसभेने मंजूर केल्यानंतर विधानपरिषदेकडे पाठविले जाते. विधानपरिषद या विधेयकात दुरुस्त्या सुचवू शकते किंवा ते विधेयक बहुमताने फेटाळून लावू शकते किंवा त्या विधेयकावर सभागृहात कोणतीही चर्चा न करता व कोणताही निर्णय न घेता ते तसेच पडून राहू देऊ शकते. या तीनपैकी कोणतीही कृती विधानपरिषद करू शकते. अशा परिस्थितीत तीन (३) महिन्यांची मुदत संपल्यानंतर ते विधेयक पुन्हा दुसऱ्यांदा मंजूर करण्याचा अधिकार विधानसभेला आहे. विधानपरिषदेने त्या विधेयकात सुचविलेल्या दुरुस्त्या स्वीकारल्याच पाहिजेत असे बंधन विधानसभेवर नाही. विधानपरिषदेने विधेयकामध्ये सुचविलेल्या दुरुस्त्यांकडे दुर्लक्ष करण्याचा अधिकार विधानसभेला आहे. अशा प्रकारे तीन महिन्यांची मुदत संपल्यानंतर विधानसभा सर्वसाधारण विधेयक दुसऱ्यांदा मंजूर करते.

विधानसभेने दुसऱ्यांदा मंजूर केलेले विधेयक विधानपरिषदेकडे पाठविले जाते. विधानपरिषद त्या विधेयकात पुन्हा दुरुस्त्या सुचवू शकते किंवा ते विधेयक फेटाळून लावू शकते किंवा त्या विधेयकावर कोणतीही कृती विधानपरिषद करू शकते. अशा परिस्थितीत एक महिन्यांची मुदत संपल्यानंतर ते विधेयक विधानसभेने दुसऱ्यांदा पारित केले होते. त्याच स्वरुपात विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी पारित केले आहे, असे घोषित केले जाते व राज्यपालांकडे स्वाक्षरीसाठी पाठविले जाते. अशा प्रकारे विधानसभेने पारित केलेले सर्वसाधारण विधेयक

मंजूर करण्यात विधानपरिषद जास्तीत जास्त चार (४) महिन्यांचा विलंब लावू शकते. संविधाननेच विधानसभेला विधानपरिषदेपेक्षा अधिक अधिकार देऊन शक्तीशाली बनविलेले आहे.

**२) आर्थिक बाबतीत (अर्थविधेयकाबाबत) :**

अर्थविधेयकाबाबत देखील विधानसभेचे अधिकार विधानपरिषदेपेक्षा वरचढ ठरल्याचे दिसते. अर्थविधेयक फक्त विधानसभेतच मांडले जाते. एखादे विधेयक अर्थविधेयक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अंतिम अधिकार विधानसभेच्या सभापतीला आहे. विधानसभेने पारित केलेले अर्थविधेयक विधानपरिषदेत सादर केले जाते. विधानपरिषद त्यात काही नवीन दुरुस्त्या करण्याची शिफारस करू शकते. मात्र विधानपरिषदेने सुचविलेल्या दुरुस्त्या विधानसभेने स्वीकारल्या पाहिजेत असे बंधन विधानसभेवर नाही. विधानपरिषदेने अर्थविधेयकाबाबत कोणत्याही शिफारशी केल्या असल्या तरी १४ दिवसांची मुदत संपल्यानंतर अर्थविधेयक विधिमंडळाने पारित केले आहे, असे घोषित केले जाते. म्हणजे विधानपरिषद अर्थविधेयकाला जास्तीत जास्त १४ दिवसांचा विलंब लावू शकते.

**३) कार्यकारी मंडळावर (मंत्रीमंडळावर) नियंत्रण ठेवण्यासंबंधी :**

कार्यकारी मंडळावर (मंत्रीमंडळावर) नियंत्रण ठेवण्याच्या अधिकाराबाबत विधानसभा विधानपरिषदेपेक्षा वरचढ आहे. कारण दोन्ही सभागृहांना कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार असला तरी, मंत्रिपरिषदेवर अविश्वास ठराव मांडण्याचा अधिकार फक्त विधानसभेलाच आहे. हा अधिकार विधानपरिषदेला नाही. त्यामुळे मंत्रिमंडळाच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विधानपरिषदेपेक्षा विधानसभाच अधिक शक्तीशाली, प्रभावी ठरते.

**४) मंत्रिमंडळ निर्मितीबाबत :**

मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाच्या निर्मितीबाबत विधानसभा विधानपरिषदेपेक्षा शक्तीशाली ठरते. कारण विधानसभा हे जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह आहे. सभागृहात जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी असतात. अशा विधानसभेतील बहुमत प्राप्त पक्षाचा नेता मुख्यमंत्री बनतो व त्याच्या नेतृत्त्वात मंत्रिमंडळ तयार करतो. मात्र विधानपरिषदेला मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ निर्मितीचा अधिकार नसतो.

**५) निवडणूक विषयक :**

भारताचा राष्ट्रपती, महाराष्ट्रातून राज्यसभेवर पाठविण्यात येणारे सदस्य, विधानपरिषदेवर निवडून द्यावयाचे १/३ सदस्य यांच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार केवळ विधानसभेतील निर्वाचित सदस्यांना आहे. विधानपरिषदेला सदस्य निवडण्यासंबंधी कोणताही अधिकार नाही.

**६) विधानपरिषदेचे अस्तित्व विधानसभेवर अवलंबून :**

विधानपरिषदेचे अस्तित्व विधानसभेवर अवलंबून असते. विधानसभेच्या एकूण सभासदांच्या बहुमताने व उपस्थित व मतदान करणाऱ्या सभासदांच्या विशिष्ट बहुमताने (२/३) विधानपरिषद निर्माण करण्यासंबंधी अथवा रद्द, बरखास्त (विसर्जित) करण्याबाबतची मागणी विधानसभा संसदेकडे करू शकते व संसद त्यासंबंधी कायदा करू शकते.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, विधानसभा हे राज्य विधिमंडळाचे शक्तिशाली व प्रभावी सभागृह आहे. एकगृह विधिमंडळ असलेल्या राज्यात विधानसभेलाच सर्व अधिकार असतात. त्यामुळे राज्यविधिमंडळ म्हणजेच विधानसभा असे जणू समीकरणच बनले आहे. एकंदरीत विधानपरिषद हे सभागृह विधानसभेपेक्षा कमी महत्त्वाचे व अनावश्यक मानले जाते. कायदे निर्मितीस विलंब लावणारे, अनावश्यक खर्चीक सभागृह म्हणून विधानपरिषदेकडे पाहिले जाते. आज भारतात आंध्र प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि तेलंगणा या सहा (६) घटक राज्यामध्ये विधानपरिषद हे विधिमंडळाचे वरिष्ठ सभागृह आहे. बाकी सर्व २२ राज्यात विधानसभा हे एकमेव सभागृह असलेले दिसते तेथे विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह नाही.

**विभानसभेचे सभापती व त्यांचा कार्यकाल**

| क्र. | सभापतीचे नाव | पत्ता | कार्यकाल (पासून ते पर्यंत) | |
|---|---|---|---|---|
| १ | सयाजी लक्ष्मण सिलम | काँग्रेस | २६/११/१९५६ | १२/३/१९६२ |
| २ | त्र्यंबक शिवराम भारदे | काँग्रेस | १७/३/१९६२ | १५/३/१९७२ |
| ३ | बाळासाहेब श्रीपतराव देसाई | काँग्रेस | ४/७/१९७७ | १३/३/१९७८ |
| ४ | शिवराज विश्वनाथ पाटील | काँग्रेस | १७/३/१९७८ | ६/१२/१९७९ |
| ५ | प्राणलाल हरकिसनदास व्होरा | काँग्रेस | १/२/१९८० | २९/६/१९८० |
| ६ | शरद शंकर दिघे | काँग्रेस | २/७/१९८० | ११/१/१९८५ |
| ७ | शंकरराव चिमाजी जगताप | काँग्रेस | २०/३/१९८५ | २०/३/१९९० |
| ८ | मधुकर धनाजी चौधरी | काँग्रेस | २१/३/१९९० | २२/३/१९९५ |
| ९ | दत्ताजी शंकर नलावडे | शिवसेना | २४/३/१९९५ | १९/१०/१९९९ |
| १० | अरुणलाल गोवर्धनदास गुजराथी | राष्ट्रवादी काँग्रेस | २२/१०/१९९ | १७/१०/२००४ |
| ११ | बाबासाहेब कुपेकर | काँग्रेस | ६/११/२००४ | ३/११/२००९ |
| १२ | दिलीप वळसे-पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस | ११/११/२००९ | ८/११/२०१४ |
| १३ | हरिभाऊ बागडे | भाजप | १२/११/२०१४ | २५/११/२०१९ |
| १४ | नाना पटोले | काँग्रेस | १/१२/२०१९ | ४/२/२०२१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | नरहरी सिताराम झिरवळ | राष्ट्रवादी कॉंग्रेस | ४/२/२०२१ | ३/७/२०२२ |
| १६ | राहुल नॉर्वेकर | भाजप | ३/७/२०२२ | आजपर्यंत |

## विधानपरिषद आणि विधानसभा यांच्या अधिकारांची तुलना

| क्र. | विधानपरिषद | क्र. | विधानसभा |
|---|---|---|---|
| १ | धनविधेयक या सभागृहात मांडता येत नाही. | १ | धनविधेयक केवळ याच सभागृहात मांडता येते. |
| २ | धनविधेयकामध्ये दुरुस्ती करता येत नाही वा ते नाकारता येत नाही. | २ | धनविधेयकावर (अर्थविधेयक) निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार या सभागृहाचा आहे. |
| ३ | कोणते विधेयक हे धन विधेयक आहे, हे ठरविण्याचा अधिकार नाही. | ३ | धनविधेयक ठरविण्याचा अधिकार विधानसभा सभापतीकडे असतो. |
| ४ | सर्वसाधारण विधेयक रोखून धरणे वा जास्तीत जास्त ४ महिन्यांपर्यंत (प्रारंभी ३ महिने आणि नंतर (१ महिना = ४) विलंब लावू शकते. | ४ | सर्वसाधारण विधेयक संमत (मंजूर) करण्याचा वा नाकारण्याचा अंतिम अधिकार या गृहाला आहे. |
| ५ | अंदाजपत्रकावर चर्चा करता येते, परंतु मागण्यांच्या अनुदानावर मतदान करता येत नाही. | ५ | अंदाजपत्रकाबाबत सर्व अधिकार विधानसभेकडे आहेत. |
| ६ | मंत्रीमंडळावर अविश्वासाचा ठराव आणता येत नाही. | ६ | मंत्रीमंडळावर अविश्वासाचा ठराव मांडण्याचा अधिकार या सभागृहाला आहे. |
| ७ | राष्ट्रपती व राज्यसभा सदस्यांच्या निवडणुकीत सहभाग व मतदानाचा अधिकार नाही. | ७ | राष्ट्रपती आणि राज्यसभेच्या सदस्यांच्या निवडणुकीत मतदान करता येते. |
| ८ | घटनादुरुस्ती विधेयकावर मतदान करता येत नाही. | ८ | घटना दुरुस्ती विधेयकावर मतदान करता येते. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | अस्तित्व विधानसभेच्या (आणि संसदेच्या) मर्जीवर अवलंबून असते. | ९ | विधानसभेचे अस्तित्व घटनात्मक असते. |

## १.२.३ विधानसभा व विधानपरिषद यांच्यातील संबंध : (Relation Between Vidhansabha and Vidhanprishad) :

द्विगृही राज्यविधिमंडळ (कायदेमंडळ) पद्धतीत विधानसभा हे जनतेचे प्रतिनिधित्व करणारे प्रथम व कनिष्ठ सभागृह (Lower House) असते, तर विधानपरिषद हे द्वितीय व वरिष्ठ सभागृह (Upper House) असते. भारतातील ज्या घटकराज्यांत द्विसदनात्मक (Bi-cameral) विधिमंडळ पद्धत आहे तेथील विधानसभा व विधानपरिषद यांच्यातील परस्परसंबंध कसे आहेत, याचा विचार करणे आवश्यक व महत्त्वाचे ठरते. भारतीय राज्यघटनेतील यासंबंधीच्या तरतुदी पाहिल्यास विधानसभेला विधानपरिषदेपेक्षा जास्त अधिकार प्राप्त झालेले दिसतात. भारतीय संसदेच्या दोन्ही सभागृहांचे परस्परसंबंध निश्चित करताना आपल्या घटनाकारांनी राज्यसभेला काही बाबतीत तरी लोकसभेच्या बरोबरीने अधिकार दिले आहेत; परंतु घटक राज्यात मात्र त्यांनी विधानसभेच्या तुलनेत विधानपरिषदेला फारच मर्यादित अधिकार दिलेले दिसतात, तेव्हा विधानपरिषदेच्या स्थानासंबंधी काही घटनातज्ज्ञांनी मत व्यक्त करताना असे म्हटले आहे की, विधानपरिषद केवळ द्वितीय सभागृह नसून ते दुय्यम सभागृहही आहे. राज्यविधिमंडळाच्या विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहांमधील परस्पर संबंधांचा आढावा खालीलप्रमाणे –

**कायदेविषयक संबंध :**

भारतीय संविधानाने विधानपरिषदेला काही कायदेविषयक अधिकार दिले असले तरी विधानसभेच्या तुलनेत ते अधिकार मर्यादित आहेत. अर्थविषयक विधेयक सोडून इतर विधेयके विधिमंडळाच्या (कायदेमंडळाच्या) कोणत्याही सभागृहात प्रथम मांडली जाऊ शकतात, परंतु विधेयक संमत करण्याबाबत विधानसभेच्या मतालाच प्रधान्य मिळते.

विधानसभेत प्रथम मांडण्यात आलेले आणि त्या सभागृहाने मंजूर केलेले विधेयक विधानपरिषदेकडे पाठविण्यात येते. विधानपरिषदेनेही ते विधेयक संमत केल्यास ते विधेयक राज्यपालांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येते. अर्थात, विधानसभेने पारित केलेले विधेयक अमान्य करण्याचा किंवा त्यात दुरुस्त्या सुचवून ते विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्याचा अधिकार विधानपरिषदेला असतो. एखाद्या विधेयकावर विधानपरिषदेने तीन महिन्यांपर्यंत कोणतेही मत व्यक्त न केल्यास ते विधेयक विधानपरिषदेला अमान्य आहे, असे समजण्यात येते. अशावेळी विधानसभा ते विधेयक दुसऱ्यांदा मंजूर करते. विधान परिषदेने मतदानाद्वारे अमान्य केलेल्या विधेयकावरही विधानसभा वरीलप्रमाणे दुसऱ्यांदा मंजूर करते. विधानपरिषदेने संबंधित विधेयकात काही दुरुस्त्या सुचविल्या असल्यास विधानसभा त्या दुरुस्त्या विचारात घेते. अशा प्रकारे एखादे विधेयक विधानसभेकडे दुसऱ्यांदा विचारासाठी आल्यावर विधानसभेने ते विधेयक दुसऱ्यांदा मूळ स्वरूपात किंवा दुरुस्त्या स्वीकारून संमत केले तर ते विधेयक परत विधानपरिषदेकडे संमतीसाठी पाठविले जाते. यावेळी विधानपरिषदेला त्यावर एक

महिन्याच्या आत निर्णय घ्यावा लागतो. दुसऱ्यावेळी मात्र विधानपरिषदेने त्यावर कोणताही निर्णय घेतला तरी त्याचा विधेयकावर काही परिणाम होत नाही. कारण विधानसभेने दुसऱ्यांदा संमत केलेले विधेयक विधानपरिषदेकडे आल्यावर एक महिन्यानंतर ते विधानसभेने ज्या स्वरूपात मंजूर केले असेल त्याच स्वरूपात ते दोन्ही सभागृहांनी संमत केले, असे समजले जाते व ते राज्यपालांच्या मान्यतेसाठी पाठविले जाते. याचा अर्थ असा की, विधानसभेने संमत केलेले कोणतेही विधेयक विधानपरिषद पूर्णपणे फेटाळून लावू शकत नाही. ती फार तर त्या विधेयकाला जास्तीत जास्त चार महिने (३ महिने + १ महिना = कमाल ४ महिने) विलंब करू शकते.

विधानपरिषदेत प्रथम मांडण्यात आलेले आणि त्या सभागृहाने मंजूर केलेले प्रत्येक विधेयक विधानसभेकडे पाठविण्यात येते. विधानसभेनेही ते विधेयक संमत केल्यास असे विधेयक राज्यपालाच्या मान्यतेसाठी पाठविले जाते. परंतु ते विधेयक विधानसभेने अमान्य केले तर असे विधेयक पूर्णपणे बारगळते. ते पुन्हा विधानपरिषदेकडे पाठविले जात नाही.

**आर्थिक संबंध :**

घटनेनुसार घटकराज्य कायदेमंडळाला (विधिमंडळाला) काही महत्त्वपूर्ण आर्थिक अधिकार मिळाले असले तरी त्याबाबत विधानपरिषदेला मात्र दुय्यम स्वरूपाचे अधिकार दिले आहेत. अर्थविषयक विधेयक प्रथम विधानसभेतच मांडले जाते. विधानसभेने संमत केलेले अर्थविषयक विधेयक विधानपरिषदेकडे पाठविले जाते; पण विधानपरिषद ते विधेयक फेटाळून लावू शकत नाही. विधानपरिषदेने त्या विधेयकावर चर्चा करून ते १४ दिवसांच्या आत आपल्या शिफारशींसह विधानसभेकडे परत पाठवावयाचे असते. विधानसभा विधानपरिषदेच्या सर्व किंवा काही शिफारशी स्वीकारू शकते किंवा त्या फेटाळूनही लावू शकते. विधानसभेने ते विधेयक दुरुस्तीसह किंवा मूळच्याच स्वरूपात दुसऱ्यांदा संमत केले की त्यास दोन्ही सभागृहांची संमती मिळाली असे समजले जाते व ते राज्यपालाच्या मान्यतेसाठी पाठविले जाते.

विधानसभेकडून विधानपरिषदेकडे आलेले अर्थविषयक विधेयक विधानपरिषदेने १४ दिवसांच्या आत विधानसभेकडे परत पाठविले नाही किंवा त्या विधेयकावर विधानपरिषदेने १४ दिवसांच्या मुदतीत कोणताच निर्णय घेतला नाही तरीदेखील ते विधेयक विधानसभेने संमत केलेल्या स्वरूपातच दोन्ही सभागृहांनी संमत केले असे समजले जाते. यावरून हे स्पष्ट होते की, अर्थविषयक विधेयकाबाबत विधानपरिषदेला केवळ शिफारशी करण्यापलीकडे काही अधिकार नाहीत.

एखादे विधेयक हे अर्थविषयक विधेयक आहे की नाही असा वाद उत्पन्न झाला तर त्यासंबंधी अंतिम निर्णय घेण्याचा अधिकारदेखील विधानसभेच्या सभापतीलाच देण्यात आला आहे. थोडक्यात, आर्थिक बाबतीत विधानसभेला विधानपरिषदेच्या तुलनेत दुय्यम अधिकार दिलेले दिसतात.

**कार्यकारी संबंध :**

संसदीय शासन पद्धतीत कार्यकारी मंडळावर (मंत्रीमंडळावर) नियंत्रण ठेवण्याचा आणखी एक महत्त्वपूर्ण अधिकार कायदेमंडळाला प्राप्त झालेला असतो. घटक राज्यातील कायदेमंडळाच्या बाबतीत हा अधिकार देखील एकट्या विधानसभेलाच देण्यात आला आहे. विधान परिषदेला हा अधिकार देण्यात आलेला नाही. भारतीय राज्यघटनेच्या कलम १६४ (२) अन्वये घटक राज्याचे मंत्रिमंडळ त्या राज्याच्या विधानसभेला

सामूहिकरित्या (संयुक्तरित्या) जबाबदार असते. याचा अर्थ मंत्रिमंडळावर जोपर्यंत विधानसभेचा विश्वास असतो. तोपर्यंतच मंत्रिमंडळ अधिकारावर राहू शकते. विधानसभेने मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त केला की त्यास राजीनामा द्यावा लागतो. अशा प्रकारे मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त करण्याचा अधिकार फक्त विधानसभेलाच आहे. यावरून विधानसभेचे श्रेष्ठत्वच या ठिकाणी अधोरेखित होते. विधानपरिषदेला मात्र याबाबतीत कसलेही अधिकार नाहीत. ती केवळ मंत्र्यांना संबंधित खात्याविषयी प्रश्न, उपप्रश्न विचारू शकते. अविश्वास ठराव आणून मंत्रिमंडळाला पदच्युत करू शकत नाही.

घटक राज्याच्या मंत्रिमंडळाची निर्मिती विधानसभेतून होते. सार्वत्रिक निवडणूकीत ज्या राजकीय पक्षाला बहुमत मिळते. तो पक्ष विधिमंडळ नेता म्हणजेच मुख्यमंत्र्याची निवड करतो. मुख्यमंत्री मंत्रिमंडळाची निर्मिती करतो आणि मुख्यमंत्र्यांची निवड विधानसभेतील बहुमतावर अवलंबून असते. विधानसभेतील बहुमतवाल्या पक्षाच्या किंवा आघाडीच्या नेत्याचीच मुख्यमंत्री म्हणून नियुक्ती होते. राज्य मंत्रिमंडळातील बहुसंख्य मंत्री विधानसभेचेच सभासद असतात. विधानपरिषद मात्र मुख्यमंत्र्याची मंत्री मंडळातील मंत्र्याची निवड करू शकत नाही. कारण विधानपरिषदेचे सदस्य प्रत्यक्ष जनतेकडून निवडून आलेले नसतात. त्यामुळे घटनेने हा अधिकार विधानपरिषदेला दिलेला नाही. थोडक्यात, कार्यकारी संबंधाचा विचार करता विधानसभेला मंत्रिमंडळ निर्मिती व त्यावरील नियंत्रणाच्या बाबतीत सर्वाधिकार दिलेले दिसतात. मात्र विधानपरिषदेला मर्यादित स्वरूपाचे अधिकार दिलेले दिसतात.

वरीलप्रमाणे विधानसभा व विधानपरिषद यांचे परस्परसंबंध पाहता विधानसभेच्या तुलनेत विधानपरिषदेला सर्वच बाबतीत दुय्यम स्थान व अधिकार प्राप्त झाल्याचे दिसून येतात.

**◆ विधानपरिषदेला दुय्यम स्थान प्राप्त होण्याची कारणे :**

घटक राज्यातील विधिमंडळाच्या (कायदेमंडळाच्या) दोन सभागृहांचे परस्परसंबंध विचारात घेतल्यास विधानसभेच्या तुलनेत विधानपरिषदेला दुय्यम स्थानन प्राप्त झाले असल्याचे दिसून येते. त्याची काही कारणे आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील -

**१) सभासदांची निवड प्रत्यक्ष जनतेकडून नाही :**

विधानसभेच्या तुलनेत विधानपरिषदेला दुय्यम स्थान प्राप्त होण्याचे सर्वात महत्त्वाचे कारण तिच्या सभासदांची निवड प्रत्यक्ष जनतेकडून होत नाही. या सभासदांची निवड मर्यादित क्षेत्रातून आणि अप्रत्यक्ष पद्धतीने होते. त्यामुळे विधान परिषद आपण जनतेचे प्रतिनिधित्व करीत असल्याचा दावा करू शकत नाही. याउलट विधानसभेचे सदस्य राज्यातील जनतेकडून प्रत्यक्षरित्या निवडले जातात. अशा परिस्थितीत जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विधानसभा या सभागृहाला जास्त महत्त्व मिळणे लोकशाहीशी सुसंगत आहे, असेच म्हणावे लागते.

**२) मोजक्या वर्गांचे प्रतिनिधित्व करणारे गृह :**

विधानपरिषदेला विधानसभेच्या तुलनेत दुय्यमस्थान प्राप्त होण्यास तिची रचनाही कारणीभूत ठरली आहे. या सभागृहातील काही सभासदांची नेमणूक केली जाते, तर काही सभासदांची मर्यादित क्षेत्रातून निवड होते. म्हणून विधानपरिषद सदस्य हे अगदी मोजक्या वर्गांचेच प्रतिनिधित्व करतात. राज्यपालाला साहित्य, कला,

विज्ञान, समाजसेवा, सहकारी चळवळ असा निरनिराळ्या क्षेत्रांत विशेष कर्तबगारी दाखविलेल्या तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींमधून काहीजणांची या सभागृहावर नियुक्ती करण्याचा अधिकार दिला आहे; परंतु या नेमणुका निखळ गुणवत्तेवर क्वचितच होतात. गुणवत्तेपेक्षा राजकीय लागेबांधे विचारात घेऊनच या नेमणूका केल्या जातात असे दिसते.

**३) अनावश्यक सभागृह असल्याची भावना :**

भारतीय राज्यघटनेने काही घटक राज्यांसाठी एकगृही कायदेमंडळाची तर काही घटक राज्यांसाठी द्विगृही कायदेमंडळाची तरतूद केली आहे. अशा प्रकारच्या व्यवस्थेमुळे विधानपरिषद नसली तरी चालू शकते असा समज व भावना तयार होते, त्यामुळे एक अनावश्यक व खर्चिक सभागृह अशा दृष्टिनेच विधानपरिषदेकडे पाहिले जाते.

**४) निवडून येऊ न शकणाऱ्या व्यक्तींच्या पुनर्वसनाची सोय एवढीच या गृहाची उपयुक्तता :**

विधानसभा व विधानपरिषद यांच्या परस्परसंबंधाचा आढावा घेताना आपण असे पाहिले की, विधानसभेच्या तुलनेत जवळपास सर्वच बाबतीत विधानपरिषदेला मर्यादित अधिकार मिळाले आहेत. कायदे मंडळाच्या ज्या सभागृहाला असे मर्यादित अधिकार प्राप्त झालेले असताना त्याच्या उपयुक्ततेबद्दलच लोकांना शंका वाटू लागते. लोकसभा व विधानसभा निवडणूकीत प्रत्यक्ष जनतेकडून निवडून येऊ न शकणाऱ्या अथवा पराभूत व्यक्तींच्या राजकीय पुनर्वसनासाठी मागील दाराने कायदेमंडळात प्रवेश करण्याची सोय एवढीच या सभागृहाची उपयुक्तता असल्याचे लोकांचे मत बनते. त्यामुळे विधानसभा या सभागृहाच्या तुलनेत विधानपरिषदेला दुय्यम स्थान व महत्त्व प्राप्त झाले आहे.

**५) विधानपरिषदेचे अस्तित्व विधानसभेच्या इच्छेवर अवलंबून :**

विधानपरिषदेचे अस्तित्वच मुळी विधानसभेच्या इच्छेवर अवलंबून असते, हे देखील तिला दुय्यम स्थान प्राप्त होण्याचे एक कारण आहे. भारतीय संविधानाने घटक राज्यात विधानपरिषद निर्माण करण्याचा अथवा अस्तित्वात असलेली विधानपरिषद रद्द, बरखास्त करण्याचा ठराव संमत करण्याचा अधिकार विधानसभेला दिला आहे. विधानसभेने वरीलप्रमाणे ठराव संमत केल्यास संसद कायदा करून त्या राज्यातील विधानपरिषद निर्माण अथवा रद्द (बरखास्त) करू शकते.

अशा प्रकारे वरील विविध कारणांमुळे विधानसभेच्या तुलनेत विधानपरिषदेला दुय्यम स्थान प्राप्त झाल्याचे दिसून येते.

## १.३ सारांश (Summary) :

महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळात विधानसभा व विधानपरिषद ही देन स्वतंत्र पण परस्परपूरक सभागृहे आहेत. विधानसभा हे थेट जनतेद्वारे निवडले गेलेले लोकप्रतिनिधींचे सभागृह असून ते अधिक शक्तिशाली सभागृह म्हणून ओळखले जाते. सरकार स्थापन करण्यामध्ये या सभागृहाची भूमिका निर्णायक असते. विधानपरिषद हे कायमस्वरूपी (स्थायी) सभागृह असून तिचे सदस्य विविध क्षेत्रांतून अप्रत्यक्ष पद्धतीने निवडले

जातात. कायदा निर्मिती प्रक्रियेत दोन्ही सभागृहांचा सहभाग असला तरी आर्थिक विधेयके फक्त विधानसभेतच मांडली जातात. विधानसभेला थेट लोकप्रतिनिधित्वाचे सामर्थ्य लाभले आहे, तर विधानपरिषद विचारविनिमयाचे आणि सल्लागार स्वरूपाचे कार्य करते. या दोन्ही सभागृहांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे विधिमंडळाचे कामकाज सुरळीत चालवणे, कायदे तयार करणे व राज्यकारभारावर नियंत्रण ठेवणे हे असते. अर्थविधेयके सोडून बाकी सर्व विधेयके दोन्ही सभागृहांपैकी कोणत्याही सभागृहात प्रथम मांडली जाऊ शकतात. मात्र आर्थिक विधेयके फक्त विधानसभेतच मांडली जातात. ती विधानपरिषदेत प्रथम मांडली जात नाहीत. विधानपरिषद त्यावर मत देऊ शकत नाही, ती केवळ सूचना देऊ शकते. त्या सूचना मान्य अथवा अमान्य करण्याचा संपूर्ण अधिकार विधानसभेला आहे. विधानपरिषद केवळ १४ दिवस अर्थविधेयकास संमती देण्यासाठी विलंब लावू शकते. त्यानंतर विधानसभा ते विधेयक दोन्ही सभागृहांना मान्य आहे, असे समजून राज्यपालांच्या मान्यतेसाठी पाठविते. इथे आर्थिक बाबतीत विधानसभा शक्तीशाली असल्याचे दिसून येते. सर्वसाधारण विधेयकाच्या बाबतीतही विधानपरिषद जास्तीत जास्त ४ महिने विलंब लावू शकते. त्यानंतर विधानसभा ते विधेयक दोन्ही सभागृहांना मंजूर आहे असे समजून राज्यपालांकडे स्वाक्षरीसाठी पाठविते. राज्य कार्यकारी मंडळावर (मंत्रीमंडळावर) नियंत्रण ठेवण्याच्या बाबतीतही विधानपरिषदेच्या तुलनेत विधानसभेलाच महत्त्वपूर्ण अधिकार प्राप्त झालेले आहेत. एखाद्या विधेयकावर विधानपरिषद व विधानसभा यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाल्यास संयुक्त अधिवेशन बोलविण्याची घटनेत तरतूद नाही. येथे विधानसभेचा निर्णय अंतिम मानला जातो. यावरून हे स्पष्ट होते की, घटनेनुसारच विधानसभेच्या तुलनेत विधानपरिषदेचे स्थान, महत्त्व व अधिकार दुय्यम स्वरूपाचे असल्याचे दिसून येतात.

विधानपरिषदेचे स्थान विधानसभेच्या तुलनेत दुय्यम असले तरी विधानपरिषद हि अनुभवसंपन्न, विविध क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्यांचा समावेश असलेले हे सभागृह असल्याने तिचे कार्य सल्लागार व तपासक, मार्गदर्शक स्वरूपाचे असते. अनेक वेळा विधानपरिषद एखाद्या विधेयकावर सखोल चर्चा करून त्यात सुधारणा सुचवते, जेणेकरून कायदे अधिक सक्षम व जनहितकारक होण्यास मदत होते.

विधानपरिषद व विधानसभा या दोन्ही सभागृहांमधील परस्परसंबंध हे सहकार्य, समन्वय व संतुलनावर आधारित आहेत. संविधानाने त्यांच्या अधिकारांचे स्पष्ट वाटप करूनही, लोकशाही प्रक्रियेस अधिक व्यापक आणि गुणात्मक बनविण्यासाठी ते परस्परावलंबी ठेवले आहेत. विधानसभा जिथे लोकशक्तीचे, लोकभावनेचे प्रतिनिधित्व करते, तिथे विधानपरिषद हे विचारशील विवेकाचे द्योतक आहे. त्यामुळे दोन्ही सभागृहांची भूमिका राज्याच्या लोकशाही व प्रशासकीय स्थैर्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. संविधानानेच विधानपरिषदेला विधानसभेच्या तुलनेत दुय्यम स्थान, महत्त्व व अधिकार दिलेले असले तरीही या दोन्ही सभागृहांची एकत्रित भूमिका लोकशाही बळकट करण्यास मदत करते.

**स्वयं अध्ययन प्रश्न – २**

**खालील दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

१. भारतीय संविधानाच्या कलम ................. मध्ये घटक राज्यात विधानसभा निर्माण करण्याची तरतूद आहे.

अ) १६८ ब) १६९ क) १७० ब) १७१

२. ................ हे सभागृह जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह म्हणून ओळखले जाते.

अ) विधानपरिषद ब) विधानसभा क) राज्यसभा ब) यापैकी नाही

३. विधानसभा हे ................ स्वरूपाचे सभागृह आहे.

अ) स्थायी ब) अस्थायी क) दीर्घ ब) यापैकी नाही

४. महाराष्ट्र विधानसभेची सदस्संख्या ................ इतकी आहे.

अ) २४३ ब) २८८ क) २९४ ब) ४०३

५. ................ द्वारे ॲंग्लोइंडियन समाजाच्या एका सदस्याची विधानसभेत नियुक्ती करण्याची तरतूद १०४ व्या घटनादुरुस्ती कायदा-२०१९ ने बंद करण्यात आली.

अ) राज्यपाल ब) सभापती क) उपसभापती ब) मुख्यमंत्री

६. विधानसभा निवडणूकीमध्ये ................ वय वर्षे पूर्ण झालेल्या स्त्री-पुरुष नागरिकांना मतदानाचा अधिकार आहे.

अ) १८ ब) २१ क) २५ ब) ३०

७. विधानसभा निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवाराचे ................ वय वर्षे पूर्ण असावे.

अ) २१ ब) २५ क) ३० ब) ३५

८. पूर्वपरवानगी शिवाय विधानसभा व विधानपरिषद सदस्य सर्व बैठकीस ................ दिवस गैरहजर राहिल्यास त्याचे सदस्यत्व रद्द होते.

अ) ६० ब) ९० क) १८० ब) २००

९. विधानसभा सदस्य ................ कडे राजीनामा देतो.

अ) विधानसभा अध्यक्ष ब) विधानपरिषद अध्यक्ष क) मुख्यमंत्री ब) राज्यपाल

१०. राज्यविधिमंडळाच्या दोन अधिवेशनामधील अंतर ................ महिन्यापेक्षा जास्त असता कामा नये, असे घटनात्मक बंधन आहे.

अ) ३ ब) ६ क) ९ ब) १२

११. विधिमंडळाचे अधिवेशन बोलविण्याचा अधिकार ................ ला आहे.

अ) राज्यपाल ब) सभापती क) मुख्यमंत्री ब) कॅबिनेट मंत्री

१२. महाराष्ट्र विधानसभेची बैठक (कामकाज) सुरू होण्यासाठी किमान ................ सदस्य संख्या (गणसंख्या) आवश्यक असते.

अ) ८ ब) २९ क) ५५ ब) २५

१३. विधानसभेचा कार्यकाल ................. वर्षे इतका असतो.

अ) ४ ब) ५ क) ६ ब) ७

१४. विधानसभेचे पीठासीन अधिकारी म्हणून ................. यांना ओळखले जाते.

अ) सभापती, उपसभापती ब) मुख्यमंत्री क) राज्यपाल ब) कॅबिनेट मंत्री

१५. एखादे विधेयक अर्थविधेयक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार ................ ला आहे.

अ) विधानसभा सभापती ब) विधानपरिषद सभापती क) मुख्यमंत्री ब) अर्थमंत्री

१६. विधानसभेत एखाद्या विधेयकावर समान मते पडल्यास निर्णायक मत देण्याचा अधिकार ................ ला आहे.

अ) विधानसभा अध्यक्ष ब) विधानपरिषद अध्यक्ष क) मुख्यमंत्री ब) राज्यपाल

१७. विधानसभा सभापतीच्या गैरहजेरीत ................. हा सभागृहाचे कामकाज पाहतो.

अ) विधानसभा सभापती ब) विधानपरिषद सभापती क) मुख्यमंत्री ब) राज्यपाल

१८. विधानसभा सभापती, उपसभापती यांचा कार्यकाल ................. वर्ष इतका असतो.

अ) ४ ब) ५ क) ६ ब) ७

१९. विधानसभा सभापती ................. कडे राजीनामा देतो.

अ) विधानसभा सभापती ब) विधानपरिषद सभापती क) मुख्यमंत्री ब) राज्यपाल

२०. विधानसभा उपसभापती ................. कडे राजीनामा देतो.

अ) विधानसभा सभापती ब) विधानपरिषद सभापती क) मुख्यमंत्री ब) राज्यपाल

२१. ................. हे राज्यविधिमंडळाचे प्रथम व कनिष्ठ सभागृह आहे.

अ) विधानसभा ब) विधानपरिषद क) लोकसभा ब) राज्यसभा

२२. ................. हे राज्यविधिमंडळाचे द्वितीय व वरिष्ठ सभागृह आहे.

अ) विधानसभा ब) विधानपरिषद क) लोकसभा ब) राज्यसभा

२३. राज्यसूचीतील सर्व ६६ विषयांवर कायदा करण्याचा अधिकार ................. सभागृहाला आहे.

अ) विधानसभा ब) विधानपरिषद क) लोकसभा ब) राज्यसभा

२४. ................. सभागृहाचा विश्वास असेपर्यंत राज्य मंत्रिमंडळ अधिकारपदावर राहू शकते.

अ) विधानसभा ब) विधानपरिषद क) लोकसभा ब) राज्यसभा

२५. घटक राज्यात अर्थविधेयक प्रथम ................. सभागृहात मांडले जाते.

अ) विधानसभा ब) विधानपरिषद क) लोकसभा ब) राज्यसभा

२६. राज्यविधिमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनाच्या कामाची सुरवात ................ च्या अभिभाषणाने होते.

अ) राज्यपाल    ब) सभापती    क) मुख्यमंत्री    ब) विरोधी पक्षनेता

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**१) विधिमंडळ :** कायदेमंडळ, विधानमंडळ

**२) पारित :** संमत, मंजूर

**३) विसर्जित :** रद्द, नष्ट, बरखास्त

**४) निर्वाचन :** निवडणूक

**५) संविधान विशोधन :** घटना दुरुस्ती

**६) गणसंख्या** (Quorum) **:** गणसंख्या म्हणजे सभागृहाच्या बैठक सुरु करण्यासाठी आवश्यक असलेली किमान उपस्थित सदस्यांची संख्या होय. जर या किमान उपस्थितीची संख्या पूर्ण न झाल्यास, सभेचे कामकाज सुरू करता येत नाही. उदा. महाराष्ट्र विधानसभा - एकूण सदस्यसंख्येच्या १/१० - २८८ सदस्य असलेल्या विधानसभेसाठी २९ सदस्यांची उपस्थिती आवश्यक असते. लोकसभेत - ५४५ सदस्यां पैकी किमान ५५ सदस्यांची उपस्थिती आवश्यक असते.

**७) गणपूर्ती** (Quorum Fulfillment) **:** गणपूर्ती म्हणजे सभागृहाच्या बैठकीत निर्णय घेण्यासाठी आवश्यक असलेली किमान उपस्थित सभासदांची संख्या. गणसंख्या ही सभा सुरू करण्यासाठी आवश्यक असते. तर गणपूर्ती निर्णय घेण्यासाठी आवश्यक असते. उदा. जर एका ठरावासाठी १/३ सदस्यांची उपस्थिती आवश्यक असेल तर ती संख्या गणपूर्ती मानली जाते. जर गणपूर्ती पूर्ण न झाल्यास ठरावावर मतदान करता येत नाही. गणपूर्ती नसल्यास, सभा सुरू होऊ शकते, पण निर्णय घेता येत नाही.

**८) सामाईक (समवर्ती) सूची :** भारतीय संविधानातील सामाईक / समवर्ती सूची म्हणजे या सूचीतील विषयावर केंद्र व राज्य शासनाला कायदे करण्याचा अधिकार असतो.

**९) राज्यपाल / राज्यपालांचे अभिभाषण :** राज्यपालाचे अभिभाषण म्हणजे राज्यपालांनी राज्य विधिमंडळाच्या सुरवातीला दिलेले अधिकृत भाषण होय. हे भाषण म्हणजे सरकारच्या धोरणांचे, योजनांचे आणि आगामी कामकाजाचे एक संक्षिप्त प्रस्तुतीकरण (सादरीकरण) असते. नवीन वर्षाच्या पहिल्या अधिवेशनाची (साधारणपणे) अर्थसंकल्पीय (उन्हाळी) अधिवेशनाची सुरवात राज्यपालाच्या अभिभाषणाने होते.

**१०) पीठासीन अधिकारी** (Presiding Officer) **:** म्हणजे विधिमंडळाच्या कामकाजाचे संचालन करणारे अधिकारी. ते सभागृहातील शिस्त, नियम आणि प्रक्रियेचे पालन होईल याची जबाबदारी घेतात. उदा. विधानसभा / विधानपरिषदेचे पीठासीन अधिकारी, सभापती व उपसभापती (अध्यक्ष-उपाध्यक्ष) हे असतात.

**११) अर्थविधेयक - कलम ११७** (Financial Bill) **:** अर्थविधेयक म्हणजे असे विधेयक जे केंद्र अथवा राज्य सरकारच्या महसूल, खर्च, कर, कर्ज, आर्थिक व्यवहार इत्यादींशी संबंधित असते. परंतु ते सर्वच वेळेस

संविधानातील कलम ११० अन्वये ''धनविधेयक' म्हणून पात्र ठरत नाही. अशा विधेयकांना अर्थविधेयक (Financial Bill) असे म्हटले जाते. (कलम ११७)

**१२) धनविधेयक – कलम ११०** (Money Bill) **:** (i) धनविधेयक म्हणजे असे विधेयक जे केवळ कर लावणे, सरकारच्या संचित निधीतून पैसा काढणे, सरकारचे कर्ज घेणे किंवा अशा प्रकारच्या आर्थिक बाबींशी संबंधित असते. (ii) धनविधेयक म्हणजे असे विधेयक जे सरकारच्या उत्पन्न आणि खर्चाशी थेट संबंधित असते, जसे की कर लावणे, निधी वापरणे, कर्ज घेणे किंवा निधी वाटप यासारख्या गोष्टी.

**१३) पहिल्या क्रमांकाचा बहुमत पद्धत / अधिकतम मत प्राप्ती पद्धत** (The First Past the Post System) **:** म्हणजे सर्वाधिक मते मिळालेल्या उमेदवाराची निवड होणारी पद्धत. या पद्धतीत जो उमेदवार सर्वात जास्त मते मिळवतो (इतरांपेक्षा) तो विजयी ठरतो. जरी त्याला एकूण मतांचे ५०% मते मिळाली असली तरी ही पद्धत विधानसभा, लोकसभा, स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्यांची निवड इ. मध्ये वापरली जाते.

**१४) पसंती क्रम किंवा एकल संक्रमणीय मतदान पद्धती** (Single Transferable Vote System) **:** ही एक प्रमाणानुसार प्रतिनिधित्व (Proportional Representation) देणारी मतदान पद्धत आहे. 'एकल संक्रमणीय मतदान पद्धत' म्हणजे मतदान एकहून अधिक उमेदवारांना पसंती क्रमाने (१, २, ३.....) मतदान करतो. जर पहिल्या पसंतीचा उमेदवार निवडून आला किंवा बाद झाला, तर त्याचे मत पुढील पसंतीच्या उमेदवाराकडे 'संक्रमित' केले जाते. ही प्रक्रिया मतांचे अधिक न्याय्य विभाजन करण्यासाठी वापरली जाते. ही पद्धत राज्यसभा सदस्य निवडणूक, विधानपरिषद सदस्यांची निवड, राष्ट्रपती व उपराष्ट्रपती पदाची निवड इ. मध्ये वापरली जाते.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

### स्वयं अध्ययन प्रश्न – १ ची उत्तरे :

| | |
|---|---|
| १. (ड) कलम १६८ ते २१२ | २. (अ) कलम १६८ |
| ३. (अ) विधानसभा | ४. (ब) विधानपरिषद |
| ५. (ब) द्विगृही | ६. (ब) ६ |
| ७. (ब) २२ | ८. (ब) द्विगृही |
| ९. (अ) आमदार | १०. (ब) १६९ |
| ११. (अ) ९ | १२. (क) ७८ |
| १३. (अ) वि. स. पागे | १४. (ब) राम शिंदे |
| १५. (अ) सभायी / कायमस्वरूपी | १६. (क) ३० |
| १७. (क) ६ | १८. (अ) २ |
| १९. (अ) राज्यपाल | २०. (अ) मुंबई |
| २१. (अ) नागपूर | २२. (अ) विधानपरिषद उपाध्यक्ष |
| २३. (ब) १४ | २४. (ब) १० |

**स्वयं अध्ययन प्रश्न – २ ची उत्तरे :**

| | |
|---|---|
| १. (क) १७० | २. (ब) विधानसभा |
| ३. (ब) अस्थायी | ४. (ब) २८८ |
| ५. (अ) राज्यपाल | ६. (अ) १८ |
| ७. (ब) २५ | ८. (अ) ६० |
| ९. (अ) विधानपरिषद | १०. (ब) ६ |
| ११. (अ) राज्यपाल | १२. (ब) २९ |
| १३. (ब) ५ | १४. (अ) सभापती, उपसभापती |
| १५. (अ) विधानसभा सभापती | १६. (अ) विधानसभा अध्यक्ष |
| १७. (अ) विधानसभा उपाध्यक्ष (उपसभापती) | १८. (ब) ५ |
| १९. (अ) विधानसभा उपसभापती | २०. (अ) विधानसभा सभापती |
| २१. (अ) विधानसभा | २२. (ब) विधानपरिषद |
| २३. (अ) विधानसभा | २४. (अ) विधानसभा |
| २५. (अ) विधानसभा | २६. (अ) राज्यपाल |

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टीपा लिहा.**

१. विधानपरिषदेची रचना

२. विधानपरिषद सभापती/अध्यक्ष

३. विधानपरिषद उपसभापती/उपाध्यक्ष

४. विधानपरिषद या द्वितीय सभागृहाच्या आवश्यकतेची कारणे

५. विधानपरिषद या द्वितीय सभागृहाच्या अनावश्यकतेची कारणे

६. विधानसभेची रचना

७. विधानसभा सदस्यत्वाची पात्रता व अपात्रता

८. विधानसभा सभापती / अध्यक्ष

९. विधानसभा उपसभापती / उपाध्यक्ष

१०. विधानसभेचे कायदेविषयक अधिकार

११. विधानसभेचे कार्यकारी अधिकार

१२. विधानसभेचे आर्थिक (वित्तीय) अधिकार

१३. विधानसभा व विधानपरिषद संबंध

**ब) लघूत्तरी प्रश्न.**

१) विधानपरिषदेची रचना स्पष्ट करा.

२) विधानपरिषद अध्यक्षांचे अधिकार व कार्ये स्पष्ट करा.

३) विधानसभेची रचना स्पष्ट करा.

४) विधानसभा सभापतीचे अधिकार व कार्ये स्पष्ट करा.

५) विधानसभा विधानपरिषदेपेक्षा अधिक शक्तीशाली सभागृह कसे आहे ते स्पष्ट करा.

६) विधानसभा व विधानपरिषद यांच्यातील संबंध स्पष्ट करा.

**क) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) विधानपरिषदेची रचना, अधिकार व कार्ये सविस्तर स्पष्ट करा.

२) विधानसभेची रचना, अधिकार व कार्ये यांची सविस्तर चर्चा करा.

३) विधानसभा विधानपरिषदेपेक्षा अधिक शक्तीशाली सभागृह कसे आहे, याविषयी सविस्तर चर्चा करा.

४) विधानसभा व विधानपरिषद यांच्यातील परस्पर संबंध सविस्तर स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ, पुस्तके :


१. जाधव तुकाराम, शिरापूरकर महेश (२०२४) : 'भारतीय राज्यघटना आणि घटनात्मक प्रक्रिया', खंड-१, युनिक अॅकॅडमी पब्लिकेशन्स, प्रा. लि. पुणे. सहावी आवृती.

२. लक्ष्मीकांत एम. (२०२४) : 'इंडियन पॉलिटी', मॅकग्रोहिल, एज्युकेशन (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, चेन्नई, ७ वी आवृत्ती.

३. आष्टेकर शदर (मे, २०२४) : 'भारताचे संविधान', मधुश्री पब्लिकेशन, पुणे.

४. डॉ. देशमुख अलका (२०१७) : 'भारताचे शासन आणि राजकारण', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

५. डॉ. देशमुख अलका (२०१४) : 'भारतीय लोकशाही प्रक्रिया', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

६. डॉ. पाटील वा. भा., डॉ. पाटील महेंद्र (२०१६) : 'महाराष्ट्र शासन', प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

७. डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण (२००३) : 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

८. डॉ. राठी शुभांगी दिनेश (२०१७) : 'भारतीय संविधानाची ओळख', अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, जळगाव.

९. पाटील बी. बी. (२०११) : 'महाराष्ट्र शासन आणि राजकारण', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१०. Laxmikanth M. (2021) : 'Indian Polity', MeGrew Hill Education, New Delhi.


❍❍❍

घटक २

# घटकराज्याचे कार्यकारी मंडळ

## (State Executive)

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ राज्यपाल : रचना, अधिकार व कार्ये

२.२.२ मुख्यमंत्र्यांची भूमिका

२.२.३ मंत्रिमंडळाचे अधिकार व कार्ये

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्टे :

या घटकासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. राज्यपाल: रचना, अधिकार व कार्ये कोणती आहेत हे समजून घेणे .

२. मुख्यमंत्र्यांची भूमिका, अधिकार व कार्ये स्पष्ट करणे.

३. मंत्रिमडळाचे अधिकार व कार्ये कोणती आहेत ते समजून घेणे.

४. राज्यपाल, मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातील परस्पर संबंध समजून घेणे.

## २.१ प्रास्ताविक :

राज्याच्या ध्येयधोरणांचीअंमलबजावणी करणाऱ्या शासनसंस्थेच्या विभागाला कार्यकारी मंडळ म्हणतात. भारताने संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. केंद्रीय पातळीप्रमाणेच राज्य पातळीवर संसदीय शासनपद्धतीनुसार कारभार चालतो. भारतीय राज्यघटनेच्या १५२ ते १६७ या कलमांत घटकराज्यांच्या कार्यकारी मंडळाची तरतूद केलेली आहे. घटकराज्याच्या कार्यकारी मंडळात राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ यांचा समावेश होतो. घटक राज्यात कार्यकारी मंडळ कायदेमंडळाला जबाबदार राहते. केंद्रातील राष्ट्रपती पदाप्रमाणे राज्यपाल हे घटकराज्याचे संविधानिक प्रमुख असतात. राष्ट्रपतीचा प्रतिनिधी म्हणून राज्यपाल कार्य करीत असतात. राज्यपाल हे घटकराज्याचे घटनात्मक प्रमुख असतात. संघराज्य व्यवस्थेत केंद्र व घटक राज्य यांच्यात संवाद साधणारी महत्त्वाची घटनात्मक यंत्रणा म्हणून राज्यपाल पद महत्त्वाचे आहे. घटकराज्याचे कार्यकारी सत्ता ही मुख्यमंत्री आणि त्यांच्या मंत्रिमंडळाकडे असते त्यामुळे मुख्यमंत्री व त्यांच्या मंत्रिमंडळाला वास्तववादी सत्ताप्रमुख म्हटले जाते.मुख्यमंत्री आपल्या सर्व मंत्र्यांसह सामूहिकरित्या विधानसभेला जबाबदार राहतो.

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्रातील राज्यपाल, मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ याविषयी आढावा घेणार आहोत.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ राज्यपाल : रचना अधिकार व कार्ये :

**(Governor : Composition, Powers and Functions) :**

राज्यपाल हा घटकराज्याचा कार्यकारी प्रमुख आहे. राज्यपालांच्या नावानेच राज्याचा संपूर्ण कारभार चालवला जातो. भारतीय राज्यघटनेच्या कलम १५३ नुसार प्रत्येक घटकराज्यासाठी राज्यपालपदाची तरतूद केली आहे. राष्ट्रपतीप्रमाणेच राज्यपाल हा घटकराज्याचा सांविधानिक प्रमुख असतो. राज्यपालांला सल्ला देण्यासाठी आणि राज्यकारभारात मदत करण्यासाठी मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ यांची तरतूद केली आहे. राज्यपाल हा नामधारी प्रमुख असतो आणि राज्याची खरी सत्ता मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ यांच्याकडे असते. केंद्र व घटकाराज्ये यांच्यात दुवा साधणारी यंत्रणा म्हणून राज्यपाल पद महत्त्वाचे आहे.

**राज्यपालांची नियुक्ती :**

भारतीय राज्यघटनेचे कलम १५६ नुसार भारताचे राष्ट्रपती राज्यपालांची नेमणूक करतात. राष्ट्रपतींची मर्जी

असेपर्यंत राज्यपाल आपल्या पदावर राहू शकतात. राज्यपालांच्या नियुक्तीची पद्धत ही कॅनडाच्या राज्यघटनेवरून घेण्यात आली आहे.

**राज्यपाल पदाची पात्रता :**

राज्यपाल होण्यासाठी व्यक्तीला पुढील अटी पूर्ण कराव्या लागतात.

१. ती व्यक्ती भारताची नागरिक असावी.

२. तिचे वय ३५ वर्षेपूर्ण असावे.

३. ती व्यक्ती संसद व राज्यविधिमंडळाची सदस्य असू नये. जर सदस्याची राज्यपालपदी नियुक्ती झाली तर तिचे संबंधित गृहाचे सदस्यत्व रद्द झाले असे मानले जाते.

४. त्या व्यक्तीने राज्यपाल पदावर असताना अन्य कोणतेही लाभाचे पद धारण करू नये.

**कार्यकाल :**

राज्यपालांचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. राष्ट्रपतींची इच्छा असेपर्यंत ते आपल्या पदावर कार्यरत राहतात. राज्यपाल स्वमर्जीने आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात. राज्यपालांचा आकस्मिक मृत्यू अशा परिस्थितीमुळे पद रिकामे झाल्यास राष्ट्रपती काही कालावधीसाठी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांकडे राज्यपाल पदाची जबाबदारी सोपवितात.

**पदाची शपथ :**

राज्यपालांना आपल्या पदाची जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी राज्यपालांना उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांसमोर आपल्या पदाची शपथ घ्यावी लागते.

**वेतन व अन्य सवलती :**

राज्यपालांना मासिक ३ लाख ५० हजार रुपये वेतन मिळते तसेच मोफत निवास, इतर भत्ते व सेवा-सवलती मिळतात. राज्यपालांचे वेतन व भत्ते ठरविण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला आहे. राज्यपालांचे वेतन हे राज्याच्या संचित निधीतून दिले जाते.

**राज्यपालाचे अधिकार व कार्ये (Powers and Functions of Governor) :**

भारतीय राज्यघटनेने राज्यपालांना पुढील प्रकारचे अधिकार दिले आहेत.

**१. कार्यकारी अधिकार :**

राज्यपाल हे घटकराज्याचे कार्यकारी प्रमुख असतात. घटकराज्याचा राज्यकारभार राज्यपालांच्या नावाने चालतो.राज्यपाल मुख्यमंत्र्यांची नेमणूक करतात. राज्यपाल मुख्यमंत्र्यांच्या सल्यानुसार मंत्रिमंडळातील इतर मंत्र्यांच्या नेमणूका करतात. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत विधानसभेमध्ये ज्या राजकीय पक्षाला बहुमत मिळते त्या पक्षाचा प्रमुखाला मुख्यमंत्री म्हणून नेमणूक केली जाते. जर विधानसभेत कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही तर पक्षांची आघाडी करून संयुक्त मंत्रिमंडळ बनविले जाते.

राज्याचा महाधिवक्ता, राज्य निवडणूक आयुक्त, लोकायुक्त, राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य, राज्य मानवी हक्क आयोगाचे सदस्य, वित्त आयोगाचे सदस्य, दुय्यम न्यायालयाचे न्यायाधीश, वरिष्ठ पोलीस अधिकारी, प्रशासनातील उच्चपदस्थ अधिकारी, विद्यापीठाचे कुलगुरू, विद्यापीठ सिनेटवर काही सदस्य इत्यादींच्या नेमणूका राज्यपाल करतात.

मंत्रिमंडळामध्ये घेतल्या गेलेल्या निर्णयांची माहिती घेणे आणि मंत्रिमंडळाला मार्गदर्शन व सूचना देण्याचाही अधिकार राज्यपालांना आहे. राज्यपाल घटक राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस करतात. राष्ट्रपती राजवटीच्या काळात केंद्राचा प्रतिनिधी म्हणून राज्यपाल कार्य करतात.

**२. कायदेविषयक अधिकार :**

घटकराज्याच्या विधिमंडळाचे राज्यपाल हे अविभाज्य घटक असतात. राज्यपालांना विविध प्रकारची कायदेविषयक कार्ये पार पाडावी लागतात. राज्यविधिमंडळाचे अधिवेशन बोलाविणे, सत्र समाप्ती करणे, राज्यातील विधानसभा बरखास्त करणे हे राज्यपालांचे अधिकार आहेत. सार्वत्रिक निवडणुकीनंतर व प्रत्येक वर्षाच्या पहिल्या अधिवेशनात राज्यपाल विधिमंडळाला उद्देशून भाषण करतात. राज्यपालांच्या या भाषणातून शासनाची ध्येयधोरणाची रूपरेषा विशद केली जाते. विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहामध्ये मतभेद निर्माण झाल्यास त्यांचे संयुक्त अधिवेशन बोलाविण्याचा अधिकार राज्यपालांना आहे.

राज्यपाल विधानपरिषदेवर १/६ किंवा १२ सदस्यांची साहित्य, विज्ञान, कला, सहकार, समाजसेवा या विविध क्षेत्रांतील नामवंत, हुशार व विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींची नेमणूक करतात. विधिमंडळाने संमत केलेल्या विधेयकाला राज्यपालांची मान्यता मिळाली तरच विधेयकाचे कायद्यात रुपांतर होते. एखादे विधेयक राज्यपालांनी नाकारले असेल तर पुन्हा तेच विधेयक विधिमंडळाने मंजुर करून राज्यपालांच्या संमतीसाठी पाठविले तर राज्यपालांना त्या विधेयकावर सही करावीच लागते. राज्यपाल काही महत्वाची विधेयके राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी राखून ठेवतात. राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी राखून ठेवलेल्या विधेयकांना मान्यता देण्याचा किंवा नामंजूर करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे. विधानसभेमध्ये जर अँग्लो-इंडियन समाजाला योग्य प्रतिनिधित्व मिळाले नसेल तर राज्यपाल एक किंवा दोन व्यक्तींची नियुक्ती करतात.

विधानसभेचे मुदतपूर्व विसर्जन करण्याचा अधिकार राज्यपालांना आहे. विधानसभेचे मुदतपूर्व विसर्जन करण्याचा निर्णय घेताना राज्यपाल राष्ट्रपतींशी विचारविनिमय करून निर्णय घेतात. राज्यघटनेतील कलम २१३ नुसार राज्यपालांना वठहुकूम वा अध्यादेश काढण्याचा अधिकार आहे. विधिमंडळाचे अधिवेशन चालू नसताना एखाद्या कायद्याची गरज निर्माण झाल्यास राज्यपाल वटहुकूम काढतात. वटहुकूम काढल्यानंतर जे विधिमंडळाचे अधिवेशन भरते त्यामध्ये वटहुकमाला सहा आठवड्यांच्या आत मंजुरी घ्यावी लागते. विधिमंडळाची संमती मुदतीत मिळाली नाही तर राज्यपालांनी काढलेला वटहुकूम रद्द होतो.

**३. आर्थिक अधिकार :**

राज्यपालांच्या संमतीशिवाय धनविधेयक विधानसभेत मांडले जात नाही. राज्यपालांच्या संमतीने अर्थमंत्री

विधानसभेत वार्षिक अंदाजपत्रक मांडतात. विधिमंडळाने मंजूर केलेले अर्थविधेयक राज्यपाल नाकारू शकत नाहीत. राज्यपालांची संमतीनेच राज्याच्या संचित निधीतून खर्च केला जातो.

**४. न्यायविषयक अधिकार :**

राज्यातील उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नियुक्ती करताना राष्ट्रपती राज्यपालांचा सल्ला घेतात मात्र हा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक नसतो. राज्यपाल उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करून न्यायाधीशांची नियुक्ती, पदोन्नती व बढती करतात. राज्यसरकारच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या कायद्याच्या बाबतीत गुन्हेगारास झालेली शिक्षा कमी करणे, शिक्षेला तात्पुरती स्थगिती देणे, विशिष्ट परिस्थितीमुळे शिक्षेत सूट देणे तसेच शिक्षेचा कालावधी कमी करणे इत्यादी अधिकार राज्यपालांना आहे. देहदंड किंवा मृत्युदंडाची शिक्षा माफ करण्याचा अधिकार राज्यपालांना असत नाही केवळ राष्ट्रपती देहदंडाची शिक्षा माफ करू शकतात.

**५. स्वविवेकाधीन अधिकार :**

भारतीय राज्यघटनेच्या १६३ व्या कलमानुसार राज्यपालांना काही विवेकाधीन अधिकार दिलेले आहेत. राज्यपाल घटक राज्याचे घटनात्मक प्रमुख असतात. राज्याची वास्तविक सत्ता मुख्यमंत्री व त्याचे मंत्रिमंडळ यांच्याकडे असते. राज्यपाल मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानुसार राज्याचा कारभार करतात. राज्यपाल स्वविवेकाधीन अधिकाराचा वापर करून काही निर्णय घेऊ शकतात. राज्यपालांना मिळालेले हे विशेषाधिकार आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत.

१. सार्वत्रिक निवडणुकीमध्ये विधानसभेत कोणत्याच राजकीय पक्षाला बहुमत मिळाले नसेल तर मंत्रिमंडळ बनविण्याची संधी कोणाला द्यायची याचा निर्णय राज्यपाल आपल्या विवेकबुद्धीने घेतात. कोणता नेता बहुमताचा पाठिंबा मिळवू शकतात याचा अंदाज घेऊन राज्यपाल मुख्यमंत्र्यांची नेमणूक करतात. नेमणूक झाल्यानंतर मुख्यमंत्र्याला विधानसभेत बहुमत आहे हे सिद्ध करावे लागते.

२. राज्यपालांना विधानसभा बरखास्त करण्याचा अधिकार आहे. मंत्रिमंडळाने विधानसभेचा विश्वास गमावला असेल तर अशा वेळी राज्यपाल विधानसभा बरखास्त न करता विरोधी पक्षाला मंत्रीमंडळ बनविण्याची संधी देऊ शकतात. तसेच कोणतेच मंत्रीमंडळ स्थिर शासन देऊ शकत नाही याची खात्री पटल्यास राज्यपाल विधानसभा बरखास्त करत असतात.

३. राज्य विधिमंडळाने मंजूर केलेले विधेयक राज्यपालांकडे मान्यतेसाठी आल्यानंतर राज्यपाल एखादे विधेयक राष्ट्रपतींच्या संमतीसाठी ते राष्ट्रपतींकडे पाठवू शकतात.

४. कलम ३५६ नुसार घटकराज्यातील घटनात्मक यंत्रणा मोडकळीस आल्यास राज्यपाल राष्ट्रपतींकडे राज्यात राष्ट्रपती राजवटीची शिफारस करतात. राष्ट्रपतींनी घटकराज्यात आणीबाणी घोषित केली असेल तर राज्यपाल राष्ट्रपतींचा प्रतिनिधी म्हणून घटक राज्याचा कारभार पाहतात.

५. विधानसभेचे अधिवेशन चालू नसतना कायद्याची गरज निर्माण झाली तर राज्यपाल त्यासंबंधी वटहुकूम काढू शकतात.

## ६. इतर अधिकार :

- राज्यपाल हे राज्याचे प्रथम नागरिक असतात. त्यांना उत्सवमूर्ती म्हणून कार्य करावे लागते. विविध राजकीय समारंभ, कार्यक्रम इत्यादींना भेटी देणे, पारितोषिके, पदव्या, सन्मानदर्शक पदके, बक्षिसे यांचे वितरण करणे, सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणे, विदेशी पाहुण्यांचे व परराष्ट्रातून आलेल्या राजकीय प्रतिनिधींचे स्वागत करणे यासारखी कार्ये राज्यपालांला करावी लागतात.
- राज्यपाल राज्य लोकसेवा आयोगाचा वार्षिक अहवाल मागवून तो चर्चेसाठी विधानसभेपुढे ठेवतात.
- राज्यपाल महालेखापरीक्षकांकडून राज्याच्या जमा-खर्चाचा अहवाल मागवू शकतात.
- राष्ट्रपती काही वेळा राज्यपालांकडे केंद्रशासित प्रदेशाचा राज्यकारभार सोपवितात.

**राज्यपालांची भूमिका :**

घटनात्मकदृष्ट्या राज्यपाल पद हे अतिशय महत्त्वाचे आहे. राष्ट्रपती ज्याप्रमाणे केंद्रशासनाचे नामधारी प्रमुख असतात त्याचप्रमाणे राज्यपाल हे घटकराज्याचे नामधारी प्रमुख असतात. राष्ट्रपती आणि घटकराज्य यांना सांधणारा महत्त्वाचा दुवा म्हणून राज्यपाल काम करतात. राज्यपाल राष्ट्रपतींचे प्रतिनिधी म्हणून कार्य करतात. राज्यपाल घटकराज्याचे कार्यकारी प्रमुख या नात्याने राज्यकारभारावर नियंत्रण व देखरेख ठेवतात. घटकराज्यात शांतता, सुव्यवस्था व स्थिर शासन देण्याचे कार्य राज्यपाल करतात.राज्यपालांचे पद अत्यंत महत्त्वाचे असले तरी प्रत्यक्षात हे पद नामधारी स्वरूपाचे बनले आहे. राज्यपाल घटनात्मकदृष्ट्या कार्यकारी प्रमुख असले तरी प्रत्यक्षात सत्ता मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ यांच्याकडे असते. राज्यपालांना काही स्वविवेकाधीन अधिकार प्राप्त झाले आहेत. विधानसभा बरखास्त करणे, राज्यात आणीबाणी लागू करणे, राष्ट्रपती राजवट आणणे असे स्वविवेकाधिकार राज्यपालांना असले तरी प्रत्यक्षात राज्यपाल स्वविवेकाधिकाराचा वापर कसा करतात यावर राज्यपालपद महत्वाचे ठरते.

राज्यपालांनी घटनात्मक प्रमुख या नात्याने आपली जबाबदारी नि:पक्षपातीपणे पार पाडणे हे अपेक्षित असले तरी प्रत्यक्षात मात्र राज्यपालांचे पद नेहमी वादाच्या भोवऱ्यात अडकले असल्याचे दिसून येते. राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंतच राज्यपाल पदावर राहू शकतात. केंद्रात सत्ता बदल झाला की काही घटकराज्यांचे राज्यपालही बदलले जातात.

राज्यपालांची नेमणूक राष्ट्रपतींकडून होते त्यामुळे राज्यपाल निवडीच्या प्रक्रियेमध्ये घटकराज्याची कोणतीही भूमिका नसते. राज्यपाल नेमणुकीच्या वेळी केंद्र सरकार आपल्या वर्चस्वाचा वापर करते. तसेच राज्यपालांची बडतर्फी ही राष्ट्रपतींच्या मर्जीवर असल्यामुळे घटकराज्याचा सहभाग त्यामध्ये नसतो. केंद्रात सत्ताबदल झाला की राज्यपालांच्या नियुक्त्या रद्द करून आपल्या मर्जीतील व्यक्तींची राज्यपाल पदावर नेमणूक केली जाते. त्यामुळे काही राज्यपालांची बडतर्फी ही केवळ राजकीय कारणामुळेच होते. त्यामुळे राज्यपाल बडतर्फीविषयी वादावर अनेक आयोगांनी केलेल्या शिफारशी आणि वेळोवेळी झालेले न्यायिक निवाडे यातून बरीच चर्चा झालेली दिसते.

कलम ३५६ च्या तरतूदीमुळे राज्यपालपद सातत्याने वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. कलम ३५६ व्या कलमानुसार राज्यपालांना घटकराज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा महत्त्वाचा अधिकार देण्यात आला आहे. राज्यपालांच्या पक्षपाती भूमिकेमुळे अनेक वाद निर्माण झाले आहेत. राज्यघटनेच्या कलम २०० नुसार राज्यपाल राज्य विधिमंडळाचे एखादे विधेयक राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखीव ठेवू शकतात. हा अधिकार म्हणजे राज्याच्या कायदेनिर्मितीत केंद्राला मिळालेला नकाराधिकार असल्याने हा अधिकारही वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

घटना मसुदा समितीचे सदस्य श्री. अल्लादी कृष्णस्वामी यांनी राज्यपालांची नियुक्ती व अधिकाराबाबत आपले मत व्यक्त करताना म्हटले आहे की, ''राज्यपालपदावर नियुक्ती होणारी व्यक्ती संबंधित घटकराज्याच्या परिस्थितीची जाणीव ठेवून निवडलेली, निर्विवाद योग्यता व चारित्र्यसंपन्न, प्रतिष्ठित असणारी व कोणताही पक्ष, गटाच्या राजकारणापासून अलिप्त असलेली असावी. राज्यपाल हा मंत्रिमंडळाचा मित्र व मध्यस्थ असावा. राज्याच्या घटनात्मक प्रमुखपदी असणारी ही व्यक्ती मंत्रिमंडळाला सल्ला देणारी आणि तणावपूर्ण परिस्थितीतून मार्ग काढणारी अशी असावी की, ज्यामुळे घटकराज्याचा कारभार सुरळीत चालण्यास कोणतीही अडचण राहणार नाही.'' राज्यपाल पदाविषयी बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, ''राज्यपालांची नियुक्ती चारित्र्य, शिक्षण व सार्वजनिक जीवनातील स्थान या निकषांवर व्हावी. राज्यपाल हे पद 'अलंकारणात्मक' म्हणून जरी मानले असले तरी विशिष्ट परिस्थितीत त्याला अमर्याद अधिकार प्राप्त होतात. अशा वेळी हे अधिकार सामंजस्यता व राष्ट्रहिताची जाणीव ठेवून वापरण्याची क्षमता असणारी व्यक्ती त्या पदावर असल्यासच घटनेतील उद्दिष्ट सफल होईल.''

राज्यशास्त्राचे अभ्यासक डॉ. सुहास पळशीकर यांच्या मते, ''राज्यपाल पदाविषयी वाद हा तिच्या नियुक्तीमध्ये नसून वादाचे खरे कारण या पदाच्या स्वरूपामध्येच आहे. राज्यघटनेतील राज्यपाल पदाविषयी असलेल्या तरतूदी फारच गुंतागुंतीच्या असून अनुभवाच्या आधारे त्यांचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. एखाद्या चुकीच्या व्यक्तीची निवड करण्यात आली वा चुकीच्या पद्धतीने या पदावर निवड झाल्यामुळे हे पद वादग्रस्त ठरते. हे पद पूर्णपणे बिगर-निर्वाचीत स्वरूपाचे आहे आणि तरीदेखील त्याला लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या शासनाचे पर्यवेक्षण करणे आणि केंद्र सरकारचा प्रतिनिधी म्हणून काम करणे अशा दुहेरी भूमिका कराव्या लागतात. त्याचबरोबर सर्वसाधारणपणे निर्वाचित पदस्थांना नसलेले 'स्वविवेकाधिकार' या पदाला आहेत. याचा परिणाम म्हणजे 'संघर्षात्मक राजकारण' होय. थोडक्यात हे बिगर-लोकशाही स्वरूप हेच वादाचे मूळ कारण होय. डॉ. सुहास पळशीकर यांनी राज्यपाल पदाविषयीचा वाद संपुष्टात आणण्याचा प्रयत्नांचा भाग म्हणून दोन संभाव्य मार्गांची मांडणी केली आहे. एक म्हणजे, राज्यपाल पदाकडे असणाऱ्या काही महत्त्वाच्या जबाबदाऱ्या अन्य काही यंत्रणांकडे सुपूर्द करून हे पद रद्दबातल करणे. दुसरे म्हणजे राज्यपालांची संबंधित विधिमंडळ सदस्यांव्दारे निवड करणे आणि त्यांना नाममात्र अधिकार बहाल करणे. अशा पर्यायाचा विचार सुरु केल्यास 'संविधानिक नैतिकता आणि अस्तित्वात नसलेली प्रतिष्ठा वा पदाचे बिगर-पक्षीय स्वरूप' अशा चर्चांमध्ये सदर विषय अडकून पडणार नाही.

आतापर्यंतचे नियुक्त झालेले राज्यपालांचे कार्य पाहता राज्यपाल पद हे राजकीय वादचक्रात कायम अडकले गेलेले पद आहे. राज्यपालांचे पक्षीय राजकारणाशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे संबंध आले आहेत. राज्यपालांसारख्या निष्पक्ष पदावर असूनही त्यांचे राजकारण सुटले नाही किंवा ते सोडण्याचा प्रयत्नही केला

नाही. केंद्रसरकारचा हस्तक म्हणून राज्यपालांचे वर्तन घडताना दिसते. काही वेळा राज्यपाल केंद्राच्या हातातले राजकीय बाहुले बनल्याचे दिसून येते. राज्यपालांनी केंद्र व राज्यसरकार यांना जोडणारा दुवा म्हणून काम केले पाहिजे. केंद्र सरकारला अहवाल पाठविणे, केंद्रात राज्याचे प्रतिनिधित्व करणे, राज्यपालांच्या बैठकींना उपस्थित राहणे, राष्ट्रपतींची भेट नियमितपणे घेणे, राज्याच्या गरजा केंद्र पातळीवर मांडणे इत्यादी कामे राज्यपालांना करावी लागतात. परंतु दुवा म्हणून भूमिका पार पाडताना राज्यपाल अपयशी ठरल्याचे दिसून येते. राज्यपाल आपल्या पदाचा उपयोग नि:पक्षपातीपणे करताना दिसून येत नाहीत. सवर्च राजकीय पक्षांनी आपले राजकीय हितसंबंध बघून राज्यपाल पदाचा गैरवापर केलेला आहे.

राज्यपाल पद नामधारी आहे, राज्यपाल हा रबरी शिक्का आहे, केवळ मानसन्मानाचे पद आहे, राज्यपाल म्हणजे केवळ उत्सवमूर्ती आहे अशी टीका होत असते. श्रीप्रकाश, पट्टाभिसीतारामय्या, विजयालक्ष्मी पंडित या निवृत्त राज्यपालांनी राज्यपालपदाविषयी नाराजी व्यक्त केली आहे.राज्यपाल विधान परिषदेवर सदस्यांची नियुक्ती करीत असतात परंतु ही निवड साहित्य, कला, शास्त्र, शेती, सहकार या क्षेत्रांतील नामवंत व्यक्तींतून होणे आवश्यक असते. प्रत्यक्षात मात्र केंद्रातील सत्तारूढ पक्षांच्या नेत्यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती होत असते. त्यामुळे काही वेळा अपात्र, अकार्यक्षम सदस्यांची नियुक्ती विधान परिषदेवर होत असलेली दिसते.

राज्यपालांचे पद अनावश्यक आहे असा निष्कर्ष काढणे बरोबर नाही. याचे कारण भारताने संघराज्य शासन पद्धती स्वीकारलेली आहे. त्यामुळे घटकराज्यांना स्वायत्तता व अधिकार बहाल केले आहेत. केंद्राप्रमाणेच घटकराज्यांतही संसदीय शासनपद्धतीप्रमाणे कारभार चालविला जातो. राष्ट्रपतीप्रमाणे घटकराज्यांत राज्यपाल हे पद निर्माण केले आहे. केंद्र सरकार व राज्यसरकार यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणून राज्यपालांना कार्य करावे लागते. राज्यपाल हे केंद्र सरकार आणि राज्यसरकार यांच्या कार्यात सुसंवाद आणि समन्वय साधण्याचे कार्य करतात. घटकराज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे, राज्याचे संरक्षण व संवर्धन करणेआणि केंद्रसरकारचा प्रतिनिधी या नात्याने राज्यपालाचे पद हे अतिशय महत्त्वाचे मानले जाते.

राज्यपालाने आपल्या विवेकाधीन अधिकाराचा योग्य प्रकारे वापर करून पदाची प्रतिष्ठा राखण्याचा प्रयत्न करावा. राज्यपालांनी निष्पक्षपातीपणे, स्वविवेकबुद्धीने निर्णय घेतले पाहिजेत. राष्ट्रपती किंवा केंद्र सरकाराने राज्यपालांवर कोणतेही दडपण आणू नये. राज्यपालांनी निर्भीडपणे निर्णय घेतले पाहिजेत. एकंदरीत घटकराज्याच्या प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यपालांचे कायमस्वरूपी पद आवश्यक आहे. घटक राज्याचा घटनात्मक प्रमुख म्हणून राज्यपाल पद हे राज्याचे प्रशासन स्थिर व कार्यक्षम ठेवण्यास आवश्यक व उपयुक्त ठरते.

**महाराष्ट्राचे राज्यपाल**

| अ. क्र. | राज्यपाल | कालावधी |
|---|---|---|
| १. | श्री. प्रकाश | १९६०-१९६२ |
| २. | श्री. सुब्बारायन | १९६२-१९६२ |
| ३. | श्रीमती. विजयालक्ष्मी पंडित | १९६२-१९६४ |

| | | |
|---|---|---|
| ४. | पी. व्ही. चेरियन | १९६४-१९६९ |
| ५. | अलीयावर जंग | १९७०-१९७६ |
| ६. | सादिक अली | १९७७-१९८० |
| ७. | ओम प्रकाश मेहरा | १९८०-१९८२ |
| ८. | आय. एच. लतिफ | १९८२-१९८५ |
| ९. | कोना प्रभाकर राव | १९८५-१९८६ |
| १०. | डॉ. शंकर दयाळ शर्मा | १९८६-१९८७ |
| ११. | के. ब्रह्मानंद रेड्डी | १९८८-१९९० |
| १२. | डॉ. सी. सुब्रमण्यम | १९९०-१९९३ |
| १३. | डॉ. पी. सी. अलेक्झांडर | १९९३-२००२ |
| १४. | महंमद फजल | २००२-२००४ |
| १५. | एस. एम. कृष्णा | २००४-२००८ |
| १६. | एस. सी. जमीर | २००८- २०१० |
| १७. | के. शंकरनारायणन | २०१०-२०१४ |
| १८. | विद्यासागर राव | २०१४ - २०१९ |
| १९. | भगतसिंग कोश्यारी | २०१९ - २०२३ |
| २०. | रमेश बैस | २०२३ - २०२४ |
| २१. | सी. पी. राधाकृष्णन | २०२४ - |

**स्वयं अध्ययन प्रश्न १ :**

**खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य तो पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. राज्यपालांची नियुक्ती ............. कडून होते.

अ) पंतप्रधान ब) राष्ट्रपती क) सरन्यायाधीश ड) यापैकी नाही

२. राज्यपाल पदावर नियुक्त होण्यासाठी त्या व्यक्तीला वयाची ........ वर्षे पूर्ण करावी लागतात.

अ) २१ ब) २५ क) ३० ड) ३५

३. विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर भरणाऱ्या पहिल्या अधिवेशनात ........... हे विधानसभेला उद्देशून अभिभाषण करतात.

अ) राज्यपाल ब) राष्ट्रपती क) मुख्यमंत्री ड)सभापती

४. महाराष्ट्राचे सध्याचे राज्यपाल ............ हे आहेत.

अ) भगतसिंग कोशारी ब) रमेश बैस क) सी विद्यासागर राव ड) यापैकी नाही

५. राज्यपाल पद.......... स्वरूपाचे आहे.

अ) वास्तववादी ब) नामधारी क) कायम ड) यापैकी नाही

६. कोणतेही अर्थविधेयक विधानसभेत .........च्या संमतीशिवाय मांडता येत नाही.

अ) राज्यपाल ब) मुख्यमंत्री क) राष्ट्रपती ड)सरन्यायाधीश

७. राज्यपाल विधान परिषदेवर....... सदस्यांची नियुक्ती करतात.

अ) १/२ ब) १/३ क) १/६ ड) १/१०

## २.२.२ मुख्यमंत्र्यांची भूमिका (Role of chief Minister) :

घटकराज्याच्या कार्यकारी मंडळात राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ यांचा समावेश होतो. राज्यपाल हे घटकराज्याचे घटनात्मक प्रमुख असतात. तरी राज्याची वास्तविक सत्ता ही मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रीमंडळ यांच्याकडे असते. केंद्रात ज्याप्रमाणे पंतप्रधानांचे स्थान असते त्याप्रमाणे घटकराज्यात मुख्यमंत्र्यांचे स्थान असते. भारतीय राज्यघटनेतील कलम १५३ ते १६७ मध्ये घटकराज्याच्या कार्यकारीमंडळाची तरतूद करण्यात आली आहे.

### मुख्यमंत्र्यांची नियुक्ती :

भारतीय राज्यघटनेच्या १६४ व्या कलमानुसार राज्यपाल मुख्यमंत्र्यांची नियुक्ती करतात. विधानसभेत बहुमत प्राप्त पक्षाच्या किंवा आघाडीच्या नेत्याला राज्यपाल मुख्यमंत्री म्हणून नियुक्त करतात व मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने इतर मंत्री नियुक्त केले जातात. मुख्यमंत्री आपल्या पक्षातील विश्वासू सदस्यांची मंत्री म्हणून निवड करतात व त्यास राज्यपालांची औपचारिक मान्यता घेतात. जर विधानसभेत कोणत्याच पक्षाला बहुमत नसेल तर राज्यपाल आपल्या स्वविवेकाधीन अधिकाराचा वापर करून विधानसभेत सर्वाधिक जागा प्राप्त केलेल्या पक्ष किंवा आघाडीच्या नेत्याला मुख्यमंत्रीपदी नियुक्त करतात. अशा परिस्थितीत विशिष्ट कालावधीत मुख्यमंत्र्यांना बहुमत असल्याचे सिद्ध करावे लागते. मुख्यमंत्री आपल्या सर्व मंत्र्यांसह सामूहिकरित्या विधानसभेला जबाबदार असतात.

मुख्यमंत्र्यांना पदग्रहण करण्यापूर्वी पद व गोपनीयतेची शपथ घ्यावी लागते. राज्यपाल मुख्यमंत्र्यास शपथ देतात. मुख्यमंत्री पदासाठी कोणत्याही मुदतीच्या मर्यादा नाहीत. जोपर्यंत विधानसभेत बहुमत आहे तोपर्यंत मुख्यमंत्री आपल्या पदावर राहतात. मुख्यमंत्र्यांनी विधानसभेचा विश्वास गमावला तर त्यांना आपल्या पदाचा

राजीनामा द्यावा लागतो किंवा राज्यपाल त्यांना बडतर्फ करु शकतात. राज्याचे विधिमंडळ मुख्यमंत्र्यांचे वेतन व भत्ते निश्चित करतात शिवाय त्याला भत्ते, मोफत निवास, प्रवास भत्ते, वैद्यकीय सेवा इत्यादी सुविधा मिळतात.

**मुख्यमंत्र्याचे अधिकार व कार्ये :**

१. मुख्यमंत्री मंत्रिमंडळाची निर्मिती करतात. राज्यातील सर्व प्रदेश आणि घटक यांना मंत्रिमंडळात स्थान मिळेल अशा पद्धतीने ते मंत्र्यांची निवड करतात. मंत्री निवडताना पक्षातील विविध गटांना मंत्रीमंडळात स्थान द्यावे लागते. आघाडीचे मंत्रिमंडळ असेल तर आघाडीतील घटक पक्षांना मंत्रिमंडळामध्ये प्रतिनिधित्व दिले जाते. मंत्र्यांमध्ये खाते वाटप करणे, मंत्र्यांची नियुक्ती करणे, बडतर्फ करणे, खाते बदल यासारखी कामे मुख्यमंत्र्यांना करावी लागतात.

२. मुख्यमंत्री वेळोवेळी मंत्रिमंडळाच्या बैठका घेऊन मंत्रिमंडळाच्या बैठकींचे अध्यक्षस्थान भूषवितात. मंत्रिमंडळात एकजिनसीपणा आणि ऐक्य टिकविण्याचा मुख्यमंत्री प्रयत्न करत असतात.

३. मुख्यमंत्री आपल्या सर्व मंत्र्यांसह सामूहिकरित्या विधानसभेला जबाबदार राहताम. ते नेहमी विधानसभेचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न करीत असतात.

४. सर्व मंत्र्यांच्या कार्यात मार्गदर्शन, सूचना, नियंत्रण व समन्वय साधण्याचे काम मुख्यमंत्र्यांना करावे लागते.

५. मुख्यमंत्री आपला पदाचा राजीनामा देऊन संपूर्ण मंत्रीमंडळ बरखास्त करू शकतात. मुख्यमंत्री हे मंत्रीमंडळाचे प्रमुख असल्याने मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याने मंत्रीमंडळ आपोआप बरखास्त होते.

६. मुख्यमंत्री हे राज्यपाल आणि मंत्रिमंडळ यांना सांधणारा दुवा म्हणून कार्य करतात. मुख्यमंत्री मंत्रिमंडळाने घेतलेल्या सर्व महत्त्वाचे निर्णयाची माहिती राज्यपालांना कळवितात. राज्यपालांनी दिलेला सल्ला व आदेश मंत्रिमंडळापर्यंत पोहोचविण्याचे कार्य मुख्यमंत्री करतात.

७. मुख्यमंत्री हे राज्याचा महाधिवक्ता, राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य, राज्य निवडणूक आयुक्त आणि इतर महत्त्वाच्या पदांच्या नियुक्तीबाबत राज्यपालांना सल्ला देतात.

८. राज्यामध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाली असेल तर मुख्यमंत्री राज्यपालांना विधानसभा बरखास्त करण्याची शिफारस करतात.

९. मुख्यमंत्री हे राज्यपालांचा मुख्य सल्लगार म्हणून कार्य करतात.

१०. मुख्यमंत्री हे राज्य विधिमंडळाचे अधिवेशन बोलाविणे किंवा सत्र समाप्ती करणे याविषयी राज्यपालांना सल्ला देतात.

११. मुख्यमंत्री मंत्रिमंडळाची ध्येयधोरणे व कार्यक्रम याविषयी माहिती सभागृहाला देतात.

१२. मुख्यमंत्री हे राज्यशासनाचा प्रवक्ता म्हणून कार्य करतात.

१३. मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ हे जनतेच्या अडीअडचणी, प्रश्न व समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतात.

१४. मुख्यमंत्री मंत्रिमंडळाच्या कार्यावर नियंत्रण व देखरेख करतात. मंत्रिमंडळाने घेतलेले निर्णय तसेच विधिमंडळाने संमत केलेल्या कायद्याची अंमलबजावणी करण्याचे कार्य मुख्यमंत्र्यांच्या नियंत्रणाखाली चालते.

१५. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील आंतर-राज्य परिषद व राष्ट्रीय विकास परिषद यांचा सदस्य असल्याने त्यांसंदर्भातील कार्ये मुख्यमंत्र्यांना करावी लागतात.

१६. राज्यातील सर्व सेवांचे राजकीय प्रमुख म्हणून मुख्यमंत्री कार्य करतात.

१७. मंत्रीमंडळातील एखाद्या मंत्र्याच्या कामगिरीवर मुख्यमंत्री हे असहमत असतील तर मुख्यमंत्री त्या मंत्र्याला राजीनामा देण्यास सांगतात.

अशा प्रकारे राज्याच्या प्रशासनामध्ये मुख्यमंत्री हे महत्त्वाची जबाबदारी पार पाडतात.

**मुख्यमंत्र्यांचे स्थान :**

घटकराज्याच्या प्रशासनासाठी मुख्यमंत्र्याचे पद हे महत्त्वाचे आहे. मुख्यमंत्री हे राज्यशासनाचे प्रमुख असतात. मुख्यमंत्री हे घटकराज्याचे वास्तववादी सत्ताप्रमुख असतात. राज्यपालांचे त्यांच्यावर काही प्रमाणात नियंत्रण असते. विधानसभेमध्ये बहुमत प्राप्त असणारा मुख्यमंत्री हा राज्याला स्थिर शासन देतो. मुख्यमंत्र्यांना विविध प्रकारची भूमिका पार पाडावी लागते. मुख्यमंत्री हे मंत्रिमंडळाचा नेता, सत्तारूढ पक्षाचा नेता, विधानसभेचा नेता आणि जनतेचा नेता असतात. मुख्यमंत्र्यांचे मंत्रिमंडळात महत्त्वाचे स्थान असते. मुख्यमंत्री हे सर्व मंत्र्यांमधील 'समानातील प्रमुख'असतात. 'मंत्रिमंडळरूपी कमानीची मध्यशिला' किंवा 'ग्रहमालेतील सूर्य' असे त्यांचे वर्णन केले जाते. मुख्यमंत्री सत्तारूढ पक्षाचा नेता या नात्याने आपल्या पक्षाचे हित पाहतात. जनमानसामध्ये आपल्या पक्षाची प्रतिमा व महत्त्व वाढविण्याचा नेहमी प्रयत्न करतात. मुख्यमंत्री हे राज्यात सुव्यवस्था व शांतता प्रस्थापित करून स्थिर शासन निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. मुख्यमंत्री पदावर असणारी व्यक्ती ही कार्यक्षम, कर्तव्यदक्ष,निःस्वार्थी व चारित्र्यसंपन्न असावी लागते. मुख्यमंत्र्यांच्या निवडीच्या प्रक्रियेमध्ये केंद्रस्तरावरून हस्तक्षेप होताना दिसून येतो. नेता निवडीचा अंतिम निर्णय पक्षश्रेष्ठींकडून किंवा पंतप्रधानांकडून होतो. घटकराज्याच्या राज्यकारभाराची संपूर्ण धुरा मुख्यमंत्र्याच्या हाती असते. मुख्यमंत्री हे राज्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करून कल्याणकारी राज्य निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत असतात त्यामुळे घटकराज्याच्या राज्यकाराभारात मुख्यमंत्र्याचे स्थान हे अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे, प्रतिष्ठेचे व सन्मानाचे असते.

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री**

| अ. क्र. | मुख्यमंत्री | पदावरील काळ | राजकीय पक्ष |
|---|---|---|---|
| १ | श्री. यशवंतराव चव्हाण | ०१ मे १९६०-<br>२० नोव्हेंबर १९६२ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| २ | श्री. एम. एस. कन्नमवार | २१ नोव्हेंबर १९६२-<br>२४ नोव्हेंबर १९६३ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ३ | श्री. पी. के सावंत<br>(काळजीवाहू) | २५ नोव्हेंबर १९६३ -<br>०४ डिसेंबर १९६३ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ४ | श्री. वसंतराव नाईक | ०५ डिसेंबर १९६३ -<br>२० फेब्रुवारी १९७५ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ५ | श्री. शंकरराव चव्हाण | २० फेब्रुवारी १९७५ -<br>१७ एप्रिल १९७७ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ६ | श्री. वसंतदादा पाटील | १७ एप्रिल १९७७-<br>०५ मार्च १९७८ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ७ | श्री. वसंतदादा पाटील | ०५ मार्च १९७८-<br>१८ जुलै १९७८ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ८ | श्री. शरद पवार | १८ जुलै १९७८-<br>१७ फेब्रुवारी १९८० | समाजवादी कॉंग्रेस |
| ९ | श्री. ए. आर. अंतुले | ०९ जून १९८०-<br>१२ जानेवारी १९८२ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| १० | श्री. बाबासाहेब भोसले | २१ जानेवारी १९८२-<br>०१ फेब्रुवारी १९८३ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ११ | श्री. वसंतदादा पाटील | ०२ फेब्रुवारी१९८३-<br>०९ मार्च १९८५ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| १२ | श्री. वसंतदादा पाटील | १० मार्च १९८५-<br>०१ जून १९८५ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | श्री. शिवाजीराव निलंगेकर | ०३ जून १९८५ – ०६ मार्च १९८६ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १४ | श्री. शंकरराव चव्हाण | १२ मार्च १९८६ – २६ जून १९८८ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १५ | श्री. शरद पवार | २६ जून १९८८– ०४ मार्च १९९० | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १६ | श्री. शरद पवार | ०४ मार्च १९९०– २५ जून १९९१ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १७ | श्री. सुधारकरराव नाईक | २५ जून १९९१– २२ फेब्रुवारी १९९३ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १८ | श्री. शरद पवार | ०६ मार्च १९९३– १४ मार्च १९९५ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १९ | श्री. मनोहर जोशी | १४ मार्च १९९५– ३१ जानेवारी १९९९ | शिवसेना |
| २० | श्री. नारायण राणे | ०१ फेब्रुवारी १९९९ – १८ ऑक्टोबर १९९९ | शिवसेना |
| २१ | श्री. विलासराव देशमुख | १८ ऑक्टोबर १९९९– १८ जानेवारी २००३ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| २२ | श्री. सुशीलकुमार शिंदे | १८ जानेवारी २००३ – ३१ ऑक्टोबर २००४ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| २३ | श्री. विलासराव देशमुख | ०१ नाव्हेंबर २००४ – ०८ डिसेंबर २००८ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| २४ | श्री. अशोक चव्हाण | ०८ डिसेंबर २००८ – २६ ऑक्टोबर २००९ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| २५ | श्री. अशोक चव्हाण | ०७ नोव्हेंबर २००९ – १० नोव्हेंबर २०१० | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| २६ | श्री. पृथ्वीराज चव्हाण | ११ नोव्हेंबर २०१० – २६ सप्टेंबर २०१४ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | श्री. देवेंद्र फडणवीस | ३१ ऑक्टोबर २०१४ – १२ नोव्हेंबर २०१९ | भारतीय जनता पक्ष |
| २८ | श्री. देवेंद्र फडणवीस | २३ नोव्हेंबर २०१९ – २८ नोव्हेंबर १०१९ | भारतीय जनता पक्ष |
| २९ | श्री. उद्धव ठाकरे | २८ नोव्हेंबर २०१९ – ३० जून २०२२ | शिवसेना |
| ३० | श्री. एकनाथ शिंदे | ३० जून २०२२ – ०५ डिसेंबर २०२४ | शिवसेना |
| ३१ | श्री. देवेंद्र फडणवीस | ०५ डिसेंबर २०२४ – .............. | भारतीय जनता पक्ष |

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री :**

भारतीय राज्यघटनेमध्ये घटक राज्यांसाठी उपमुख्यमंत्री पदाची तरतूद केलेली नाही. तरीही महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्र्याला सहकार्य करण्यासाठी उपमुख्यमंत्रीपद निर्माण केले आहे. पक्षांतर्गत असलेले मतभेद मिटवण्यासाठी किंवा आघाडी सरकारातील पक्षांना खुश करण्यासाठी उपमुख्यमंत्रीपद निर्माण करण्यात येते. आघाडी सरकारामध्ये एका पक्षाकडे मुख्यमंत्रीपद तर दुसऱ्या पक्षाकडे उपमुख्यमंत्री पद देण्यात येते. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री या दोघांमध्ये सलोख्याचे व सहकार्याचे संबंध असणे महत्त्वाचे असते. परंतु त्यांच्यात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष ताणतणाव निर्माण झाले तर राज्यकारभार करण्यास अडथळा येतो. मुख्यमंत्री एका पक्षाचा आणि उपमुख्यमंत्री दुसऱ्या पक्षाचा असेल तर मत भिन्नता व संघर्ष चालू राहतात. कारण प्रत्येकाला आपल्या पक्षाचे अस्तित्व टिकवायचे असते. आघाडी सरकार निर्माण करतेवेळी उपमुख्यमंत्री पदाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त होते. घटनात्मक तरतूद नसतानाही राजकीय परिस्थितीमुळे उपमुख्यमंत्रीपदाचे महत्त्व वाढलेले आहे. उपमुख्यमंत्री हा मुख्यमंत्र्याच्या बरोबरीने राज्यकारभार करीत असतो. २००४ काँग्रेसप्रणित आघाडी सरकार स्थापन करताना मुख्यमंत्रीपद व उपमुख्यमंत्रीपद कोणत्या पक्षाला द्यायचे याचा निर्णय घेण्यास वेळ लागला. शेवटी मुख्यमंत्रीपद राष्ट्रीय काँग्रेसला व उपमुख्यमंत्रीपद व काही महत्वाची खाती राष्ट्रवादी काँग्रेसला देऊन मतैक्य घडवून आणले आणि लोकशाही आघाडी सरकार स्थापन केले.

२०१९च्या विधानसभा निवडणूकीनंतर भारतीय जनता पक्ष व शिवसेनेत मुख्यमंत्री पदावरून व खाते वाटपावरून निर्माण झालेल्या वादानंतर शिवसेना – भाजपयुती संपुष्टात आली. शिवसेनेसोबतची युती तुटल्यानंतर २३ नोव्हेंबर २०१९ ला भाजपचे देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस सोबत बंड करून अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. परंतु बहुमत सिद्ध करू न शकल्याने तीनच दिवसात देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. या सर्व राजकीय घडामोडीनंतर शिवसेना, भारतीय राष्ट्रीय

काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तीन प्रमुख पक्षांनी एकत्र येऊन महाविकास आघाडी सरकार स्थापन केले. या आघाडी सरकारमध्ये उद्धव ठाकरे मुख्यमंत्री आणि अजित पवार उपमुख्यमंत्री झाले. महाविकास आघाडीचे सरकार हे केवळ अडीच वर्षच टिकले. शिवसेनेचे मंत्री एकनाथ शिंदे यांच्या सह ४० आमदारांनी बंड केल्याने महाविकास आघाडीचे सरकार पडले. एकनाथ शिंदे यांनी ४० आमदारांना सोबत घेऊन भाजप बरोबर युती केली. या युती सरकारमध्ये एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री व भारतीय जनता पक्षाचे देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. जुलै २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली व अजित पवारांसह अनेक आमदार सत्ताधारी महायुतीत सामील झाले. २०२४ ला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाले. भारतीय जनता पक्ष, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या तीन प्रमुख पक्षांनी महायुती सरकार स्थापन केले. सध्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार हे आहेत.

**आजपर्यंत झालेले महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री**

| अ. क्र. | उपमुख्यमंत्री | कार्यकाल | राजकीय पक्ष | मुख्यमंत्री |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. नासिकराव तिरपुडे | १९७८ | काँग्रेस (आय) | श्री. वसंतदादा पाटील |
| २ | श्री. सुंदरराव सोळंखे | १९७८ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | श्री. शरद पवार |
| २ | श्री. रामाराव आदीक | १९८३ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | श्री. वसंतदादा पाटील |
| ३ | श्री. गोपीनाथ मुंडे | १९९५ | भारतीय जनता पक्ष | श्री. मनोहर जोशी |
| ४ | श्री. गोपीनाथ मुंडे | १९९९ | भारतीय जनता पक्ष | श्री. नारायण राणे |
| ५ | श्री. छगन भुजबळ | १९९९ | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री. विलासराव देशमुख |
| ६ | श्री. छगन भुजबळ | २००३ | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री. विलासराव देशमुख |
| ७ | श्री. विजयसिंह मोहिते-पाटील | २००३ | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री. सुशीलकुमार शिंदे |
| ८ | श्री. आर. आर. पाटील | २००४ | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री. विलासराव देशमुख |
| ९ | श्री. छगन भुजबळ | २००८ | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री. अशोक चव्हाण |
| १० | श्री. छगन भुजबळ | २००९ | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री. अशोक चव्हाण |
| ११ | श्री. अजित पवार | २०१० | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री. पृथ्वीराज चव्हाण |
| १२ | श्री. अजित पवार | २०१९ | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री. उद्धव ठाकरे |
| १३ | श्री. देवेंद्र फडणवीस | २०२२ | भारतीय जनता पक्ष | श्री. एकनाथ शिंदे |
| १४ | श्री. एकनाथ शिंदे व श्री. अजित पवार | २०२४ | राष्ट्रवादी काँग्रेस | श्री. देवेंद्र फडणवीस |

**स्वयं अध्ययन प्रश्न २ :**

**खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य तो पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. ........ हे मंत्रिमंडळाच्या बैठकीचे अध्यक्ष असतात.

अ) राज्यपाल ब) मुख्यमंत्री क) उपमुख्यमंत्री ड) सभापती

२. मुख्यमंत्री हा राज्याचा................ सत्ता प्रमुख असतो.

अ) नामधारी ब) हंगामी क) घटनात्मक ड) वास्तववादी

३. .......... हा राज्यपाल आणि मंत्रिमंडळ यांना साधणारा दुवा असतो.

अ) राष्ट्रपती ब) मुख्यमंत्री क)सभापती ड) न्यायाधीश

४. सध्या महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ............. हे आहेत.

अ) देवेंद्र फडवणीस ब) एकनाथ शिंदे क) अजित पवार ड) उद्धव ठाकरे

५. मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ यांचा कार्यकाल ......... वर्ष असतो.

अ) दोन ब) चार क) पाच ड) सहा

६. सर्व मंत्र्यांमध्ये समानातील प्रमुख, मंत्रिमंडळरुपी कमानीची मध्यशीला किंवा ग्रहमालिकेतील सूर्य असे वर्णन ............यांचे केले जाते.

अ) राज्यपाल ब) मुख्यमंत्री क) उपमुख्यमंत्री ड) यापैकी नाही

७. महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ ............. या गृहाला सामूहिकरित्या जबाबदार राहते.

अ) राज्यसभा ब) लोकसभा क) विधान परिषद ड) विधानसभा

## २.२.३ मंत्रिमडळाचे अधिकार व कार्ये (Powers and Functions of Council of Ministers) :

भारतीय राज्यघटनेच्या १६३ व्या कलमानुसार राज्यपालांना त्याच्या कार्यात मदत करण्यासाठी आणि सल्ला देण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ असेल. केंद्राप्रमाणेच घटकराज्यासाठी संसदीय शासनपद्धती स्वीकारलेली आहे. राज्यघटनेच्या १६४ व्या कलमानुसार राज्यपाल मुख्यमंत्र्यांची नेमणूक करतील आणि मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या नेमणूका करतील अशी तरतूद केली आहे.

**मंत्रिमंडळाची निर्मिती व रचना :**

सार्वत्रिक निवडणुकीमध्ये ज्या राजकीय पक्षाला किंवा आघाडीला विधानसभेत बहुमत प्राप्त होते त्या राजकीय पक्षाला किंवा आघाडीच्या नेत्याला राज्यपाल मुख्यमंत्री पदासाठी नियुक्त करतात. विधानसभेत जर कोणत्याच राजकीय पक्षाला बहुमत मिळाले नसेल तर राज्यपाल आपल्या स्वविवेकबुद्धीच्या आधारे ज्या नेत्याला विधानसभेत बहुमत मिळू शकेल अशा नेत्याची मुख्यमंत्रीपदावर नियुक्ती केली जाते. राज्यपालांना

मंत्रिमंडळाची निर्मिती करणे ही महत्त्वाची जबाबदारी विवेकबुद्धीने पार पाडावी लागते. त्यामुळे मुख्यमंत्र्यांची नियुक्ती करताना त्यांना बहुमत आहे की नाही हे काळजीपूर्वक पाहण्याची जबाबदारी राज्यपालांची असते. राज्यपालांनी घाईघाईने किंवा पक्षपातीपणे मुख्यमंत्र्यांची निवड केली तर आणि मुख्यमंत्र्यांना बहुमत स्पष्ट करता आले नाही तर त्याला आपला राजीनामा द्यावा लागतो. विधानसभेत कोणत्याच राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही तर राज्यपाल आपल्या स्वविवेकबुद्धीने अशाच व्यक्तीची मुख्यमंत्रिपदी निवड करावी की, जी स्पष्ट व निर्विवाद बहुमत सिद्ध करू शकेल.

**मंत्रिमंडळाची निर्मिती :**

राज्यपाल मुख्यमंत्र्यांच्या शिफारशीने मंत्रिमंडळातील मंत्र्यांची नेमणूक करतात. मुख्यमंत्री आपल्या पक्षातील ज्येष्ठ, अनुभवी व हुशार व्यक्तींची मंत्री म्हणून निवड करतात. मंत्री म्हणून निवडताना पक्षातील विविध गटांना मंत्रिमंडळात स्थान द्यावे लागते. राज्यात जर आघाडीचे सरकार असेल तर आघाडीतील पक्षांना मंत्रिमंडळात स्थान द्यावे लागते तसेच राज्याचे वेगवेगळे प्रादेशिक विभाग, विविध गट, अनुसूचित जातीजमाती, इतर मागासवर्गीय, महिला वर्ग इत्यादींना मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व दिले जाते. मुख्यमंत्री मंत्र्यांची निवड करताना प्रशासकीय कौशल्य, पक्षातील प्रभाव, अनुभव व लोकप्रियता अशा गुणांचाही विचार केला जातो. राज्य विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या सदस्याला मंत्री म्हणून नियुक्त केले जाते. कोणत्याही सभागृहाचा सदस्य नसणाऱ्या व्यक्तीची मंत्री म्हणून नियुक्ती झाली तर त्या व्यक्तीला सहा महिन्यांच्या आत कोणत्याही एका सभागृहाचे सदस्य म्हणून निवडून यावे लागते अन्यथा तिचे मंत्रिपद संपुष्टात येते. एखाद्या मंत्र्याची अकार्यक्षमता आढळून आल्यास मुख्यमंत्री त्या मंत्र्याला बडतर्फ करू शकतात किंवा त्याला राजीनामा देण्यास सांगतात. मुख्यमंत्र्यांची मर्जी असेपर्यंत मंत्री आपल्या पदावर राहू शकतात.

सामान्यतः मंत्रिमंडळातील मंत्र्यांचे तीन स्तर असतात.

१. कॅबिनेट मंत्री

२. राज्य मंत्री

३. उप मंत्री

कॅबिनेट मंत्र्यांकडे महत्त्वाची खाती असतात. कॅबिनेट ही घटक राज्याचे धोरणे ठरवणारी सर्वोच्च यंत्रणा आहे. राज्यमंत्र्यांना कॅबिनेट मंत्र्याएवढा दर्जा व वेतन मिळते. कॅबिनेट मंत्र्यांना राज्यमंत्री व उपमंत्री तसेच संसदीय सचिव सहकार्य करतात. राज्यमंत्र्यावर काही प्रशासकीय जबाबदारी सोपविली जाते. वरिष्ठ मंत्र्यांना त्यांच्या कार्यात उपमंत्री सहकार्य करतात.

मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या ही विधानसभेतील सदस्य संख्येच्या १५ टक्केहून जास्त असू नये व ती कमीत कमी १२ एवढी असावी असावी. महाराष्ट्र विधानसभेची सदस्यसंख्या ही २८८ आहे तिच्या १५ टक्के म्हणजेच जास्तीतजास्त ४३ सदस्य हे महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात असू शकतात.

घटकराज्याच्या कारभाराची सर्व जबाबदारी ही मंत्रिमंडळाची असते. मंत्रिमंडळाच्या बैठका ह्या नियमितपणे होतात. आठवड्यातून एकदा मंत्रिमंडळाची बैठक होते. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होते. त्याला

कॅबिनेट मंत्री उपस्थित राहतात. राज्यमंत्री व उपमंत्री मंत्रिमंडळाच्या बैठकीस उपस्थित राहू शकत नाहीत. मुख्यमंत्र्यांनी एखाद्या राज्यमंत्र्याला निमंत्रण दिले तरच ते बैठकीस उपस्थित राहू शकतात. मुख्यमंत्र्यांच्या अनुपस्थितीत/गैरहजेरीत बैठकीचे अध्यक्षस्थान कॅबिनेटमधील ज्येष्ठ मंत्री स्वीकारतात. राज्याची सर्व महत्त्वाची धोरणे ही मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा करून घेतली जातात.

**कार्यकाल :**

मंत्रिमंडळाचा कार्यकाल हा पाच वर्षाचा असतो. राज्यपाल मुदतीपूर्वी मंत्रिमंडळ बरखास्त करू शकतात. संपूर्ण मंत्रीमंडळ सामूहिकरीत्या विधानसभेला जबाबदार असते. विधानसभेचा विश्वास असे पर्यंत मंत्रिमंडळ सत्तेवर राहते. विधानसभेत मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव मंजूर झाला तर मुख्यमंत्री आपल्या सर्व मंत्र्यांसह मंत्रिमंडळाचा राजीनामा देतात. राज्यपाल मंत्र्यांना पद व गोपनीयतेची शपथ देतात.

**वेतन व भत्ते :**

मंत्र्यांचे वेतन व भत्ते ठरविण्याचा अधिकार राज्य विधिमंडळाला आहे. मंत्र्यांना मोफत निवास, टेलिफोन, प्रवास भत्ते, वैद्यकीय सुविधा इत्यादी सुविधा दिल्या जातात.

**मंत्रिमंडळाची वैशिष्ट्ये :**

मंत्रिमंडळाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१. सामूहिक जबाबदारी** (Collective Responsibility) **:**

भारतीय राज्यघटनेच्या १६४ (२) कलमा अन्वये राज्याचे मंत्रिमंडळ विधानसभेला सामूहिकरित्या जबाबदार राहते. जोपर्यंत विधानसभेचा मंत्रिमंडळावर विश्वास असतो तोपर्यंत मंत्रिमंडळ अधिकार पदावर राहते. 'एकासाठी सर्व व सर्वांसाठी एक' अशा पद्धतीने मंत्रिमंडळ सामूहिकरित्या विधानसभेला जबाबदार राहते. विधानसभेत मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव मंजूर झाला तर मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. त्यामुळेच मुख्यमंत्री नेहमी विधानसभेला जबाबदार राहून कार्य करीत असतात. ते आपल्या सर्व मंत्र्यांना विश्वासात घेतात. मुख्यमंत्री मंत्रिमंडळाच्या बैठका ह्या नियमितपणे घेऊन सर्व मंत्र्यांत ऐक्य व एकजिनसीपणा निर्माण करतात.

**२. गोपनीयता :**

मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये घेण्यात येणारे निर्णय, ठरावासंबंधी गुप्तता पाळावी लागते. प्रत्येक मंत्री पदग्रहण करतेवेळी गुप्ततेची शपथ घेतात. मंत्रिमंडळाच्या बैठका गुप्त पद्धतीने होतात. मुख्यमंत्र्याने निर्णय घोषित केल्याशिवाय त्यासंबंधी कोठेही बोलू नये असे गुप्ततेचे बंधन प्रत्येक मंत्र्यावर असते.

**३. एकजिनसीपणा :**

मंत्रिमंडळातील मंत्र्यांमध्ये एकजिनसीपणा, ऐक्य आढळून येते. सर्व मंत्री मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एकत्र येऊन प्रत्येक निर्णय एकमताने घेतला जातो. त्यामुळे मंत्रिमंडळाच्या कार्यात ऐक्यभाव व एकजिनसीपणा निर्माण होतो.

**४. संमिश्र मंत्रिमंडळ /आघाडीचे सरकार :**

विधानसभेत कोणत्याच राजकीय पक्षाला बहुमत मिळाले नसेल तर विविध राजकीय पक्षांचे मिळून आघाडी सरकार स्थापन केले जाते. महाराष्ट्रात आघाडी सरकारचा प्रयोग यशस्वी झालेला आहे. आघाडी सरकारमध्ये सामील झालेल्या राजकीय पक्षांत एकजूट, एकजिनसीपणा असेल तरच ते सरकार दीर्घकाळ टिकून राहते. महाराष्ट्रात २०१४ साली भाजप-शिवसेनेचे आघाडी सरकार होते. २०१९ पासून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या राजकीय पक्षांचे मिळून महाआघाडीचे सरकार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाले पण २०२२ साली महाविकास आघाडीचे सरकार पडले. २०२२ साली शिवसेनेचे आमदार एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदार शिवसेनेतून फूटून बाहेर पडले. या फुटलेल्या आमदारांनी भारतीय जनता पक्षाबरोबर युती करून एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले. २०२४ साली भारतीय जनता पक्ष, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या तीन प्रमुख राजकीय पक्षांनी एकत्र येऊन महायुती सरकार स्थापन केले आहे.

**५. वास्तववादी सत्ताप्रमुख :**

घटकराज्याचा घटनात्मक प्रमुख राज्यपाल असतो परंतु तो मंत्रिमंडळाच्या बैठकीना उपस्थित राहत नाही. प्रत्यक्षात मुख्यमंत्री व त्याचे मंत्रिमंडळ हे सर्व निर्णय घेत असतात. मुख्यमंत्री वास्तववादी प्रमुख असतो. तो मंत्रिमंडळाचा नेता, सभागृहाचा नेता सतारूढ पक्षाचा नेता या सर्वाची जबाबदारी पार पाडत असतो.

**मंत्रिमंडळाची कार्ये :**

राज्यपाल हा घटकराज्याचा कार्यकारी प्रमुख असला तरी मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ वास्तववादी सत्ताप्रमुख असतात. घटकराज्याचे मंत्रिमंडळ घटकराज्याच्या प्रशासनाबाबत निर्णय घेते व त्याची अंमलबजावणी करते.

सामान्यत: मंत्रिमंडळाला पुढील कार्ये करावी लागतात.

**१. शासनाचे धोरणे ठरविणे :**

घटकराज्याच्या शासनाची धोरणे निश्चित करणे ही मंत्रिमंडळाची सामूहिक जबाबदारी असते. ठरविलेल्या धोरणांची आणि घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी मंत्रिमंडळातील मंत्र्यांकडून होत असते. प्रत्येक मंत्री आपल्या खात्याच्या संबंधित ध्येयधोरणांची आणि निर्णयांची अंमलबजावणी करीत असतात. राज्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याची जबाबदारी मंत्रिमंडळावर असते.

**२. विधेयके तयार करणे :**

कायदेनिर्मितीच्या कार्यात मंत्रिमंडळाला महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते. विधिमंडळात मांडली जाणारी बहुसंख्य विधेयके सरकारी असतात. त्यामुळे विधेयकांचा मसुदा तयार करणे, ती सभागृहात मांडणे, विधेयकांचा उद्देश सभागृहाला समजावून देणे, ती मंजूर करून घेणे इत्यादी कार्ये मंत्रिमंडळाला करावी लागतात. विधिमंडळात विचारलेल्या प्रश्नांना, उपप्रश्नांना समर्पक उत्तरे देण्याची जबाबदारी संबंधित खात्याच्या मंत्र्यावर असते. विधिमंडळाने संमत केलेली विधेयकांची आणि धोरणांची अंमलबजावणी मंत्रिमंडळाकडून होते. विधिमंडळाचे अधिवेशन सुरु नसताना आवश्यकता भासल्यास वटहुकूम काढले जातात.

**३. वित्तीय कार्ये :**

राज्याचे आर्थिक धोरण ठरविण्याचे कार्य मंत्रिमंडळाला करावे लागते. अर्थमंत्री अर्थखात्याकडून वार्षिक अंदाजपत्रक मांडतो. त्यापूर्वी प्रत्येक खात्याकडून उत्पन्न आणि खर्च याविषयी अंदाजे खर्चाची माहिती ही अर्थ मंत्रालयाकडे पाठविली जाते. त्या माहितीच्या आधारे अर्थसंकल्प तयार केला जातो. अर्थसंकल्प हा विधिमंडळात मांडण्यापूर्वी त्यावर मंत्रिमंडळाच्या बैठकीत सविस्तर अशी चर्चा होते आणि मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन अर्थसंकल्प विधिमंडळामध्ये मांडला जातो. विधिमंडळाने मंजूर केलेल्या आर्थिक धोरणांची व अर्थसंकल्पांची अंमलबजावणी मंत्रिमंडळाकडून होते. केंद्र सरकारकडून अनुदान मागणे, कर्ज उभारणी करणे, कर आकारणीचे धोरण ठरविणे, कर्जाची परतफेड करणे, वस्तूंच्या किमतीवर नियंत्रण ठेवणे, राज्याच्या संचित निधीतून खर्चाचा प्रस्ताव मांडणे, खर्चाचा अहवाल विविध खात्यांकडून मागविणे इत्यादी अर्थविषयक कार्ये मंत्रिमंडळाला पार पाडावी लागतात.

**४. नेमणूका करणे :**

राज्याचा महाधिवक्ता, राज्य लोकसेवा आयोगचे सदस्य, विविध लोकनिगम व प्राधिकरणाचे सदस्य, विधान परिषदेतील राज्यपाल नियुक्त सदस्य इत्यादींच्या नेमणूका ह्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार राज्यापालांकडून केल्या जातात.

**५. इतर कार्ये :**

मंत्रिमंडळ आपल्या कामकाजाचा अहवाल दर १५ दिवसांनी राज्यपालांकडे पाठविते. मंत्रिमंडळ न्यायाधीशांच्या नियुक्तीसंबंधी राज्यपालाला सल्ला देऊ शकते. राज्यातील विकास कार्यक्रम, विकास योजना राबविणे, पालकमंत्री या नात्याने जिल्ह्याच्या विकासाकडे लक्ष देणे, परकीय पाहुण्यांचे स्वागत करणे, वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या यांना राज्यकारभार व ध्येयधोरणांसंबंधीची माहिती देणे इत्यादी कार्ये मंत्रिमंडळाला करावी लागतात.

**मंत्रिमंडळ आणि राज्यपाल यांचा संबंध :**

राज्यपाल हे घटकराज्याचे घटनात्मक प्रमुख असतात परंतु प्रत्यक्षात सत्ता ही मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ यांच्याकडे असते. त्यामुळे राज्यपालांचे पद नामधारी आहे. राज्याचे मंत्रिमंडळच वास्तववादी कार्यकारी प्रमुख असते. घटक राज्यात राष्ट्रपतींचा प्रतिनिधी म्हणून राज्यपाल कार्य करीत असतात. केंद्र सरकार आणि घटकराज्य सरकार यांना सांधणारा महत्त्वाचा दुवा म्हणून राज्यपाल कार्य करतात. केंद्र सरकार राज्यपालांमार्फत घटकराज्यावर नियंत्रण ठेवते. राज्यपालांचे पद नामधारी आहे परंतु राज्यपालांना स्वविवेकाधीन अधिकार दिल्यामुळे राज्यपाल पदाचे महत्त्व वाढले आहे.

विधानसभेत बहुमत प्राप्त राजकीय पक्षाचा नेता हे मुख्यमंत्री बनतात आणि ते आपल्या पक्षातील सदस्यांची निवड करून मंत्रिमंडळ बनवितात. काही वेळा विधानसभेत कोणत्याच राजकीय पक्षाला बहुमत प्राप्त होत नाही अशा वेळी राज्यपालांना स्वविवेकबुद्धीने निर्णय घेऊन विधानसभेत स्पष्ट बहुमत मिळवू शकणाऱ्या व्यक्तीची मुख्यमंत्री म्हणून निवड करतात. राज्यपाल आपल्या विवेकबुद्धीने निर्णय घेऊन राज्याला स्थिर प्रशासन देतात.

मंत्रिमंडळ व राज्यपाल यांचे संबंध सलोख्याचे व सहकार्याचे असतील तर केंद्र सरकार व राज्य सरकार यांचे संबंध दृढ स्वरूपाचे होतील. राज्यात राजकीय पेचप्रसंग निर्माण झाला, तर राज्यपालांनी खरी वस्तुस्थिती विचारात घेऊन त्यासंबंधी आपल्या विवेकबुद्धीने निर्णय देऊन कार्यवाही केली पाहिजे. त्यासंबंधीची योग्य माहिती राष्ट्रपतींना देऊनच हे कार्य केले जाते. काही वेळा राष्ट्रपती राज्यपालांना आदेश देतात. अशा वेळी मुख्यमंत्र्यांचा सल्ला न मानता राष्ट्रपतींच्या आदेशाचे पालन करावे लागते. घटनात्मकदृष्ट्या राज्यपालांनी मुख्यमंत्र्यांचा सल्ला मानला पाहिजे, असे जरी असले तरी राष्ट्रपतींचा प्रतिनिधी या नात्याने राज्यपाल राष्ट्रपतींच्या आदेशाचे पालन करतात. तरीही राज्यपालांनी घटकराज्याची स्वायत्तता आणि अधिकार जोपासण्यासाठी विवेकाधीन अधिकाराचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. राज्यपाल हे घटकराज्याच्या मंत्रिमंडळाचा सल्लागार, मार्गदर्शक आणि नियंत्रक या नात्याने कार्य करणे महत्त्वाचे असते. महाराष्ट्रात राज्यपाल व मुख्यमंत्री यांचे संबंध नेहमी सलोख्याचे असणे गरजेचे आहे. काही वेळा राज्यपाल व मंत्रिमंडळामध्ये संघर्ष व मतभेद ही झालेले आहेत.

## २.३ सारांश :

भारताने संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. केंद्राप्रमाणेच घटक राज्यांचा राज्यकारभारही संसदीय शासन पद्धतीप्रमाणे चालतो. राज्यपाल हे घटकराज्याचे नामधारी प्रमुख असतात व राज्याची वास्तविक सत्ता ही मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रीमंडळ यांच्याकडे असते. राज्याचे मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्रीमंडळ यांच्या साह्याने राज्यपाल आपली जबाबदारी पार पाडतात. काही अपवाद वगळता मंत्रिमंडळाचा सल्ला किंवा शिफारस राज्यपालांना बंधनकारक असतो. श्रीमती सरोजिनी नायडू म्हणतात की, ''राज्यपाल हे सोनेरी पिंजऱ्यातील पक्षी आहेत.''

राज्यपाल हे राष्ट्रपती आणि केंद्रशासन यांचे प्रतिनिधी आहेत. केंद्र सरकार आणि घटकराज्य सरकार यांना सांधणारा महत्त्वाचा दुवा म्हणून ते कार्य करतात. राज्यपाल व मुख्यमंत्री यांचे संबंध नेहमी सलोख्याचे व सहकार्याचे असणे महत्त्वाचे आहे. राज्यपाल, मुख्यमंत्री आणि मंत्रीमंडळ यांच्यात सुसंवाद असेल तरच राज्यकारभार यशस्वी होतो व शासन स्थिर होऊन राज्याच्या विकासाला गती मिळते.

## २.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

* **स्वविवेकबुद्धी :** स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धीने सारासार विचार करून निर्णय घेणे.
* **संमिश्र मंत्रिमंडळ :** अनेक राजकीय पक्ष एकत्र येऊन एक सरकार स्थापन केले जाते.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे १ :**

१) राष्ट्रपती

२) ३५

३) राज्यपाल

४) रमेश बैस

५) नामधारी

६) राज्यपाल

७) १/६

**स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे २ :**

१) मुख्यमंत्री

२) वास्तववादी

३) मुख्यमंत्री

४) देवेंद्र फडवणीस

५) पाच

६) मुख्यमंत्री

७) विधानसभा

## २.६ सरावासाठी प्रश्न :

**अ) टीपा लिहा.**

१. राज्यपाल पदाची पात्रता

२. मंत्रीमंडळाची वैशिष्टे

३. मंत्र्यांचे प्रकार

४. उपमुख्यमंत्री

५. सामूहिक जबाबदारी

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. राज्यपालांचे अधिकार, कार्ये आणि महत्त्व याची सविस्तर चर्चा करा.

२. मंत्रीमंडळाची निर्मिती सांगून मंत्रीमंडळाचे अधिकार व कार्ये विशद करा.

३. मुख्यमंत्र्यांची नियुक्ती पद्धत सांगून त्यांचे अधिकार व कार्ये स्पष्ट करा.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१. डॉ. कारेकर शोभा व डॉ. घोडके शरद – 'महाराष्ट्राचे शासन व राजकारण', अंशुल पब्लिकेशन, नागपूर.

२. सिरसीकर वसंत – 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण', कान्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.

३. डॉ. जोशी सुधाकर – 'भारतीय शासन व राजकारण', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

४. डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण – 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर.

५. पाटील बी. बी.– 'महाराष्ट्रातील राजकारण आणि चळवळी', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६. जाधव तुकाराम व शिरापूरकर महेश – 'भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया', युनिक अकॅडमी पुणे.

७. पाटील महेंद्र – 'महाराष्ट्रातील सामाजिक – राजकीय चळवळी आणि महाराष्ट्र प्रशासन', डायमंड पब्लिकेशन, पुणे.

८. साने रविकिरण, साने नीलिमा – महाराष्ट्राचे शासन व राजकारण', डायमंड पब्लिकेशन, पुणे.

९. Jain -shok - "Government and Politics of Maharashtra", Seth Publishers, Mumbai.

१०. Basu Durga Das - "Introduction to the Constitution of India", Prenticehall of India, Pvt. Ltd. New Delhi.

❍❍❍

घटक ३

# राज्य न्यायव्यवस्था

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ उच्च न्यायालयाची रचना

३.२.२ उच्च न्यायालयाचे अधिकार आणि कार्य

३.२.३ लोक अदालत– रचना, अधिकार आणि कार्य

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

३.५ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे :

हा घटक अभ्यासल्यानंतर तुम्हाला -

१. उच्च न्यायालयाची रचना सविस्तर समजून घेता येईल.

२. उच्च न्यायालयाचे अधिकार व कार्ये स्पष्ट करता येतील.

३. लोक अदालतीची संकल्पना, कार्यपद्धती, अधिकार व कार्ये जाणून घेता येईल.

४. उच्च न्यायालय आणि लोकअदालत यांच्यातील परस्पर संबंधांचे अवलोकन करता येईल.

## ३.१ प्रास्ताविक :

आधुनिक लोकशाही राज्यासाठी न्यायव्यवस्था असणे अपरिहार्य झाले आहे. कायद्याचा अर्थ लावून विवाद मिटविणे, व्यक्तीचे हक्क अबाधित ठेवणे अशा महत्त्वाच्या कामांकरिता न्यायव्यवस्था असावीच लागते. भारतात संघराज्यात्मक शासन व्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला आहे. भारतीय संघराज्याचे केंद्रानुवरर्ती स्वरूप लक्षात घेता केंद्रीकरणाच्या प्रक्रियेपासून घटक राज्यांचे संरक्षण करण्याची विशेष जबाबदारी इथल्या सर्वोच्च न्यायालयावर पडते. तसेच राष्ट्रातील फुटीर प्रवृत्तींना आवर घालण्यासाठी केलेल्या अनेक उपाययोजना पैकी एक म्हणजे संपूर्ण राष्ट्रासाठी एकेरी असलेली न्यायव्यवस्था होय. जगातील काही संघराज्यांमध्ये केंद्रीय न्यायव्यवस्था व घटक राज्यांची न्यायव्यवस्था अशा दोन स्वातंत्र्य व समांतर न्याय व्यवस्था असतात. त्याउलट भारतात वर पासून खालपर्यंत एकच न्यायालयीन उतरंड घटनाकारांनी निर्माण केली आहे.

इंग्रजी राजवटीमध्ये आधुनिक भारताची न्यायव्यवस्था विकसित झाली आहे. कलकत्ता, मुंबई, मद्रास, लाहोर, अलाहाबाद, पाटणा इत्यादी ठिकाणी उच्च न्यायालय (High Court's) होती. त्यांच्या निर्णयाविरुद्ध इंग्लंड मधील प्रिव्ही कौन्सिलच्या न्याय समितीकडे अपील केले जाऊ शकत असे. १९३५ च्या कायद्याने 'फेडरल कोर्ट ऑफ इंडिया' स्थापन करण्यात आले. घटनाकारांनी स्वातंत्र्यानंतर फेडरल कोर्ट ऑफ इंडिया च्या जागी सर्वोच्च न्यायालयाची (Supreme Court) प्रतिष्ठापना केली. कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळाप्रमाणेच न्यायमंडळ ही सुद्धा शासन व्यवस्थेची एक महत्त्वपूर्ण शाखा आहे. संघराज्यात विधिमंडळाच्या कायद्याचा अर्थ लावण्याचे कार्य न्याय मंडळाचे आहे. भारतात केंद्र आणि घटक राज्यांकरता एकच एकेरी न्यायव्यवस्था निर्माण केली आहे. भारतात न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्च स्थानी सर्वोच्च न्यायालय व त्याच्या अधिनस्त घटकराज्य स्तरावर उच्च न्यायालयाची व्यवस्था करण्यात आली आहे.

## ३.२ विषय विवेचन :

भारतातील न्यायव्यवस्थेमध्ये उच्च न्यायालयाला महत्त्वाचे स्थान आहे. राज्य किंवा राज्यांच्या गटासाठी कार्य करणाऱ्या या न्यायालयांची स्थापना भारतीय संविधानाच्या कलम २१४ अंतर्गत झाली आहे. उच्च न्यायालय हे संबंधित घटकराज्यातील सर्वोच्च न्यायिक संस्था आहे आणि त्याचे निर्णय अधिनस्थ न्यायालयांवर बंधनकारक असतात. भारतामध्ये पहिले उच्च न्यायालय १८६२ मध्ये कलकत्ता येथे स्थापन करण्यात आले.

त्यानंतर मुंबई आणि मद्रास येथेही उच्च न्यायालये स्थापन करण्यात आली. १९५० साली भारतीय संविधान लागू झाल्यानंतर प्रत्येक घटक राज्यासाठी किंवा एकापेक्षा अधिक घटक राज्यांसाठी एक उच्च न्यायालय असू शकते, असे संविधानात नमूद करण्यात आले. भारताने संघराज्यात्मक स्वरूपाच्या शासन पद्धतीचा स्वीकार केला असला तरी अमेरिकेच्या दुहेरी न्यायदान व्यवस्थेचा आपण स्वीकार केलेला नाही. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, कनिष्ठ न्यायालय अशी एकेरी किंवा एकात्म स्वरूपाची न्यायव्यवस्था भारतात निर्माण करण्यात आली आहे. उच्च न्यायालयाची तरतूद भारतीय राज्यघटनेच्या पाचव्या व सहाव्या भागात कलम १२४ ते १४६ मध्ये तसेच कलम २१४ ते २३७ मध्ये न्यायदान व्यवस्थेची तरतूद करण्यात आली आहे. भारतीय लोकशाही व्यवस्थेतील न्यायसंस्थेला विशेष महत्त्व आहे. घटनेनुसार भारतात संघराज्य व्यवस्था स्विकारली असून प्रत्येक घटक राज्यात न्यायव्यवस्थेची तरतूद केली आहे. न्यायव्यवस्था नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करून कायद्याचे राज्य सुनिश्चित करते. घटक राज्यातील न्यायव्यवस्थेची रचना मुख्यतः उच्च न्यायालय, जिल्हा न्यायालये आणि अधिनस्त न्यायालये अशा स्वरूपाची असते. या न्यायालयांना विशिष्ट अधिकार व कार्यक्षेत्र देण्यात आले आहेत, जी न्यायदानाच्या कार्यात पारदर्शकता व परिणामकारकता आणण्याचे काम करतात. लोकअदालत ही भारतीय न्यायप्रणालीची एक पूरक व्यवस्था आहे, जी समाजातील सर्व घटकांना न्यायप्रवेशाची समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी निर्माण करण्यात आली आहे. जलद, सुलभ, विनामूल्य आणि तडजोडीच्या माध्यमातून न्याय मिळावा या उद्देशाने लोकअदालतींची स्थापना करण्यात आली आहे. न्याय सर्वांसाठी या मूलतत्त्वावर आधारित लोकअदालती वाद निवाड्याचा एक पर्यायी मार्ग प्रदान करतात. या प्रणालीचा मुख्य उद्देश असा आहे की, सामान्य माणसाला न्याय मिळण्यासाठी अनेक वर्षे कोर्टात खेटे घालावे लागू नयेत, वेळ आणि पैसा खर्च होऊ नये आणि वाद तडजोडीच्या माध्यमातून शांततेने निकाली निघावेत.भारतीय राज्यघटनेनुसार प्रत्येक नागरिकाला न्याय मिळण्याचा मूलभूत हक्क आहे. मात्र न्यायप्रक्रिया अनेक वेळा खर्चिक, वेळखाऊ आणि गुंतागुंतीची ठरते. अशा परिस्थितीत सामान्य नागरिकाला न्याय मिळवणं कठीण होतं. ही गरज ओळखून भारतीय न्यायव्यवस्थेने लोकअदालत ही संकल्पना स्विकारली आहे. त्यामुळे लोकअदालत ही एक जलद, सुलभ आणि विनामूल्य न्याय देणारी व्यवस्था आहे. यात दोन्ही पक्ष एकमेकांच्या सहमतीने वाद मिटविण्याचा प्रयत्न करतात आणि न्यायालयीन प्रक्रियेशिवाय तडजोडीच्या आधारे निकाल दिला जातो. त्यामुळे वेळ, पैसा आणि मानसिक त्रास वाचतो. ही व्यवस्था विशेषतः गरिबांसाठी, दुर्बळांसाठी आणि ग्रामीण भागातील लोकांसाठी आशेचा किरण ठरते. लोकअदालतींमुळे न्यायालयांवरील ताण कमी होतो आणि अनेक जुन्या प्रकरणांचे निपटारे शक्य होतात. ही व्यवस्था सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्याचेही महत्त्वाचे कार्य करते. म्हणूनच लोकअदालत ही न्यायालयीन व्यवस्थेतील एक महत्वपूर्ण आणि लोकाभिमुख पाऊल आहे. तसेच, पारंपरिक न्यायप्रणालीबरोबरच लोकन्याय किंवा लोक अदालत ही व्यवस्था देखील महत्त्वाची ठरते.

**भारतातील न्यायव्यवस्थेची रचना :**

सर्वोच्च न्यायालय (सरन्यायाधीश व इतर न्यायाधीश)

⇩

उच्च न्यायालय (मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीश)

⇩

कनिष्ठ न्यायालये (जिल्हा व सेशन न्यायाधीश)

**दिवानी व फौजदारी न्यायालये :**

| | |
|---|---|
| १. सिव्हिल जज | १. मॅजीस्ट्रेट वर्ग १ (सीनियर डिव्हिजन) |
| २. सिविल जज | २. मॅजिस्ट्रेट वर्ग २ (ज्युनिअर डिव्हिजन) |
| ३. स्मॉल कॉजेस कोर्ट | ३. मॅजिस्ट्रेट वर्ग ३ |

**१. घटक राज्यातील न्यायव्यवस्थेची रचना :**

भारतीय राज्य घटनेनुसार प्रत्येक घटक राज्यामध्ये स्वतंत्र उच्च न्यायालय स्थापन करण्यात आले आहे. याखाली इतर अधिनस्त न्यायालये येतात. ही रचना तीन स्तरांमध्ये विभागलेली आहे.

**१. उच्च न्यायालय (High Court) :**

प्रत्येक राज्याचे किंवा दोन किंवा अधिक राज्यांचे एकत्रित उच्च न्यायालय असू शकते.उच्च न्यायालय भारतीय राज्य घटनेच्या कलम २१४ ते २३१ मध्ये घटक राज्यासाठी उच्च न्यायालयाची तरतूद करण्यात आली आहे. उच्च न्यायालयाच्या अधिकारात मूलभूत हक्कांचे संरक्षण, घटनात्मक बाबींचा निर्णय, तसेच अधिनस्त न्यायालयांवरील देखरेख समाविष्ट असते. तसेच प्रत्येक घटक राज्यासाठी संसद कायदा करून दोन किंवा दोन पेक्षा जास्त घटक राज्यांसाठी किंवा केंद्रशासित प्रदेशासाठी एक उच्च न्यायालय स्थापन करू शकते.

**२. जिल्हा आणि सत्र न्यायालये (District Sessions Courts) :**

जिल्हा व सत्र न्यायालये राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी स्थापन करण्यात आली आहेत. जिल्हा न्यायालय नागरी प्रकरणांसाठी तर सत्र न्यायालय फौजदारी प्रकरणांसाठी कार्य करत असते. ही न्यायालये उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली कार्य करतात. जिल्हा न्यायालयाच्या खाली निरनिराळ्या श्रेणीची दुय्यम न्यायालये असतात. त्यात प्रथम वर्ग दिवाणी न्यायालय, द्वितीय वर्ग, तृतीय वर्ग दिवाणी न्यायालय अशा

श्रेणीची न्यायालये असतात. जिल्हा न्यायालयात दहा हजार ते तीस हजार रुपयांच्या किंमतीची प्रकरणे दाखल करता येतात. जिल्हा न्यायालयाला फाशीची शिक्षा देता येत नाही. एखाद्या प्रकरणात फाशीची शिक्षा देणे अपरिहार्य असेल तर त्यासाठी उच्च न्यायालयाची पूर्वपरवानगी जिल्हा न्यायालयाला घ्यावी लागेल.

**३. अधिनस्त न्यायालये (Subordinate Courts) :**

अधिनस्त न्यायालयामध्ये दिवाणी न्यायालय, न्याय दंडाधिकारी, प्रथम वर्ग व द्वितीय वर्ग न्यायालये यांचा समावेश होतो. ही न्यायालये स्थानिक पातळीवर न्यायदानाचे काम करतात. अधिनस्त न्यायालय किंवा तालुका न्यायालये न्यायव्यवस्थेच्या शेवटच्या तालुका स्तरावर न्यायालयाचे संघटन करण्यात आलेले आहे. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी हे न्यायालय स्थापन केलेले असते. दहा हजार रुपये किमतीपर्यंतची प्रकरणे तालुका न्यायालयात दाखल केली जाऊ शकतात. तालुका न्यायालयात दिवाणी व फौजदारी स्वरूपाच्या खटल्याचे कामकाज चालते.

## ३.२.१ उच्च न्यायालयाची – रचना :

भारतीय राज्यघटनेनुसार भारत हा एक राज्यांचा संघ आहे, ज्यात केंद्र आणि घटक राज्ये यांच्यात अधिकारांचे विभाजन करण्यात आले आहे. प्रत्येक घटक राज्याची स्वतंत्र न्यायव्यवस्था असून ती नागरिकांच्या न्यायहक्कांचे रक्षण करण्यासाठी कार्य करते. ही न्यायव्यवस्था न्याय, समता, स्वातंत्र्य आणि कायद्याचे राज्य या मुल्यांवर आधारित आहे. भारतीय न्यायव्यवस्था १९३५ च्या भारत सरकार कायद्याने प्रेरित होऊन, भारतीय संविधानाने तीन-स्तरीय संरचनेसह एक-एकात्मिक स्वरूपाची न्यायिक व्यवस्था स्थापन केली आहे. सर्वोच्च न्यायालय उच्च न्यायालये कनिष्ठ न्यायालये (जिल्हा न्यायालये आणि इतर कनिष्ठ न्यायालये) अशी न्यायालयांची अशी एकच व्यवस्था देशभरात निर्माण केली आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम २१४ ते २३१ मध्ये घटक राज्यासाठी उच्च न्यायालयाची तरतूद केली आहे. प्रत्येक घटक राज्यासाठी तसेच संसद कायदा करून दोन किंवा दोन पेक्षा जास्त घटकराज्यांसाठी किंवा केंद्रशासित प्रदेशांसाठी एकच उच्च न्यायालय देखील स्थापन करू शकते. भारतातील एकेरी न्यायव्यवस्थेचा उच्च न्यायालय एक भाग असले तरी ते न्यायविषयक स्वतंत्र्य संस्था या भूमिकेतूनच त्याचे कार्य चालत असते. प्रत्येक उच्च न्यायालयाला अभिलेख न्यायालयाचा दर्जा देण्यात आले आहे. म्हणजेच उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय प्रमाण दस्तऐवज त्या घटक राज्यातील न्यायप्रक्रियेत प्रमाण मानला जातो व कोणत्याही कनिष्ठ न्यायालयात ते ग्राह्य मानले जातात. उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली राज्यात जिल्हा व सत्र न्यायालय आणि तालुका पातळीवरील न्यायालय कार्य करत असतात. संसदेला कायदा करून एखाद्या घटक राज्यातील उच्च न्यायालयाच्या कामकाजाचा व्याप लक्षात घेता क्षेत्रफळ व लोकसंख्या विचारात घेऊन उच्च न्यायालयाचे एकापेक्षा जास्त विभाग निर्माण करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. महाराष्ट्रात मुंबई येथे उच्च न्यायालयाचे मुख्यालय असून नागपूर, औरंगाबाद व पणजी या ठिकाणी उच्च न्यायालयाचे खंडपीठ किंवा बेंच आहेत.

उच्च न्यायालयाच्या रचनेबाबत पुढील मुद्द्यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो.

**१) न्यायाधीशांची संख्या :**

भारतीय संविधानातील कलम २१६ नुसार प्रत्येक उच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश व राष्ट्रपती

आवश्यकतेनुसार वेळोवेळी ज्यांची नियुक्ती करतील असे अन्य न्यायाधीश असतात. संसदेच्या कायद्यानुसार कामाचा व्याप लक्षात घेऊन राष्ट्रपती इतर न्यायाधीशांची नेमणूक करु शकतो. कलम २२४ नुसार तात्पुरते आणि अतिरिक्त न्यायाधीश नेमण्याचा अधिकारही राष्ट्रपतींना देण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्येक उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या सारखी नसते. महाराष्ट्रात सध्या उच्च न्यायालयात खंडपीठासह एक मुख्य न्यायाधीश व इतर ४७ न्यायाधीश असे एकूण ४८ कायमस्वरूपी न्यायाधीश आहेत. शिवाय १६ अतिरिक्त न्यायाधीश आहेत.

**२) न्यायाधीशांची पात्रता :**

भारतीय राज्यघटनेच्या कलम २१७ मध्ये न्यायाधीशांची पात्रता निर्धारित केलेली आहे.

१) तो भारताचा नागरिक असला पाहिजे.

२) त्याने भारतातील कोणत्याही न्यायिक पदावर कमीत कमी दहा वर्षे काम केलेले असावे किंवा भारतातील कोणत्याही उच्च न्यायालयात कमीत कमी दहा वर्षे वकिली केलेली असावी.

३) राष्ट्रपतींच्या मते तो विख्यात कायदे पंडित असावा.

४) त्यांचे वय ६२ वर्षापेक्षा अधिक असू नये.

**३) न्यायाधीशांची नेमणूक :**

भारतीय राज्य घटनेच्या कलम २१७ नुसार उच्च न्यायालयातील सर्वच न्यायाधीशांची नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे. राष्ट्रपती उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीशांची निवड करताना सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश आणि संबंधित राज्याच्या राज्यपालांचा सल्ला घेतात. इतर न्यायाधीशांची नियुक्ती करताना त्या घटक राज्यतील राज्यपाल व उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांचा सल्ला राष्ट्रपती घेत असतात. राज्य घटना कलम २२४ नुसार राष्ट्रपती अतिरिक्त न्यायाधीश नेमू शकतात. अशा न्यायाधीशांची नियुक्ती दोन वर्षापेक्षा जास्त काळासाठी करता येत नाही. प्रत्येक उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नेमणूक राष्ट्रपतींच्या सही व शिक्क्याने होते.

**४) न्यायाधिशांचा शपथविधी :**

घटनेच्या तिसऱ्या परिशिष्टातील तरतूदीनुसार उच्च न्यायालयातील प्रत्येक न्यायाधीशाला आपले पद ग्रहण करण्यापूर्वी राज्यपालांसमोर किंवा त्याने नेमलेल्या अधिकाऱ्यांसमोर शपथ घ्यावी लागते.

**५) न्यायाधीशांचा कार्यकाल :**

संविधानाने न्यायाधीशांचा कार्यकाल निश्चित करताना त्यांची वयोमर्यादा ठरविली आहे. १९६२ च्या घटनादुरुस्तीने वयाची ६२ वर्ष पूर्ण होईपर्यंत उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम करता येते. आपल्या कार्यकाळात न्यायाधीशांना स्वेच्छेने राष्ट्रपतींकडे आपला राजीनामा देता येतो.

**६) न्यायाधीशांची पदच्यूती :**

न्यायाधीशांवर राज्यकर्त्यांचे नियंत्रण असू नये म्हणून न्यायाधीशांची पदच्युती करण्यासाठी महाभियोगाची

प्रक्रिया सांगितली आहे. गैरवर्तन, अकार्यक्षमता यावरून न्यायाधीशांना बडतर्फ करता येते. त्यासाठी न्यायाधीशांवर ठेवण्यात आलेले आरोप संसदेच्या दोन्ही सभागृहाने एकूण सभासद संख्येच्या बहुमताने व उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सदस्यांच्या २/३ बहुमताने महाभियोगाचा ठराव संमत झाल्यास राष्ट्रपती संबंधित न्यायाधीशांना पदच्युत करतात. घटक राज्याच्या विधिमंडळाला महाभियोगाचा अधिकार नाही. आतापर्यंत भारतातील उच्च न्यायालयाच्या कोणत्याही न्यायाधीशावर महाभियोग चालवण्यात आलेला नाही.

**७) न्यायाधीशांचे वेतन व भत्ते :**

उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे वेतन व भत्ते तसेच इतर सोयी सवलती संसद वेळोवेळी कायदा करून ठरविते. त्यांचे वेतन व भत्ते राज्याच्या संचित निधीतून दिले जाते. एकदा ठरवून दिलेले वेतन व भत्ते आर्थिक आणीबाणीचा अपवाद वगळता त्यांच्या कार्यकालात कमी करता येत नाहीत. राज्य विधिमंडळात वेतन व भत्ते यावर चर्चा होऊ शकत नाही. सध्या महाराष्ट्रात उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना २ लाख ५० हजार व इतर न्यायाधीशांना २ लाख २५ हजार वेतन दिले जाते.

**८) सेवा व निवृत्तीनंतर वकिली व्यवसाय करण्यास बंधन :**

उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना सेवानिवृत्तीनंतर कोणत्याही उच्च न्यायालयात वकिली व्यवसाय करण्यास बंधन किंवा बंदी घातली होती. परंतु १९५६ च्या घटनादुरुस्तीनुसार उच्च न्यायालयात न्यायाधीशास त्यांनी ज्या न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम केले नसेल आशा न्यायाल्यात त्यांना  वकिली व्यावसाय करता येइल.

**९) न्यायाधीशांच्या बदल्या :**

भारताच्या राष्ट्रपतींना सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांशी चर्चा करून एका राज्यातील उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची बदली दुसऱ्या राज्यातील उच्च न्यायालयात करण्याचा अधिकार आहे. भारताचे राष्ट्रपती भारताच्या मुख्य न्यायाधीशांशी सल्लामसलत केल्यानंतर एका उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची दुसऱ्या उच्च न्यायालयात बदली करू शकतात. पण असे करताना थर्ड जजेस केस (१९९८) नुसार उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या बदलीच्या बाबतीत, भारताच्या मुख्य न्यायाधीशांनी सर्वोच्च न्यायालयाच्या ४ सर्वात वरिष्ठ न्यायाधीशांच्या मंडळाव्यतिरिक्त संबंधित दोन उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांचा सल्ला घेतला जातो.

उच्च न्यायालयाची रचना ही न्यायिक स्वायत्तता, न्यायदेवतेचे संरक्षण आणि लोकशाही मूल्यांचे पालन यासाठी अत्यंत महत्त्वाची असते. उच्च न्यायालय ही प्रत्येक राज्यातील सर्वोच्च न्यायिक संस्था असून तिची रचना मुख्य न्यायमूर्ती व इतर न्यायमूर्तींपासून होते. तसेच खालच्या न्यायालयांवर नियंत्रण ठेवून एकसंघ आणि प्रभावी न्यायव्यवस्था निर्माण करते. उच्च न्यायालय हे भारतीय न्यायसंस्थेतील एक महत्त्वाचे स्तंभ आहे. या न्यायालयाचे मुख्य कार्य म्हणजे संविधानाचे संरक्षण करणे, कायद्याच्या अंमलबजावणीत न्याय देवून आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करणे. उच्च न्यायालय न्यायव्यवस्थेचा असा भाग आहे जो लोकशाहीत कायद्याचे वर्चस्व कायम ठेवतो. त्यामुळे नागरिकांच्या न्यायाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी उच्च न्यायालयाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. उच्च न्यायालय हे संविधानाचे रक्षण करणारे आणि जनतेला न्याय मिळवून देणारे एक महत्त्वाचे संस्थात्मक केंद्र आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न – १ :**

**अ) योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. भारतीय संविधानाच्या ................ कलमानुसार उच्च न्यायालयाची स्थापना केली आहे.

अ) कलम २१४ ते २३१ ब) कलम ११४ ते १३१

क) कलम १४ ते ३१ ड) कलम २१ ते २१

२. उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांची नियुक्ती कोण करते.

अ) पंतप्रधान ब) राष्ट्रपती

क) उपराष्ट्रपती ड) मुख्यमंत्री

३. उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना ................ वेतन दिले जाते.

अ) २ लाख २५ हजार ब) २ लाख

क) १ लाख २५ हजार ड) २ लाख ५० हजार

४. भारतात ................ उच्च न्यायालये आहेत.

अ) २५ ब) ३०

क) ३५ ड) २२

५. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे निवृत्तीचे वय ............... इतके आहे.

अ) ६५ वर्ष ब) ५५ वर्ष

क) ६२ वर्ष ड) ६० वर्ष

### ३.२.२ उच्च न्यायालयाचे अधिकार आणि कार्य :

भारतीय राज्यघटनेने उच्च न्यायालयाला व्यापक अधिकार दिले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने घटनेतील नियमांचा अर्थ लावणे, घटकराज्य सरकार व घटक राज्यातील अन्य व्यवस्था यांच्यातील संघर्ष व तंटे मिटवणे त्यासंबंधी निर्णय देणे, जिल्हा व अधिनस्त न्यायालयांनी दिलेल्या दिवाणी व फौजदारी खटल्यांच्या निर्णयांची तपासणी करणे, नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करणे असे अधिकार देण्यात आले आहेत. तरीही संविधानात उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रा बाबत तपशीलवार तरतुदी नाहीत. ते फक्त असे सांगते की, उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र संविधानाच्या प्रारंभापूर्वीसारखेच असतील यामध्ये महसूल बाबी, रिट अधिकारक्षेत्र, देखरेखीचे अधिकार, सल्ला देण्याचे अधिकार इत्यादी विषयक अधिकार असतील. उच्च न्यायालयाचे सध्याचे अधिकार क्षेत्र अनेक स्त्रोतांद्वारे नियंत्रित केले जाते. यामध्ये खालिल बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. संविधानिक तरतुदी, लेटर्स पेटंट, संसदेचे कायदे, राज्य विधिमंडळाचे कायदे, भारतीय दंड संहिता- १८६०, भारतीय न्याय संहिता- २०२३, फौजदारी प्रक्रिया संहिता- १९७३ आणि दिवाणी प्रक्रिया संहिता- १९०८ इ. वरील स्त्रोतांच्या आधारावर उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र विस्तृतपणे खालील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**उच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राची विभागणी पुढीलप्रमाणे कारात येईल.**

अ) प्रादेशिक अधिकार क्षेत्र

ब) प्रारंभिक किंवा मूळ अधिकार क्षेत्र

क) अपीलीय अधिकार क्षेत्र किंवा घटनेच्या अर्थासंबंधी पुननिर्णयाचा अधिकार

ड) दिवाणी विषयक किंवा नागरी प्रकरणातील वाद

इ) नियंत्रणात्मक अधिकार किंवा पर्यवेक्षी अधिकार क्षेत्र

ई) अभिलेख अधिकार क्षेत्र किंवा न्यायालयीन रेकॉर्ड

फ) न्यायालयीन पुनर्निर्णयाचा अधिकार

**अ) प्रादेशिक अधिकार क्षेत्र :** ज्या घटक राज्याचे ते उच्च न्यायालय आहे. त्या राज्यापुरतेच उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र मर्यादित असते. संसदेने कायदा करून एका उच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात दोन किंवा दोन पेक्षा जास्त राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांचा समावेश केला असेल तर तेवढे उच्च न्यायालयाचे भौगोलिक अधिकार क्षेत्र असते. महाराष्ट्रात एकच उच्च न्यायालय असून त्याचे अधिकार क्षेत्र महाराष्ट्र, गोवा व दिव, दमन या दोन राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशापुरते मर्यादित आहे.

**ब) प्रारंभिक किंवा मूळ अधिकार क्षेत्र :** उच्च न्यायालयाच्या मूळ अधिकार क्षेत्रात अशा खटल्यांचा समावेश होतो की, जे खटले केवळ उच्च न्यायालयात दाखल करून चालवले जातात. राज्यातील इतर कोणत्याही न्यायालयात चालवले जात नाहीत. म्हणजेच अपीलद्वारे नव्हे तर पहिल्याच टप्प्यावर वाद ऐकण्याच्या त्याच्या त्या अधिकाराला मूळ किंवा प्रारंभिक अधिकार क्षेत्र असे म्हणतात. भारतीय संविधानाच्या कलम २२६ अन्वये, उच्च न्यायालयाच्या प्रारंभिक अधिकार क्षेत्रात खालील बाबींचा समावेश होतो.

**(i) लेखी अधिकार क्षेत्र :** भारतीय संविधानाच्या कलम २२६ नुसार, उच्च न्यायालयाला मूलभूत हक्कांच्या आणि कोणत्याही सामान्य कायदेशीर हक्कांच्या अंमलबजावणीसाठी रिट जारी करण्याचा अधिकार आहे.उच्च न्यायालयाचे रिट अधिकार क्षेत्र हे विशेष नाही तर सर्वोच्च न्यायालयाच्या रिट अधिकार क्षेत्रासोबत समवर्ती आहे.याचा अर्थ, जेव्हा एखाद्या नागरिकाच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होते, तेव्हा पीडित पक्षाला थेट उच्च न्यायालयात किंवा सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा पर्याय असतो. तथापि, उच्च न्यायालयाचे रिट अधिकारक्षेत्र सर्वोच्च न्यायालयापेक्षा विस्तृत आहे. सर्वोच्च न्यायालय केवळ मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी रिट जारी करू शकते, तर उच्च न्यायालय मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी तसेच कोणत्याही सामान्य कायदेशीर अधिकारासाठी रिट जारी करू शकते. लेखी अधिकार क्षेत्र (Writ Jurisdiction) म्हणजे उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयाला संविधानात दिलेला असा विशेष अधिकार, ज्याद्वारे ते नागरिकांचे मूलभूत हक्क सुरक्षित राखू शकतात. तसेच उच्च न्यायालय राज्याच्या कोणत्याही भागात मूलभूत हक्कांचे उल्लंघन, कायद्याच्या अंमलबजावणीत त्रुटी, सार्वजनिक कर्तव्यातील दुर्लक्ष अशा बाबतीत लेखी आदेश (writ) काढू शकते. उच्च न्यायालयास मूलभूत हक्कांचे रक्षण व इतर कायदेशीर अधिकारांसाठी व्यक्तीला संरक्षण देण्यासाठी लेखी आदेश (writs) काढण्याचा अधिकार आहे. हे आदेश खालील प्रकारचे असतात:

1) Habeas Corpus (बंदी प्रत्यक्षीकरण) – बेकायदेशीर अटकेपासून संरक्षण

2) Mandamus (परमादेश) – कोणत्याही सार्वजनिक अधिकाऱ्याला त्याचे कर्तव्य पार पाडण्यास भाग पाडणे.

3) Prohibition (प्रतिषेध) – खालच्या न्यायालयास प्रक्रिया थांबवण्याचा आदेश देणे.

4) Certiorari (उत्प्रेषण) – खालच्या न्यायालयाचा निर्णय रद्द करणे.

5) Quo-Warranto (अधिकार पृच्छा) – व्यक्ती कोणत्या अधिकाराने एखादे पद धारण करते हे विचारणे. हे अधिकार मूलभूत हक्कांच्या उल्लंघनाच्या बाबतीत उच्च न्यायालयात थेट वापरले जाऊ शकतात. याबरोबरच उच्च न्यायालयाच्या प्रारंभिक अधिकार क्षेत्रात खालील बाबींचाही समावेश होतो.

**(ii)** राज्यातील स्थानिक संस्था, सार्वजनिक अधिकारी व सरकारी संस्था यांच्यातील प्रकरणे जिथे राज्यातील कोणतीही संस्था किंवा अधिकाऱ्याशी संबंधित कायदेशीर अधिकार, कर्तव्य किंवा हक्क याबाबत वाद असतो, अशा प्रकरणांतही उच्च न्यायालय त्याचे प्रारंभिक अधिकार वापरू शकते.

**(iii)** नागरी व दायित्व प्रश्नांमध्ये विशिष्ट कायद्यांतर्गत दिलेले अधिकार काही विशिष्ट कायदे उच्च न्यायालयाला प्रारंभिक अधिकार देतात, उदा. कंपनी कायद्यांतर्गत कंपन्यांचे विघटन, विवाह कायद्यातील अपील इत्यादी.

**(iv)** संसद आणि राज्य विधिमंडळांच्या सदस्यांच्या निवडणुकीशी संबंधित वाद निर्माण झाल्यास त्या निवडणुकी विषयी खटले उच्च न्यायालयात दाखल करता येतात. अशा प्रकारचे निवडणूक विषयक दावे कनिष्ठ न्यायालयात दाखल न करता ते थेट उच्च न्यायालयात करतात.

**(v)** संविधानाचा अर्थ लावण्याशी संबंधित प्रकरणे कनिष्ठ न्यायालयातून त्यांच्या स्वतःच्या न्यायालयामध्ये हस्तांतरित करण्याचे आदेश दिले जातात.

**क) अपीलीय अधिकार क्षेत्र किंवा घटनेच्या अर्थासंबंधी पुनर्निर्णयाचे अधिकार क्षेत्र :**

उच्च न्यायालय हे प्रामुख्याने अपील अपीलाचे न्यायालय आहे आणि राज्याच्या प्रादेशिक अधिकार क्षेत्रात कार्यरत असलेल्या कनिष्ठ न्यायालयांच्या निकालाविरुद्ध अपील ऐकते. उच्च न्यायालयाचे अपीलीय अधिकार क्षेत्र खालील दोन शीर्षकाखाली वर्गीकृत केले जाऊ शकते.

१) दिवाणी बाबींमध्ये उच्च न्यायालयाचे दिवाणी अपीलीय अधिकार क्षेत्र खालीलप्रमाणे आहे: जिल्हा न्यायालये, अतिरिक्त जिल्हा न्यायालये आणि इतर कनिष्ठ न्यायालयांच्या आदेश आणि निकालांवरील पहिले अपील कायदा आणि वस्तुस्थिती या दोन्ही प्रश्नांशी संबधित अपील थेट उच्च न्यायालयात केले जाते.

२) जिल्हा न्यायालय किंवा इतर कनिष्ठ न्यायालयांचे आदेश आणि निकालांविरुद्ध दुसरे अपील उच्च न्यायालयात केले जाऊ शकते, ज्यामध्ये केवळ कायद्याचे प्रश्न असतात, वस्तुस्थितीचे प्रश्न नसतात. काही उच्च न्यायालयांमध्ये न्यायालयांतर्गत अपील करण्याची तरतूद आहे. याअंतर्गत, जेव्हा उच्च न्यायालयाच्या एका

न्यायाधीशाने एखाद्या प्रकरणाचा निर्णय दिला असेल, तेव्हा अशा निर्णयाविरुद्ध त्याच उच्च न्यायालयाच्या खंडपीठाकडे अपील करता येते. प्रशासकीय आणि इतर न्यायाधिकरणांच्या निर्णयांविरुद्ध अपील उच्च न्यायालयाच्या खंडपीठाकडे करता येते. गुन्हेगारी प्रकरणांमध्ये जर सात वर्षांपेक्षा जास्त काळ तुरुंगवासाची शिक्षा असेल तर सत्र न्यायालय आणि अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या निकालांविरुद्ध उच्च न्यायालयात अपील करता येते. सत्र न्यायालय किंवा अतिरिक्त सत्र न्यायालयाने दिलेली मृत्युदंडाची शिक्षा किंवा फाशीची शिक्षा उच्च न्यायालयाने अंमलात आणण्यापूर्वी मान्य केली पाहिजे, मग दोषी व्यक्तीने अपील केले असो वा नसो. राज्यातील जिल्हा न्यायालयात चालवलेल्या खटल्यात घटनेच्या अर्थासंबंधी महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाल्यास त्या खटल्याच्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात अपील करता येते. अर्थात अशा आशयाचे संमती पत्र जिल्हा न्यायालयाने दिले पाहिजे. परंतु एखाद्या खटल्यासंबंधी जिल्हा न्यायालयाने संमती पत्र दिले आणि त्या खटल्यात घटनेचा अर्थ लावण्यासंबंधी प्रश्न उपस्थित झाला आहे अशी उच्च न्यायालयाची खात्री झाली तर अपिलाची खास परवानगी उच्च न्यायालय देऊ शकते. थोडक्यात जिल्हा न्यायालयांनी घटनेच्या अर्थासंबंधीच्या खटल्यांचा जो निर्णय दिलेला असतो त्याविरुद्धच्या अपीलावर फेर विचार करून निर्णय देण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला दिलेला आहे.

**ड) दिवाणी किंवा नागरी प्रकरणातील वाद :**

महाराष्ट्र राज्य क्षेत्रातील दिवाणी किंवा नागरी प्रकरणांचा प्रारंभिक अधिकार क्षेत्रात समावेश होतो. साधारणत२०,००० किंवा त्यापेक्षा जास्त किंमतीचे दिवाणी स्वरूपाचे खटले उच्च न्यायालयातच दाखल केले जातात. कनिष्ठ न्यायालयात असे खटले चालविता येत नाहीत. परंतु पूर्वी या अधिकार क्षेत्रात दिवाणी व फौजदारी असे दोन्ही खटले येत असत. परंतु आता प्रारंभिक अधिकार क्षेत्रातून फौजदारी खटले काढून टाकले आहेत. दिवाणी दाव्यांचा खटला एका न्यायाधीशांसमोर चालतो त्यांच्या निर्णयाविरुद्ध दोन न्यायाधीशांसमोर अपील करता येते. त्या दोघांनी दिलेला निर्णय अंतिम असतो परंतु त्या दोघांत मतभेद असल्यास तो खटला तिसऱ्या न्यायाधीशांकडे पाठविण्यात येतो आणि त्यांचा निर्णय अंतिम मानला जातो. जिल्हा न्यायालयाने दिवाणी दाव्याच्या खटल्यासंबंधी दिलेल्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात अपील करता येते. पुढील खटल्यांच्या बाबतीत असे अपील उच्च न्यायालयात करता येते.

१) जिल्हा न्यायालयाने दिवाणी हक्कांसंबंधीत दिलेल्या निर्णयात कायद्याचा महत्त्वाचा प्रश्न अंतर्भूत असेल तर उच्च न्यायालयात अपील करता येते.

२) राज्यातील जिल्हा न्यायालयाने फौजदारी खटल्यासंबंधी दिलेल्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात अपील करता येते. यामध्ये असे अपील उच्च न्यायालयाकडे करता येते यामध्ये एका कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय फिरवून जिल्हा न्यायालयाने आरोपीला फाशीची शिक्षा दिली असल्यास याबाबत उच्च न्यायालयात अपील करण्यास योग्य आहे शिफारस पत्र उच्च न्यायालयाने दिले असल्यास.

३) घटनेच्या कलम १४३ व्या कलमानुसार राष्ट्रपती किंवा राज्यपाल आवश्यक वाटल्यास एखाद्या कायद्याच्या किंवा वस्तुस्थितीचा प्रश्न उपस्थित झाल्यास आणि तो प्रश्न सार्वजनिक महत्त्वाचा वाटल्यास

राष्ट्रपती, राज्यपाल उच्च न्यायालयाकडून त्याबाबत सल्ला मागवू शकतात. पण उच्च न्यायालयाने दिलेला सल्ला राष्ट्रपती व राज्यापल यांच्यावर बंधनकारक नसतो.

**इ) पर्यवेक्षणाचे किंवा नियंत्रणात्मक अधिकार क्षेत्र :**

घटना कलम २५७ नुसार लष्करी न्यायालये किंवा न्यायाधिकरण वगळता, उच्च न्यायालयाला त्याच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व न्यायालये आणि न्यायाधिकरणांवर देखरेखीचा अधिकार असतो.ज्या अर्थाने सर्वोच्च न्यायालयाने घोषित केलेला कायदा भारतातील सर्व न्यायालयांवर बंधनकारक आहे त्याच अर्थाने उच्च न्यायालयाचा कायदा त्याच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व कनिष्ठ न्यायालयांवर बंधनकारक आहे. यामध्ये केवळ प्रशासकीय देखरेखच नाही तर न्यायालयीन देखरेख देखील समाविष्ट आसते. उच्च न्यायालयांच्या पर्यवेक्षी अधिकारक्षेत्रात पुढील बाबींचा समावेश होतो. कनिष्ठ न्यायालयाच्या कामकाजाचे नियम तयार करणे, नियमात दुरुस्त्या करणे व त्यासंबंधी आदेश देण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला आहे. उच्च न्यायालयाच्या देखरेखीचा हा अधिकार सर्व न्यायालये आणि न्यायाधिकरणांना लागू आहे, मग ते उच्च न्यायालयाच्या अपीलीय अधिकारक्षेत्राच्या अधीन असोत किंवा नसोत. जिल्हा न्यायाधीशांच्या नियुक्ती आणि पदोन्नतीच्या बाबतीत आणि राज्याच्या न्यायिक सेवेतील व्यक्तींच्या नियुक्त्यांमध्ये (जिल्हा न्यायाधीशांव्यतिरिक्त) राज्यपालांकडून त्यांचा सल्ला घेतला जातो. हे राज्याच्या न्यायिक सेवेतील (जिल्हा न्यायाधीशांव्यतिरिक्त) सदस्यांच्या नियुक्ती, पदोन्नती, रजा मंजूर करणे, बदल्या आणि शिस्त या बाबींशी संबंधित आहे. कनिष्ठ न्यायालयातील अधिकारी कर्मचारी यांच्या नेमणुका बदल्या रजा सेवाशर्ती याबाबत नियम तयार करणे कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधीशांच्या बदल्यासंबंधी राज्यपालांना सल्ला देणे. कनिष्ठ न्यायालयाची कागदपत्रे, नोंदी, अभिलेख ठेवण्यासंबंधी त्यांना मार्गदर्शन करणे. राज्यातील कोणत्याही कनिष्ठ न्यायालयामध्ये चालू असलेल्या कोणत्याही खटल्याची कागदपत्रे मागवून त्याची पाहणी करणे.कनिष्ठ न्यायालयात चालू असलेला खटला काढून घेऊन उच्च न्यायालयात चालवणे किंवा तो इतर कोणत्याही न्यायालयाकडे वर्ग करणे. कनिष्ठ न्यायालयात चालवलेल्या खटल्यात आवश्यकता वाटल्यास घटनेचा व कायद्याचा अर्थ स्पष्ट करणे. राज्यातील उच्च न्यायालय व कनिष्ठ न्यायालय यांच्या कार्यात सुसूत्रता ठेवणे.

**फ) न्यायालयीन रेकॉर्ड किंवा अभिलेख अधिकार क्षेत्र :**

सर्वोच्च न्यायालयाप्रमाणे घटनेच्या कलम २५१ नुसार उच्च न्यायालय हे घटक राज्याचे अभिलेख न्यायालय आहे. उच्च न्यायालयाचा प्रत्येक निर्णय अभिलेखित व नोंदणीकृत असतो. उच्च न्यायालयाने दिलेले निर्णय राज्यातील इतर न्यायालयामध्ये प्रमाण मानून त्याचे पालन कनिष्ठ न्यायालयांनी करावे लागते. उच्च न्यायालयाचा अवमान करणाऱ्या न्यायालयास उच्च न्यायालय शिक्षा करू शकते. उच्च न्यायालयाचे निर्णय कनिष्ठ न्यायालयाच्या एखाद्या खटल्यामध्ये साक्ष म्हणून वापरले जाऊ शकतात. सर्वोच्च न्यायालयाचे निकाल, कार्यवाही आणि कृती कायमस्वरूपी स्मृती आणि साक्ष म्हणून नोंदवल्या जातात. हे रेकॉर्ड पुराव्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे मान्य केले जाते आणि कोणत्याही न्यायालयात सादर केल्यावर त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करता येत नाही. अशाप्रकारे, हे निर्णय कायदेशीर उदाहरणे आणि कायदेशीर संदर्भ म्हणून ओळखले जातात.

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाला कायदे निर्माण करताना घटनात्मक बाबतीत मार्गदर्शन करण्याची भूमिका उच्च न्यायालयाची असते.

**ग) न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार :**

भारतीय राज्यघटनेच्या ४४ व्या घटना दुरुस्तीने घटनेच्या २६८ व्या कलमानुसार घटक राज्याच्या कायद्याची वैधता तपासण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला देण्यात आला आहे. एखादा कायदा घटनाविरोधी किंवा नागरिकांच्या मूलभूत अधिकाराचा भंग करणारा असेल तर तो कायदा रद्द करण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार म्हणजे न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार होय. महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या कायद्याची वैधता तपासण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला आहे परंतु अशा प्रकारचे खटले चालवताना कमीत कमी पाच न्यायाधीशांचे बेंच आवश्यक आहे आणि त्यांनी दोन तृतीयांश बहुमताने निर्णय दिला पाहिजे असे ४२ व्या घटनादुरुस्तीने ठरविले आहे. राज्य सरकारच्या कायदेविषयक आणि कार्यकारी आदेशांची घटनात्मकता सत्यता तपासण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला आहे.जर तपासणीत राज्य सरकार संविधानाचे उल्लंघन करणारे कायदेविषयक आणि कार्यकारी विषयक आदेश असल्याचे आढळले तर उच्च न्यायालय त्यांना बेकायदेशीर, असंवैधानिक, रद्दबातल घोषित करू शकते.न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकारामुळे राज्य सरकारच्या हुकुमशाही प्रवृत्ती, मनमानीला आळा घातला जातो. यातून नागरिकांच्या मुलभूत अधिकारांचे रक्षण केले जाते.

अशा प्रकारे उच्च न्यायालयाचे विविध स्वरूपाचे अधिकार आहेत.

**न्यायदानाचे कार्य (Judicial Functions) :**

उच्च न्यायालय (High Court) ही भारताच्या न्यायप्रणालीतील एक प्रमुख न्यायसंस्था आहे. प्रत्येक राज्य किंवा राज्यांच्या गटासाठी एक उच्च न्यायालय असते. सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देणे हे मुख्य कार्य उच्च न्यायालय करत असते. तसेच उच्च न्यायालय घटना व कायद्यांची व्याख्या व स्पष्टता करणे. उच्च न्यायालयाची प्रमुख कार्ये खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) उच्च न्यायालयाला मोठ्या रकमेच्या दिवाणी खटल्यांची सुनावणी करण्याचे कार्य करावे लागते. तसेच सत्र न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अपिलावर उच्च न्यायालयाला निर्णय देण्याचे कार्य करावे लागते.

२) संविधानाच्या कलम २२६ अंतर्गत, उच्च न्यायालयाला बंदी प्रत्यक्षीकरण, परामादेश, प्रतिषेध, उत्प्रेषण अधिकार पृच्छा या प्रकारचे आदेश देण्याचे कार्य करावे लागते.

३) नागरिकांचे मूलभूत हक्क जपण्यासाठी महत्वाचे कार्य उच्च न्यायालयाला करावे लागते.

४) उच्च न्यायालयाला खालच्या न्यायालयांवर देखरेख ठेवणे, न्यायालयीन कर्मचाऱ्यांची नेमणूक व नियंत्रण, जिल्हा व सत्र न्यायालयांच्या न्यायाधीशांची बदली व बढतीवर निर्णय घेण्याचे कार्य करावे लागते.

५) राज्य सरकारच्या कायद्यांच्या वैधतेचे परीक्षण करणे, राज्यातील सर्व कायदे योग्य प्रकारे राबवले जात आहेत का याची देखरेख करणे.

६) राज्यातील सर्व निवडणुकीसंबंधी याचिकांवर निर्णय देणे. खास प्रकरणांमध्ये तातडीची मदत देणे.

अशा प्रकारची कार्ये उच्च न्यायालयाला करावी लागतात.

**उच्च न्यायालयाचे महत्त्व :**

भारतातील प्रत्येक राज्यासाठी किंवा दोन अथवा अधिक राज्यांसाठी एक उच्च न्यायालय असते. हे न्यायालय संबंधित राज्यांतील सर्व जिल्हा व सत्र न्यायालयांपेक्षा वरचे असते. उच्च न्यायालय हे भारतीय लोकशाही व्यवस्थेतील महत्त्वाचा स्तंभ (pillar) असून त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ते खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१) न्यायदानाची राज्य पातळीवरची सर्वोच्च संस्था म्हणजे उच्च न्यायालय होय. ते संबंधित राज्यातील श्रेष्ठ न्यायालय आहे. सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देणे, चुकीच्या निर्णयांमध्ये सुधारणा करणे आणि कायद्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत आहे की नाही हे पाहण्याची मुख्य जबाबदारी न्याय मंडळावर आसते त्यामुळे न्याय व्यवस्था राज्यात महत्वची असते.

२) कोणत्याही नागरिकाचे मूलभूत अधिकार (जसे की – स्वातंत्र्य, समानता, धर्मस्वातंत्र्य इत्यादी) राज्य सरकारकडून किंवा इतर कोणत्याही संस्थेकडून धोक्यात आले, तर उच्च न्यायालय त्याचे रक्षण करते यासाठी प्रत्येक घटक राज्यात उच्च न्यायालय महत्त्वाचे आहे.

३) राज्य सरकाराने किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांनी तयार केलेले कायदे आणि नियम संविधानाच्या विरोधात असतील, तर उच्च न्यायालय त्यांच्यावर बंदी आणू शकते. त्यामुळे कायदे संविधानाशी सुसंगत असेच राज्यव्यवस्था निर्माण करते. योग्य कायद्यांची निर्मिती होण्यासठी उच्च न्यायालय महत्वाचे आहे.

४) उच्च न्यायालय हे कार्यपालिकेपासून स्वतंत्र असते. त्यामुळे ते कोणत्याही राजकीय दबावाशिवाय निर्णय घेऊ शकते. यामुळे लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होतो.

५) उच्च न्यायालय वेळोवेळी महत्त्वाचे आदेश काढून पोलिस, प्रशासकीय अधिकारी आणि इतर सरकारी संस्थांना कायद्याच्या चौकटीत राहून कार्य करण्यास भाग पाडते. यातून स्वायत्तता, पारदर्शकता राखून राज्यात कायदा आणि सुव्यवस्था यावर नियंत्रण निर्माण होण्यासाठी उच्च न्यायालय महत्वाचे आहे.

उच्च न्यायालय हे राज्यातील सर्वोच्च न्यायिक संस्था असून त्याचे कार्यक्षेत्र व्यापक आणि महत्त्वाचे आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१४ ते २३१ मध्ये उच्च न्यायालयाची स्थापना, अधिकार व कार्य याविषयी तरतुदी आहेत. उच्च न्यायालय हे राज्यातील कायदा, सुव्यवस्था आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण करणारे एक अत्यंत महत्त्वाचे केंद्र आहे. नागरिकांचे हक्क सुरक्षित ठेवणे, राज्य सरकारच्या कृतीवर नियंत्रण ठेवणे आणि न्यायाचे संविधानाशी सुसंगत वितरण करणे हे याचे मूळ कार्य आहे. त्यामुळेच उच्च न्यायालय हे भारतीय न्यायप्रणालीतील एक अत्यावश्यक घटक आहे. उच्च न्यायालयाला न्यायिक, प्रशासकीय, अपीलीय आणि लेखी अधिकार असतात. हे अधिकार संविधानिक बाबींवर निर्णय देण्यास तसेच मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यास सक्षम ठरतात. उच्च न्यायालय गुन्हेगारी, दिवाणी आणि संविधानिक खटल्यांचा

निपटारा करते. राज्यातील खालच्या न्यायालयांवर देखरेख ठेवणे, न्यायाधीशांच्या नेमणुकीसाठी शिफारस करणे आणि जनहित याचिकांवर निर्णय घेणे ही त्याची महत्त्वाची कामगिरी करत आसते. उच्च न्यायालय हे लोकशाहीचा एक प्रमुख स्तंभ असून नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करणारी आणि शासनावर नियंत्रण ठेवणारी संस्था आहे. कायद्याचे राज्य प्रस्थापित करणे आणि न्यायालयीन उत्तरदायित्व वाढवणे हे त्याचे मूलभूत कार्य आहे. उच्च न्यायालय न्यायदानाच्या प्रक्रियेत पारदर्शकता व कार्यक्षमतेसाठी अत्यंत आवश्यक असणारी व्यवस्था असून ते संविधानाचे रक्षक व नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करते.

**उच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य :**

उच्च न्यायालयात न्यायदानाचे कार्य नि:पक्षपातीपणे, निर्भिडपणे व कोणत्याही दबावाला बळी न पडता होण्यासाठी न्यायव्यवस्था स्वतंत्र असावी लागते. त्यासाठी पुढील तरतुदी केलेल्या आहेत.

**१) न्यायाधिशांची नियुक्ती :** कलम २१७ नुसार राष्ट्रपती न्यायाधीशांची नियुक्ती करतो, परंतु त्यासाठी भारताचे सरन्यायाधीश, राज्याचा राज्यपाल संबंधित उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश यांचा सल्ला घेण्यात यावा. यामुळे कार्यकारी सत्तेचा नियुक्तीमधील एकाधिकार न राहता न्यायाधीशांच्या नियुक्ती पारदर्शकता होतील.

**२) न्यायाधीशांचा कार्यकाळ :** कलम २१७ (१) नुसार उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या निवृत्तीची वयोमर्यादा ६२ वर्षे असते. कार्यकाळ निश्चित असल्यामुळे कार्यकारी सत्तेच्या दबावाशिवाय न्यायाधीशांना न्यायनिवाडा करता येतो.

**३) काढून टाकण्याची कठीण प्रक्रिया :** कलम २१८ नुसार न्यायाधीशांना (काढून टाकण्याची प्रक्रिया) कठीण करण्यात आली आहे. यासाठी न्यायाधीशांना त्यांच्या पदावरून फक्त संसदेमार्फत विशेष बहुमताने (Impeachment) काढून टाकता येते. यामुळे कार्यकारी सत्तेला थेट न्यायाधीशांना काढून टाकण्याचा अधिकार असणार नाही.

**४) वेतन, भत्ते व सेवा अटी :** कलम २२१ नुसार न्यायाधीशांचे वेतन व भत्ते संसद ठरवते, परंतु ते कार्यकाळात कमी करता येत नाहीत. हे आर्थिक स्वातंत्र्य देणारे एक महत्त्वाची तरतूद आहे.

**५) पद सोडल्यानंतर वकिलीवर निर्बंध :** कलम २२० नुसार न्यायाधीशांनी पद सोडल्यानंतर न्यायाधीश संबंधित प्रांतात वकिली करू शकत नाही. यामुळे निर्णय देताना भविष्यातील लाभाचा विचार न करता न्यायाधीश निर्णय देतील.

**६) अवमान प्रकरणात कारवाईचा अधिकार :** कलम २१ उच्च न्यायालय स्वत:च्या अवमानासंबंधी कारवाई करू शकते. त्यामुळे कोणतीही बाह्य सत्ता न्यायालयाचा मानभंग करू शकत नाही.

**७) न्यायिक पुनरावलोकनाचा अधिकार :** कलम २२६ आणि २२७ नुसार राज्यातील कायदे आणि कार्यकारी आदेशांवर न्यायालय पुनरावलोकन करू शकते.

उच्च न्यायालयाच्या स्वातंत्र्याच्या तरतुदीमुळे कार्यकारी नियंत्रणापासून स्वायत्त राहून न्यायालय आपले

प्रशासन, खटल्याचे वाटप, खटल्याची प्रक्रिया यामध्ये कार्यकारी सत्तेच्या आदेशांशिवाय कार्य करू शकते. उच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य हे न्यायव्यवस्थेच्या विश्वासार्हतेसाठी अत्यावश्यक आहे. वरील तरतुदींमुळे न्यायाधीश कोणत्याही दबावाशिवाय स्वतंत्र आणि नि:ष्पक्ष निर्णय देऊ शकतात. उच्च न्यायालयाच्या स्वातंत्र्याच्या तरतुदी भारतीय संविधानात न्यायपालिका स्वतंत्र राहावी यासाठी खास प्रकारे समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

**स्वयं अध्ययन प्रश्न – २ :**

**अ) योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. जे खटले प्रथमत: उच्च न्यायालयातच चालवले जातात त्या अधिकारास .......... म्हणतात.

अ) प्रारंभिक अधिकार क्षेत्र  ब) नियंत्रणात्मक अधिकार

क) अभिलेख अधिकार  ड) इतर अधिकार

२. उच्च न्यायालय हे घटक राज्याचे अभिलेख न्यायालय ........... कलमानुसार आहे.

अ) कलम१५१  ब) कलम २३०

क) कलम २४०  ड) कलम २५१

३. ........... कलमानुसार राष्ट्रपती, राज्यपाल आवश्यक वाटल्यास उच्च न्यायालयाचा सल्ला घेऊ शकतात.

अ) १४३ व्या कलमानुसार  ब) १४८ व्या कलमानुसार

क) १५० व्या कलमानुसार  ड) १४० व्या कलमानुसार

४. २०,००० किंवा त्यापेक्षा जास्त किमतीचे दिवाणी स्वरूपाची खटले ........... न्यायालयात दाखल केले जातात.

अ) तालुका न्यायालय  ब) जिल्हा न्यायालय

क) उच्च न्यायालय  ड) लष्करी न्यायालय

५. ........... कलमानुसार घटक राज्याच्या कायद्याची वैधता तपासण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला देण्यात आला आहे.

अ) २१५  ब) २६०

क) २५०  ड) २६८

### ३.२.३ लोक अदालत– रचना, अधिकार आणि कार्य :

**प्रस्तावना :**

लोकशाहीतील न्यायप्रणालीचा मुख्य उद्देश म्हणजे प्रत्येक व्यक्तीला वेळेत, सुलभ आणि किफायतशीर न्याय मिळवून देणे हा असतो. मात्र पारंपरिक न्यायालयीन प्रक्रियेमध्ये वेळखाऊ प्रक्रिया, खर्चाचे प्रमाण, तांत्रिक अडचणी आणि प्रलंबित खटल्यांची संख्या विचारात घेता सामान्य नागरिकांसाठी न्यायप्राप्ती कठीण बनली

आहे. अशा परिस्थितीत न्याय व्यवस्थेतील एक पूरक आणि प्रभावी पर्याय म्हणून 'लोक अदालत' ही संकल्पना उदयास आली आहे. लोक अदालत म्हणजे एक अशी व्यवस्था जिथे न्यायालयाबाहेर चर्चेद्वारे प्रलंबित खटल्यांचे निराकरण करणे होय. या प्रक्रियेमध्ये न्यायालयीन अधिकारी, वकील, सामाजिक कार्यकर्ते आणि संबंधित पक्ष हे सर्व समोपचाराच्या पद्धतीने काम करतात. यामध्ये फौजदारी स्वरूपाचे किरकोळ गुन्हे, वैवाहिक वाद, कर्ज विवाद, कामगार प्रकरणे, अपघात नुकसान भरपाई यांसारख्या प्रकरणांचा समावेश होतो. लोक अदालतीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे दोन्ही पक्षांच्या संमतीने विवाद मिटवला जातो. यामध्ये कोणत्याही अपिलाची गरज राहत नाही आणि न्यायाला खर्चही फार कमी येतो. म्हणूनच, लोक अदालत ही भारतीय न्यायप्रणालीतील एक प्रभावी आणि लोकाभिमुख संकल्पना ठरली आहे.भारतातील लोक अदालत (People's Court) ही एक विशेष न्याय प्रणाली आहे जी सरकारने विशेषतः ग्रामीण भागांतील लहान व किरकोळ न्यायविवाद जलदगतीने सोडवण्यासाठी सुरू केली आहे. हे एक प्रकारचे जनतेचे कोर्ट आहे, जे ग्रामीण भागात जाऊन थेट तिथल्या जनतेसमोर न्यायप्रक्रिया राबवते. भारतात पहिल्या लोकअदालतची संकल्पना सर्वप्रथम १४ मार्च १९८२ रोजी गुजरात राज्यातील जुनागड जिल्हातील 'उनाम' येथे आयोजित करण्यात आली होती. पण ती कायद्याच्या मदतीशिवाय स्वयंसेवी आणि तात्पुरती लोक न्यायालय म्हणून आयोजित करण्यात आली होती. हा प्रयोग यशस्वी ठरल्यानंतर संपूर्ण देशात लोक अदालतीचे आयोजन सुरू करण्यात आले. या लोक अदालतींना कायदेशीर मान्यता: १९८७ मध्ये भारतातील 'न्यायालयीन सेवा प्राधिकरण कायदा १९८७' (Legal Services Authorities Act) नुसार प्राप्त झालेली आहे. या कायद्यान्वये लोक अदालतीला अधिकृत दर्जा मिळाला आणि तिच्या निर्णयांना कायदेशीर बळ प्राप्त झाले. १९९५ पासून हा कायदा संपूर्ण देशात लागू करण्यात आला आहे. या प्रक्रियेमुळे न्यायालयांवरील ताण कमी होतो आणि सामान्य माणसालाही न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. लोक अदालतींची निर्मिती भारतीय संविधानातील कलम ३९-अ नुसार न्याय प्रत्येक नागरिकाला सहज आणि कमी खर्चात उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने करण्यात आली आहे.

**लोकअदालतीचा इतिहास :**

महाराष्ट्रातील लोक अदालतींचा इतिहास हा भारतातील लोक अदालतींच्या एकूण इतिहासाशी निगडीत आहे, महाराष्ट्राने या यंत्रणेला अधिक प्रभावीपणे अंमलात आणले आहे. भारतात पहिली लोक अदालत १९८२ मध्ये गुजरात राज्यात भरवण्यात आली होती त्या अगोदर महाराष्ट्रात लोक अदालतीचे आयोजन १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात सुरू झाले होते. सुरुवातीला या अदालती राज्य विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा न्यायालये यांच्या मार्गदर्शनाखाली भरवल्या जात असत. गुजरात राज्याबरोबरच महाराष्ट्रात लोक अदालत भरवण्यात येऊ लागली. १९८७ साली विधी सेवा प्राधिकरण कायदा (Legal Services Authorities Act,1987) मंजूर झाला आणि लोक अदालतीस कायदेशीर मान्यता मिळाली. महाराष्ट्रातही या कायद्यांतर्गत राज्य विधी सेवा प्राधिकरण (MSLSA) १९८७ ला स्थापन करण्यात आले. १९९५ पासून हा कायदा देशभरात लागू करण्यात आला. या कायद्याअंतर्गत लोक अदालतींना अधिकृत दर्जा मिळाला. महाराष्ट्रात 'राज्य विधी सेवा प्राधिकरण' (MSLSA) १९९८ मध्ये स्थापन झाले. त्यानंतर राज्यभरात जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय लोक अदालती नियमितपणे आयोजित केल्या जाऊ लागल्या.त्या लोक अदालतीचे प्रारंभीचे उद्दिष्टे असे होते

की, ग्रामीण व गरीब जनतेला न्याय सुलभ व विनामूल्य मिळावा. कोर्टातील प्रलंबित खटले कमी करावेत सामंजस्यातून व जलद निकाल मिळावा. सध्या महाराष्ट्रात लोक अदालतींचे आयोजन महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात नियमितपणे केले जाते. राष्ट्रीय लोक अदालत, विशेष लोक अदालत आणि मोबाईल लोक अदालत अशा विविध लोक अदालतींच्या प्रकारांद्वारे नागरिकांना न्याय दिला जातो. महाराष्ट्र राज्यात ऑनलाइन लोक अदालतींचाही प्रयोगही कोविडनंतर सुरू करण्यात आला आहे. २०२४ च्या राष्ट्रीय लोक अदालतीत महाराष्ट्रात सुमारे १५ लाख प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. यातून कोट्यवधी रुपयांचची वसुली करण्यात आली आहे. यामुळे न्यायालयांवरील ताण कमी झाला आहे. या लोक अदालतीसाठी तंत्रज्ञानाचा वापरही करण्यात येऊ लागला आहे. यातून ई-लोक अदालत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावण्या या संकल्पना पुढे येत आहेत. यात व्यक्ती डिजिटल प्रणालीद्वारे अर्ज करू शकते. पक्षकारांना SMS व ई-मेलद्वारे माहिती माहिती दिली जाते. महाराष्ट्रातील लोक अदालत ही न्यायव्यवस्थेतील एक लोकाभिमुख, जलद आणि परिणामकारक यंत्रणा बनली आहे. तिच्या माध्यमातून गरजू, गरिब आणि ग्रामीण भागातील नागरिकांना न्याय अधिक सुलभपणे मिळू लागला आहे.

**लोकअदालतीचा उद्देश :**

लोक अदालतीचा मुख्य उद्देश न्यायप्रणालीला अधिक लोकाभिमुख, सुलभ आणि वेगवान बनवणे हा असून या बरोबर लोक अदालत एक पर्यायी वाद निवारण यंत्रणा आहे. जी लोकांना जलद स्वस्त आणि सोप्या पद्धतीने न्याय मिळवून देते. याचा मुख्य उद्देश लोकांना न्यायालयातील प्रलंबित असलेल्या किंवा न्यायालयात जाण्यापूर्वीच्या प्रकरणांमध्ये तडजोड किंवा निराकरण साधून देण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच लोक अदालतीच्या माध्यमातून वाद मिटवून समाजात शांतता आणि समन्वय प्रस्थापित करणे हा आहे.

**लोक अदालतीचे स्वरूप :**


लोक अदालत ही एक वैकल्पिक विवाद निवारण प्रणाली (Alternative Dispute Resolution - ADR) आहे, जिथे न्यायालयीन प्रक्रियेपासून वेगळी आणि जलद पद्धतीने तडजोडीने प्रकरणे सोडवली जातात. या अदालतीत न्यायाधीश, वकील व दोन्ही पक्ष सामंजस्याने निर्णय घेतात. यात न्यायालयीन निर्णयाबरोबरच लोकांची सहमती महत्त्वाची असते. ही व्यवस्था लोकांना जलद आणि स्वस्त न्याय मिळवून देते आणि लोकांना न्यायालयात जाण्याची गरज भासत नाही. लोक अदालत ही एक पर्यायी वाद निवारण व्यवस्था आहे. लोक अदालत ही न्यायालयात जाण्याऐवजी वाद मिटवण्यासाठी एक वैकल्पिक मार्ग निर्माण करते.या व्यवस्थेत, वादाचे निराकरण करण्यासाठी दोन्ही पक्ष एकमेकांशी चर्चा करून तडजोडीच्या माध्यमातून वाद मिटवतात.

**लोकअदालतीची रचना** (Structure of Lok Adalat) **:**

लोकअदालतींची रचना ही Legal Services Authorities Act, 1987 नुसार केली जाते. या रचनेत विविध स्तरांवर लोकांना न्याय देण्यासाठी विशेष समित्यांची स्थापना केली जाते. भारतीय न्यायव्यवस्था ही व्यापक असून सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत.

यामध्ये लोकअदालत ही एक महत्त्वाची संकल्पना आहे. गरीब, दुर्बल व गरजू लोकांना जलद व विनामूल्य न्याय मिळवून देण्यासाठी लोकअदालतीची स्थापना करण्यात आली आहे. लोकअदालतींची रचना अत्यंत शिस्तबद्ध आणि कार्यक्षम अशा प्रकारे करण्यात आली आहे.लोकअदालत ही Legal Services Authorities Act, 1987 अंतर्गत स्थापन केली जाते. यामध्ये खालीलप्रमाणे विविध स्तरांवर लोकअदालतींची रचना केली जाते:

**लोक अदालतीची रचना :**




**लोक अदालतीची (लोक न्यायालय) रचना पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल :**

**अ) वैधानिकआयोजन व नियंत्रण :** १९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण कायद्याद्वारे लोक अदालतींना कायदेशीर दर्जा देण्यात आला आहे.लोक अदालतीचे आयोजन महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण (MSLS) किंवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण करत असते. यासाठी न्यायालयीन आणि प्रशासकीय यंत्रणा सहकार्य करते.

**ब) न्यायालयीन पॅनल किंवा संघटन** (Composition) **:** लोक अदालतीमध्ये सहसा २ ते ३ सदस्य असतात. त्यामध्ये अध्यक्ष (Chairman) हे सहसा सेवानिवृत्त न्यायाधीश (District Judge/High Court Judge) असतात. सदस्य म्हणून एक वकील किंवा कायद्याचा जाणकार एक सामाजिक कार्यकर्ता किंवा संबंधित क्षेत्रातील जाणकार व्यक्ती असतो. लोक अदालतीचे सदस्य हे लोक अदालतीतील खटले निकाल देणारे लोक असतात. ते केवळ वैधानिक मध्यस्थ म्हणून काम करतात. ते कोणतेही न्यायिक कार्य करत नाहीत.

**क) प्रशासनिक स्तर: लोक अदालती वेगवेगळ्या स्तरांवर कार्य करतात :**

१) राष्ट्रीय लोक अदालत (National Lok Adalat)

२) राज्य पातळीवर – राज्य विधी सेवा प्राधिकरण (State Legal Services Authority)

३) जिल्हा पातळीवर – जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (District Legal Services Authority)

४) तालुका पातळीवर – तालुका विधी सेवा समिती (Taluka Legal Services Committee)

५) स्थायी लोक अदालती (Permanent Lok Adalat)

६) चलती लोक अदालत (Mobile Lok Adalat)

**१) राष्ट्रीय लोकअदालत** (National Lok Adalat) **:** ही लोकअदालत संपूर्ण देशभर एकाच दिवशी आयोजित केली जाते. यामध्ये सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, जिल्हा व तालुका न्यायालयांतील प्रकरणे एकत्रितपणे निपटवली जातात. याचे आयोजन राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (NALSA) करते. दर महिन्याला एकदा संपूर्ण भारतात एकाच दिवशी या लोक अदालतीचे आयोजन केले जाते. सर्व न्यायालयीन स्तरांवरील प्रकरणे एकत्रितपणे निकाली काढली जातात. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (NALSA) यांच्या अधिपत्याखाली या लोक अदालतीची रचना असते.

**२) राज्य लोकअदालत** (State Lok Adalat) **:** प्रत्येक राज्यात ही लोकअदालत कार्य करते. राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या अधिपत्याखाली याची रचना असते. अध्यक्ष म्हणून उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त किंवा कार्यरत न्यायाधीश असतात, तर सदस्य म्हणून वकील, समाजसेवक, शिक्षक किंवा अन्य क्षेत्रातील तज्ज्ञांचा किंवा अनुभवी व्यक्तींचा समावेश यामध्ये असतो.

**३) जिल्हा लोकअदालती** (District Lok Adalat) **:** जिल्हा स्तरावर जिल्हा न्यायालयात ही लोकअदालत आयोजित केली जाते. या लोकअदालतीचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत आयोजन केले जाते. यामध्ये जिल्हा न्यायाधीश अध्यक्ष म्हणून कार्य करत असतात. ही लोकअदालत जिल्हास्तरावर कार्य करते.

**४) तालुका लोकअदालती** (Taluka Lok Adalat) **:** तालुकास्तरावर ही लोकअदालत कार्यरत असते. यामध्ये प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी किंवा सिव्हिल जज अध्यक्ष असतो. ग्रामीण भागातील लोकांसाठी ही अत्यंत उपयुक्त लोकअदालत आहे.

**५) स्थायी लोकअदालती** (Permanent Lok Adalat) **:** ही लोकअदालत सार्वजनिक सेवा क्षेत्रांतील वादासाठी कायमस्वरूपी असते. जसे की वीज, पाणी, वाहतूक इत्यादी. यामध्ये सेवानिवृत्त न्यायाधीश अध्यक्ष

असतो आणि इतर दोन सदस्यांची नेमणूक केली जाते. ही लोकअदालत काही प्रकरणांमध्ये पक्षकारांच्या सहमतीशिवाय निर्णय देऊ शकते. सार्वजनिक सेवा क्षेत्रातील वाद या लोकअदालती मार्फत मिटवले जातात.ही कायमस्वरूपी समिती असते. पक्षकार तयार नसतानाही काही प्रकरणांमध्ये या लोकअदालतीस निर्णय देण्याचा अधिकार असतो.

**६) चलती लोक अदालत** (Mobile Lok Adalat) **:** ही लोकअदालत ग्रामीण भागातील लोकांच्यासाठी वाहनाद्वारे वेगवेगळ्या गावांमध्ये जाऊन प्रलंबित खटल्यांचा निपटारा केला जातो. यातून समाजात जनजागृती वाढण्यास मदत होते.

**ड) स्थान व वेळ :** लोक अदालती जिल्हा व तालुका न्यायालयांच्या ठिकाणी किंवा विशेषतः शाळा, ग्रामपंचायत कार्यालय, पंचायत समिती इ. ठिकाणी घेतल्या जातात. काही वेळा चल लोक अदालती (Mobile Lok Adalat) सुद्धा आयोजित केल्या जातात.

**ड) कार्यपद्धती :** लोक अदालतीचे कार्य हे येथे दोन्ही पक्षांच्या सहमतीवर चालत असते (Permanent Lok Adalat वगळता). या लोक अदालतीचा निकाल हा तडजोडीच्या माध्यमातून दिला जातो. लोक अदालतीचा निर्णय बांधील (Binding) आणि अंतिम असतो. लोक अदालतीने दिलेल्या निर्णयाविरुद्ध कोणतेही अपील करण्याची तरतूद यामध्ये नसते.

**इ) शुल्क नाही :** जेव्हा एखादा खटला लोक अदालतीसमोर आणला जातो तेव्हा त्यासाठी कोणतेही न्यायालयीन शुल्क भरावे लागत नाही. जर कायदेशीर वाद जो न सुटलेला असेल तो लोकअदालतीकडे पाठवला गेला आणि नंतर सोडवला गेला तर याचिकेवर सुरुवातीला न्यायालयात भरलेले न्यायालयीन शुल्क देखील पक्षकारांना परत दिले जातात.

**ई) अंतिम निकाल :** १९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण कायद्याअंतर्गत लोक अदालतीचा निर्णय अंतिम आणि सर्व पक्षांसाठी लागू करण्यायोग्य असतो आणि तो दिवाणी न्यायालयाचा निर्णय मानला जातो.

**फ) अपील नाही :** लोक अदालतीच्या निर्णयावर अपील करण्याची तरतूद नाही. अपील प्रक्रियेचा अभाव असूनही, लोकअदालतीच्या निर्णयावर समाधानी नसल्यास पक्षकारांना खटला सुरू करण्याची परवानगी आहे.

**ज) सौहार्दपूर्ण निराकरण :** लोकअदालत वरील वाद स्वतःहून सोडवणार नाही; उलट, तो दोन्ही पक्षांनी केलेल्या तडजोडीच्या आधारे सोडवला जाईल. सहभागी पक्षांच्या सार्वभौम आणि निःपक्षपाती पद्धतीने त्यांचा संघर्ष शांततेने सोडवण्याच्या प्रयत्नांना पाठिंबा देतील.

लोकअदालतींची रचना ही भारतातील लोकशाही न्यायप्रणालीचे एक मोठे यश आहे. या रचनेमुळे ''न्याय सर्वांसाठी'' हे तत्व प्रत्यक्षात उतरत आहे. म्हणूनच लोकअदालती हा समाजातील शांतता, सलोखा आणि न्यायासाठी एक मजबूत आधारस्तंभ ठरतो आहे. लोकअदालतीची रचना ही न्यायाच्या सहज व सुलभ उपलब्धतेसाठी प्रभावीपणे विविध स्तरांवर करण्यात आलेली आहे. या रचनेमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना जलद व माफक खर्चात न्याय मिळू शकतो. लोकअदालतची ही रचना अशी आहे की, तिच्या

माध्यमातून समाजातील प्रत्येक स्तरातील व्यक्तीला न्याय मिळू शकतो. प्रकरणांचे निपटारे जलद होतात, न्यायालयांवरील ताण कमी होतो आणि तडजोडीच्या माध्यमातून सामाजिक समता टिकवली जाते. या प्रकारे लोक अदालतीची रचना स्पष्ट करता येईल.

**लोक अदालतीचे मुख्य प्रकार :**

१. स्थायी लोक अदालत (Permanent Lok Adalat)

२. राष्ट्रीय लोक अदालत (National Lok Adalat)

३. राज्य/जिल्हा/तालुका लोक अदालत (State/District/Taluka Lok Adalat)

४. चलती लोक अदालत (Mobile Lok Adalat)

**लोकअदालतिचे अधिकार :**

लोकअदालत हा भारतातील न्यायप्रणालीतील एक महत्त्वाचा भाग आहे. लोक न्यायालयांना काही विशिष्ट अधिकार दिलेले असतात. लोकअदालत ही भारतीय न्यायप्रणालीतील एक महत्त्वाची संकल्पना असून, तिचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे तडजोडीच्या आधारे वादांचा निकाल लावणे. ही प्रक्रिया जलद, सुलभ व विनाखर्च न्याय देण्यासाठी प्रसिद्ध आहे. लोकअदालत केवळ सामाजिक दृष्टीने उपयुक्त नाही, तर तिला काही कायदेशीर अधिकारही प्रदान करण्यात आले आहेत. तिचे अधिकार Legal Services Authorities Act, १९८७ नुसार निश्चित करण्यात आले आहेत. ते खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**लोकअदालतीचे प्रमुख अधिकार पुढीलप्रमाणे आहेत :**

**१. तडजोडीच्या माध्यमातून वाद निकाली काढण्याचा अधिकार :** लोकअदालत केवळ अशाच प्रकरणांवर सुनावणी करते जिथे दोन्ही पक्ष तडजोडीला तयार असतात. दोन्ही पक्षांची सहमती घेतल्यानंतरच निकाल दिला जातो.

**२. न्यायालयात प्रलंबित असलेल्या आणि न्यायालयात दाखल होऊ शकणाऱ्या प्रकरणांवर निर्णय देण्याचा अधिकार :** लोकअदालत आधीपासून न्यायालयात चालू असलेल्या प्रकरणांवर, तसेच नवीन दाखल होणाऱ्या प्रकरणांवरही निर्णय देऊ शकते परंतु यासाठी दोन्ही पक्षांची सहमती आवश्यक असते.

**३. न्यायालयातील प्रलंबित व न्यायालयात न गेलेली प्रकरणे निकाली काढण्याचा अधिकार :** लोक अदालतीत प्रलंबित (pending) प्रकरणे व न्यायालयात अजून दाखल न झालेली (pre-litigation) प्रकरणेही निकाली काढता येतात.तपास व साक्षी, पुरावे तपासण्याचा न्यायालयासारखा अधिकार लोक अदालतीस नाही. केवळ दोन्ही पक्षांची सहमती असलेली प्रकरणेच येथे निकाली काढली जातात. उदाहरणार्थ – कर्जवसुली, वाहतूक दंड, कौटुंबिक वाद, कामगार वाद अशा स्वरूपाची प्रकरणे लोक अदालतीत सोप्या व जलद पद्धतीने निकाली काढता येतात.

**४. न्यायालयीन आदेशासारखा अधिकार :** लोकअदालतीने दिलेला निर्णय अंतिम आणि बंधनकारक असतो. तसेच तो न्यायालयीन निर्णयासारखाच वैध असतो. एकदा निर्णय झाल्यावर त्याविरुद्ध कोणतेही अपील

करता येत नाही. (फक्त तडजोडीच्या आधारे दिलेले निर्णय) कारण निर्णय दोन्ही पक्षांच्या संमतीने घेतलेला असतो.

**५. न्यायालयीन फी माफ करण्याचा अधिकार :** न्यायालयीन शुल्क माफ करण्याचा अधिकार लोक अदालतीस आहे. यामध्ये प्रकरण निकाली निघाले तर कोर्ट फी (court fee) माफ केली जाते किंवा आधी भरलेली फी परत केली जाते.

**६. वेगवेगळ्या प्रकरणांवर निर्णय घेण्याचा अधिकार :** लोकअदालती वैवाहिक वाद, अपघात भरपाई प्रकरणे, बँक कर्ज वसुली, वीजबिल वाद, जमीन-वाटप, कामगार विवाद, पाण्याचे हक्क यांसारख्या अनेक नागरी प्रकरणांवर निर्णय घेऊ शकतात.

**७. स्थायी लोकअदालतीला पक्षकार तयार नसतानाही निर्णय देण्याचा विशेष अधिकार (केवळ सार्वजनिक सेवा प्रकरणांत) :** स्थायी लोकअदालती सार्वजनिक सेवा क्षेत्राशी संबंधित असलेल्या प्रकरणांमध्ये, काही वेळा दोन्ही पक्षांपैकी एखादा सहमत नसतानाही निर्णय देऊ शकते.

**८. केस पुन्हा सामान्य न्यायालयात नेण्याचा अधिकार :** एखाद्या खटल्यात दोन्ही पक्षांनी सहमती दर्शविली नसेल तर अशा वेळी लोक अदालतीत ती केस परत मूळ न्यायालयात पाठवण्याचा अधिकार आहे.

लोकअदालतींना दिलेल्या अधिकारांच्या आधारे लोकअदालती सामान्य माणसाला न्याय देण्यासाठी प्रभावी ठरत आहेत. लोकअदालतींना दिलेल्या अधिकारांमुळे न्यायालयांवरील ताण कमी होत आहे. तसेच लोकअदालतींना मिळालेल्या अधिकारांमुळे खटले तडजोडीच्या माध्यमातून निकालात निघून सामाजिक शांतता प्रस्थापित होण्यास मदत मिळत आहे.

**लोक अदालतीचे कार्य :**

लोकशाही व्यवस्थेमध्ये न्यायदान ही एक मूलभूत गरज आहे. भारतासारख्या लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून, न्यायालयांमध्ये वाढत्या प्रकरणांमुळे सामान्य नागरिकांना वेळेत न्याय मिळणे कठीण झाले आहे. या समस्येवर उपाय म्हणून लोक अदालत या वैकल्पिक न्यायदान पद्धतीची संकल्पना पुढे आली.लोक अदालत म्हणजे लोकांसाठीची न्यायसभा. येथे वादग्रस्त पक्ष एकत्र येऊन आपले वाद परस्पर सहमतीने सोडवतात. यामध्ये न्यायालयाच्या खर्चाची गरज नसते आणि निकाल लगेच दिला जातो. हे न्यायिक प्रक्रिया सुलभ, जलद आणि सर्वसामान्यांना दिलासा देणारी आहे. लोक अदालतींचे प्रमुख कार्य म्हणजे तडजोडीच्या आधारे प्रकरणांची सोडवणूक करणे. वीज बिल, बँकेची थकीत कर्जे, वाहतूक नियम उल्लंघन, कौटुंबिक वाद, अपघात प्रकरणे अशा अनेक बाबींवर येथे सुनावणी होते. यामध्ये न्यायालयाचे नियम पाळले जात असले, तरी ते अधिक लवचिक असते ज्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोडीने प्रकरणांचा निकाल लावला जातो. या लोक अदालतींची मुख्य कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

**लोक अदालतीची प्रमुख कार्ये :**

**१) तडजोडीने वाद निवारण :** दोन्ही पक्षांचे ऐकून त्यांच्यात परस्पर सहमतीने तडजोड घडवून आणणे. लोकअदालतीत दोन्ही पक्षांमध्ये तडजोड घडवून आणून वाद मिटवण्याचे कार्य केले जाते.

**२) जलद व वेगवान न्यायदान :** लोक अदालतीत प्रकरणांचा जलद व वेगवान निवाडा करण्याचे कार्य करत असते. यातून दीर्घकालीन न्यायालयीन प्रक्रिया टाळली जाते आणि निकाल तत्काळ दिला जातो.

**३) न्यायसुलभ प्रक्रिया :** लोक अदालत गरीब व सामान्य नागरिकांसाठी सुलभ न्यायदान प्रक्रिया राबविण्याचे कार्य करत असते.

**४) सामाजिक सलोखा :** लोक अदालतीच्या माध्यमातून सहमतीने न्यायदान करून प्रस्थापित पक्षांमध्ये तडजोड घडवून आणल्यामुळे त्यांच्यातील वैर, शत्रुत्व कमी होते व सामाजिक शांतता टिकवण्याचे महत्वाचे कार्य घडून येते.

**५) न्यायालयावरील भार कमी करणे :** तडजोडीच्या आधारे लोक अदालतीच्या माध्यमातून प्रकरणे निकालात काढल्यामुळे न्यायालयांवरील ताण कमी करण्याचे कार्य लोक अदालत करत असते.

**लोक अदालतीचे महत्त्व :**

भारतीय लोकशाहीत न्यायव्यवस्थेला अत्यंत महत्त्व आहे. परंतु प्रलंबित खटले, खर्चिक प्रक्रिया आणि दीर्घकाळ चालणारे खटले यामुळे सामान्य माणसासाठी न्याय मिळवणे कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर लोक अदालत ही एक प्रभावी आणि लोकाभिमुख संकल्पना ठरत असल्यामुळे तिचे महत्व अनन्यसाधारण आहे. कारण यामध्ये नागरिकांना जलद न्याय मिळतो पारंपरिक न्यायालयांपेक्षा येथे प्रकरणे लवकर निकाली काढली जातात. त्यामुळे वेळेची बचत होते. यात तडजोडीचा आधार घेतला जातो. यामुळे वादग्रस्त पक्षांमध्ये परस्पर सहमतीने वाद मिटवला जातो. त्यामुळे दीर्घकाळ राग वा शत्रुत्व राहात नाही यातून सामाजिक समरसता वाढून समाजात शांतता व सौहार्द निर्माण होते.संविधानाच्या मूल्यांना बळ देण्यासाठी ही संकल्पना महत्वाची आहे. कारण भारतीय संविधानाच्या कलम ३९-A नुसार सर्व नागरिकांना न्याय मिळावा हे ध्येय न्याय व्यवस्थेचे आहे. ते या लोक अदालतीतून साध्य होते.

**निष्कर्ष :**

लोक अदालत म्हणजेच जनतेचे न्यायालय ही एक पर्यायी वाद निराकरण यंत्रणा आहे. भारतातील न्यायप्रणालीवरचा ताण कमी करण्यासाठी आणि सामान्य नागरिकांना जलद, स्वस्त व सुलभ न्याय मिळवून देण्यासाठी लोक अदालत हे प्रभावी माध्यम ठरले आहे.लोक अदालतींमध्ये वाद दोन्ही पक्षांच्या संमतीने मिटवले जातात. यात कोणतेही कठीण कायदेशीर प्रक्रिया नसते आणि वकिलांवर होणारा खर्चही कमी होतो. ही एक पारदर्शक, वेळेची बचत करणारी आणि सर्व पक्षांना समाधान देणारी प्रणाली आहे. सरकारी कार्यालयातील प्रलंबित प्रकरणे, बँक कर्ज, वाहन दंड, कौटुंबिक वाद, जमीन मालकी हक्क यांसारखे वाद लोक अदालतीद्वारे सहज मिटवले जातात. या प्रक्रियेमुळे न्यायालयांवरील भार कमी होतो आणि नागरिकांचा न्याय व्यवस्थेवरील विश्वास वाढतो.लोक अदालत ही समाजात शांतता, समंजसपणा आणि जलद न्याय मिळवून देणारी एक प्रभावी व लोकाभिमुख यंत्रणा आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३ :**

**अ) योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. भारतीय संविधानाच्या ............. कलमानुसार सर्व नागरिकांना न्याय मिळावा हे ध्येय आहे.

अ) कलम ३९ – अ ब) कलम ४० – अ

क) कलम ३५ – अ ड) कलम ४०

२. भारतात पहिली लोक अदालत सर्वप्रथम ............. रोजी आयोजित करण्यात आली होती.

अ) १४ मार्च १९८२ ब) १५ मार्च १९८०

क) १० मार्च १९८८ ड) २५ मार्च १९८९

३. लोक अदालतींना कायदेशीर मान्यता ................ कायद्यानुसार प्राप्त झाली.

अ) न्यायालयीन सेवा प्राधिकरण कायदा १९८० ब) न्यायालयीन सेवा प्राधिकरण कायदा १९८८

क) न्यायालयीन सेवा प्राधिकरण कायदा १९८७ ड) न्यायालयीन सेवा प्राधिकरण कायदा १९८५

४. भारतात पहिली लोक अदालत ................ राज्यात आयोजित करण्यात आली होती.

अ) बिहार ब) राज्यस्तान

क) महाराष्ट्र ड) गुजरात

५. महाराष्ट्र शासनाने ............... साली तंटामुक्त ग्राम अभियान सुरू केला आहे.

अ) २००९ साली ब) २००२ साली

क) २००७ साली ड) २०१० साली

## ३.३ सारांश :

उच्च न्यायालय ही भारतातील राज्य किंवा राज्यसमूहासाठीची सर्वोच्च न्यायिक संस्था आहे. ती संविधानाने स्थापन केली असून तिचे मुख्य कार्य कायद्याच्या चौकटीत न्यायदान करणे आहे. ती नागरी, फौजदारी, तसेच मूलभूत अधिकारांशी संबंधित प्रकरणांवर सुनावणी करते. उच्च न्यायालय अधिनस्त न्यायालयांवर देखरेख ठेवते आणि आवश्यक तेव्हा रिट याचिकेद्वारे व्यक्तीस्वातंत्र्याचे रक्षण करते. न्यायालयाचे निर्णय बंधनकारक असतात आणि अपील स्वरूपात सर्वोच्च न्यायालयातही प्रकरण जाऊ शकते. उच्च न्यायालय हे औपचारिक आणि कायद्यानुसार कठोर नियमांनुसार काम करणारी संस्था आहे, तर लोक अदालत ही जलद, सुलभ आणि लोकाभिमुख न्याय देणारी संस्था आहे. लोक अदालत समाजातील सर्वसामान्यांसाठी न्याय सुलभ करत असते, तर उच्च न्यायालय व्यापक आणि गंभीर कायदेशीर प्रश्न सोडवते. राज्यतील न्यायव्यवस्थेमध्ये न्यायालयाच्या भूमिके बरोबर लोक अदालतसुद्धा तितकीच महत्त्वपूर्ण आहे. भारतीय शासन व्यवस्थेच्या यशस्वीतेसाठी आणि समाजाच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय उन्नतीसाठी या दोन्ही संस्था महत्वाच्या आहेत.

लोक अदालत म्हणजेच जनतेसाठी, जनतेद्वारे चालवलेली न्यायव्यवस्था – एक अशी संकल्पना जी न्याय सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवते. पारंपरिक न्यायालयीन प्रक्रियेत वेळ, पैसा आणि तांत्रिक गुंतागुंत असते, तर लोक अदालत हे त्याचं एक सुलभ, वेगवान आणि माणुसकीच्या आधारावर चालणारा पर्याय आहे. येथे पक्षकार स्वतः आपली बाजू मांडतात, वकील, खर्च किंवा अपीलचा ताण नसतो, आणि तडजोडीच्या माध्यमातून न्याय मिळतो.लोक अदालत ही केवळ न्यायदानाची प्रक्रिया नाही, तर ती सामाजिक संवाद आणि विश्वास यांची पुनर्स्थापना करणारी एक सकारात्मक पायरी आहे. गरीब, शोषित आणि दुर्बळ वर्गासाठी ही एक आशेची किरणासारखी आहे. त्यामुळे लोक अदालत हा न्यायव्यवस्थेतील लोकशाहीचा खरा चेहरा म्हणता येईल.लोक अदालत या संकल्पनेला व्यापक अर्थाने महाराष्ट्र शासनाने या धर्तीवर तंटामुक्ती अभियान हा एक सामाजिक उपक्रम चालू केला आहे. जो गावपातळीवर वाद-विवाद, तंटे आणि संघर्ष शांतीपूर्ण मार्गाने सोडवण्याच्या उद्देशाने राबवला जातो. महाराष्ट्र शासनाने २००७ साली 'तंटामुक्त ग्राम अभियान' सुरू केले आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामस्थांमध्ये ऐक्य, शांतता आणि सहकार्य वाढवणे हा आहे. तंटामुक्ती अभियान हे गावपातळीवरील लोक अदालत म्हणून काम करते. अनेक वेळा तंटामुक्ती समित्या स्थानिक वाद आधीच सामोपचाराने सोडवतात, जे नंतर लोक अदालतपर्यंत पोहोचतच नाहीत. जे वाद गावात सुटत नाहीत, ते पुढे लोक अदालतकडे पाठवले जातात. तंटामुक्ती अभियान आणि लोक अदालत एकमेकांना पूरक आहेत. तंटामुक्ती अभियान ही पहिली पायरी आहे, तर लोक अदालत ही थोडी अधिक औपचारिक आणि कायदेशीर प्रक्रिया असते. दोघेही ग्रामीण आणि नागरी भागांमध्ये न्याय पोहोचवणारे प्रभावी पर्याय आहेत. लोक अदालत ही केवळ न्यायदानाची प्रक्रिया नाही, तर ती एक लोकशाहीचा स्तंभ आहे. समाजातील सर्व स्तरांतील लोकांना न्याय मिळवून देण्यात तिचे योगदान अमूल्य आहे. लोक अदालत हे भारतीय न्यायव्यवस्थेतील एक आदर्श व प्रेरणादायक पाऊल आहे.

### ३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

१) **केंद्रानुवर्ती** – केंद्र सरकारच्या आदेश किंवा धोरणानुसार कोणतेही कार्य, संस्था किंवा नियम लागू करणे. केंद्र सरकारचे प्राबल्य असणे.

३) **अधिनस्त न्यायालय** – उच्च न्यायालयाच्या किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या अधीन, नियंत्रणात असलेले खालच्या स्तराचे न्यायालय. उदा. जिल्हा न्यायालय, सत्र न्यायालय.

४) **रीट** (Writ) – नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्यासाठी उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयाकडून दिले जाणारे आदेश. उदा. हॅबियस कॉर्पस, मँडेमस.

५) **अधिकार क्षेत्र** – एखाद्या न्यायालयाला किंवा अधिकाऱ्याला जी कामे करण्याची किंवा निर्णय घेण्याची कायदेशीर परवानगी आहे, त्या परिघाला अधिकार क्षेत्र म्हणतात.

६) **लेटर्स पेटंट** – राजे/सरकारने एखाद्या व्यक्तीस विशिष्ट अधिकार देण्यासाठी दिलेले औपचारिक दस्तऐवज. इंग्लंडमधील राज्यघटनेत वापरले जाणारे एक विशेष शब्द, विशेषतः कुलगौरव (honours), विशेष हक्क वा नोकरीसाठी.

**७) भारतीय दंड संहिता –** भारतात केलेल्या गुन्ह्यांसाठी कोणते शिक्षाप्रकार आहेत हे सांगणारा कायदा (Indian Penal Code - IPC). १८६० मध्ये तयार करण्यात आला.

**८) लोक अदालत –** सामान्य माणसाच्या न्यायासाठी जलद आणि पर्यायी न्यायप्रणाली. येथे तडजोडीने प्रकरणे सोडवली जातात.

**९) प्राधिकरण –** एखाद्या विशिष्ट कार्यासाठी स्थापन करण्यात आलेली संस्था किंवा यंत्रणा. उदा. जलप्राधिकरण, विमानतळ प्राधिकरण.

**१०) पॅनल –** निवडलेली व्यक्तींची समिती. विशिष्ट कार्यासाठी असलेले तज्ज्ञांचे गट. उदा. न्यायाधीशांचा पॅनल.

**११) तडजोड –** दोन पक्षांमधील मतभेद अथवा वाद शांततेने, परस्पर सहमतीने मिटवणे.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न – १ :**

१. अ) कलम २१४ ते २३१

२. ब) राष्ट्रपती

३. ड) २ लाख ५० हजार

४. अ) २५

५. क) ६२ वर्ष

**स्वयं अध्ययन प्रश्न – २ :**

१. अ) प्रारंभिक अधिकार क्षेत्र

२. ड) कलम २५१

३. अ) १४३ व्या

४. क) उच्च न्यायालय

५. ड) २६८

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३ :**

१. अ) कलम ३९ – अ

२. अ) १४ मार्च १९८२

३. क) न्या. से. प्रा. का. १९८७

४. ड) गुजरात

५. क) २००७

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टीपा लिहा.**

१. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची पात्रता.

२. जिल्हा आणि सत्र न्यायालये

३. उच्च न्यायालयाची रचना

**ब) लघूत्तरी प्रश्न.**

१) प्रारंभिक अधिकार क्षेत्र

२) न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार

३) उच्च न्यायालयाचे महत्त्व

४) अपीलीय अधिकार क्षेत्र किंवा घटनेच्या अर्थासंबंधी पुनर्निर्णयाचा अधिकार

**क) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) लोक अदालतीची रचना व कार्य स्पष्ट करा.

२) लोक अदालतीचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करा.

३) घटक राज्यातील न्यायव्यवस्थेची रचना स्पष्ट करा.

४) उच्च न्यायालयाचे अधिकार व कार्ये स्पष्ट करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१. पाटील बी. बी; चव्हाण उर्मीला (२०१३) भारतीय शासन, फडके प्रकाशन , कोल्हापूर

२. डॉ. भोळे भा. ल. - (२००३) भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकरण, पिंपळापुरे, नागपूर.

३. डॉ. भोगले शांताराम - भारतीय राज्यघटना विकास, स्वरूप आणि राजकारण

४. कुलकर्णी बी. वाय. - (२०००) भारतीय शासन आणि राजकारण पिंपळापुरे, नागपूर.

६. पाटील वा. भा., (२०१६) महाराष्ट्र प्रशासन, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव,

७. पवार प्रकाश, (२००९) महाराष्ट्रच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना, प्रतिमा प्रकाशन, पुणे,

८. पाटील बी. बी., (२०१८) महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

९. वेबसाईट : nalsa.gov.in आणि इंटरनेट वरील उपलब्ध माहिती.


❍❍❍

घटक ४

# स्वायत्त संस्था

## (Autonomous Institutions)

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

    ४.२.१ महाराष्ट्राचा महाधिवक्ता

    ४.२.२ महाराष्ट्र लोकसेवा आयोग

    ४.२.३ महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.५ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

४.६ सरावासाठी प्रश्न

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१. स्वायत्त संस्थांचे लोकशाहीतील महत्त्व जाणून घेणे.

२. महाराष्ट्राच्या महाधिवक्तांची नेमणूक, घटनात्मक स्थान व कार्य अभ्यासणे.

३. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची रचना, आयोगाची स्वायत्तता अधिकार व कार्ये जाणून घेणे.

४. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना, अधिकार, कार्ये व महत्त्व अभ्यासणे.

## ४.१ प्रस्तावना :

सरकारी यंत्रणेच्या दैनंदिन हस्तक्षेपाशिवाय, काही कार्ये ही स्वतंत्र व लवचिकतेसह पार पाडण्याची आवश्यकता भासते तेव्हा स्वायत्त संस्था स्थापन केल्या जातात. स्वायत्त संस्था ह्या सरकारच्या कामकाजात एक प्रमुख भूमिका बजावतात. धोरणांची चौकट तयार करणे, संशोधन करणे, तपासणी करणे, नेमणुका करणे. लोकशाहीत स्वायत्त संस्था (Independent bodies) महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. त्या सरकारवर नियंत्रण ठेवतात, नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करतात आणि समाजाला विविधतेने जोडण्याचे काम करतात.

**उदा.** स्वायत्त संस्था, न्यायव्यवस्था, निवडणूक आयोग आणि प्रेस, सरकारवर नियंत्रण ठेवतात आणि सत्तेचा गैरवापर रोखतात.

या संस्था नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करतात, जसे की अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सभा आणि संघटना स्वातंत्र्य इत्यादी हक्क व स्वातंत्र्याचे संरक्षण केले जाते.

स्वायत्त संस्था समाजातील विविध विचार आणि मतप्रणालींना स्थान देतात, ज्यामुळे लोकशाही अधिक सर्वसमावेशक आणि व्यापक होते.

स्वायत्त संस्था पारदर्शक आणि जबाबदार प्रशासन सुनिश्चित करतात, त्यामुळे जनतेचा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास वाढतो.

स्वायत्त संस्था समाजातील गरीब आणि उपेक्षित लोकांना न्याय मिळवून देतात, ज्यामुळे सामाजिक समानता येते. या प्रकरणामध्ये आपण महाराष्ट्रातील स्वायत्त संस्थांचा अभ्यास करणार आहोत. यामध्ये महाराष्ट्राचा महाधिवक्ता, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग या स्वायत्त संस्थाची स्थापना, त्यांची कार्य, त्यांचे योगदान, रचना, भूमिका व लोकशाही विकासातील त्यांचे योगदान यासंबंधी माहिती घेणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ महाराष्ट्राचा महाधिवक्ता :

भारतीय राज्यघटनेने कलम १६५ द्वारे राज्यांसाठी महाअधिवक्ता या पदाची तरतूद केली आहे. तो राज्यातील सर्वोच्च विधी अधिकारी असतो. जसे केंद्र पातळीवर महान्यायवादी असतो, तसा राज्यपातळीवर

महाअधिवक्ता असतो. भारतीय राज्यघटनेत कलम १६५ मध्ये राज्याच्या महाधिवक्त्याची तरतूद केली आहे.

कलम १७७ नुसार राज्य विधानमंडळाची सभागृहे आणि त्याची कार्यवाही यासंदर्भातील महाअधिवक्त्याचे अधिकार स्पष्ट केले आहेत.

कलम १९४ नुसार महाअधिवक्त्याला मिळालेले अधिकार, विशेषाधिकार आणि सूट यांची तरतूद करण्यात आली आहे.

**नेमणूक आणि कार्यकाळ :**

महाअधिवक्त्याची नेमणूक मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने राज्यपाल करतात. उच्च न्यायालयाचा न्यायाधीश होण्याची आणि महाअधिवक्ता पदाची अर्हता एकसमान आहे. १) तो भारतीय नागरिक असला पाहिजे २) त्याने यापूर्वी दहा वर्षांकरता विधी क्षेत्रातील पद सांभाळलेले असले पाहिजे ३) उच्च न्यायालयामध्ये दहा वर्षांकरता अधिवक्ता म्हणून काम केले असले पाहिजे ४) त्याचे वय ६२ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

महाअधिवक्ता पदाचा कार्यकाळ राज्यघटना निश्चित करत नाही. तसेच त्याला पदावरून हटवण्याची प्रक्रिया आणि कारणे राज्यघटनेमध्ये नमूद केलेली नाहीत. महाअधिवक्ता राज्यपालाच्या मर्जीनुसार पदभार सांभाळतो. म्हणजेच राज्यपालाला त्याला कोणत्याही वेळी पदच्युत करण्याचे अधिकार आहेत. महाअधिवक्त्याला राज्यपालाकडे आपला राजीनामा सादर करून पदावरून दूर होता येते. महाअधिवक्त्याची नेमणूक मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार होते, त्यामुळे संकेताला अनुसरून, जेव्हा सरकार (मंत्रिमंडळ) राजीनामा देते तेव्हा, तोदेखील आपल्या पदाचा राजीनामा देतो, किंवा त्याच्या ऐवजी दुसऱ्या व्यक्तीची नेमणूक केली जाते. महाअधिवक्त्याचे वेतन राज्यपाल निश्चित करतात.

**अधिकार आणि कार्ये :**

राज्य शासनाचा मुख्य विधी अधिकारी वा नात्याने महाअधिवक्त्याचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. राज्यपाल जे विषय महाअधिवक्त्याकडे विचारार्थ पाठवतात. त्यावर शासनाला सल्ला देण्याची जबाबदारी महाधिवक्त्याची असते.

२. याशिवाय राज्यपाल जी कायदेशीर स्वरूपाची कामे त्याच्यावर सोपवतो, ती पार पाडणे.

३. भारताची राज्यघटना किंवा अन्य कोणत्याही कायद्यानुसार सोपवलेली कार्ये पूर्ण करावी लागतात.

४. महाधिवक्ता अशा कायदेशीर बाबींवर सरकारला सल्ला देईल, ज्यामध्ये कायद्याच्या प्रस्तावांचा समावेश आहे, ज्यावर त्याचा सल्ला घेतला जाऊ शकतो आणि वेळोवेळी नियमांमध्ये निर्दिष्ट केल्या जाणाऱ्या किंवा वेळोवेळी कायदेशीर व्यवहार समितीने त्याला संदर्भित केलेल्या किंवा नियुक्त केलेल्या कायदेशीर स्वरूपाची इतर कर्तव्ये पार पाडतील.

५. महाधिवक्ता राज्याच्या किंवा त्याच्या अधिकाऱ्यांच्या वतीने चालविण्यास भाग पाडल्या जाणाऱ्या कार्यवाहीच्या बाबतीत, मग ते दिवाणी असो वा फौजदारी, सरकारला सल्ला देईल.

६. सरकारकडून आवश्यक असेल तेव्हा, महाधिवक्ता महाराष्ट्र विधानसभा आणि विधान परिषदेच्या आणि या सभागृहांच्या समित्यांच्या बैठकांना उपस्थित राहू शकतात.

७. सरकारला त्याच्या सेवांची आवश्यकता असू शकेल अशा कोणत्याही खटल्यात किंवा कार्यवाहीत सरकारच्या बाजूने हजर राहणे.

८. सध्या लागू असलेल्या कोणत्याही कायद्याअंतर्गत स्थापन केलेल्या उच्च न्यायालयाच्या कोणत्याही विशेष खंडपीठासमोरील कोणत्याही कार्यवाहीत, सरकार आणि कायदेशीर व्यवहार समितीने त्यांना आवश्यक असल्यास, राज्याच्या वतीने महाधिवक्ता उपस्थित राहतात.

९. कोणताही कर, उपकर, आकारणी, दंड इत्यादी आकारण्याबाबत किंवा कोणत्याही कायद्यात, वैधानिक नियमात अस्तित्वात असलेल्या कोणत्याही दोष किंवा उणीवा किंवा न्यायालयाने कोणताही कायदा किंवा वैधानिक नियम अतिरेकी असल्याचे घोषित केले असेल किंवा ज्यामध्ये असे निरीक्षण केले असेल की तो कायदा किंवा वैधानिक नियम गैरसोय किंवा विसंगती निर्माण करत आहे, हे प्रशासकीय विभाग आणि कायदेशीर व्यवहार समितीच्या निदर्शनास आणून देणे.

कार्यालयीन कर्तव्ये पार पाडताना महाअधिवक्ता राज्यातील कोणत्याही न्यायालयात उपस्थित राहू शकतात. याशिवाय, त्याला राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये आपले मत मांडण्याचा आणि त्यांच्या कामकाजामध्ये सहभागी होण्याचा अधिकार आहे. याशिवाय राज्य विधान मंडळाच्या ज्या समितीचा तो सदस्य असतो तिच्या कामकाजामध्ये तो भाग घेतो, मात्र त्याला मतदानाचा अधिकार नसतो. राज्य विधि मंडळाचा सदस्य आणि महाअधिवक्ता यांना मिळणारे विशेषाधिकार आणि सूट हे एकसमान असतात.

**राज्याच्या महाधिवक्तांच्या मर्यादा :**

राज्याच्या महाधिवक्त्यांवर कर्तव्यातील गुंतागुंत टाळण्याची काही मर्यादा आहेत. त्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. महाधिवक्ता महाराष्ट्र राज्य वगळता इतर कोणत्याही पक्षकारासाठी सल्ला देऊ शकत नाहीत किंवा केस करू शकत नाहीत.

२. राज्य सरकारला सल्ला देण्यासाठी किंवा राज्य सरकारच्या वतीने कोर्टात हजर राहण्यासाठी बोलावण्याची शक्यता असल्यास राज्य सरकारविरूद्ध कोणत्याही पक्षाला सल्ला देवू नये.

३. राज्य सरकारच्या परवानगीशिवाय महाधिवक्ता फौजदारी कार्यवाहीत आरोपीचा बचाव करू शकत नाहीत.

४. राज्य सरकारच्या मंजुरीशिवाय महाधिवक्ताची कोणत्याही व्यवसायात किंवा संस्थेत कोणत्याही पदावर नियुक्ती स्विकारू नये.

**स्वयं अध्ययन प्रश्न :**

१. भारतीय राज्यघटनेमधील .................. कलमानुसार राज्यासाठी महाधिवक्ता हे पद निर्माण केले आहे.

अ) १६५  ब) १६६  क) १६७ ड) १६८

२. राज्यामधील सर्वोच्च विधी अधिकारी .................. हा असतो.

अ) न्यायाधीश  ब) राज्यपाल क) महाधिवक्ता ड) यापैकी नाही

३. महाधिवक्ता ह्या पदाची  नेमणूक .................. हे करतात.

अ) मुख्यमंत्री  ब) राज्यपाल क) पंतप्रधान ड) राष्ट्रपती

४. राज्याचा महाधिवक्ता होण्यासाठी उच्च न्यायालयामध्ये .................. वर्ष वकिल म्हणून काम केले असले पाहिजे.

अ) १०  ब) १५  क) ५  ड) ३

५. .................. हे  राज्याच्या महाधिवक्त्याला पदावरून दूर करू शकतात.

अ) मुख्यमंत्री  ब) राज्यपाल क) पंतप्रधान ड) राष्ट्रपती

### ४.२.२ महाराष्ट्र लोकसेवा आयोग (Maharashtra Public Service Commission :

**प्रास्ताविक,**

आधुनिक काळात लोकसेवेला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. समाज हा अधिक गतिमान बनला आहे व या गतिमानतेतून सार्वजनिक स्वरूपाचे लहान मोठे प्रश्न निर्माण होत आहेत. राज्याच्या कार्यक्षेत्रात कल्याणकारी राज्यकल्पनेचा व समाजवादी राज्याचा जसजसा विकास होत गेला तसतसा 'कायदा व सुव्यवस्था' पाहण्याची पारंपरिक जबाबदारीच तेवढी राज्याकडे नसून विविध कार्यक्रम हाती घेऊन व त्यांची अंमलबजावणी करून समाजाला विशिष्ट वळण देण्याची जबाबदारी राज्यसंस्थेवर येऊन पडली आहे. परिणामी शासनाचे कार्यक्षेत्र झपाट्याने वाढत जाऊन सनदी सेवांवरील जबाबदाऱ्या व कार्येही वाढत गेली. या विविध कारणांमुळे बहुतेक सर्व राष्ट्रांत शासकीय धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या नोकरांच्या संख्येत व त्यामुळे नोकर यंत्रणेच्या आकारात खूपच वाढ झाली आहे. यामुळेच पूर्वी सनदी सेवांचा अभ्यास अनुशासकीय सत्तेचा एक घटक या नात्याने केला जात असे. आज मात्र शासनाच्या क्षेत्रात स्वतःचे एक वेगळे महत्त्व व स्थान या स्थायी प्रशासकांनी निर्माण केल्यामुळे हा एक स्वतंत्र अभ्यासविषय ठरू लागला आहे. नोकरभरतीसाठी 'गुणवत्ता' तत्त्वाचा स्वीकार व त्यामुळे नोकर वर्गाची गुणवत्ता व प्रावीण्य, कार्यक्षमता, कार्यकालात त्यांना लाभलेली सुरक्षितता, धोरण निर्मितीस आवश्यक असणाऱ्या माहितीवरील त्यांचे नियंत्रण आणि त्यांच्यात असलेला संघटितपणा यामुळे नोकरवर्ग एक महत्त्वाची शक्ती बनला आहे. राजकीय व्यवस्थेचे यशापयश बऱ्याचदा नोकरवर्गाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते.

भारतारच्या राज्य घटनाकारांना लोकसेवेच्या भूमिकेची यथार्थ जाणीव होती. त्यामुळेच सामाजिक न्याय, लोकशाही व समतेवर आधारित कल्याणकारी राज्याचा आदर्श पुढे ठेवणारी घटना तयार करतानाच त्यांनी त्यात निष्पक्ष, कार्यक्षम, स्वतंत्र सार्वजनिक सेवांचा सुद्धा अंतर्भाव केलेला दिसतोः भारताच्या न्याय व्यवस्थेप्रमाणेच भारताच्या प्रशासन व्यवस्थेची रचनाही एकात्म असावी असा निर्णय घटनाकारांनी घेतला. संघराज्याच्या

तत्त्वाला मुरड घालून त्यांनी केंद्र व राज्य या दोहोंसाठी संमिश्र असलेला अखिल भारतीय सेवा हा प्रकार निर्माण केला. भारतीय प्रशासकीय सेवा आणि भारतीय पोलीस सेवा केंद्र आणि राज्ये या दोन्ही स्तरांवर सारख्याच पद्धतीने कार्यान्वित राहतील अशी राज्यघटनेत तरतूद करण्यात आली.केंद्रीय पातळीवर जसा केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) कार्यरत असतो, तसा राज्य पातळीवर राज्य लोकसेवा आयोग (MPSC) कार्यरत असतो. राज्यघटनेतील भाग १४, कलम ३१५ ते ३२३ मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाप्रमाणे राज्य लोकसेवा आयोगाची रचना, सदस्यांच्या नेमणुका आणि पदच्युती, तसेच आयोगाचे अधिकार, कार्ये यांची तरतूद केली आहे.

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची रचना** (Composition of Maharashtra Public Service Commission) **:**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये एक अध्यक्ष आणि इतर सदस्य असतात आणि त्यांची नेमणूक त्या राज्याचे राज्यपाल करतात. आयोगाची सदस्यसंख्या घटनेमध्ये निश्चित केलेली नाही तर ती निश्चित करण्याचा स्वेच्छाधिकार घटनेने राज्यपालांना दिला आहे. आयोगातील निम्म्याहून अधिक सदस्य हे केंद्र किंवा राज्य शासनामध्ये किमान दहा वर्षे पदभार सांभाळलेले असावेत, याव्यतिरिक्त घटनेने पात्रतेची अन्य कोणतीही अट घातलेली नाही. याशिवाय घटनेने आयोगाचा अध्यक्ष आणि सदस्यांच्या सेवाशर्ती निश्चित करण्याचा अधिकार राज्यपालांना दिला आहे.

**अध्यक्ष आणि सदस्यांचा कार्यकाळ :**

राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष आणि सदस्य यांचा कार्यकाळ ६ वर्षे किंवा सदस्याचे ६२ वर्षे वयोमान (यापैकी जे आधी पूर्ण होईल) इतका असतो. तरीदेखील, कार्यकाळ संपण्यापूर्वी सदस्यांना आपला राजीनामा राज्यपाल यांना सादर करून पदावरून पायउतार होता येते.राज्यपाल दोन परिस्थितींमध्ये राज्य लोकसेवा आयोगाच्या सदस्याची प्रभारी अध्यक्ष म्हणून नेमणूक करू शकतात.

१) लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांचे पद रिक्त झाले असल्यास.

२) अध्यक्षांची अनुपस्थिती किंवा अन्य कारणाने आपले कर्तव्य बजावण्यास असमर्थ असल्यास.

अध्यक्ष म्हणून नेमणूक केलेली व्यक्ती पदभार हाती घेईपर्यंत किंवा अध्यक्ष पुन्हा कामावर रुजू होईपर्यंत प्रभारी अध्यक्ष कार्यभार सांभाळतात.

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सदस्यांची पदच्युती :**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य यांची नेमणूक राज्यपाल करतात, मात्र त्यांना पदावरून दूर करण्याचा अधिकार केवळ राष्ट्रपतीला आहे (राज्यपालाला नाही). राष्ट्रपती केंद्रीय लोकसेवा आयोग आणि राज्य लोकसेवा आयोगाच्या सदस्यांना एकसमान कारणांच्या आधारे आणि पद्धतीने पदावरून दूर करू शकतो. राष्ट्रपती सदस्यांना पुढील परिस्थितीमध्ये पदच्युत करतो, जेव्हा तो सदस्य,

१) दिवाळखोर असल्याचे कायद्याने सिद्ध झाल्यास किंवा घोषित केल्यास.

२) त्याच्या किंवा तिच्या कार्यकाळात आयोगाच्या कामाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही पगारी नोकरी करत असल्यास.

३) राष्ट्रपतींच्या मते मानसिक किंवा शारीरिक दौर्बल्यामुळे आयोगाचे कामकाज पार पाडण्याकरता सक्षम नसल्यास.

या कारणांव्यतिरिक्त, कोणतेही गैरवर्तन केल्याबद्दल राष्ट्रपती आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्याला पदच्युत करू शकतो. मात्र, तत्पूर्वी राष्ट्रपतीला हा विषय चौकशीकरिता सर्वोच्च न्यायालयाकडे सुपूर्द करणे अनिवार्य असते. चौकशीनंतर सर्वोच्च न्यायालयाने सदस्याला पदावरून दूर करणे ग्राह्य मानले आणि तसे करण्याचा सल्ला दिला तर, राष्ट्रपती सदस्य किंवा अध्यक्षांना पदच्युत करतात. घटनेतील तरतुदींनुसार, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय राष्ट्रपतींवर बंधनकारक असतो. सर्वोच्च न्यायालयाद्वारे होणाऱ्या चौकशी दरम्यान राज्यपाला आयोगाचे अध्यक्ष किंवा सदस्याला केवळ निलंबित करू शकतात. मात्र, सदस्यांना पदावरून दूर करण्याचा अंतिम निर्णय सर्वोच्च न्यायालय अहवालाद्वारे राष्ट्रपतीना देते. यासंबंधी तरतुदींमधील गैरवर्तन या शब्दप्रयोगाचा अर्थ घटनेमध्ये स्पष्ट केला आहे. त्यानुसार, लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्याने गैरवर्तन केले असे पुढील कारणांआधारे म्हणता येते: (१) जर त्या सदस्याला केंद्र अथवा राज्य शासनाने केलेल्या करारामध्ये रस निर्माण झाला किंवा त्यामध्ये त्याचे हितसंबंध गुंतले असतील, किंवा (२) जर तो सदस्य संबंधित करारामध्ये किंवा त्यातून मिळणाऱ्या लाभांमध्ये किंवा नफ्यामध्ये सहभागी असेल तर राष्ट्रपती कोणत्याही सदस्याला पदच्यूत करू शकतात.

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची स्वायत्तता :**

राज्यघटनेने केंद्रीय लोकसेवा आयोगाप्रमाणे राज्य लोकसेवा आयोगाचे कामकाज स्वतंत्रपणे आणि नि:ष्पक्षपातीपणे चालावे याकरता पुढील तरतुदी केल्या आहेतः

(१) राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्याला केवळ घटनेमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार आणि कारणांकरताच पदच्युत करण्याचा राष्ट्रपतींना अधिकार आहे. परिणामी, त्यांचा कार्यकाळ सुनिश्चित असतो.

(२) अध्यक्ष किंवा सदस्यांच्या सेवाशर्ती राज्यपाल ठरवतात. मात्र सदस्याच्या नेमणुकीनंतर त्या पदाला नुकसानकारक होतील अशा रितीने त्या बदलता येत नाहीत.

(३) राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्यांचे वेतन, भत्ते आणि निवृत्तीवेतन हा सर्व खर्च राज्याच्या संचित निधीतून केले जातात. त्यांना राज्यविधिमंडळाच्या मंजुरीची आवश्यकता नसते.

(४) राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष (पदावरून दूर झाल्यानंतर) केंद्रीय लोकसेवा आयोगाचा किंवा कोणत्याही राज्य लोकसेवा आयोगाचा सदस्य किंवा अध्यक्ष होण्यास किंवा अन्य राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष होण्यास पात्र असतो. मात्र, केंद्र किंवा राज्य शासनामध्ये नोकरी स्वीकारण्यास तो पात्र नसतो.

(५) राज्य लोकसेवा आयोगाचा सदस्य (पदावरून दूर झाल्यानंतर) केंद्रीय लोकसेवा आयोगाचा सदस्य किंवा अध्यक्ष होण्यास, तसेच त्या किंवा अन्य कोणत्या राज्य लोकसेवा आयोगाचा

अध्यक्ष होण्यास पात्र असतो  मात्र, केंद किंवा राज्य शासनामध्ये नोकरी स्वीकारण्यास तो पात्र नसतो.

(६) राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष किंवा सदस्य (पहिली मुदत संपल्यानंतर पुन्हा एकदा त्याच पदावर काम करण्यास पात्र नसतो (म्हणजेच दुसऱ्या मुदतीकरता पात्र नसतो).

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अधिकार व कार्ये :**

केंद्रीय लोकसेवा आयोग जसा केंद्रीय सेवांकरता कार्य पार पाडतो, त्याच स्वरूपाची कार्ये महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग राज्य पातळीवरील सेवांकरता करतो. राज्य लोकसेवा आयोगाची कार्ये पुढीलप्रमाणे आहेतः

(अ) आयोग राज्य पातळीवरील नागरी सेवांकरता नेमणुका करण्याकरता परीक्षा आयोजित करते.

(ब) कर्मचारी व्यवस्थापनाकरता पुढील विषयांवर आयोगाचा सल्ला घेतला जातोः

(१) नागरी सेवा आणि पदभरतीच्या पद्धती आणि त्यासंबंधी निगडित विषय.

(२) नागरी सेवा आणि पदांकरता नेमणुका करताना, तसेच बढती आणि एका सेवेतून दुसऱ्या सेवेत बदली करताना पालन करण्यात येणारी तत्त्वे.

(३) प्रशासकीय सेवा आणि पदांकरता; एका सेवेतून दुसऱ्या सेवेत होणारी बदली करताना तसेच प्रतिनिवृत्ती किंवा बदली करून नेमणुका करताना उमेदवारांची योग्यता ठरवणे; संबंधित विभाग बढतीकरता शिफारस करतात आणि त्यांना मान्यता देण्याकरता केंद्रीय लोकसेवा आयोगाला विनंती करतात.

(४) कोणत्याही राज्य शासनामध्ये प्रशासकीय सेवक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तिसंदर्भातील शिस्तविषयक तरतुदींसंबंधी काढली जाणारी विज्ञापने किंवा विनंती अर्ज यावर आयोगाचे मत विचारात घेतले जाते. जसे की,

अ) निंदा ठराव (टोकाची नापसंती)

ब) वेतनवाढ रोखून ठेवणेबाबत

क) निम्न पातळीवरील सेवा किंवा दर्जा स्वीकारावा लागणे (पदावनती)

ड) सक्तीची निवृत्ती

इ) पदावरून हटवले जाणे

ई) बडतर्फी

(५) एखाद्या प्रशासकीय सेवकाने त्याची कार्यालयीन कर्तव्ये बजावताना त्याच्यावर कायदेशीर कारवाई झाल्यास त्या प्रक्रियेला त्याला सामोरे जावे लागते. न्यायिक दाव्याकरता केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीकरता त्याने मागणी केली असल्यास, त्यासंबंधी आयोगाकडून सल्ला घेतला जातो.

(६) भारत सरकारच्या सेवेत रुजू असताना त्यादरम्यान एखाद्या अधिकाऱ्यास इजा झाली, तर त्याला

निवृत्तीवेतन बहाल करण्यासंदर्भात, तसेच त्याचे पैशातील मूल्य किती असावे याबाबत आयोगाचे मत घेतले जाते.

(७) कर्मचारी व्यवस्थापनाशी निगडित अन्य विषय.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, शासन वरील प्रकरणांमध्ये राज्य लोकसेवा आयोगाशी चर्चा करण्यात अयशस्वी झाले तर, पीडित प्रशासकीय अधिकाऱ्याला न्यायालयाकडे दाद मागता येत नाही. वेगळ्या शब्दांत, जर शासनाने आयोगाशी वेळोवेळी सल्लामसलत केली नाही किंवा कोणत्याही प्रकारे सल्लामसलत न करता कृती केली तरी शासनाचा निर्णय अवैध ठरत नाही. अशाप्रकारे, ही तरतूद बंधनकारक नाही, तर सूचक आहे. त्याचप्रमाणे, लोकसेवा आयोगाने केलेली नियुक्ती ही उमेदवाराला पदाधिकार देण्यास पुरेशी नसते. परिणामी, शासनाने न्यायबुद्धीने वागणे, तसेच त्याने कोणतीही मनमानी किंवा अप्रामाणिक कृत्य करू नये, हे अपेक्षित असते.

याव्यतिरिक्त राज्य शासनाला ठराव करून राज्य लोकसेवा आयोगाला त्या राज्य शासनाची कार्ये सोपवता येतात. शिवाय याअन्वये कोणतेही स्थानिक अधिकाराचे पद, निगम किंवा सार्वजनिक संस्था यांचे कर्मचारी व्यवस्थापन आयोगावर सोपवता येते. अशाप्रकारे, आयोगाचे कार्यक्षेत्र राज्य विधिमंडळ कायद्यान्वये वाढवू शकते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यपालाला आपल्या कामाचा वार्षिक अहवाल सादर करतो. राज्यपाल राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर तो अहवाल सादर करतो. अहवालासोबत आयोगाचे सल्ले जेव्हा स्वीकारले गेले नसतील, त्याचे सकारण स्पष्टीकरण करणारे जोडपत्र जोडलेले असते.

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्याक्षेत्रावरील मर्यादा :**

पुढील विषय आयोगाच्या कार्यात्मक क्षेत्रामध्ये समाविष्ट केलेले नाहीत. याचाच अर्थ पुढील विषयांवर आयोगाचा सल्ला घेतला जात नाही:

(अ) मागासवर्गांना नेमणुकीमध्ये आरक्षण देणे किंवा त्यांच्याकरता पदे राखून ठेवणे.

(आ) नागरी सेवा पदांकरता नेमणुका करताना अनुसूचित जाती आणि जमातींचे दावे विचारात घेणे.

राज्य लोकसेवा आयोगाच्या अखत्यारीतील पदे, सेवा आणि विषय वगळण्याचे अधिकार राज्यपालांना असतात. घटनेनुसार, राज्यपाल राज्य पातळीवरील सेवा आणि पदे यांविषयी नियमावली तयार करतात. त्यामध्ये कोणत्या विषयांवर लोकसेवा आयोगाचा सल्ला घेणे गरजेचे नाही, हे स्पष्ट केले जाते. मात्र राज्यपालांनी तयार केलेली नियमावली १४ दिवसांकरता राज्य विधिमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवली जाते. राज्य विधानमंडळ त्यात दुरुस्त्या करते किंवा ती रद्दबातल करते.

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची भूमिका :**

राज्यघटना लोकसेवा आयोगाकडे राज्यातील गुणवत्ता व्यवस्थेचा पहारेकारी म्हणून पाहते. बढती आणि शिस्तीसंबंधी मामल्यांमध्ये शासनाने सल्ला विचारल्यास तो देणे, हे देखील आयोगाचे काम आहे. याशिवाय

सेवांची वर्गवारी, वेतन आणि सेवाशर्ती, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन, प्रशिक्षण आणि अन्य बाबी हे आयोगाच्या अखत्यारीतील विषय नाहीत. हे विषय कर्मचारी व्यवस्थापन विभाग किंवा सर्वसाधारण प्रशासन विभाग हाताळते. अशाप्रकारे, राज्य लोकसेवा आयोग ही राज्य पातळीवरील भरती करणारी संस्था आहे, तर कर्मचारी व्यवस्थापन विभाग किंवा सर्वसाधारण प्रशासन विभाग कर्मचारी व्यवस्थापन हाताळणारी संस्था आहे.

एकूण पाहता, लोकसेवा आयोगाची भूमिका मर्यादित स्वरूपाची आहे, असे लक्षात येते. शिवाय त्याला केवळ सल्लावजा शिफारशी करता येतात. परिणामी, त्या शासनावर बंधनकारक नसतात. आयोगाचा सल्ला स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार पूर्णतः शासनाचा असतो. मात्र त्या कृतीकरता शासन राज्य विधानमंडळाला उत्तरदायी असते, ही दिलासा आणि खात्रीदायक बाब आहे. याशिवाय आयोगाच्या सल्लादायी कार्यांची व्याप्ती निश्चित करण्याकरता नियम करण्याचा शासनाला अधिकार आहे.

सन १९६४ रोजी राज्य दक्षता आयोगाची (SVC) स्थापना झाल्यानंतर आयोगाच्या शिस्तविषयक कार्यामध्ये बदल झाले. याचे कारण, प्रशासकीय अधिकाऱ्यांसंबंधी कृती किंवा कारवाई करताना शासन या दोन्ही संस्थांचा सल्ला घेते. अशावेळी जर दोन्ही संस्थांनी परस्परविरोधी सल्ले दिले तर अडचण निर्माण होते. तरीदेखील, राज्य लोकसेवा आयोग ही घटनात्मक संस्था आहे आणि त्यामुळे राज्य दक्षता आयोगाहून ती महत्त्वाची ठरते.

**स्वयं अध्ययन प्रश्न :**

१. भारतीय राज्यघटनेतील कलम .................. ते .................. केंद्रीय लोकसेवा आयोगाप्रमाणे राज्य लोकसेवा आयोगाची रचना, कार्य स्पष्ट केलेले आहे.

   अ) ३१५ ते ३२३    ब) ३१० ते ३१५

   क) ३२३ ते ३३०    ड) ३३० ते ३३९

२. राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष आणि सदस्य यांचा कार्यकाळ ......... वर्षांचा असतो.

   अ) ५  ब) ६  क) ७  ड) ८

३. राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष आणि सदस्य यांची नेमणूक .......... करतात.

   अ) राष्ट्रपती  ब) पंतप्रधान  क) राज्यपाल  ड) मुख्यमंत्री

४. राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष व सदस्य यांना पदावरून दूर करण्याचा अधिकार ......... असतो.

   अ) राष्ट्रपती  ब) पंतप्रधान  क) राज्यपाल  ड) मुख्यमंत्री

५. राज्यघटनेच्या ....................... भागामध्ये राज्य लोकसेवा आयोगासंबंधी तरतूद केलेली आहे.

   अ) १४  ब) १५  क) १६  ड) १७

### ४.२.३ **महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग** (Maharashtra State Human Rights Commission (MSHRC)) **:**

**प्रस्ताविक,**

आधुनिक काळात मानवाला सन्मानाने जगण्यासाठी काही हक्कांची आवश्यकता असते. प्रत्येक देशाची राज्यघटना आपल्या देशातील नागरिकांना वेगवेगळ्या प्रकारचे अधिकार देत असतात. भारतातील नागरिकांनाही राज्यघटनेच्या माध्यमातून मूलभूत हक्क देण्यात आले आहेत. हे हक्क किंवा अधिकार मानवी हक्कांशी संबंधित आहेत.

मानवी हक्क हे वंश, लिंग, राष्ट्रीयत्व, वांशिकता, भाषा, धर्म किंवा इतर कोणत्याही दर्जाचा विचार न करता सर्व मानवांना असलेले हक्क आहेत. मानवी हक्कांमध्ये जीवन आणि स्वातंत्र्याचा अधिकार, गुलामगिरी आणि छळापासून मुक्तता, मत आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य, काम आणि शिक्षणाचा अधिकार आणि बरेच काही समाविष्ट आहे. प्रत्येक व्यक्तिला भेदभाव न करता या अधिकारांचा अधिकार आहे. आंतरराष्ट्रीय मानवी हक्क कायदा व्यक्ती किंवा गटांच्या मानवी हक्कांना आणि मूलभूत स्वातंत्र्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी सरकारांना विशिष्ट प्रकारे कृती करण्याची किंवा विशिष्ट कृतींपासून दूर राहण्याची जबाबदारी निश्चित करतो. मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहीरनामा (UDHR) हा मानवी हक्कांच्या इतिहासातील एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे. जगातील सर्व प्रदेशांतील वेगवेगळ्या कायदेशीर आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या प्रतिनिधींनी तयार केलेला हा जाहीरनामा १० डिसेंबर १९४८ रोजी पॅरिसमधील संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या ठराव क्रमांक २१७ A (III) द्वारे सर्व लोकांसाठी आणि सर्व राष्ट्रांसाठी उपलब्धींचा एक सामान्य मानक म्हणून घोषित करण्यात आला. त्यात प्रथमच, मूलभूत मानवी हक्कांचे सार्वत्रिक संरक्षण करण्याचे ठरवले आहे. दरवर्षी १० डिसेंबर रोजी मानवी हक्क दिन साजरा केला जातो.

भारतात मानवी हक्क किवा अधिकार संरक्षण अधिनियम, १९९३ अन्वये राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या बरोबरीने राज्य पातळीवर देखील राज्य मानवाधिकार आयोग स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार, २६ राज्यांनी अधिकृत राजपत्र अधिसूचनांद्वारे राज्य मानवाधिकार आयोग स्थापन केले आहेत.

**महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग** (MSHRC) **:**

महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग (MSHRC) ची स्थापना १५ जानेवारी, २००० रोजी मानवाधिकार संरक्षण कायदा, १९९३ च्या कलम २१(१) अंतर्गत शासन निर्णय क्रमांक HRC १०९९/३७८/पोल क्रमांक १४ द्वारे करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग मानवी हक्कांचा आदर करण्यास प्रोत्साहन देते. ते मानवी हक्कांचा प्रचार, संरक्षण आणि अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षण, माहिती आणि प्रसिद्धीचा वापर करते.

मानवी हक्क संरक्षण कायद्याच्या कलम २(१) (ड) मध्ये मानवी हक्कांची व्याख्या अशी केली आहे की, संविधानाने हमी दिलेले किंवा आंतरराष्ट्रीय करारांमध्ये समाविष्ट असलेले आणि भारतातील न्यायालयांद्वारे लागू

करण्यायोग्य व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य, समानता आणि प्रतिष्ठेशी संबंधित अधिकार. ज्या अधिकारांना भारतीय संविधानाने किंवा आंतरराष्ट्रीय करारांनी हमी दिली आहे व ज्यांची अंमलबजावणी भारतीय न्यायालयात केली जाते.

**महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाची रचना :**

महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगामध्ये एक अध्यक्ष आणि दोन सदस्य असणारी एक बहुसदस्यीय संस्था आहे.

आयोगाचा अध्यक्ष हा उच्च न्यायालयाचा निवृत्त न्यायाधीश असावा. आयोगाचे सदस्य हे उच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा निवृत्त न्यायाधीश असावेत, आणि यातील तीन सदस्यांना मानवी अधिकाराचे प्रत्यक्ष ज्ञान आणि अनुभव (त्यापैकी किमान एक महिला सदस्य असावी) असावा. तसेच आयोगाकडे एक सचिव, एक विशेष पोलीस महानिरीक्षक आणि एक प्रबंधक असतो.

महाराष्ट्राचे राज्यपाल आयोगाचा अध्यक्ष आणि सदस्यांची नेमणूक मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीच्या शिफारशींनुसार करतो. मुख्यमंत्र्याशिवाय विधानसभेचा सभापती, राज्याचे गृहमंत्री, विधानसभेतील विरोधी पक्षनेता आणि राज्यात विधान परिषद असेल तर, विधान परिषदेचा अध्यक्ष आणि विरोधी पक्षनेता हेदेखील समितीचे सदस्य असतात. राज्यातील उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाशी सल्लामसलत करून, त्या राज्याच्या उच्च न्यायालयाचा विद्यमान न्यायाधीश किंवा विद्यमान जिल्हा न्यायाधीशाची आयोगावर नेमणूक केली जाते.

अध्यक्ष आणि सदस्य हे तीन वर्षांच्या कार्यकाळाकरता पद धारण करतात किंवा ७० वर्षे वय होईपर्यंत पदावर राहतात. शिवाय ते पुनर्नियुक्तीकरिता पात्र असतात. त्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर अध्यक्ष आणि सदस्य हे केंद्र किंवा राज्य सरकारच्या अंतर्गत पुढील नोकरीकरता पात्र राहत नाहीत.

राज्यपाल राज्य मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्ष आणि सदस्यांची नेमणूक करत असले तरी केवळ राष्ट्रपतींना (राज्यपालांना नाही) त्यांना पदच्युत करण्याचा अधिकार आहे. राष्ट्रीय आणि राज्य मानवाधिकार आयोगाचा अध्यक्ष आणि सदस्य यांना हटवण्याची कारणे आणि पद्धती एकसमान आहे.

आयोगाच्या अध्यक्षाला खालील परिस्थितीत अन्य पदसिद्ध अध्यक्ष किंवा कोणत्याही सदस्याला कार्यमुक्त करता येतेः

(अ) जर त्याला दिवाळखोर ठरवले असेल तर किंवा,

(आ) जर त्याच्या कार्यकाळात किंवा कार्यालयीन कर्तव्य बजावताना अन्य कोणत्याही सशुल्क कामात किंवा व्यवसायात गुंतलेला आढळून आल्यास किंवा, शारीरिक किंवा मानसिक दौर्बल्यामुळे तो पदावर राहण्यास अयोग्य असल्यास;

(ई) मानसिक आजारी असल्यास किंवा न्यायालयाने तसे ठरविले असल्यास,

(उ) एखाद्या गुन्ह्याकरता त्याला दोषी ठरवून कारावासाची शिक्षा झाल्यास.

याव्यतिरिक्त आयोगाचा अध्यक्ष हा अकार्यक्षमता किंवा गैरवर्तन केल्याचे सिद्ध झाल्यास अध्यक्ष किंवा सदस्यास कार्यमुक्त करू शकतो. अशी प्रकरणे अध्यक्ष चौकशीकरता सर्वोच्च न्यायालयाकडे पाठवतो. सर्वोच्च न्यायालयास चौकशीअंती ती व्यक्ती दोषी आढळल्यास अध्यक्षास किंवा सदस्यास कार्यमुक्त करण्याचा आदेश अध्यक्षास देतात.

अध्यक्ष किंवा सदस्याचे वेतन, भत्ते आणि अन्य सेवाशर्ती हे राज्य सरकार ठरवते. नियुक्तीनंतर त्याला नुकसानकारक होतील असे कोणतेही बदल सेवाशर्तींमध्ये केले जात नाहीत.

आयोगाच्या कामकाजात निष्पक्षता, स्वातंत्र्य आणि स्वायत्तता आणण्याच्या उद्देशाने या तरतुदी करण्यात आल्या आहेत.

**महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाचे अधिकार व कार्ये :**

महाराष्ट्र राज्याच्या मानवाधिकार आयोगाचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे आहेतः

(१) न्यायालयाच्या आदेशानुसार मानवी हक्कांचे उल्लंघन किंवा सार्वजनिक सेवकाने असे उल्लंघन रोखण्यात निष्काळजीपणा केल्याची एकतर स्वतःहून किंवा इतरांनी सादर केलेल्या याचिकेवर चौकशी करणे.

(२) न्यायालयासमोर प्रलंबित असलेल्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाचा आरोप असलेल्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये हस्तक्षेप करणे.

(३) कैद्यांच्या राहणीमानाचा अभ्यास करण्याकरता तुरुंग आणि अटकेच्या ठिकाणी भेटी देणे आणि त्याविषयीच्या शिफारशी करणे.

(४) मानवी हक्कांच्या संरक्षणाकरता घटनात्मक आणि अन्य कायदेशीर सुरक्षा उपायांचे पुनरावलोकन करणे आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीकरता उपायांची शिफारस करणे.

(५) मानवी हक्कांच्या उपभोगात अडथळा आणणाऱ्या दहशतवादाच्या कृत्यांसह अन्य घटकांचे पुनरावलोकन करणे आणि त्यावरील उपायांची शिफारस करणे.

(६) मानवाधिकारांवरील करार आणि अन्य आंतरराष्ट्रीय उपायांचा अभ्यास करणे आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीकरता शिफारशी करणे.

(७) मानवी हक्कांच्या क्षेत्रात संशोधन करणे आणि प्रोत्साहन देणे

(८) लोकांमध्ये मानवी हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि या अधिकारांच्या संरक्षणाकरता उपलब्ध असलेल्या सुरक्षा उपायांबद्दल जागरूकता वाढविणे.

(९) मानवी हक्कांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे,

(१०) मानवी हक्कांच्या संवर्धनाकरता आवश्यक असतील अशी अन्य कार्ये हाती घेणे.

**महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाचे कामकाज :**

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे मुख्यालय मुंबई येथे आहे. त्यांच्या स्वतःच्या कार्यपद्धतीचे नियमन करण्याचा अधिकार त्यांच्याकडे आहे. त्यात दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार व काही फौजदारी अधिकार आहेत आणि त्याच्या कार्यवाहीचे स्वरूप न्यायिक आहे. आयोग राज्य सरकार किंवा त्यांच्या अधीन असलेल्या अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडून माहिती किंवा अहवाल मागवते.

ज्या तारखेपासून मानवी हक्कांचे उल्लंघन करणारे कृत्य केल्याचा आरोप आहे त्या तारखेपासून एक वर्ष संपल्यानंतरही कोणत्याही प्रकरणाची चौकशी करण्याचा अधिकार आयोगाला नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, ती घटना घडल्यानंतर एका वर्षाच्या आत आयोग त्याकडे लक्ष वेधते.

चौकशी दरम्यान किंवा पूर्ण झाल्यावर आयोग खालीलपैकी कोणतीही पावले उचलू शकतोः

(अ) आयोगाला संबंधित राज्य सरकार किंवा प्राधिकरणाला नुकसान भरपाई किंवा पीडिताला भरपाई देण्याची शिफारस करता येते.

(आ) दोषी सरकारी सेवकांविरोधी खटला चालवण्याची किवा अन्य कोणतीही कारवाई करण्याकरता संबंधित राज्य सरकार किंवा प्राधिकरणाला शिफारस करता येते.

(इ) पीडिताला तात्काळ अंतरिम मदत देण्याची शिफारस संबंधित राज्य सरकार किंवा प्राधिकरणाकडे करता येते.

(ई) आयोग हा चौकशी दरम्यान आवश्यक निर्देश, आदेश किवा प्राधिलेखाकरता सर्वोच्च न्यायालय किंवा राज्याच्या उच्च न्यायालयाकडे विचारार्थ पाठवता येतो.

वरील चर्चेवरून आयोगाची कार्ये ही शिफारशी स्वरूपातील आहेत. आयोगाला मानवाधिकारांची पायमल्ली करणाऱ्यास शिक्षा करण्याचा, तसेच त्याचा बळी ठरलेल्या व्यक्तीस आर्थिक साहाय्य मिळवून देण्याचा अधिकार नाही, हे स्पष्ट होते. म्हणजेच, राज्य सरकार किंवा तत्सम मंडळाकरता त्याच्या शिफारशी बंधनकारक नसतात. मात्र आयोगाने केलेल्या शिफारशींवर कोणती पावले उचलण्यात आली, हे एक महिन्याच्या आत त्याला कळवावे लागते.

आयोग त्याचा वार्षिक किंवा विशेष अहवाल राज्य शासनापुढे सादर करतो. राज्य विधान मंडळापुढे अहवाल सादर करतेवेळी, त्याच्यासह केलेल्या कृतींचे जोडपत्र देखील सादर केले जाते, तसेच यापैकी ज्या शिफारशी स्वीकारल्या गेल्या नाहीत, ते सकारण स्पष्ट केले जाते.

**महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाची मर्यादा** (Maharashtra State Human Rights Commission (MSHRC) Limitations)**:**

महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाकडे तपासाची कोणतीही यंत्रणा नाही. बहुतेक प्रकरणांमध्ये, ते संबंधित केंद्र आणि राज्य सरकारांना मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या प्रकरणांची चौकशी करण्यास सांगते.

पीडित पक्षाला व्यावहारिक दिलासा देण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे सोली सोराबजी (भारताचे माजी ॲटर्नी-जनरल) यांनी याला 'भारताचा छेडछाड भ्रम' असे म्हटले आहे.

महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग फक्त शिफारसी करू शकते, निर्णय लागू करण्याचा अधिकार नाही.

बऱ्याचदा मानवाधिकार आयोगाकडे राजकीय संलग्नता असलेल्या न्यायाधीश आणि नोकरशहांसाठी निवृत्तीनंतरचे ठिकाण म्हणून पाहिले जाते, शिवाय, निधीच्या कमतरतेमुळे देखील त्याचे काम बिघडते.

घटनेच्या एक वर्षानंतरही नोंदवलेल्या तक्रारीची चौकशी करू शकत नसल्याने मोठ्या संख्येने तक्रारींचे निवारण होत नाही.

सरकार अनेकदा राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या शिफारसी योग्यरित्या नाकारते किंवा या शिफारसींचे अंशतः पालन होते.

राज्य मानवाधिकार आयोग केंद्र सरकारकडून माहिती मागवू शकत नाहीत, याचा अर्थ त्यांना केंद्राच्या नियंत्रणाखालील सशस्त्र दलांची चौकशी करण्याचा अधिकार अप्रत्यक्षपणे नाकारला जातो.

सशस्त्र दलांकडून होणाऱ्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाशी संबंधित राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे अधिकार मोठ्या प्रमाणात मर्यादित करण्यात आले आहेत.

**महाराष्ट्र राज्य मानवाधिकार न्यायालये :**

मानवाधिकार संरक्षण अधिनियमानुसार (१९९३) मानवाधिकारांचे उल्लंघन झालेल्या खटल्यांची सुनावणी वेगाने व्हावी याकरता प्रत्येक जिल्ह्यात मानवाधिकार न्यायालय स्थापन करण्याची तरतूद केली आहे.राज्य शासन हे केवळ त्या राज्याच्या उच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशाच्या सहमतीनेच या न्यायालयांची स्थापना करते. प्रत्येक मानवाधिकार न्यायालयाकरता, राज्य शासन सरकारी अभियोक्ता नेमण्याची सूचना करतो किंवा अधिवक्त्याची (ज्याने ७ वर्षे अधिवक्ता म्हणून काम केले आहे) विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नेमणूक करते.

## ४.३ सारांश :

लोकशाहीत स्वायत्त संस्था (Independent Bodies) महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. त्या सरकारवर नियंत्रण ठेवतात, नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करतात आणि समाजाला विविधतेने जोडण्याचे काम करतात.

मानवी हक्क हे एखाद्या व्यक्तीच्या मानव म्हणून विकासासाठी आवश्यक असलेले मूलभूत हक्क आहेत. आयोगाने पीडितांना आर्थिक मदतीसह अंतरिम आणि तात्काळ मदत देण्यास सक्षम असले पाहिजे. मानवाधिकार उल्लंघन करणाऱ्यांवर खटला चालवण्याचा अधिकार देखील न्यायाधिकरणाकडे असावा, ज्यामुळे भविष्यात होणारे उल्लंघन रोखता येईल.

**स्वयं अध्ययन प्रश्न :**

१. मानवाधिकार संरक्षण अधिनियम .................. ने राज्य पातळीवर राज्य मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली.

अ) १९९१ ब) १९९२ क) १९९ ड) १९९४

२. राज्य मानवाधिकार आयोगामध्ये .... सदस्य असतात

अ) २ ब) ३ क) ४ ड) ५

३. .................. हे राज्य मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्षांची नेमणूक करतात.

अ) मुख्यमंत्री ब) राज्यपाल क) मुख्य न्यायाधीश ड) पंतप्रधान

४. राज्य मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्षांना .................. हे पदच्युत करू शकतात.

अ) पंतप्रधान ब) राष्ट्रपती क) राज्यपाल ड) मुख्यमंत्री

५. राज्य मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष .................. वर्षाच्या कार्यकाळापर्यंत पदावर राहू शकतात.

अ) तीन वर्ष ब) चार वर्ष क) पाच वर्ष ड) सहा वर्ष

## ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**१. पदच्युत:** एखाद्या व्यक्तीला तिच्या पदावरून किंवा अधिकृत स्थितीवरून दूर करणे किंवा काढून टाकणे.

**२. आयोग:** एखाद्या विशिष्ट कामासाठी किंवा उद्देशासाठी नेमलेली समिती किंवा मंडळ.

**३. लेखा व लेखापरीक्षण :** हिशोब ठेवणे , ठेवलेले हिशोबांची तपासणी करणे

**४. स्वायत्तता :** स्वतःचे निर्णय घेण्याची आणि स्वतःवर राज्य करण्याची क्षमता किंवा स्थिती. याचा अर्थ असा की, एखाद्या व्यक्तीला किंवा संस्थेला त्यांच्या स्वतःच्या नियमांनुसार आणि अधिकाराखाली कार्य करण्याची मुभा असते, ज्यात बाह्य हस्तक्षेपाची गरज नसते. राजकीय, सामाजिक किंवा व्यक्तिगत संदर्भात स्वायत्तता वापरली जाते

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे :

**स्वयंअध्ययन प्रश्न १ ची उत्तरे :**

१) अ २) क ३) ब ४) अ ५) ब

**स्वयंअध्ययन प्रश्न २ ची उत्तरे :**

१) अ २) ब ३) क ४) क ५) अ

**स्वयंअध्ययन प्रश्न ३ ची उत्तरे :**

१) क २) अ ३) ब ४) ब ५) अ

## ४.६ सरावासाठी प्रश्न :

**टिपा लिहा.**

१. महाराष्ट्राच्या महाधिवक्त्याचे कार्य

२. महाधिवक्त्याची भूमिका

३. महाधिवक्तांचे महत्व

४. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अधिकार

५. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची रचना

६. राज्य मानवाधिकार आयोगाची रचना

७. राज्य मानवाधिकार आयोगाचे अधिकार

८. राज्य मानवाधिकार आयोगाचे महत्त्व

९. राज्य मानवाधिकार आयोगाचे कामकाज

**दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. महाराष्ट्र राज्याच्या महाधिवक्त्याचे महत्त्व स्पष्ट करा.

२. महाराष्ट्राच्या महाधिवक्त्याचे अधिकार व कार्य स्पष्ट करा.

३. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची रचना, अधिकार व कार्ये स्पष्ट करा.

४. महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग म्हणजे काय ते सांगून त्याचे महत्त्व स्पष्ट करा

५. महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाची रचना, अधिकार व कार्याची चर्चा करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१. Mohan Singh Saggu, (2023) Dynamics of Institution of Governor in India, KK Publication.

२. Basu, D. D., others, (2015) Introduction to Indian Constitution. Gurgaon: Lexis Nexis,

३. Laxmikanth, M., (2021) Indian Polity. New Delhi: McGraw Hill Education.

४. Dasarathy Bhuyan, (2016) Political Process in India. Cuttack: Kitab Mandal,

५. Paylee, M. V., (2016) India‘s Constitution, S. Chand, New Delhi.

६. Ranjan Manish, (2025) Polity, Governance and Social Justice, S. Chand, New Delhi.11 of 30.

७. सिंग जगदीप, (२०२२) भारतीय संविधान, के के पब्लिकेशन्स, नवी दिल्ली.

८. जाधव तुकाराम. शिरपूरकर महेश, (२०२४) भारतीय राज्यघटना आणि घटनात्मक प्रक्रिया खंड-१. युनिक अकॅडमी पुणे.

९. लक्ष्मीकांत एम., (२०२४) इंडिअन पोलिटी, माक्यो हिल, चेन्नई.

१०. पाटील वा. भा. (२०१६) महाराष्ट्र प्रशासन, प्रशांत पव्लिकेशन्स, जळगाव.

११. पवार प्रकाश (२००९) महाराष्ट्रच्या नव्या राजकारणाची पुनरचना, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

१२. जोहरी जे. सी.. (२०१९) राजनीती विज्ञान, एस बी पी डी पब्लिकेशन्स.

१३. पाटील वी. बी., (२०१८) महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

OOO

घटक १

# राजकीय पक्ष

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

- १.२.१ राजकीय पक्ष अर्थ आणि
- १.२.२ महाराष्ट्रातील आघाडीचे राजकारण
- १.२.३ महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्ष

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयं अध्ययन प्रश्न

१.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे :

भारतातील पक्ष पद्धती या घटकाचा आभ्यास केल्यानंतर आपल्याला :

१. राजकीय पक्ष म्हणजे काय समजेल.

२. भारतातील पक्ष पद्धतीचे स्वरूप समजेल.

३. महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्ष समजतील.

४. महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय आघाड्या आणि त्यांचे राजकारण समजून येईल.

## १.१ प्रास्ताविक :

मागील प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ याचा आभ्यास केला. या प्रकरणामध्ये आपण भारतातील पक्षपद्धती, महाराष्ट्रातील महत्वाचे राजकीय पक्ष आणि महाराष्ट्रातील आघाडी सरकारे याचा अभ्यास करणार आहोत. लोकशाही शासनपद्धतीत राजकीय पक्षाना अनन्यसाधारण महत्व असते. शासनसंस्थेला समर्थन, स्थिरता आणि विश्वासार्हता मिळवून देण्याचे काम राजकीय पक्ष करीत आसतात. भारतात बहुपक्ष पध्दती आस्तित्वात आहे. त्यामध्ये राष्ट्रीयपक्ष, प्रादेशिकपक्ष आणि स्थानिक पक्ष यांचा समावेश होतो. राजकीय पक्ष म्हणजे ऐच्छिक संघटना किंवा आशा व्यक्तींचे संघटित गट कि जे समान राजकीय विचार, धोरण स्वीकारून घटनात्मक मार्गाने सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करतात. राजकीय पक्ष हा लोकांचा समूह असून तो सामान्य माणसांची स्वारस्ये, समस्या आणि उद्दिष्टांना पाठिंबा देण्यासाठी मतदारांना राजकीय दृष्ट्या एकत्रित करण्याचा हा एक मार्ग आहे. राजकीय अजेंडा आणि लोककल्याणकारी धोरणे निश्चित करणे ही राजकीय पक्षाची प्राथमिक भूमिका असते. भारतीय निवडणूक आयोग राजकीय पक्षांना मान्यता देत असतो. १५ मार्च २०१९ रोजी भारतीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या राजकीय पक्षांच्या यादीनुसार भारतामध्ये एकूण २,३३४ राजकीय पक्ष असून, त्यापैकी ८ राष्ट्रीय पक्ष, २६ राज्यस्तरीय पक्ष आणि इतर २,३०१ नोंदणी कृत पक्ष आहेत. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, जनता दल, भारतीय जनता पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट, भारतीय कम्युनिस्ट, समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल, समता पक्ष, बिजू जनता दल, बहुजन समाज पक्ष, भारतीय रिपब्लिकन पक्ष, तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स, केरळ काँग्रेस, मुस्लीम लीग, अकाली दल, द्रमुक, अण्णा द्रमुक, तेलगू देसम्, शेतकरी कामगार पक्ष, गुरखा लीग, आसाम गण परिषद, शिवसेना इत्यादी लहान-मोठे राजकीय पक्ष भारतीय राजकारणात आहेत. यापैकी महाराष्ट्रात एकूण १४५ नोंदणीकृत पक्ष आणि २ राज्यस्तरीय (मनसे व शिवसेना) पक्ष आहेत.

## १.२ विषय विवेचन :

राजकीय पक्ष म्हणजे ऐच्छिक संघटना किंवा अशा व्यक्तींचे संघटित गट कि जे समान राजकीय विचार, धोरण स्वीकारून घटनात्मक मार्गाने सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करतात. राजकीय पक्ष हा लोकांचा समूह असून तो सामान्य माणसांची स्वारस्ये, समस्या आणि उद्दिष्टांना पाठिंबा देण्यासाठी मतदारांना राजकीयदृष्ट्या एकत्रित करण्याचा हा एक मार्ग आहे. राजकीय अजेंडा आणि लोककल्याणकारी धोरणे निश्चित करणे ही राजकीय पक्षाची प्राथमिक भूमिका असते. शासनसंस्थेला समर्थन, स्थिरता आणि विश्वासार्हता मिळवून देण्याचे काम राजकीय पक्ष करीत असतात. भारतीय निवडणूक आयोग राजकीय पक्षांना मान्यता देत असतो.

## १.२.१ राजकीय पक्ष अर्थ आणि :

**प्रा. गेटेल :** 'राजकीय पक्ष' हा कमी-अधिक प्रमाणात संघटीत असणारा, एक राजकीय घटक या नात्याने कृती करणारा, आपल्या सामर्थ्याच्या जोरावर शासन संस्थेवर नियंत्रण ठेवण्याचे उद्दिष्ट बाळगणारा आणि त्या आधारे आपली सर्वसामान्य धोरणे कार्यवाहीत आणण्याचा प्रयत्न करणारा असा नागरिकांचा एक समूह म्हणजे 'राजकीय पक्ष' होय.

**प्रा. आयव्हर :** ''राजकीय पक्ष ही काही तत्त्वे व घोरणे यांच्या समर्थनासाठी अस्तित्वात आलेली संघटना असते आणि ती तत्त्वे व धोरणे यांना घटनात्मक मार्गाने शासनसंस्थेचे आधार बनविण्याचा प्रयत्न करते.''

**एडमंड बर्क :** ''राजकीय पक्ष हा लोकांचा असा समूह असतो की, त्यातील व्यक्ती संयुक्त प्रयत्नांद्वारे त्यांना मान्य असलेल्या तत्त्वानुसार राष्ट्रहित साधण्यासाठी एकत्र झालेल्या असतात.''

थोडक्यात, राजकीय पक्ष म्हणजे राष्ट्राची राजकीय सत्ता प्राप्त करून घेऊन ती वापरण्याच्या उद्देशाने संघटित झालेल्या राष्ट्रातील नागरिकांचा समुदाय होय. राजकीय पक्ष ही सामूहिक संस्था आहेत जी राजकीय संस्थेच्या सहभागासाठी स्पर्धा आयोजित करतात. राजकीय पक्ष एक प्रकारे राजकिय सामाजिक संघटनाच असते . परंतु त्यांची उद्दिष्टे व कार्यपद्धती वेगवेगळ्या असतात. या पार्श्वभूमीवर आपल्याला असे म्हणता येईल की राजकीय सत्ता प्राप्त करण्यासाठी जेंव्हा लोक एकत्र येऊन निवडणूक प्रक्रियेत सहभागी होतात तेव्हा त्या संघटनांना राजकीय पक्ष म्हटले जाते. राजकीय पक्ष म्हणजे निवडणूक लढवून ती जिंकण्यासाठी व त्यानंतर सत्ता मिळवून आपल्या पक्षाचे सरकार स्थापन करणाऱ्या लोकांचा गट होय.

**राजकिय पक्षाचे प्रकार :**

राजकीय पक्षाचे दोन प्रकार पडतात. राष्ट्रीय पक्ष , प्रादेशिक पक्ष किंवा स्थानिक पक्ष असे प्रकार पडत असून संबंधित पक्षांना राष्ट्रीय पक्ष , प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता देण्याचे काम भारतातील निवडणूक आयोग करत असते .

**१. राष्ट्रीय पक्ष :** चार किंवा अधिक राज्यांमध्ये लोकसभा किंवा विधानसभेच्या मागील निवडणुकीत किमान ६% मते मिळवणे आवश्यक असते तसेच मागील निवडणुकीत कोणत्याही राज्यातून अथवा राज्यांमधून किमान चार सदस्य लोकसभेवर निवडून आले पाहिजेत किंवा लोकसभा मतदारसंघाच्या किमान २% मतदारसंघातून तसेच किमान तीन राज्यातून उमेदवार निवडून येणे आवश्यक असते. अशाप्रकारे निवडणूक आयोगाने स्पष्ट केलेल्या निकषांची पूर्तता केलेल्या पक्षांना राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळते. उदा : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, बहुजन समाज पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष इत्यादी पक्ष हे राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळालेले आहेत.

**२. प्रादेशिक पक्ष :** प्रादेशिक किंवा राज्य पातळीवरील पक्ष म्हणून मान्यता मिळण्यासाठी निवडणूक आयोगाने पुढील निकष स्पष्ट केले आहेत. लोकसभा किंवा विधानसभेच्या मागील निवडणुकीत किमान ६% मते मिळवणे आणि किमान दोन सदस्य विधानसभेवर निवडून येणे आवश्यक असते किंवा विधानसभेच्या एकूण सदस्य संख्येच्या किमान तीन टक्के जागा किंवा किमान तीन जागा प्राप्त करणे आवश्यक आहे.वरील निकष पूर्ण

करणाऱ्या पक्षांना प्रादेशिक पक्ष म्हणून निवडणूक आयोग मान्यता देते. उदा : शिवसेना, शेतकरी कामगार पक्ष, भारतीय रिपब्लीकन पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, बहुजन विकास आघाडी, राष्ट्रीय समाज पक्ष, स्वाभिमानी पक्ष, नॅशनल कॉन्फरन्स, शिरोमणी अकाली दल आणि आसाम गण परिषद इत्यादी.

**राजकीय पक्षांची कार्ये :**

**१. निवडणुका लढवणे :**

केंद्रीय कायदेमंडळ ते ग्रामपंचायत निवडणुका लढवणे हे पहिले कार्य राजकीय पक्षाचे आसते. राजकीय पक्ष सर्व राजकीय संस्थाच्या निवडणुका लढवतात. लोकशाही देशांमध्ये, निवडणुका प्रामुख्याने पक्षांनी उभे केलेल्या उमेदवारांमध्ये लढवल्या जातात. विशिष्ट राजकीय विचारसरणी आणि कल्याणकारी अजेंडा घेऊन विविध राजकीय पक्ष निवडणुका लढवतात.

**२. सरकार स्थापन करणे :**

सरकार स्थापन करणे हे राजकीय पक्षाचे अंतिम ध्येय असते. राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी, राजकीय पक्ष निवडणूक प्रक्रियेत सहभागी होतात आणि निवडणुका लढवतात. प्रचाराच्या माध्यमातून ते व्यापक जनसमर्थन मिळवून सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न करतात. जर त्यांना स्वतःहून बहुमत मिळवता आले नाही, तर ते समान विचारसरणीच्या पक्षांसोबत आघाडी किंवा युती करून सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारचे आघाडी स्थापनेचे कार्य भारतात मोठ्या प्रमाणात दिसून येते. एकदा राजकीय पक्षांना निवडणुकीत आवश्यक बहुमत मिळाले की, ते सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारे राजकीय पक्षांचे निवडून आलेले सदस्य सरकार चालवतात आणि सरकारच्या धोरणे आणि कार्यक्रम बनवण्याच्या प्रक्रियेत थेट सहभागी होतात.

**३. कल्याणकारी धोरणाचे नियोजन :**

राजकिय पक्ष विकासाची वेगवेगळी धोरणे आणि कार्यक्रम ठरवून सरकार चालवतात, ती धोरणे पुढे नेतात. सरकारकडून सत्ताधारी पक्षाने घेतलेल्या मार्गावर आपली धोरणे आधारित असणे अपेक्षित असते.उदा: भाजपची स्मार्ट सिटी योजना, उज्वला योजना, पंतप्रधान आवास योजना, जलसंधारण योजना, कृषी पिक योजना जन धन योजना, लाडकी बहिण योजना, पंतप्रधान जल मिशन योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि वृद्धापकाळ निवृत्तीवेतन इत्यादी. वेगवेगळे राजकीय पक्ष आपल्या पक्षाची उदिष्टे आणि विचारसरणी या आधारावर लोककल्याणकारी धोरणे ठरत आसतात. धोरण तयार करणे हे राजकीय पक्षाचे महत्वाचे कार्य आहे.

**४. कायदे निर्मिती प्रक्रियेत सहभाग :**

देशासाठी कायदे करण्यात पक्षांची निर्णायक भूमिका असते. कायदेमंडळात ज्या राजकीय पक्षाला बहुमत आसते तो पक्ष आणि सभागृहातील इतर राजकीय पक्ष यांचा कायदे निर्मिती प्रक्रियेत सहभाग सहभाग आसतो. कायदेमंडळात कायदे निर्मितीवर चर्चा केली जाते आणि ते कायदे मंजूर केले जातात. म्हणजेच सर्व राजकीय संस्थाच्या कायदे निर्मिती प्रकियेत सत्ताधारी आणि विरीधी राजकीय पक्षांचे सदस्य यांचा सहभाग असतो.

**५. राजकीय सामाजीकरण :**

राजकीय पक्ष देशपातळीवर लोकांचे राजकीय सामाजीकरण करतात. राजकीय पक्षांना राजकीय सामाजीकरणाचे प्रतिनिधी मानले जाते. राजकीय समाजीकरण ही अशी प्रक्रिया आहे, ज्यामध्ये लोकांना त्यांच्या देशाच्या राजकीय संस्कृती, राजकीय नियम आणि मूल्यांशी परिचित केले जाते आणि हे गुण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केले जातात. राजकीय पक्ष एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे राजकीय संस्कृतीचे संवाद साधणारे माध्यम म्हणून काम करतात. ते लोकांना विविध प्रकारे शिक्षित करतात. प्रथम निवडणुकीच्या वेळी राजकीय पक्ष आणि त्यांचे प्रतिनिधी मतदारांना भेटून त्यांना त्यांच्या कार्यक्रम आणि धोरणांबद्दल माहिती देतात जेणेकरून त्यांना त्यांच्या बाजूने मतदान करण्यास भाग पाडता येईल. दुसरे म्हणजे सत्ताधारी पक्ष कोणत्याही मुद्द्यावर सरकारच्या कार्यक्रम आणि धोरणांबद्दल लोकांना जागरूक करतात. अलिकडच्या काळात सोशल मीडिया राजकीय समाजीकरणाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून उदयास आले आहे. तिसरे म्हणजे आंदोलने, धरणे किंवा निदर्शने याद्वारे, विरोधी पक्ष सरकारच्या कार्यक्रम आणि धोरणांमधील कमतरता दाखवतात आणि सरकारच्या धोरणांना पर्याय देतात. यामुळे लोकांना सरकार आणि त्याच्या धोरणांची जाणीव होते. चौथे, राजकीय समाजीकरणाचे कार्य टेलिव्हिजन आणि रेडिओवरील वादविवादांमध्ये नेतृत्व करून आणि सहभागी होऊन आणि इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट माध्यमांमध्ये जाहिराती देऊन देखील केले जाते. पाचवे, निवडणुकीपूर्वी निवडणूक जाहीरनामे जारी करून, राजकीय पक्ष लोकांना निवडणूक जिंकल्यास त्यांचा काय हेतू आहे हे कळवतात. या पद्धतींद्वारे लोकांना त्यांच्या राजकीय व्यवस्थेची, तिच्या संस्थांची आणि प्रक्रियांची जाणीव होते.

**पक्ष पद्धतीची वैशिष्ट्ये :**

**१. एक पक्ष प्रबळ पद्धती :**

भारतातील राजकीय पक्ष पद्धतीचे वर्णन एक पक्ष प्रबळ पद्धती आसे करता येईल. एकाच राजकीय पक्षाच्या हाती सत्ता दीर्घकाळ असल्यास व अन्य कोणतेही पक्ष राजकारणात असून प्रभावी नसल्यास त्या पक्ष पद्धतीला एक पक्ष प्रबळ पद्धती असे म्हटले जाते. भारतात स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रीय काँग्रेस पक्ष हा एक प्रबळ पक्ष होता. काही राज्यांचा अपवाद वगळता केंद्र व राज्य पातळीवर या पक्षाला स्पष्ट बहुमत होते. १९७७ ची निवडणूक अपवाद वगळता १९८९ पर्यंत राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची भारतीय राजकारणावर पकड होती म्हणून या काळातील पक्ष पद्धतीचे वर्णन एक प्रबळ पक्ष पद्धती असे केले जाते. या काळात इतर राजकीय पक्षांचे अस्तित्व होते पण त्याचा भारतीय राजकारणावर प्रभाव कमी होता.

**२. विशिष्ट तत्व आणि विचारसरणी :**

प्रत्येक राजकीय पक्ष काही धोरणांचा विचारांचा पुरस्कार करणार असतो. सार्वजनिक प्रश्नाबाबत पक्षांची एक विशिष्ट भूमिका असते. या सर्वांच्या समावेशनातून पक्षाची विचारसरणी तयार होते, ही विचारसरणी ज्यांना योग्य वाटते ते लोक त्या पक्षाला पाठिंबा देतात. पक्षाला लोकांचा पाठिंबा मिळतो त्याला त्या पक्षाचा जनाधार असे म्हटले जाते. भारतातील सगळे पक्ष विशिष्ट विचारसरणीच्या आधारावरती स्थापन झालेल्या आपल्याला दिसून येतात. काँग्रेस पक्ष सर्वधर्मीय, समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष पक्ष म्हणून उदयास आला. भारतीय जनता

पक्ष हा १९९१ साली डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या संघाच्या प्रभावाखाली निर्माण झालेला जनसंघ पक्ष. हा पक्ष हिंदुत्ववादी या विचारसरणीवर आधारित असलेला पक्ष आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि भारतीय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हे मार्क्सवादी विचारसरणीवर आधारित असलेले पक्ष आहेत. तसेच समाजवादी पक्ष हा समाजवादी विचारसरणीवर आधारित असलेला पक्ष दिसून येतो. थोडक्यात भारतातील राजकीय पक्षांच्या विचारसरणीचा अभ्यास करता वेगवेगळी राजकीय पक्ष हे विशिष्ट विचारसरणीच्या आधारावरती स्थापन होऊन राजकारणात सक्रिय असलेले दिसून येतात. थोडक्यात भारतातील पक्ष समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, हिंदुत्ववाद आणि गांधीवाद, फुले, शाहू, आंबेडकरी विचार या तत्त्वांवर काम करतात.

**३. सरकार आणि जनता यांच्यामधील दुवा :**

राजकीय पक्ष हे सरकार आणि नागरिक यांच्यामध्ये दुवा म्हणून काम करतात. निवडणुकीच्या माध्यमातून ज्या राजकीय पक्षाला बहुमत मिळते त्या पक्षाचे सरकार स्थापन होते आणि ज्या पक्षांना बहुमत मिळत नाही ते विरोधी पक्ष म्हणून काम करत असतात. अशा प्रकारे सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष म्हणून विधिमंडळात कामकाज चालू असते. सत्ताधारी पक्ष हा दिलेली आश्वासने, धोरणे याबाबत निर्णय घेऊन कार्य करीत असतात, म्हणजेच जनतेची लोक कल्याणकारी कार्य करीत असतात, तर विरोधी पक्ष हा सामान्य जनतेच्या मागण्या आणि गाऱ्हाणी शासनापर्यंत पोहोचवण्याचे काम करीत असतात. त्यामुळे राजकीय पक्ष हे शासन आणि जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करीत असतात.

**४. विशिष्ठ वर्गीय स्वरूप :**

भारतातील राजकीय पक्ष यांचे विशिष्ठ वर्गीय स्वरूप आसल्याचे दिसून येते. बहुतेक पक्षांचे सदस्य व प्रामुख्याने नेते एकाच शिक्षित, पांढरेपेशा, शहरी, मध्यमवर्गाचे आहेत .त्यामुळे भारताचे राजकारण हे नेहमी या वर्गाचेच राजकारण राहिले आहे. सत्ताधारी व विरोधी हे दोन्ही पक्ष सारख्याच तत्त्वांचा व मूल्यांचाच नव्हे, तर साध्य आणि साधनांचाही पुरस्कार करताना दिसतात. स्वतंत्र सामाजिक-आर्थिक जाणिवांच्या संघटनांतून जेव्हा पक्ष उभे राहतात तेव्हा त्यांच्या वैचारिक भूमिका, तात्त्विक अधिष्ठाने व कार्यक्रमात्मक आशय यांना काटेकोर वेगळेपणा प्राप्त होतो.पण या देशात असे कोणत्याच पक्षाबाबत झालेले नसल्यामुळे या बाबतीत त्या सर्वांचे तत्वज्ञान सारखेच दिसतात.

**५. सरकार स्थापन करणे :**

प्रत्येक राजकीय पक्षाचा हेतू हा केवळ सत्ता स्थापने हा असतो. विशिष्ट धोरणांचा आणि विचारांचा पुरस्कार करून राजकीय पक्ष निवडणुकीच्या माध्यमातून लोकांचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करतात. त्या पक्षाला लोकांचा जास्तीत जास्त पाठिंबा मिळतो त्याला त्या पक्षाचा जनाधार असेही म्हटले जाते. या जनाधाराच्या माध्यमातून राजकीय पक्ष सत्ता मिळवत असतात. त्यामुळे सत्तेसाठीच विविध राजकीय पक्ष परस्परांशी स्पर्धा करून राजकीय सत्ता प्राप्त करीत असतात. सत्ता स्थापन झाल्यानंतर ते राजकीय पक्ष देशाचा राज्यकारभार करतात. अर्थात हे कार्य निवडणुकीत बहुमत मिळवणाऱ्या पक्षाचे असते ज्या पक्षांना बहुमत मिळत नाही ते पक्ष विरोधी पक्ष म्हणून काम करत असतात.

**६. बहुपक्ष पध्दती :**

भारतात बहुपक्ष पद्धती आस्तित्वात आहे. निवडणूक आयोगाच्या मान्यतेनुसार भारतात ७० राजकीय पक्ष आहेत त्यामध्ये सहा राष्ट्रीय पक्ष आणि ६४ प्रादेशिक पक्ष आहेत. भारतीय राजकारणाचा अभ्यास करता सर्वसाधारणपणे १९७७ ते १९८० हा कालावधी वगळता १९९० पर्यंत काँग्रेस पक्ष हाच एकमेव प्रभावी शक्तिशाली व सत्ताधारी पक्ष म्हणून कार्य करीत होता. बाकीचे इतर राजकीय पक्ष अस्तित्वात होते पण कमकुवत व दुर्बल असलेले दिसतात. थोडक्यात भारतीय राजकीय पक्षांची राजकारणाची एकूण चौकट लक्षात घेता १९४७ ते १९६७ हा काळ काँग्रेस प्रणित राजकीय व्यवस्थेच्या प्रभुत्वाचा कालखंड होता. १९६७ ते १९८९ हा काळ काँग्रेस व्यवस्थेच्या संथ ऱ्हासाचा म्हणता येईल. १९८९ नंतर भारतीय राजकारणात पक्षीय स्पर्धा यामध्ये बदल होऊन राजकीय स्पर्धा बहुपक्षीय बनली. उदा : इंडियन नॅशनल काँग्रेस (आय्), कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया, भारतीय जनता पक्ष, भारतीय रिपब्लीकन पक्ष, स्वतंत्र पक्ष, सोशलिस्ट पार्टी व जनता पक्ष, अकाली दल, ऑल पार्टी हिल लीडर्स कॉन्फरन्स इत्यादी

**७. विचारसरणीचा अभाव :**

भारतीय पक्ष पद्धतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वैचारिक आणि मुख्य विचारसरणीचा अभाव दिसून येतो. उजवीकडील भाजप आणि डावीकडील दोन कम्युनिस्ट पक्ष सोडले तर इतर सर्व लहान–मोठे राजकीय पक्ष यांच्यामध्ये वैचारिक बांधिलकीचा अभाव असल्याने त्यांची कार्यपद्धती काही व्यक्तींच्या भूमिकेवरून ठरते. त्यांच्या विचारसरणीवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी, ते पक्ष काही संकुचित हितसंबंधांवर भर देतात आणि धार्मिकता, जातीयवाद इत्यादी मुद्द्यांवर मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रसिद्ध प्रचार करतात. काही तत्त्वे आणि धोरणांच्या बांधिलकीची जागा योग्यता आणि व्यावहारिकता यांनी घेतली आहे. बहुतेक सर्वच राजकीय पक्षांचे नेते एकाच शहरी, शिक्षित, पांढरपेशा, मध्यमवर्गातून आलेले आहेत, यांची मूल्यप्रणाली व साध्यसाधने सारखीच आहेत.

**८. संमिश्र सामाजिक पाया :**

भारतातील राजकीय पक्षांचा पाया संमिश्र सामाजिक आसल्याचे दिसून येते .कारण भारतीय पक्षपद्धतीतील राजकीय पक्षप्रवेश, उमेदवारी व पदोन्नती याचे स्पष्ट नियम व पद्धती बहुधा कोणत्याच पक्षात नसल्यामुळे तसेच पक्षफुटी, पक्षयुती व पक्षांतरे मोठ्या प्रमाणात घडत असल्यामुळे इथल्या पक्षांचा विशिष्ट सामाजिक पाया पाहायला मिळत नाही. तरीही काही मोघम निरीक्षणे नोंदविता येतात. इथल्या बहुतेक सर्वच राजकीय पक्षांचे सदस्यत्व बहुजिनसी असून जाती, धर्म, भाषा व अन्य बाबी यावर आधारलेले अनेक समूह प्रत्येक पक्षात एकवटलेले आढळतात. सामाजिक पाया बहुजिनसी असल्यामुळे इथला कोणताच पक्ष धोरणाबाबत एकसंघता नाही, त्यामुळे इतर पक्षांशी स्थायी स्वरूपाची युती करण्यास लागणारी निष्ठा कोणत्याची पक्षापाशी नाही.

**९. पक्षांचे प्रादेशीकरण :**

भारतातील पक्षसंख्या वाढीचे कारण म्हणजे पक्षांचे प्रादेशीकरण होय . त् या देशातील राष्ट्रव्यापक काही पक्ष, विशिष्ट प्रदेशांवरच आपले लक्ष केंद्रित करीत असतात. उदा. द्रमुक पक्ष, अकाली दल, माकप, असंख्य राज्यपातळीवरील पक्ष वगैरे. राष्ट्रीय पक्षांचे प्रादेशिक घटकही अनेकदा परस्परांशी विचारविनिमय न

करता धोरणे ठरवितात. त्याचबरोबर अनेक प्रादेशिक निष्ठा व महत्त्वाकांक्षा घेऊन नवे नवे पक्ष निर्माण होत आहेत आणि त्यांच्या वाढीत अधिकाधिक भर पडत आहे. खऱ्या अर्थाने अखिल भारतीय म्हणता येईल असा एकही राजकीय पक्ष देशात अस्तित्वात आसल्याचे दिसून येत नाही .

**१०. पक्षशिस्त आणि संघटनात्मक बांधणीचा अभाव :**

भारतात पक्षशिस्त आणि संघटनात्मक बांधणी यांचा अभाव सर्वच राजकीय पक्षांत आढळतो. काँग्रेस पक्षांत काही अंशी संघटनात्मक बांधणी आहे; परंतु पक्षाचे कार्य संघटनात्मक रचनेनुसार चालताना दिसत नाही. साम्यवादी पक्षात संघटनात्मक बांधणी व शिस्त आढळते. सामान्यतः भारतातील सर्वच पक्षांत आढळणारा दोष म्हणजे सर्वच राजकीय पक्ष कोणत्या ना कोणत्यातरी नेत्याभोवती किंवा घराण्याभोवती फिरत असतो. इंदिरा काँग्रेस, चव्हाण काँग्रेस, शरद पवार काँग्रेस, जगजीवनराम काँग्रेस, लोकदल (बहुगुणा), रिपब्लिकन पक्ष, भंडारे, खोब्रागडे, गवई व कांबळे गट इत्यादी पक्षांवरून याची प्रचिती येते. संघटनात्मक बाधणीचा आणि रचनात्मक कार्याचा अभावच याला कारणीभूत आहे. तसेच पक्षाचे नियम, शिस्त न पाळणाऱ्या व्यक्तींवर शिस्तभंगाची कारवाई होणे आवश्यक असते. परंतु भारतात शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत पक्षाचे हायकमांड नेहमीच टाळाटाळ करताना दिसतात. आपल्या पक्षाचे सदस्य कमी होतील या भीतीने शिस्तभंगाची कारवाई होत नाही.

**११. धर्मांधता आणि जातीयता यांचा प्रभाव :**

भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य असले तरीही काही राजकीय पक्ष धार्मिकता, जातीयता या घटकांवर आधारलेले दिसतात. मुस्लीम लीग, अकाली दल, हिंदू महासभा, भाजप यासारखे पक्ष विशिष्ट धर्माच्या, जातीच्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी निर्माण झालेले दिसतात. वास्तविक धर्म, जात, भाषा अशा घटकांवर आधारलेले पक्ष राष्ट्रीय एकात्मतेला घातक असतात. सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी राष्ट्रीय पक्ष जातीयवादी पक्षांचे अप्रत्यक्षपणे सहकार्य घेताना दिसतात.

**१२. व्यक्तिकेंद्रितता :**

विभूतिपूजा हे भारतीय समाजाचे आणि राजकीय पक्षाचे एक प्रमुख वैशिष्ट्य मानले गेले आहे. आपल्या देशात महाराज व बुवाबाजी वाढण्यास ही विभूतिपूजाच कारणीभूत झाली आहे. राजकारणाचे क्षेत्रही त्यास अपवाद ठरले नाही. राजकीय पक्षात देखील एखाद्या नेत्याचे माहात्म्य वाढते किंवा ते वाढविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातो; त्यामुळे व्यक्तिकेंद्रितता हे भारतातील राजकीय पक्षपद्धतीचे वैशिष्ट्य बनले आहे. पक्षातील एखाद्या नेत्याकडे वलयांकित नेता म्हणून पाहिले जाते. हा नेताच आपल्या पक्षाला सर्व प्रकारच्या अडचणीतून आणि संकटातून तारून नेईल असा विश्वास पक्षाच्या बहुसंख्य सदस्यांना वाटत असतो; त्यामुळे सदस्य आपल्या नेत्यावर निष्ठा ठेवतात. एखादा पक्षकार्यकर्ता पक्षाच्या नेत्याशी निष्ठा आहे की नाही यावर त्याच्या कामाचे मूल्यमापन केले जाते. पक्षाच्या सर्वोच्च नेत्याला विरोध करणे हा पक्षद्रोह इतका गंभीर गुन्हा मानला जातो. राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना पक्षापेक्षाही नेता मोठा वाटतो. अशा प्रकारे राजकीय पक्ष हे व्यक्तिकेंद्रित बनले असल्याचे दिसते.

**१३. पक्षांतर्गत गटबाजी :**

पक्षांतर्गत गटबाजी हे भारतातील राजकीय पक्षपद्धतीचे एक ठळक वैशिष्ट्य मानले जाते. भारतातील प्रत्येक राजकीय पक्षात अशा प्रकारची गटबाजी दिसून येते. त्यास कोणताही राजकीय पक्ष अपवाद नाही. एकाच राजकीय पक्षात अनेक गट – तट असतात आणि हे पर परस्परांवर मात करण्याचा आणि पक्षावर नियंत्रण ठेवण्याचा आणि पक्षावर आपले वर्चस्व ठेवण्याचा प्रयत्न करू लागतात. पक्षातील अशा धोरणामुळे पक्षात संघर्षाला तोंड फुटते. भारतातील सर्व राजकीय पक्ष अशा प्रकारच्या अंतर्गत गटबाजी आणि संघर्षानी ग्रस्त असल्याचे पाहावयास मिळते. काही वेळा पक्षां– अंतर्गत – सघर्ष अत्यंत विकोपाला जातो. त्याची परिणती अखेरीस पक्षफुटीत होते. या संदर्भात लक्षात घेण्यासारखी बाब अशी की, पक्षातील फाटाफूट कसल्याही तात्विक मतभेदावरून झालेली नसते. काही वेळा पक्षातील फाटाफुटीला तात्त्विक मतभेदाचा मुलामा देण्याचा प्रयत्न संबंधितांकडून केला जातो; परंतु पक्षनेत्यांचा स्वार्थ, त्यांच्यातील व्यक्तिगत संघर्ष आणि त्यांना एकमेकांविषयी वाटत असलेली असूया हेच या फुटीमागील खरे कारण असते.

## १.२.२ महाराष्ट्रातील आघाडीचे राजकारण :

सहाव्या महाराष्ट्र विधानसभेसाठी निवडणूक १९७८ मध्ये घेण्यात आली. १९७४ मध्ये मतदारसंघांची पुनर्रचना करून एकूण जागा २७० वरून २८८ करण्यात आल्या होत्या. या निवडणुकीला इंदिरा गांधींनी २५ जून १९७५ ते २१ मार्च १९७७ या काळात देशात आणीबाणीची पाश्वभूमी होती. आणीबाणीच्या काळात महाराष्ट्रात शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री होते. आणीबाणीनंतर इंदिरा गांधींना देशभरातून होणारा विरोध लक्षात घेता पक्षांतर्गत हालचाली सुरू झाल्या. इंदिरा गांधींचे नेतृत्व स्वीकारण्यावरून काँग्रेस पक्षात फूट पडली. 'इंदिरा गांधीनिष्ठ' आणि 'काँग्रेस पक्षनिष्ठ' असे गट निर्माण झाले. देश पातळीवर यशवंतराव चव्हाण आणि ब्रह्मानंद रेड्डी यांनी इंदिरा गांधी यांचं नेतृत्व झुगारून देत, 'रेड्डी काँग्रेस'ची स्थापना केली. महाराष्ट्रातही याचे परिणाम उमटले. राज्यातही काँग्रेसचे दोन गट निर्माण झाले. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील व शरद पवार आदी नेते रेड्डी काँग्रेसमध्ये आले. नासिकराव तुरपुडे सारखे नेते इंदिरा काँग्रेसमध्ये राहिले. २५ फेब्रुवारी १९७८ रोजी महाराष्ट्राच्या सहाव्या विधानसभेसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. ही निवडणूक 'रेड्डी काँग्रेस' आणि इंदिरा काँग्रेस या दोन्ही काँग्रेसने स्वतंत्रपणे लढवली आणि याचा वेळी सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन जनता पक्षाची स्थापना करून निवडणूक लढवली. रेड्डी काँग्रेसने रिपब्लिकन (गवई) सोबत युती केली तर इंदिरा काँग्रेसने शिवसेनेशी युती केली. जनता पक्षाने शेकाप, माकप, रिपाई (कांबळे गट), नाग विदर्भ समिती व मुस्लिम लीग (बंडखोर गट) यांच्याशी हातमिळवणी केली होती. देशातील आणीबाणीचा फटका जसा इंदिरा काँग्रेसला बसला, तसाच रेड्डी काँग्रेसलाही बसला. परिणामी महाराष्ट्रात जनता पक्षाने सर्वाधिक ९९ जागा मिळाल्या, इंदिरा काँग्रेसला ६२, तर रेड्डी काँग्रेसला ६९ जागा मिळाल्या. शेकापला १३, माकपला ९ आणि अपक्षांना ३६ जागा मिळाल्या होत्या. कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने राज्यात त्रिशंकू स्थिती निर्माण झाली होती.

**महाराष्ट्रातील पहिले आघाडी ( संयुक्त) सरकार :**

सत्तेसाठी दोन्ही काँग्रेस एकत्र आले आणि वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात प्रथमच

संयुक्त सरकार स्थापन झाले. ७ मार्च १९७८ रोजी वसंतदादा पाटील यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची, तर इंदिरा काँग्रेसचे महाराष्ट्रातील तत्कालीन नेते नाशिकराव तिरपुडे यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. शरद पवार हे या मंत्रिमंडळात उद्योगमंत्री होते. तिरपुडे व काँग्रेस (रेड्डी) गटातील नेत्यांमधील कलहामुळे मंत्रिमंडळात एकजिनसीपणाचा अभाव दिसत होता. १९७८ सालच्या जुलै महिन्यात विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन सुरू असतानाच शरद पवारांनी ४० आमदार घेऊन वसंतदादांच्या सरकारमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. सुशीलकुमार शिंदे, सुंदरराव सोळंके आणि दत्ता मेघे यांसारख्या मंत्र्यांनीही शरद पवारांसोबत राजीनामा दिला. आघाडी सरकार अल्पमतात आल्याने वसंतदादा पाटील आणि नाशिकराव तिरपुडेंनी राजीनामे दिले. परिणामी महाराष्ट्रातील पहिलं आघाडी सरकार अवघ्या साडेचार महिन्यातच कोसळलं.

**पुरोगामी लोकशाही दल (पुलोद) सरकार :**

वसंतदादा सरकारमधून बाहेर पडल्यानंतर शरद पवारांनी 'समाजवादी काँग्रेस'ची स्थापना केली आणि जनता पक्ष, शेकाप आणि कम्युनिस्ट पक्ष यांच्याशी युती करून पुरोगामी लोकशाही दल (पुलोद) ची सत्ता स्थापन केली. १८ जुलै १९७८ रोजी शरद पवारांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आणि महाराष्ट्रात प्रथमच बिगर काँग्रेस सरकार सत्तेवर आले. वयाच्या अवघ्या ३८ व्या वर्षी शरद पवार यांनी राज्याचे नेतृत्व स्वीकारले. सर्वात तरुण मुख्यमंत्री म्हणून पवारांची नोंद आहे. त्याचा विक्रम आजही अबाधित आहे.केंद्रात सत्तेवर आलेले जनता पक्षाचे सरकार अंतर्गत गटबाजीमुळे अवघ्या दोन वर्षातच पडले आणि १९७९ मध्ये देशात मध्यावधी निवडणुका घेण्यात आल्या. केंद्रामध्ये पुन्हा इंदिरा गांधी सत्तेवर आल्या. सत्तेवर आल्यानंतर इंदिरा गांधींनी देशातील ९ बिगर काँग्रेस सरकारे बरखास्त केली. १७ फेब्रुवारी १९८० रोजी राष्ट्रपतींनी शरद पवार यांचे पुलोद सरकार बरखास्त करून महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू केली. १९८० मध्ये महाराष्ट्रात पुन्हा निवडणुका झाल्या आणि इंदिरा काँग्रेसला महाराष्ट्रातही बहुमत मिळाले आणि बॅरिस्टर ए. आर. अंतुले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. पवारांच्या समाजवादी काँग्रेसचा पराभव झाला. पुढे १९८६ मध्ये शरद पवार काँग्रेस पक्षात परत आले. पुढील कांही निवडणुका काँग्रेसने श्री. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली जिंकल्या. वसंतदादा पाटील आणि शरद पवार यांच्या आघाडी सरकारनंतर पुढे १९९५ पर्यंत आघाडी सरकारे अस्तित्वात नव्हती कारण १९८० ते १९९५ या काळात काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाल्यामुळे आघाडी सरकारचा प्रयोग थांबला होता. पण १९९५ ला आघाडी सरकारचा प्रयोग सुरु झाला आणि १९९५ साली शिवसेना-भाजप युती सरकार सत्तेवर येऊन मनोहर जोशी व नारायण राणे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले.

**भाजप-शिवसेना युतीचे आघाडी सरकार (१) :** महाराष्ट्राच्या नवव्या विधानसभेसाठी व २८८ जागांसाठी दोन टप्प्यात मतदान प्रक्रिया घेण्यात आली. १२ फेब्रुवारी व ९ मार्च १९९५ रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. १९९५ च्या निवडणुकीत काँग्रेसमध्ये मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाली. राज्यभरातून जवळजवळ २०० नेत्यांनी बंड केले. हि बंडखोरीच काँग्रेसला सत्तेवरून दूर करण्यात कारणीभूत ठरली. महाराष्ट्रातील पहिले सत्तांतर म्हणून १९९५ च्या निवडणुकीकडे पाहिले जाते. १९९५ च्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. काँग्रेसला सर्वाधिक ८० जागा मिळाल्या. परंतु ते बहुमतापासून खूपच दूर होते. काँग्रेसच्या जागा पहिल्यांदाच शंभरच्या आत आल्या होत्या. शिवसेना पक्षाला ७३ तर भाजप ६५ जागा मिळाल्या होत्या. शिवसेना - भाजप युतीला १३५ जागा व २९.२ टक्के मते मिळाली होती. प. महाराष्ट्र वगळता युतीला संपूर्ण

महाराष्ट्रात चांगला प्रतिसाद मिळाला होता. महाराष्ट्रातील विविध जातीसमूह युतीकडे आकर्षिले गेले होते. १९९५ पासून राज्यात आघाड्यांच्या राजकारणाला प्रारंभ झाला. १९९५ मध्ये जनता दल ११, शेकाप ०६ माकप ०३, सपा ०३ व अपक्ष ४५ उमेदवार निवडून आले. १३५ जागा प्राप्त करून युती विधानसभेतील सर्वात मोठा पक्ष ठरली होती. आधी ठरल्याप्रमाणे ज्यांच्या जागा जास्त त्या पक्षाचा मुख्यमंत्री या न्यायाने मुख्यमंत्रीपद शिवसेनेकडे गेले . शिवसेनेने मनोहर जोशींना तर भाजपने गोपीनाथ मुंडेंना आपआपले विधीमंडळ नेते बनवले. राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर यांनी युतीला सत्तास्थापनेचे आमंत्रण दिले . मनोहर जोशी मुख्यमंत्री तर गोपीनाथ मुंडे उपमुख्यमंत्री बनले.महाराष्ट्रात शिवसेना भाजपा युतीने पहिले बिगर काँग्रेस सरकार सत्तेवर आले. ३१ जानेवारी १९९९ पर्यंत मनोहर जोशी मुख्यमंत्री होते. त्यानंतर शवटचे १० (१ फेब्रुवारी १९९९ ते १७ ऑक्टोबर १९९९) महिने नारायण राणे मुख्यमंत्री होते.

**लोकशाही आघाडी सरकार (१) :** १९९९ ची महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक सत्तापालट करणारी होती. या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नव्हते, कारण म्हणजे १९९९ साली महाराष्ट्राच्या काँग्रेसमध्ये फुट पडून शरद पवार यांनी स्थापना केलेली राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपा - शिवसेना यांच्यामध्ये जागा वाटपावरून झालेला गोंधळ झाला. १९९९ रोजी निवडणुकीत शिवसेनेच्या १६१ पैकी ६९ उमेदवारांचा, भाजपाच्या ११७ पैकी ५६ उमेदवारांचा विजय झाला होता. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस स्वतंत्रपणे लढून या निवडणूकीत काँग्रेसला ७५ तर राष्ट्रवादी काँग्रेसला ५८ जागा मिळाल्या होत्या. शिवसेना आणि भाजप यांना सरकार स्थापन करण्यात अपयश आल्यानंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र येऊन सत्ता स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या दोन्ही पक्षांची एकत्रित संख्या १३३ होती. जनता पक्ष, शेकाप, माकप,रिपब्लिकन पक्ष आणि अपक्ष आमदारांच्या मदतीने काँग्रेस-राष्ट्रवादीचे लोकशाही आघाडी सरकार महाराष्ट्रात स्थापन झालं. याचे नेतृत्व, मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि उपमुख्यमंत्री छगन भूजबळ यांनी केले होते.

**लोकशाही आघाडी सरकार (२) :** ११ वी महाराष्ट्र विधानसभा निवडणुक १३ ऑक्टोबर २००४ रोजी आयोजित करण्यात आलेली निवडणूक होती. निवडणुकीपूर्वी राज्यात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे लोकशाही आघाडी सरकार होते. मुख्य लढत प्रमुख आघाडी म्हणजे काँग्रेस प्रणीत लोकशाही आघाडी आणि भारतीय जनता पार्टी - शिवसेना यांची युती होती. इतर प्रमुख राजकीय पक्षांमध्ये बहुजन समाज पक्ष, समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल, कम्युनिस्ट पार्टी ऑम इंडिया (मार्क्सवादी) आणि लोकजनशक्ती पक्ष ह्यांचा समावेश होता. २८८ सदस्यांच्या विधानसभेत लोकशाही आघाडीने एकत्रितपणे १४१ जागा जिंकल्या. ज्यात राष्ट्रवादी काँग्रेसने सर्वाधिक ७१, काँग्रेसने ६९ आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) एक जागा जिंकल्या. त्यांचे मुख्य प्रतिस्पर्धी शिवसेना-भारतीय जनता पार्टीच्या युतीने ११७ जागा जिंकल्या. त्यात शिवसेना ६२, भाजपा ५४ आणि स्वातंत्र्य भारत पक्षाने एक जागा जिंकल्या.या निवडणुकीत १९ अपक्ष उम्मेदवार आणि १२ महिला उम्मेदवार विजयी झाले. ह्या निवडणुकीत आघाडी सरकारने चुरशीच्या लढतीत युतीचा पराभव करून आपली सत्ता कायम ठेवली. विलासराव देशमुख आघाडी सरकारचे मुख्यमंत्री बनले.आणि राष्ट्रवादीचे आर. आर. पाटील उपमुख्यमंत्री बनले.

**लोकशाही आघाडी सरकार (३) :** १३ ऑक्टोबर २००९ रोजी महाराष्ट्रात १३ व्या विधानसभा निवडणुक झाली. सत्ताधारी लोकशाही आघाडी (काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (एनसीपी)) ने शिवसेना

आणि भारतीय जनता पक्ष (भाजप) यांच्या युतीविरुद्ध आणि रिपब्लिकन डाव्या लोकशाही आघाडी (रिडालोस) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तिसऱ्या आघाडीविरुद्ध निवडणूक लढवली. या निवडणुकीत काँग्रेसने १७० राष्ट्रवादी काँग्रेसने ११३ शिवसेनेने १६० तर भाजपने ११९ जागा लढल्या. राज ठाकरेंनी स्थापन केलेल्या मनसेने या निवडणुकीत १४३ जागा लढवल्या . या निवडणुकीत काँग्रेसने ८२ राष्ट्रवादी काँग्रेसने ६२ शिवसेनेने ४४ तर भाजपने ४६ तर मनसेला १३ जागा मिळाल्या आणि महाराष्ट्रात अशोक चव्हाण आणि छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली लोकशाही आघाडी सरकार – ३ स्थापन झाले. २०१० मध्ये या सरकारच्या नेतृत्वात बदल करण्यात येऊन मुख्यमंत्री म्हणून पृथ्वीराज चव्हाण आणि उपमुख्यमंत्री म्हणून अजित पवार यांच्याकडे नेतृत्व देण्यात आले .

**भाजप–शिवसेना युतीचे आघाडी सरकार ( २ ) :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१४ ही दिनांक १५ ऑक्टोबर २०१४ रोजी एकाच फेरीत घेतली गेली. १९ ऑक्टोबर २०१४ रोजी मतमोजणी व निवडणुकीचे निकाल घोषित केले गेले. या निवडणुकीत कोणत्याच राजकीय पक्षाला बहुमत मिळाले नाही. कारण भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या पक्षांनी २०१४ च्या लोकसभेतील अपयश आणि अंतर्गत मतभेद यामुळे आपली आघाडी मोडीत काढून निवडणुक स्वतंत्रपणे लढवण्याचे ठरवले. तसेच जागावाटपावरून एकमत होऊ न शकल्यामुळे भारतीय जनता पक्ष व शिवसेना ह्यांची २५ वर्षेसुरू असलेली युतीदेखील संपुष्टात आली. ह्यामुळे महाराष्ट्रामधील सर्व प्रमुख मतदारसंघांमध्ये बहुरंगी लढत झाली. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला सर्वाधिक १२२ जागा मिळाल्या. शिवसेनेस ६३, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला ४२ तर राष्ट्रवादी काँग्रेसला ४१ जागा मिळाल्या. कोणत्याही पक्षाला साधे बहुमत न मिळाल्याने, निकालानंतर भाजपा – शिवसेना पुन्हा एकत्र येऊन देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले.

**महाविकास आघाडी सरकार :** २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूका २१ ऑक्टोबर २०१९ रोजी एकाच फेरीत २८८ जागांसाठी झाल्या. २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत, भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांनी युती करून संयुक्तपणे निवडणूक लढवली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांनी महाविकास आघाडी करून निवडणूक लढवली. भाजपने १०५ जागा जिंकल्या, शिवसेनेने ५६ जागा जिंकल्या, राष्ट्रवादीने ५४ जागा जिंकल्या आणि काँग्रेसने ४४ जागा जिंकल्या. निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर, शिवसेना आणि भाजपमध्ये सत्तावाटप व्यवस्थेवरून मतभेद निर्माण झाले. शिवसेनेने सत्तेत समान वाटा मागितला होता, ज्यावर भाजपने कथितपणे सहमती दर्शवली होती. ५०–५० च्या कथित करारानुसार शिवसेनेने अडीच वर्षांसाठी मुख्यमंत्रीपदाची मागणी केली. भाजपचे देवेंद्र फडणवीस यांनी अशा कोणत्याही सूत्रावर सहमती झाल्याचे नाकारले. भाजपने अखेर त्यांच्या सर्वात जुन्या मित्रपक्षांपैकी एक असलेल्या शिवसेनेशी संबंध तोडले. त्यानंतर शिवसेनेने सरकार स्थापन करण्यासाठी भाजपला पाठिंबा देण्यास नकार दिला. २०१९ मध्ये महाराष्ट्रात राजकीय संकट निर्माण झाले. या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांच्या महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले होते, परंतु सरकार स्थापनेवरील मतभेदांनंतर, युती विसर्जित झाली आणि महाराष्ट्रात नवीन सरकार निर्माण झाले नाही. कोणत्याही पक्षाला सरकार बनवता न आल्याने सरकार स्थापन झाले नसल्याने राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. पुढे २३ नोव्हेंबर २०१९ च्या पहाटे देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची तर अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. तथापि, या

दोघांनी २६ नोव्हेंबर २०१९ रोजी बहुमत चाचणीच्या आधीच राजीनामा दिला आणि २८ नोव्हेंबर २०१९ रोजी शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रीय काँग्रेसने महाविकास आघाडी या नावाची नवीन महाविकास आघाडी स्थापन करून, या आघाडी अंतर्गत उद्धव ठाकरें यांनी मुख्यमंत्री आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून सरकार स्थापन केले. खासदार शरद पवार यांच्या पुढाकाराने हि आघाडी स्थापन झाली होती. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत फूट पडल्याने उद्धव ठाकरेंना राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी भाजपा-राष्ट्रवादी काँग्रेस महायुती स्थापन करून एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री झाले.

**महायुती सरकार :** २०२४ ची महाराष्ट्र विधानसभा निवडणूक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली लढवण्यात आली. केंद्रातील नरेंद्र मोदीच्या सरकारची कामगिरी आणि महाराष्ट्रामधील लाडकी बहिण योजना, महिलांना एस.टी.त ५०% तिकीट याचा परिणाम निवडणूक निकालात दिसून येतो. राज्यात २८८ जागांसाठी सरासरी ६५ % पेक्षा अधिक मतदान झालं. राज्यात सरकार स्थापन करण्यासाठी १४५ आमदारांचा पाठिंबा असणे गरजेचे आहे. या निवडणूकीत महायुतीने बहुमताचा आकडा गाठला. भाजपा सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला आहे. भाजपाने १३२, शिवेसना (शिंदे) ५७, राष्ट्रवादी (४१) जागा जिंकल्या आहेत. तर मविआ मधील काँग्रेसने १६, राष्ट्रवादी (शरद पवार) १०, शिवसेना (ठाकरे) २० ठिकाणी विजय मिळविला. थोडक्यात महायुतीने २३५, मविआने ४९ आणि इतरांनी ४ जागा जिंकल्या आहेत. सध्या महायुतीचे सरकार अस्तित्वात असून देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आणि एकनाथ शिंदे व अजित पवार उपमुख्यमंत्री आहेत.

**आघाडीच्या राजकारणाचे परिणाम :**

**१) प्रादेशिक पक्षांना सत्तेत वाटा :** कायदे मंडळच्या सार्वत्रिक निवडणुकीत कोणत्याच राजकिय पक्षाला बहुमत मिळाले नसल्याने वेगवेगळे राष्ट्रीय, प्रादेशिक पक्ष एकत्र येऊन किमान समान कार्यक्रम या आधारावर एकत्र येतात. त्यामुळे विविध राज्यातील प्रादेशिक राजकीय पक्षांना सत्तेत सहभाग मिळतो. मुख्य म्हणजे एका कोणाला बहुमत नसल्यानं सगळे सहभागी पक्ष एकमेकांवर अवलंबून असतात. त्यामुळे सत्तेवर अंकुश राहतो आणि एकांगी निर्णयांवर मर्यादा येते. प्रादेशिक पक्षांना या महत्व येतं आणि केवळ मोठ्या राष्ट्रीय पक्षांची सत्ता नसते. अल्पमतात असणारेही संख्येच्या राजकारणात सत्तेत वाटेकरी बनतात.

**२) राजकीय अस्थैर्य :** राजकीय अस्थैर्य हा सर्वात जास्त महत्वाचा मुद्दा आहे . कोणत्याही राज्यासाठी वा देशासाठी राजकीय स्थैर्य ही महत्वाची गोष्ट असते. या स्थैर्याचे परिणाम आर्थिक क्षेत्रापासून सामाजिक क्षेत्रापर्यंत दिसतात. उदाहरणार्थ, परकीय गुंतवणूक. जिथं राजकीय स्थैर्य असतं, धोरणात सतत बदल होणार नसतात, एकाच सरकारचा अंमल असतो, तिथं खाजगी परकीय कंपन्या येण्यास अनुकूल असतात. औद्योगिकिकरणासाठी असं स्थैर्य सोयिस्कर ठरतं. शिवाय ज्या सरकारी धोरणांचा नागरिकांच्या रोजच्या आयुष्यावर परिणाम होतात, तीही कायम राहतात आणि परिणामी व्यक्तीच्या आयुष्यातल्या स्थैर्यासाठीही ते अनुकूल ठरतं. त्यामुळे आघाडी सरकार आणि महायुती सरकारच्या काळात विकासापेक्षा भ्रष्टाचार जास्त झालेला दिसून येतो .

**३) निर्णयक्षमता विलंबकारी :** दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे निर्णय क्षमता होय. बहुमतातल्या एकपक्षीय

सरकारमध्ये निर्णय पटापट होतात. आघाडीच्या सरकारमध्ये अनेक पक्ष सहभागी असल्यानं सगळ्यांमध्ये एकमत होण्यास वेळ लागतो आणि निर्णय लांबणीवर पडू शकतात. पण अशा सरकारला बहुमत त्यांच्या बाजूला असल्यानं अशा स्थितीला तोंड द्यावं लागणार नाही. एकच पक्ष निर्णय घेणार असल्यानं विलंब होत नाही.पण आघाडी सरकारच्या काळात धोरणात्मक  निर्णयास विलंब लागतो.

**४) राजकीय सौदेबाजी :** आघाडी ही तात्पुरती व पर्यायी व्यवस्था आहे, ही जाणीव ठेवून प्रत्येक घटक पक्ष आपल्या राजकीय शक्तीत वाढ करण्यासाठी कायम प्रयत्न करतात. तसेच आघाडी सरकार ही काही राजकीय समझोत्यावर आधारित व्यवस्था असल्यामुळे प्रत्येक घटक पक्षाला सरकारमध्ये समावून घ्यावे लागते .मंत्रिमंडळातील महत्वाची खाती त्यांना द्यावी लागतता. नाहीतर आघाडी सरकार मधून बाहेर पडणे किंवा दुसऱ्या आघाडीत सामील होणे, बाजू बदलणे अशा बाबी राजकारणाचा सामान्य भाग बनतात.

**५) पक्षांतरे :** भारतीय राजकारणात राजकीय पक्ष फुटणे किंवा पक्षांतर करणे ही काही नवी राजकीय घडामोड नाही. सन १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर अनेक राज्यांमध्ये काँग्रेस पक्षाकडे बहुमत राहिले नाही, राज्यांमध्ये आघाड्यांचे सरकार अस्तित्वात आले. आघाड्यांचे सरकार अस्तित्वात येण्यासाठी व ते पाडण्यासाठी पक्षांतरे मोठ्या प्रमाणात झाली. आजचा राजकीय पक्ष व त्यांचे नेते राजकीय विचार, पक्षाची निष्ठा यांपासून दूर जात आहेत असे चित्र दिसते. पक्षांतर आणि एकूणच देशाच्या राजकारणात तयार झालेली परिस्थिती यातून राजकीय पक्षांपुढे पेच निर्माण झाले आहेत.

**६) कणखर नेतृत्व आणि अवघड निर्णय :** एकपक्षीय बहुमताचं सरकारच कणखर नेतृत्व देऊ शकतं असाही दावा करण्यात येतो. जे अवघड, प्रलंबित निर्णय आहेत तेही निर्णय होऊ शकतात. इंदिरा गांधींच्या काळातले बँकांचे राष्ट्रीयिकरण किंवा बांगलादेश युद्धातली आक्रमकता ही उदाहरणं दिली जातात, तर नरेंद्र मोदींच्या काळातली काश्मिरबद्दलचं कलम ३७० हटवणं, संसद-विधिमंडळातलं महिलांसाठी आरक्षण असे प्रलंबित प्रश्न मार्गी लागणं ही उदाहरणं सांगितली जातात.

**७) सर्वसमावेशक निर्णय :** एकपक्षीय बहुमताच्या सरकारमध्ये सर्वसमावेशकतेला दिसून येत नाही . जे बहुमतात आहेत ते केवळ संख्येच्या आधारावर आपले निर्णय रेटू शकतात. जे अल्पमतात आहेत वा सत्तेत सहभागी नाहीत त्यांच्याही मताला महत्व दिलं नाही तर हे निर्णय एककल्ली होऊ शकतात. याउलट विविध राजकीय पक्षाचे आघाडी सरकार हे कोणताही निर्णय घेत आसताना सहभागी पक्ष, त्यांची धोरणे आणि अपेक्षा लक्षात घेऊन निर्णय होतात. म्हणजेच विविध पक्षांनी एकत्र येऊन तयार केलेल्या आघाडी सरकारची जमेची बाजू म्हणजे तिथं सत्तेचं विकेंद्रिकरण झालेलं असतं. जेवढे पक्ष सत्तेत सहभागी होतात त्यांना निर्णयप्रक्रियेत घेतल्यानं ते पक्ष ज्या प्रदेशांचं, समाजांचं, विचारधारांचं प्रतिनिधित्व करतात त्यांचाही विचार होतो.

**८) राजकीय तत्त्व प्रणालीला थोडी मुरड :** भारतात आघाडी सरकार स्थिर होत असली तरी ज्या आघाड्या निर्माण झालेल्या आहेत ते पाहिल्यास त्यांच्यामध्ये कोणतीही विचारसरणी, तत्वे, भूमिका आणि धोरणे याबाबत साम्य किंवा सुसंगतपणा नसताना फक्त सत्तेसाठी एकत्र आलेले दिसून येतात. सगळे राजकीय

पक्ष विचारसरणी, तत्वे, भूमिका, धोरणे आणि राजकीय मतभेद विसरून एकत्र येतात व सरकार स्थापन करतात. 'किमान समान राजकीय कार्यक्रमाच्या' आधारावर एकत्र येऊन आघाडी सरकार स्थापन करतात.

### १.२.३ महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्ष :

#### अ) राष्ट्रीय काँग्रेस पक्ष :

भारतातील राजकीय पक्ष हे स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय चळवळीशी निगडित होते. नंतर अशा प्रकारच्या राष्ट्रीय चळवळीचे रूपांतर राजकीय पक्षात झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजी राजसत्तेला संघटित प्रतिकार करण्यासाठी या देशातील वेगवेगळे हित संबंध जपणारे राष्ट्रीय चळवळीचे गट १८८५ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या एका ध्वजाखाली उभे राहिले. सुरुवातीपासून एक दबाव गट अस्तित्वात आलेले भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पुढे त्याचे राजकीय पक्षात रूपांतर झाले.भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (Indian National Congress) (INC), हा भारतातील एक राष्ट्रीय राजकीय पक्ष आहे.काँग्रेसची स्थापना २८ डिसेंबर, १८८५ रोजी ॲलन ह्यूम, दादाभाई नौरोजी आणि दिनशा वाचा यांनी केली. मुंबईच्या तेजपाल संस्कृत पाठशाळेत संपूर्ण देशभरातील ७२ प्रतिनिधी एकत्र येऊन २८ डिसेंबर १८८५ रोजी 'इंडियन नॅशनल काँग्रेस' म्हणजेच राष्ट्रीय सभेची स्थापना करण्यात आली आणि भारतीय स्वातंत्र्यानंतर त्यांचे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात रूपांतर झाले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाची पूर्व - पुण्याई आणि त्या लढ्यात निर्माण झालेली प्रतिमा यामुळे आज पर्यंत भारतीय राजकारणामध्ये राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला अनन्यसाधारण महत्त्व आसल्याचे दिसून येते.

**पक्ष रचना :**

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाजवळ अन्य कोणत्याही पक्षापेक्षा मोठी, विस्तृत व सुबद्ध अशी संघटनात्मक रचना आहे. पक्षाचे मुख्यालय २४, अकबर रोड, नवी दिल्ली येथे आहे. या पक्षाची राष्ट्रीय पातळीपासून ते गाव पातळीपर्यंत संघटनात्मक बांधणी आहे.

**अखिल भारतीय काँग्रेस कमिटी :** अखिल भारतीय काँग्रेस कमिटी (AICC) ही भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची अध्यक्षीय किंवा केंद्रीय निर्णय घेणारी कमिटी आहे. ही राज्यस्तरीय प्रदेश काँग्रेस समित्यांमधून निवडून आलेल्या सदस्यांचे बनलेले असते आणि त्यात एक हजार सदस्य असू शकतात. AICC मध्ये पक्षाचे अध्यक्ष अनेक स्वीकृत सदस्य, प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सदस्यापैकी त्या कमिट्यांनी निवडलेले एक अष्टमांश सदस्य यांचा समावेश होतो. काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य हे काँग्रेसचे अध्यक्ष व पदाधिकारी निवडतात. AICC चे संघटनात्मक कार्यकारिणी हे अनेक सरचिटणीस आहेत त्यांची निवड काँग्रेस अध्यक्ष आणि काँग्रेस कार्यकारिणीच्या सदस्यांनी करतात. AICC राष्ट्रीय स्तरावर पक्षासाठी निर्णय आणि धोरण तयार करण्यासाठी जबाबदार असते तसेच ही कमिटी राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय निवडणुकांसाठी पक्षाचा अजेंडा आणि रणनीती देखील तयार करण्याचे काम करते.

**काँग्रेस कार्यकारणी :** काँग्रेस वर्किंग समिती ही भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची कार्यकारिणी समिती आहे. सामान्यत: ऑल इंडिया काँग्रेस समितीतून निवडून आलेल्या पंधरा सदस्यांचा यात समावेश असतो. याचे नेतृत्व एक कार्यकारी अध्यक्ष करतात. याला पक्षाची स्थायी कार्यपालिक असेही म्हणतात. पक्षाला सतत व समर्थपणे

मार्गदर्शन करणे हे त्याचे कार्य असते. पक्षाचे महत्त्वाचे धोरण आणि संघटनात्मक बाबींवर निर्णय घेण्यासाठी जबाबदार असते.

**संसदीय बोर्ड :** प्रत्येक पक्षाप्रमाणे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सुद्धा संसदीय बोर्ड आहे या संसदीय बोर्डात काँग्रेस अध्यक्ष आणि इतर पाच सदस्य असतात. हे संसदीय बोर्ड केंद्र व राज्य विधिमंडळासाठी उभे करावयाचे उमेदवारांची छाननी व अंतिम निवड करण्याचे काम करीत असतात. याच बरोबर प्रदेश काँग्रेस समिती, जिल्हा काँग्रेस समिती, तालुका काँग्रेस समिती, शहर आणि ग्रामीण काँग्रेस समिती आणि वार्ड समिती यांचा समावेश होतो.

**काँग्रेस पक्षाची ध्येयधोरणे :**

१. मिश्र अर्थ व्यवस्थेचा पुरस्कार.

२. औदोगिक विकास.

३. शेती विकास.

४. शिक्षणविकास.

५. धर्मनिरपेक्ष राज्याचा पुरस्कार.

६. शांततामय परराष्ट्र धोरण

**काँग्रेस पक्षाची राजकीय वाटचाल :**

लोकसभेच्या स्वतंत्र भारताच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका २५ ऑक्टोबर १९५१ ते २१ फेब्रुवारी १९५२ दरम्यान पार पडल्या होत्या. त्यावेळची ती सर्वात मोठी निवडणूक होती. भारताच्या पहिल्या निवडणुकीत देशभरातून १८७४ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले होते. तसंच १० कोटी मतदारांनी त्यावेळी मतदानाचा हक्क बजावला होता. काँग्रेसला त्यावेळी इतर प्रमुख पक्षांच्या तुलनेत चौपट मते मिळाली होती. काँग्रेसला तब्बल ३६४ जागा मिळाल्या होत्या. सीपीआयला १६ जागा मिळाल्या होत्या. टक्केवारीचा विचार केला तर ४५ टक्क्यांहून अधिक लोकांनी काँग्रेसला मतदान केलं होतं. १३ मे १९५२ रोजी, नव्याने स्वीकारलेल्या संविधानानुसार, पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान म्हणून आणि इतर १४ सदस्यांसह मंत्रिमंडळाचा भाग म्हणून स्वतंत्र भारताचे पहिले निर्वाचित सरकार स्थापन करण्यात आले. काँग्रेसला एवढे भरघोस मतदान होण्याचे कारण म्हणजे पक्षाच्या पाठीशी भारताच्या स्वातंत्र चळवळीचा प्रदीर्घ इतिहास राष्ट्रीय पक्ष संघटन आणि स्वातंत्र्यसंपादन यामुळे राष्ट्रीय काँग्रेसच्याप्रती मताचे अनुकूल मतात परिवर्तन झाले. देशाचे पंतप्रधान म्हणून नेहरूंनी संसदीय लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रचार केला आणि आधुनिक राष्ट्र म्हणून भारताच्या प्रतिमेवर जोरदार प्रभाव पाडला. लोकसभेची दुसरी सार्वत्रिक निवडणूक १९ जानेवारी १९५७ ते १ मार्च १९५७ च्या दरम्यान पार पडली. ही निवडणूक १९५६ च्या भाषावर प्रांत रचनेच्या नंतरची लोकसभा निवडणुक होती. या निवडणुकीत ४५ हुन अधिक राजकीय पक्षांनी सहभाग नोंदवला होता. अपक्षांची ही संख्या मोठी होती. १९५७ च्या या लोकसभेच्या निवडणुकीत राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने ४९० जागा उमेदवार उभे केले होते. त्यापैकी ३७१ ठिकाणी त्यांना विजय मिळाला. पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक संशयपणे जिंकली. लोकसभेची तिसरी सार्वत्रिक निवडणूक फक्त दहा दिवसात पार पडली १९६२ च्या या निवडणुकीत

४९४ जागांसाठी ११ कोटी ९९ लाख मतदारांना मतदानाचा हक्क बजावला निवडणुकीच्या मैदानात १९८५ उमेदवार उतरले होते. काँग्रेस पक्षाने ४८८ जागा लढवल्या त्यापैकी ३६१ जागावर त्यांना विजय प्राप्त झाला. आणि परत एकदा काँग्रेस पक्षाने आपले वर्चस्व सिद्ध केले. या निवडणुकीत पंडित नेहरू यांच्यावर घराणेशाहीचा आरोप झाला असला तरी पक्षाला कमालीचे यश मिळाले. या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे या निवडणुकीत काँग्रेस व इतर राजकीय पक्षांच्या माध्यमातून शेतकरी व ग्रामीण पासून असलेल्या नेतृत्वाचा उदय झाला.

देशाच्या आणि काँग्रेस पक्षाच्या दृष्टीने १९६२ ते १९६७ च्या दरम्यान सकाळ भारतीय इतिहासात अत्यसंघर्षाचा काळ म्हणून ओळखला जातो. त्याचे परिणाम देशाच्या राजकारणावर दीर्घकाळ उमटत राहिले देशावरची आणि पाकिस्तानची दोन आक्रमणे झाली. हे आक्रमणामुळे नेहरूंच्या आदर्श वादाला धक्का बसला १९६४ मध्ये पंडित नेहरूंच्या मृत्यूनंतर गुलजारी लाल नंदा काळजीवाहू पंतप्रधान झाले. काही दिवसानंतर नेहरूंचे उत्तराधिकारी म्हणून देशाची सूत्रे लालबहादूर शास्त्री यांच्याकडे सोपवण्यात आली. याच पार्श्वभूमीवर १९६७ च्या निवडणुका झाल्या या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला २८३ जागा मिळाले. गंगेच्या नाऱ्यामुळे वेगवेगळ्या राज्यात विरोधी पक्षाची सरकारी स्थापन झाली याचाच परिणाम १९६९ साली काँग्रेस पक्ष दुभंगला आणि त्यातून संघटना काँग्रेस आणि इंदिरा काँग्रेस अशा पक्षांची निर्मिती झाली. १९६९ सालची काँग्रेस मधील फूट आणि वेगवेगळ्या राज्यात स्थापन झालेले संयुक्त सरकारे या पार्श्वभूमीवर १९७१ ची पाचवी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक महत्त्वाची आहे. काँग्रेस किंवा इंदिरा गांधींची विरोधक एका बाजूला इंदिरा हाताचा नारा देत होते तर इंदिरा गांधी स्वत: गरीबी हटावचा नारा देत होत्या. 'गरीबी हटाव'च्या नाऱ्यामुळे इंदिरा गांधींची समाजवादी प्रतिमा तयार झाली. त्याचबरोबर बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तणखे बंदी भूमिकेमुळे इंदिरा गांधींच्या काँग्रेस पक्षाला अभूतपूर्व यश मिळाले. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने ३५२ जागांवर विजय प्राप्त केला तर काँग्रेसमध्ये बंड केलेल्या संघटना काँग्रेसला १६ जागांवर विजय मिळाला. भारताच्या निवडणुकीच्या इतिहासातील १९७७ ची सहावी लोकसभा निवडणूक दीर्घकाळ लक्षात राहणी आहे. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला सत्तेतून पायउतार करून भारतीय राजकारणाचा प्रवास बदलून टाकला या निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या पराभवाबरोबर स्वतः इंदिरा गांधी देखील पराभूत झाल्या. याला कारण म्हणजे १९७५ ची आणीबाणी आणि दोन्ही पक्षातील अनेक नेते आणि हजारो कार्यकर्त्यांना दिलेला तुरुंगवास होय १९७७ च्या निवडणुकीत ४९२ ठिकाणी काँग्रेसने आपले उमेदवार उभे केले होते. त्यापैकी १५७ जागा त्यांना मिळाले या उलट भारतीय समाजवादी पार्टी, जनसंघ आणि बंडखोर काँग्रेस यांच्या एकत्रीकरणातून जनता पक्षाचा उदय झाला. या पक्षाने २९५ उमेदवार निवडून आणले आणि देशात पहिले बिगर काँग्रेस सरकार स्थापन केले. १९७७ मध्ये स्थापन झालेले बिगर काँग्रेस सरकार अल्पजीवी ठरले. जनता पक्षात सहभागी झालेल्या विविध राजकीय पक्षांच्या अंतर्गत मतभेदामुळे अल्पावधीतच कोसळले आणि लोकसभा बरखास्त झाली.

त्यानंतर १९८० मध्ये सातव्या लोकसभेचे रणधुमाळी चालू झाली या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने ४९२ उमेदवार उभे केले होते त्यापैकी ३५३ उमेदवार जिंकून आले. या निवडणुकीत इंदिरा गांधींनी राजकीय स्थिरता देण्याचे आश्वासन देत निवडणूक जिंकली. जमीनदार, शेतकरी, कामगार, अल्पसंख्यांक व दलित यांनी वेगवेगळ्या कारणास्तव या पक्षाला मते दिली आणि परत इंदिरा गांधी सरकार केंद्र स्थापन झाले. जून १९८४ मध्ये ऑपरेशन ब्लू स्टारमुळे ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी इंदिरा गांधींची हत्या झाली. त्यानंतर उर्वरित

कालावधीसाठी पंतप्रधान म्हणून राजीव गांधींनी शपथ घेतली. लोकसभेची आठवी सार्वत्रिक निवडणूक १९८४ साली पार पडली ही निवडणूक इंदिरा गांधींच्या हत्तेच्या सहानुभूतीच्या लाटेवर स्वार होती आणि ही सहानुभूतीची लाट राजीव गांधींच्या पथ्यावर पडली या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला ४०४ जागा मिळाल्या. लोकसभेत ४०४ जागा म्हणजे काँग्रेसला अभुतपूर्व बहुमत मिळाले होते. यावेळी राजीव गांधींच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले. नंतर १९८९ च्या महिन्यात नव्या लोकसभेसाठी निवडणुका झाल्या या निवडणुकीत विकास, जमातवाद, दारिद्र्य व बेकारी इत्यादी विषय विविध पक्षांच्या अजेंड्यावर होते. काँग्रेस पक्षाने या निवडणुकीत ५२५ जागेसाठी लढवली होती. त्यावेळी काँग्रेस पक्षाला १९७ जागा मिळाल्या आणि सर्वात मोठा पक्ष म्हणून सरकार स्थापनेचा दावा केला पण राजीव गांधींचे निकट वरती श्री विश्वनाथ प्रताप सिंग यांनी पक्षाचा राजीनामा दिला. त्यामुळे या पक्षाला सरकार स्थापन करता आले नाही. बोफोर्स प्रकरणामुळे राजीव गांधी आणि काँग्रेस पक्षाने आपली विश्वासाहर्ता गमावली होती. देशाची दहावी लोकसभा निवडणूक १९९१ साली जाहीर झाली.

दहावी लोकसभा निवडणूक होती कारण नववी लोकसभा आपला कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच बरखास्त करण्यात आली होती. या निवडणूक प्रचाराच्या दरम्यान १९९१ मध्ये राजीव गांधी यांचा आत्मघाती स्फोटाच्या माध्यमातून हत्या केली. राजीव गांधींच्या हत्यानंतर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पी. व्ही. नरसिंह यांच्याकडे काँग्रेस पक्षाची जबाबदारी आली त्यांच्या नेतृत्वाखाली या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला २३२ जागा मिळाल्या आणि काँग्रेस पक्षाचे पी. व्ही. नरसिंह यांनी पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. गांधी घराण्याचे सदस्य नसलेले पी. व्ही. नरसिंह हे दुसरे पंतप्रधान मंत्री होते. अकरावी लोकसभा निवडणूक १९९६ मध्ये पार पडली पंतप्रधान नरसिंहराव यांनी राबवलेल्या वेगवेगळ्या योजना, आर्थिक उदारीकरणाचा पुरस्कार यामुळे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला यश संपादन करता येईल असे वाटले होते पण याचवेळी प्रादेशिक पक्षांचा उदय आणि विविध घटक राज्यात त्यांचा प्रभाव वाढताना दिसत होता. त्याचा परिणाम या पक्षा वर दिसून आला या निवडणुकीत १३२ जागा राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला मिळाल्या. मंडल आयोग, राम मंदीर आंदोलन, प्रादेशिक पक्षाचे महत्त्व आणि भारतीय जनता पक्षाचा वाढता प्रभाव व आघाडीचे सरकार लोकसभा निवडणुकीचे निवडणुकीचे वैशिष्ट्य होते. भारतीय जनता पक्ष आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष या पक्षांच्या निवडणूक पूर्व आघाडी स्थापन झाली आणि निवडणुका लढवल्या या निवडणुकीत काँग्रेसला शंभर जागा मिळाल्या आणि काँग्रेस नेतृत्वाखालच्या आघाडीला १६६ जागा मिळाला. त्यामुळे काँग्रेस आघाडीला सरकार स्थापन करण्यास अपयश आले. १९९६ च्या ११ व्या लोकसभेत काँग्रेस पक्षाला १४० जागा मिळाल्या.

१९९८ च्या १२ व्या लोकसभेतही काँग्रेसची स्थिती फारशी सुधारली नाही. काँग्रेस पक्षाला १३९ जागा मिळाल्या. काँग्रेस पक्षाने विरोधी पक्षाची भूमिका बजाविली. दरम्यान भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्षपद सीताराम केसरींकडून सोनिया गांधींकडे आले, शरद पवार काँग्रेसचे विरोधी पक्ष नेते झाले. २६ एप्रिल, १९९९ रोजी १२ वी लोकसभा बरखास्त झाली. दरम्यान सोनिया गांधी आणि शरद पवार यांच्यातील शीतयुद्धाचा स्फोट होऊन सोनिया गांधींनी पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. काँग्रेस कार्यकारिणीने शरद पवार, तारिक अन्वर आणि पी. ए. संगमा यांना भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षातून काढून टाकले. सोनिया गांधी या विदेशी व्यक्ती असल्यामुळे त्यांची पतप्रधानपदासाठी निवड होता कामा नये हा मुद्दा पुढे करून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची

स्थापना केली. डिसेंबर, १९९८ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षातून श्रीमती ममता बॅनर्जी यांना काढून टाकले. प्रामाणिक, स्पष्टवक्तेपणा आणि स्वच्छ राजकीय जीवन असणाऱ्या ममता बॅनर्जी यांनी कोलकता येथे मेळावा घेऊन तृणमूल काँग्रेस (Grass Root Congress) पक्षाची स्थापना केली. १९९९ साली १३ व्या लोकसभेत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला ११२ जागा मिळाल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ८ जागा व तृणमूल काँग्रेस पक्षाला ८ जागा मिळाल्या. २००४ साली १४ व्या लोकसभेत भारतीय काँग्रेस पक्षाला १४५ जागा मिळाल्या. मित्रपक्षांच्या सहकार्याने संयुक्त पुरोगामी आघाडी निर्माण करून पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष सत्तारूढ झाला. २००९ लोकसभा निवडणुकीत या पक्षाला २०६ जागा मिळाल्या आणि पक्षाने संयुक्त पुरोगामी आघाडी मार्फत सरकार स्थापन केले. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे नेतृत्व राहुल गांधी यांनी केले होते. यावेळी पक्षाला ४४ जागा मिळाल्या. २०१९ च्या निवडणुकीत ४४ जागा मिळाल्या ४४ सच जागा मिळाल्या.

त्यानंतर मात्र राहुल गांधी यांनी भाजप सरकार विरुद्ध संपूर्ण रान उठवले. यांनी संपूर्ण देशभर भारत जोडो काढली. त्यानंतर भारत न्याय यात्रा काढली. ६५ दिवसांच्या या यात्रेत राहुल गांधी ६२०० किलोमीटर एवढं अंतर पार केले. ही यात्रा १४ राज्यांतील ८५ जिल्ह्यांतून गेली. यावेळी राहुल गांधी मणिपूर, मेघालय, नागालँड, आसाम, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, ओडिशा, छत्तीसगड, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्राचा दौरा केला आणि इंडिया या नावाची भाजपा विरोधी पक्षांची आघाडी तयार करून २०२४ ची लोकसभा निवडणुक लढवली. यावेळी काँग्रेस पक्षाला १०० जागा मिळवून प्रभावीपणे विरोधी पक्षाची भूमिका बजावत आहे. सध्या श्री मल्लिकार्जुन खर्गे हे पक्षाचे अध्यक्ष आहेत व राहुल गांधी हे लोकसभेतील विरोधी पक्षनेता आहेत .

**ब) भारतीय जनता पक्ष :**

भारतीय जनता पक्ष हा भारतीय राजकारणातील एक महत्त्वाचा राजकीय पक्ष आहे. जो भारताला जागतिक स्तरावर एक मजबूत, समृद्ध आणि शक्तिशाली राष्ट्र म्हणून स्थापित करण्याचा संकल्प करतो. देशाच्या जास्तीत जास्त राज्यात जनाधार लाभलेला काँग्रेस नंतरचा पक्ष आहे. इ. स. १९५१ मध्ये स्थापन झालेल्या भारतीय जनसंघाचा नवा अवतार म्हणजे भारतीय जनता पक्ष होय. भाजपची मुळे भारतीय जनसंघामध्ये आहेत, ज्याची स्थापना १९५१ मध्ये श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी हिंदुत्ववादी गट राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (RSS) ची राजकीय शाखा म्हणून केली होती. यानंतर १९६७ मध्ये बीजेएसने उत्तर भारतातील हिंदी भाषिक प्रदेशांमध्ये लक्षणीय स्थान मिळवले. १९७७ ला म्हणजे दहा वर्षांनंतर अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनसंघाने व काँग्रेस विरोधी पक्षांनी एकत्र येऊन जनता पक्ष स्थापन केला. सरकारची सूत्रे हाती घेतली. गटबाजी आणि अंतर्गत वादांमुळे त्रस्त, होऊन जुलै १९७९ मध्ये सरकार कोसळले. जनता युतीमधील असंतुष्टांनी विभाजन केल्यानंतर, १९८० मध्ये भाजपची औपचारिक स्थापना झाली, ज्यांचे नेते निवडून आलेल्या बीजेएस अधिकाऱ्यांना आरएसएसमध्ये सहभागी होण्यापासून प्रतिबंधित केले. बीजेएसने नंतर वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी आणि मुरली मनोहर जोशी यांच्या नेतृत्वाखाली भाजप म्हणून स्वतःची स्थापना केली.

भारताला एक सक्षम राष्ट्र बनवण्याच्या उद्देशाने, ६ एप्रिल १९८० रोजी नवी दिल्लीतील कोटला मैदानावर

झालेल्या कामगार अधिवेशनात भारतीय जनता पक्षाची (भाजप) स्थापना करण्यात आली, ज्याचे पहिले अध्यक्ष म्हणून श्री अटलबिहारी वाजपेयी यांची निवड झाली. भाजपने आपल्या स्थापनेबरोबरच आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि सार्वजनिक हिताच्या मुद्द्यांवर आवाज उठवून भारतीय लोकशाहीत आपला मजबूत सहभाग नोंदवला आणि भारतीय राजकारणाला नवे आयाम दिले. भारतीय जनता पक्षाने भारतीय राजकारणाला द्विध्रुवीय बनवून युतीच्या युगात अग्रगण्य भूमिका बजावली आहे, जी काँग्रेसचे वर्चस्व असलेली एक-पक्षीय लोकशाही प्रणाली म्हणून ओळखली जाते. देशात विकासावर आधारित राजकारणाचा पायाही भाजपने विविध राज्यात सत्तेवर आल्यानंतर आणि संपूर्ण देशात भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएच्या राजवटीत घातला. आज तीन दशकांनंतर देशातील जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एकाच पक्षाला पूर्ण बहुमत दिले असून केंद्रात भाजपच्या नेतृत्वाखालील NDA सरकार बहुमताने अस्तित्वात आहे.

**भारतीय जनता पक्षाची विचारप्रणाली :**

पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेले 'अखंड-मानव तत्त्वज्ञान' भाजपने आपले वैचारिक तत्त्वज्ञान म्हणून स्वीकारले आहे. याशिवाय अंत्योदय, सुशासन, सांस्कृतिक राष्ट्रवाद, विकास आणि सुरक्षा यावरही पक्षाचा विशेष भर आहे. पक्षाने मपंचनिष्ठाम नावाच्या पाच मुख्य तत्त्वांवर आपली निष्ठाही व्यक्त केली आहे. ही पाच तत्त्वे (पाच निष्ठा) म्हणजे - राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय अखंडता, लोकशाही, सकारात्मक धर्मनिरपेक्षता (सर्व धर्मांची समानता), गांधीवादी समाजवाद (सामाजिक-आर्थिक समस्यांकडे गांधीवादी दृष्टिकोनातून शोषणमुक्त सुसंवादी समाजाची स्थापना) आणि मूल्य-आधारित राजकारण होय. भारतीय राज्यघटनेत निहित मूल्ये आणि तत्त्वे यांच्यासाठी भाजप प्रामाणिकपणे काम करते आणि लोकशाही व्यवस्थेवर आधारित राज्याला आपला आधार मानते. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक न्याय, समान संधी आणि धार्मिक श्रद्धा आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य सर्व नागरिकांना जात, पंथ किंवा लिंग याची पर्वा न करता, लोकशाही राज्याची स्थापना करणे हे पक्षाचे उद्दिष्ट आहे. भारतीय जनता पक्ष सशक्त, सामर्थ्यवान, समृद्ध, सक्षम आणि स्वावलंबी भारत निर्माण करण्यासाठी सतत सक्रिय आहे. पक्षाची दृष्टी आधुनिक दृष्टीकोन असलेल्या पुरोगामी आणि प्रबुद्ध समाजाचे प्रतिनिधित्व करणारी आणि प्राचीन भारतीय सभ्यता आणि संस्कृती आणि तिची मूल्ये यांच्यापासून प्रेरणा घेऊन एक महान 'जागतिक शक्ती' आणि 'विश्वगुरू' म्हणून जगाच्या पटलावर प्रकट होणारा पक्ष आहे. यासोबतच जागतिक शांतता आणि न्याय्य आंतरराष्ट्रीय व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी जगातील राष्ट्रांवर प्रभाव टाकण्याची क्षमता असावी असे मानणारा भाजपा आहे.

**संघटनात्मक बांधणी :**

**राष्ट्रीय अध्यक्ष :** भाजपची संघटना काटेकोरपणे श्रेणीबद्ध आहे, अध्यक्ष हा पक्षाचा सर्वोच्च अधिकार आहे. पक्षाच्या घटनेनुसार, राष्ट्रीय परिषद आणि राज्य परिषदांचा समावेश असलेल्या निवडणूक महाविद्यालयाद्वारे अध्यक्षाची निवड केली जाते. २०१२ पर्यंत, भाजपच्या घटनेने अनिवार्य केले की कोणताही पात्र सदस्य तीन वर्षांच्या कालावधीसाठी राष्ट्रीय किंवा राज्य अध्यक्ष होऊ शकतो. नंतर यामध्ये जास्तीत जास्त सलग दोन टर्ममध्ये सुधारणा करण्यात आली.

**राष्ट्रीय कार्यकारिणी :** भारतीय जनता पक्षाची राष्ट्रीय कार्यकारिणी ही भारतीय जनता पक्षाची अध्यक्षीय

आणि मुख्य कार्यकारी संस्था आहे. जी पक्षाची सर्वांगीण धोरणात्मक दिशा आणि धोरण ठरवते. हे भाजप अध्यक्षांनी नियुक्त केलेल्या सदस्यांचे बनलेले आहे आणि त्यात १२० सदस्य असू शकतात. अध्यक्षांच्या खाली भारतीय जनता पक्षाची राष्ट्रीय कार्यकारिणी असते, ज्यामध्ये पक्षाच्या अध्यक्षांनी नियुक्त केलेल्या देशभरातील अनेक वरिष्ठ नेत्यांचा समावेश असतो. ही पक्षाची उच्च निर्णय घेणारी संस्था आहे. यात पक्षाचे अनेक पदाधिकारी असतात, ज्यामध्ये सात उपाध्यक्ष, पाच सरचिटणीस, एक सरचिटणीस (संघटना), एक कोषाध्यक्ष आणि अध्यक्षांसोबत थेट काम करणाऱ्या सात सचिवांचा समावेश असतो. राष्ट्रीय कार्यकारिणीला पक्षाच्या घटनेतील कलम आणि नियमांचा अर्थ लावण्याचा अधिकार आहे. कार्यकारिणी पक्षाच्या घटनेत सुधारणा, फेरबदल करू शकते जी पुढील पूर्ण अधिवेशन किंवा राष्ट्रीय परिषदेच्या विशेष सत्राद्वारे सुधारण्याच्या अधीन आहे. राष्ट्रीय कार्यकारिणी अध्यक्ष आणि राष्ट्रीय परिषदेच्या अंतर्गत निवडणुकांवर देखरेख ठेवते आणि पक्षाच्या त्रैवार्षिक निवडणुका आयोजित करण्यासाठी रिटर्निंग ऑफिसरची नियुक्ती करते.राज्य स्तरावर राज्य अध्यक्षाच्या नेतृत्वाखाली राज्य कार्यकारी समिती असलेली एक समान रचना अस्तित्वात आहे.

**संसदीय मंडळ :** संसदीय मंडळ ही भाजपची प्रशासकीय संस्था आहे जी राष्ट्रीय कार्यकारिणीच्या वतीने दैनंदिन निर्णय घेते. राष्ट्रीय कार्यकारिणी पक्षाचे अध्यक्ष आणि इतर दहा सदस्य असलेले संसदीय मंडळ स्थापन करते. संसदीय मंडळ पक्षाच्या संसदीय आणि विधिमंडळ गटांच्या क्रियाकलापांवर देखरेख करते. हे राष्ट्रीय कार्यकारिणी अंतर्गत सर्व संघटनात्मक घटकांचे मार्गदर्शन आणि नियमन करते.

**केंद्रीय निवडणूक समिती** (CEC) **:** केंद्रीय निवडणूक समितीची स्थापना देखील राष्ट्रीय कार्यकारिणीद्वारे केली जाते आणि त्यात संसदीय मंडळाचे ११ सदस्य आणि राष्ट्रीय कार्यकारिणीद्वारे निवडलेले इतर ८ सदस्य असतात. केंद्रीय निवडणूक समितीची भूमिका संपूर्ण भारतातील सर्व विधानसभा आणि संसदीय निवडणुकांसाठी उमेदवार निवडणे आहे.

**राष्ट्रीय परिषद :** राष्ट्रीय परिषद ही पक्षाची सर्वोच्च धोरण ठरवणारी संस्था आहे. पुढील पूर्ण अधिवेशन किंवा विशेष सत्रात राष्ट्रीय कार्यकारिणीद्वारे पक्ष घटनेत कोणतीही सुधारणा, फेरबदल आणि जोडणी दुरुस्त करण्यासाठी देखील ते जबाबदार आहे. राज्य परिषदेसह राष्ट्रीय परिषद दर तीन वर्षांनी अध्यक्षाची निवड करते. राष्ट्रीय परिषदेमध्ये राज्य परिषदांद्वारे निवडलेले सदस्य, संसदीय पक्षाचे १०%, माजी राष्ट्रीय अध्यक्ष, राज्य विधानसभा आणि राज्य विधान परिषदांचे नेते, राष्ट्रीय अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेले सदस्य, राष्ट्रीय कार्यकारिणीचे सर्व सदस्य, मोर्चेआणि सेलचे अध्यक्ष यांचा समावेश होतो.

**जिल्हा समिती :** एक अध्यक्ष, सहा उपाध्यक्ष आणि चार सरचिटणीस आणि सहा सचिवांसह जिल्हा समिती ही भाजपची तळागाळातील महत्त्वाची संघटना आहे. जिल्हा समितीत इतर सदस्यही आहेत.

**मंडळ :** भाजपच्या मंडल समितीमध्ये एक अध्यक्ष असून दोन सरचिटणीस आणि चार सचिव आहेत.

**भारतीय जनता पक्षाची राजकीय वाटचाल :**

श्री अटलबिहारी वाजपेयी यांची भारतीय जनता पक्षाचे पहिले अध्यक्ष म्हणून निवड झाली. स्थापनेपासूनच भाजप राष्ट्रीय राजकारणात सक्रिय झाला. १९८४ च्या ८व्या लोकसभेत भाजपला २ जागा मिळाल्या. बोफोर्स

आणि भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर बिगर काँग्रेस पक्ष पुन्हा एकत्र आले आणि १९८९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपने ८८ जागा जिंकून आपला प्रभाव वाढविला. काँग्रेसला दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. व्ही.पी. सिंह यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या राष्ट्रीय आघाडी सरकारला भाजपने बाह्य समर्थन दिले. दरम्यान, श्री. लालकृष्ण आडवाणी यांच्याकडे भाजपची सूत्रे आल्यावर देशात राम मंदिरासाठी आंदोलन सुरू झाले. तत्कालीन भाजप अध्यक्ष श्री. लालकृष्ण अडवाणी यांनी सोमनाथ ते अयोध्या अशी रथयात्रा काढली होती. राममंदिर आंदोलनाला प्रचंड जनसमर्थन आणि भाजपची वाढती लोकप्रियता या भीतीने अडवाणीजींची रथयात्रा मध्यंतरी थांबवण्यात आली. परिणामी भाजपने राष्ट्रीय आघाडी सरकारचा पाठिंबा काढून घेतला आणि व्ही. पी. सिंग सरकार पडले आणि काँग्रेसच्या पाठिंब्याने चंद्रशेखर देशाचे पुढचे पंतप्रधान झाले. १९९१ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपला जनतेचा पाठिंबा वाढतच गेला. या निवडणुकीत भाजपला १११ जागा मिळाल्या आणि लोकसभेत विरोधी पक्ष नेतेपद मिळाले. दरम्यान, देशात नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे सरकार होते आणि काँग्रेसच्या पाठिंब्याने संयुक्त आघाडीची सरकारे होती.

१९९१ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाची लोकसभेतील सदस्यसंख्या १२० वर पोहोचली. भाजपला जनतेचा पाठिंबा सतत वाढत होता. १९९६ साली १६१ जागा जिंकून श्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली प्रथमच १९९६ मध्ये भाजप सरकारने शपथ घेतली, परंतु पुरेशा पाठिंब्या अभावी हे सरकार केवळ १३ दिवसच चालू शकले. त्यानंतर १९९८ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपने १८२ जागा जिंकल्या आणि अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी स्थापन करून अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने शपथ घेतली. पण लोकसभेतील विश्वासदर्शक ठरावादरम्यान जयललिता यांच्या नेतृत्वाखालील अण्णाद्रमुकने पाठिंबा काढून घेतल्याने, ओरिसाचे तत्कालीन काँग्रेसचे मुख्यमंत्री गिरिधर गोमांग यांनी सदस्यत्व मिळवताना केलेल्या अनैतिक वर्तनामुळे सरकार एका मताने पडले. १९९९ मध्ये भाजपने पुन्हा १८२ जागा जिंकल्या आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीला ३०६ जागा मिळाल्या. पुन्हा एकदा अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार स्थापन झाले.

पुढे २००४ साली १३८, २००९ साली ११६, २०१४ साली २८२ व २०१९ साली ३०३ आसा हा लोकसभेतील सदस्यांच्या संख्येचा क्रम राहिला. २०१४ साली तब्बल ३० वर्षांनी भारतातील जनतेने भाजपाचे पूर्ण बहुमताचे आणि एकाच राजकीय पक्षाचे सरकार निवडून दिले. १० वर्षे पक्षाने विरोधी पक्षात सक्रिय आणि चमकदार भूमिका बजावली. २०१४ मध्ये भाजपला२८२ जागा मिळाल्या, श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, देशात प्रथमच, भाजपने पूर्ण बहुमताने सरकार स्थापन केले, जे आज 'सबका साथ, सबका विकास' या घोषणेने गौरवशाली भारताची पुनर्बांधणी करत आहे. २०१९ च्या निवडणुकीत तर या पक्षाला ३०३ जागांवर अभूतपूर्व यश मिळाले आणि दुसऱ्यादा श्री. नरेंद्र दामोदरदास मोदी यांनी भारताचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. मोदीजींच्या नेतृत्वाखाली भाजप सरकारने अल्पावधीतच अभूतपूर्व यश संपादन केले आहे. त्यांनी जगामध्ये भारताची प्रतिष्ठा बहाल केली, लोकांचा राजकारणावरचा विश्वास पुन्हा प्रस्थापित केला. अनेक नाविन्यपूर्ण योजनांच्या माध्यमातून नव्या युगाची सुरुवात केली. अंत्योदय, सुशासन, विकास आणि समृद्धीच्या मार्गावर देश पुढे गेला आहे. आर्थिक आणि सामाजिक सुधारणा सुरक्षित जीवनाचा मार्ग प्रदान करत आहेत.

शेतकऱ्यांसाठी कर्जापासून ते खतांपर्यंतच्या नवीन धोरणांनी जसे की प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, मृदा आरोग्य कार्ड इत्यादींमुळे शेतीच्या झपाट्याने विकासाला जाग आली आहे. हे सुशासनाचे नवे युग आहे. आदर्श ग्राम योजना असो, स्वच्छता अभियान असो किंवा योगाच्या मदतीने भारताला निरोगी बनवण्याची मोहीम असो, या सर्व पावलांनी देशाला एक नवी ऊर्जा दिली आहे. भाजपच्या मोदी सरकारने 'मेक इन इंडिया', 'स्किल इंडिया', अमृत मिशन, दीनदयाल ग्राम ज्योती योजना, डिजिटल इंडिया यांसारख्या योजनांसह भारताचे आधुनिकीकरण आणि सक्षमीकरणाच्या दिशेने जोरदार पावले उचलली आहेत. जन धन योजना, बेटी बचाओ-बेटी पढाओ, सुकन्या समृद्धी योजना यासारख्या अनेक योजना देशात नवीन क्रांती घडवत आहेत. भाजप सरकारने देशवासियांना जगातील सर्वात मोठी सामाजिक सुरक्षा योजना भेट दिली आहे. २०२४ च्या निवडणुकीत मात्र नरेद्र मोदींचा करिश्मा कमी झाल्याचे निकाल लागले. या निवडणुकीत भाजपला २०२ जागा मिळाल्या. त्यामुळे भाजपला परत एनडीए सरकार स्थापन करण्याची वेळ आली. भाजपने आपल्या कार्यकाळात भारत-पाकिस्तान संबंध सुधारण्यासाठी आणि नक्षलवाद, दहशतवाद, जम्मू-काश्मीर आणि ईशान्येकडील राज्यांमधील फुटीरतावाद यासारख्या देशाच्या अंतर्गत समस्या सोडवण्यासाठी अनेक प्रभावी पावले उचलण्यात आली. राष्ट्रीय एकता आणि अखंडता मजबूत करून आणि सुशासन आणि सुरक्षा केंद्रस्थानी ठेवून देशाला समृद्ध आणि मजबूत बनविण्याच्या दिशेने अनेक निर्णायक पावले उचलली गेली. तत्कालीन पंतप्रधान श्री. नरेन्द्र मोदी आणि राष्ट्रीय अध्यक्ष श्री. जे. पी. नडा यांच्या नेतृत्वाखाली एनडीएच्या राजवटीने देशात विकासाचे नवे राजकारण सुरू केले.

**क) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष :**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (NCP), भारतातील राष्ट्रीय राजकीय पक्ष आहे. एनसीपीची औपचारिक स्थापना श्री. शरद पवार यांनी १० जून १९९९ मध्ये नवी दिल्ली येथे केली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (काँग्रेस पक्ष) पक्षातून बाहेर पडून शरद पवार, पी. ए. संगमा आणि तारिक अन्वर यांनी केली होती. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या इटालियन वंशाच्या पत्नी सोनिया गांधी काँग्रेस पक्षाच्या नेत्या बनल्यानंतर हा मुद्दा उपस्थित करून केवळ भारतात जन्माला आलेल्या व्यक्तीलाच भारतात राष्ट्रपती, उपराष्ट्रपती किंवा पंतप्रधान बनण्याची परवानगी दिली पाहिजे या आधारावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (NCP), ची स्थापना झाली आणि श्री. शरद पवार यांची राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदी निवड झाली. पी. ए. संगमा आणि तारीक अन्वर सरचिटणीस बनले. पक्षाचे चिन्ह हातातील घड्याळ आहे. एन. सी. पी. ने स्वतःचे वर्णन आधुनिक आणि पुरोगामी अभिमुखता असलेला राष्ट्रवादी पक्ष असे केले आहे. ज्याची विचारसरणी संपूर्ण लोकशाही, गांधीवादी धर्मनिरपेक्षता आणि संघराज्य वादावर आधारित राष्ट्रीय एकात्मता आहे. त्यात समानता आणि सामाजिक न्यायाशी जोडलेला लोकशाही धर्मनिरपेक्ष समाज आपेक्षित आहे.

**राजकीय वाटचाल :**

राष्ट्रवादी काँग्रेसला महाराष्ट्रात सर्वात मोठे स्थान आहे. १९९९ च्या महाराष्ट्रातील पक्षाच्या पहिल्या राज्य विधानसभेसाठीच्या निवडणुकीत मध्ये २२३ जागांपैकी ५८ जागा जिंकल्या. त्यानंतर राज्यात आघाडी सरकार स्थापन करण्यासाठी काँग्रेस पक्षाशी आघाडी केली. त्यानंतरच्या राज्य आणि राष्ट्रीय निवडणुकांमध्ये दोन्ही

पक्षांमधील आघाडी  कायम राहिली आणि एनसीपी २००४ मध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) आघाडी सरकारचा भाग बनला. राष्ट्रीय स्तरावर, पक्षाने १९९९ मध्ये लोकसभा ८ जागा आणि २००४ आणि २००९ या दोन्ही निवडणुकांमध्ये ९ जागा जिंकल्या. २०१० आणि २०१२ च्या राज्यसभेच्या निवडणुकीत पक्षाच्या जागांची संख्या  वाढली. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांना धक्का बसून  प्रतिनिधित्व कमी होऊन  सहा जागांवर आले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत या पक्षाला फक्त ५ जागा मिळाली. ऑक्टोबर २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकी दरम्यान, जागा वाटपासाठी भाजप-शिवसेना आणि राष्ट्रवादी-काँग्रेस आघाडी अबाधित राहिली. या निवडणुकीत  भाजप आणि शिवसेनेने मिळून विधानसभेत बहुमत मिळवले, परंतु दोन्ही पक्षांमधील मतभेदांमुळे त्यांना सरकार स्थापन करता आले नाही. १०५ जागांसह भाजपला बहुमत स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या १४५ जागांपैकी फारच कमी होती आणि त्यांनी अल्पमतात सरकार स्थापन करण्यास नकार दिला. त्यामुळे शिवसेनेने राष्ट्रवादी आणि काँग्रेससोबत सरकार स्थापनेसाठी बोलणी सुरू केली. तथापि, एका वादग्रस्त हालचालीत, २३ नोव्हेंबर २०१९ रोजी, सकाळी पहाटे भाजपने राष्ट्रवादीच्या पाठिंब्याने सरकार स्थापन केले. अजित पवार उपमुख्यमंत्री झाले. तीन दिवसांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पवार यांनी आपापल्या पदांचा राजीनामा दिल्याने हे सरकार कोसळले. अखेर, शिवसेना काँग्रेससोबत स्थापन झालेल्या महाविकास आघाडीचा भाग म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा राज्य पातळीवर सत्तेत आली. २८ नोव्हेंबर २०१९ रोजी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री तर उपमुख्यमंत्री म्हणून अजित पवार यांना  शपथ दिली. ठाकरे यांच्या मंत्रिमंडळात राष्ट्रवादीच्या मंत्र्यांचा महत्त्वाच्या खात्यांमध्ये समावेश होता. त्याच काळात  शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बंडखोर गटाने बहुसंख्य सेना आमदारांचा पाठिंबा मिळवून शिवसेना सोडली. उद्धव ठाकरे आघाडीची  जून २०२२ मध्ये सत्ता गेली. सत्ता  गेल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नेतृत्व पदावरून नाराजी नाट्य सुरु झाले. त्याचा परिणाम २०२३ मध्ये अजित पवारांच्या नेतृत्वाखाली  पक्षात फुट पडली. अजित पवार सोबत जवळजवळ ३५ आमदार बाहेर पडले आणि त्यांनी शिंदे -भाजपा युतीमध्ये सहभागी झाले. विधिमंडळ  गटाचा संदर्भ देत भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला (अजित पवार गट) मूळ पक्षाचे नाव आणि चिन्ह मंजूर केले व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद  पवार गट) यांना तुतारी हे चिन्ह दिले. या पक्षाला २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत १० पैकी ०८ जागा मिळाल्या आहेत. राष्ट्रवादी-काँग्रेस महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्षांपैकी एक होता.

**ड) शिवसेना :**

शिवसेना हा महाराष्ट्रातील एक प्रादेशिक राजकीय पक्ष आहे. १९६० मध्ये, मुंबईस्थित व्यंगचित्रकार बाळ ठाकरे यांनी मार्मिक हे व्यंगचित्र साप्ताहिक प्रकाशित करण्यास सुरुवात केली. या प्रकाशनाच्या माध्यमातून त्यांनी स्थलांतरितविरोधी भावना पसरवण्यास सुरुवात केली. पुढे बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना  केली. शिवसेनेचे पक्ष चिन्ह धनुष्यबाण आहे. मुंबईमध्ये मराठी माणसांवर होणारा अन्याय अत्याचाराच्या विरोधात शिवसेनेची स्थापना झाली. शिवसेनेने १९८९ साली बाळासाहेब ठाकरे, प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली भाजप पक्षा बरोबर युती केली व १९९५ साली महाराष्ट्रात शिवसेना भाजप युतीचे सरकार अस्तित्वात आले व शिवसेनेचे मनोहर जोशी हे राज्याचे मुख्यमंत्री झाले. तसेच केंद्रात

१९९९ साली अस्तित्वात आलेल्या अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये सेनेचे मनोहर जोशी हे लोकसभा अध्यक्ष होते. २०१४ साली शिवसेना व भाजप यांची युती तुटली दोन्ही पक्ष वेगळे लढले व पुन्हा एकदा एकत्र येत सरकार स्थापन केले. २०१९ साली शिवसेनेचे १८ खासदार निवडून आले, विधानसभा निवडणूक दोन्ही पक्षांनी एकत्र लढवली पण मुख्यमंत्री पदावरून दोघांमध्ये वाद झाला व शिवसेनेने युती तोडली. शिवसेनेने राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस यांच्या बरोबर महाविकास आघाडी स्थापन केली व उद्धव ठाकरे महाराष्ट्राचे १९ वे मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्र सरकारमध्ये काँग्रेसकडे विधानसभा अध्यक्ष पद, तर राष्ट्रवादी काँग्रेसकडे उपमुख्यमंत्री पद होतं. मात्र २१ जून २०२२ रोजी शिवसेनेचे नेते 'एकनाथ शिंदे' यांनी पक्षातील ४० व अपक्ष आमदारांसोबत बंड केले व २९ जून रोजी महाविकास आघाडी सरकार पडले. सध्या राज्यात शिंदे गट व भाजप असे युतीचे सरकार आहे. मुख्यमंत्रीपद शिंदे गटाकडे व उपमुख्यमंत्री आणि विधानसभा अध्यक्ष ही दोन्ही पदे भाजपकडे आहे.

**पक्ष रचना :**

शिवसेना पक्षाचे नेतृत्व एका अध्यक्षाकडे आहे , त्यांना शिवसेना प्रमुख असे संबोधले जाते.बाळसाहेब ठाकरे यांनी पहिले शिवसेना प्रमुख म्हणून काम केले आणि सर्व प्रमुख निर्णय घेतले तर शिवसेनेचे कार्यकर्तेआणि सदस्य, ज्यांना शिवसैनिक म्हणून ओळखले जाते. शिवसेना पक्षाचे बहुतेक सदस्य तळागाळातील काम करत होते. २०१२ मध्ये बाळासाहेब ठाकरे यांच्या  निधनानंतर उद्धव ठाकरे पक्षाचे नेते बनले. शिवसेनेने तळागाळातील संघटनांचे जाळे तयार केलेआहे, ज्याला शिवसेना शाखा म्हणून ओळखले जाते. शाखा पक्षाचे प्राथमिक एकक म्हणून काम करतात, प्रत्येक शाखेत २५-५० सदस्य असतात. तळागाळातील पक्षाचे उपक्रम राबविण्यासाठी शाखा जबाबदार होत्या, जसे की निवडणुकीदरम्यान मतदारांना एकत्रित करणे, निदर्शने आणि रॅली आयोजित करणे आणि सामुदायिक सेवा उपक्रमांमध्ये सहभागी होणे.

**राजकीय वाटचाल :**

१९६७ साली शिवसेनेने ठाणे महानगरपालिका निवडणुकीच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश केला. तसेच लोकसभेच्या निवडणुकीसाठी काँग्रेसचा प्रचारही केला. त्याच्या पुढच्याच वर्षी प्रजा समाजवादी पक्षाबरोबर निवडणूक लढवून मुंबई महानगरपालिकेत प्रवेश केला. त्यानंतर शिवसेनेच्या शाखा सर्वत्र दिसू लागल्या. शिवसेना शाखांकडे आपले प्रश्न सोडवण्याचे एक व्यासपीठ म्हणून लोक पाहू लागले. शिवसेनेने १९६८ मध्ये राजकारणात प्रवेश केला असला तरी शिवसेनेचे पहिले महापौर खुर्चीत बसायला १९७१ साल उजाडले. दादरचे डॉ. हेमचंद्र गुप्ते शिवसेनेचे पहिले महापौर झाले. १९७२ साली प्रमोद नवलकर विधानसभेत गेले, तर त्याच्या पुढच्या वर्षी सतीश प्रधान ठाण्याचे महापौर झाले. शिवसेनेने १९७५ साली आणीबाणीला पाठिंबा जाहीर केला. शिवसेनेच्या गुप्ते यांच्यानंतर अनेक महापौर मुंबईत झाले. काही महापौरांना काँग्रेसचा तर काही महापौरांना भाजपाचा पाठिंबा मिळाला. सध्या १९९५ पासून शिवसेनेचे महापौर मुंबईत आहेत. कम्युनिस्ट नेते कृष्णा देसाई यांची ५ जून १९७० मध्ये हत्या झाली. त्यांच्या हत्येमुळे संपूर्ण महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघाले. त्यानंतर झालेल्या पोटनिवडणुकीमध्ये शिवसेनेचे वामनराव महाडिक विजयी झाले. महाडीक हे शिवसेनेचे पहिले आमदार होते.

स्थापनेपासूनच शिवसेना आक्रमक संघटना राहिली आहे. परंतु, सुरुवातीच्या काळात काँग्रेसशी अनेक निवडणुकांत मैत्री ठेवली होती. १९८० साली काँग्रेसला मदत केल्याबद्दल शिवसेनेला विधान परिषदेवर दोन जागा देण्यात आल्या. १९८४ साली शिवसेनेने भाजपबरोबर युती केली. परंतु भाजप पुलोदमध्ये सहभागी झाल्यानंतर ही युती तुटली. त्यानंतर पुन्हा १९९८ मध्ये शिवसेना-भाजप युती झाली. बाळासाहेब ठाकरे, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, प्रमोद महाजन आणि गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली ही युती झाली. शिवसेनेने त्यापूर्वीही अनेक पक्षांशी युती केली होती. काँग्रेस, समाजवादी पक्षासह अगदी कट्टर विरोधक असलेल्या दलित पँथरसोबतही शिवसेना युतीत राहिली. त्यानंतर १९८९ साली भाजप आणि शिवसेना यांच्यामध्ये पुन्हा युती झाली. ती २५ वर्षे टिकली. २०१४ मध्ये भाजप आणि शिवसेनेने विधानसभेच्या निवडणुका वेगवेगळ्या लढल्या. त्यानंतर ते पुन्हा एकत्र आले. २०१९ मध्ये शिवसेना आणि भाजप यांची युती निवडणुकीनंतर पुन्हा तुटली. युतीचा फायदा शिवसेना-भाजप अशा दोन्ही पक्षांना झाला. १९९५ मध्ये शिवसेना भाजप युती सरकार महाराष्ट्रात सत्तेत आले. मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले. पुढे हेच मनोहर जोशी १९९९ मध्ये सत्तेत आलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील भाजप प्रणित एनडीए सरकारमध्ये लोकसभा अध्यक्ष होते. महाराष्ट्रात तळागाळात वाढण्यासाठी, हातपाय पसरण्याठी या दोन्ही पक्षांना फायदा झाला. मनोहर जोशी यांच्यानंतर अल्पकाळासाठी नारायण राणे मुख्यमंत्री झाले. तर २०१४ साली भाजपच्या देवेंद्र फडणवीस यांना शिवसेनेने पाठिंबा दिल्यानंतर देवेंद्र फडणवीस या युतीचे तिसरे मुख्यमंत्री झाले. मात्र २०१९ साली शिवसेना आणि भाजपा युती तुटल्यामुळे उद्धव ठाकरे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या मदतीने महाविकास आघाडीचे आणि विशेष म्हणजे ठाकरे घराण्यातील पहिले मुख्यमंत्री झाले. आज ठाकरे घराण्यातील दोन नेते विधिमंडळात आहेत. आदित्य ठाकरे वरळी मतदारसंघातून निवडून आले ते राज्याचे पर्यटनमंत्री होते. मात्र एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षात बंडखोरी करून ४० आमदार सहीत भाजपशी युती करून महायुती सरकार २०२२ मध्ये बनविले. शिवसेनेत मोठी बंडखोरी करून शिवसेना पक्ष व धनुष्यबाण चिन्ह शिंदे गटाकडे गेले आणि शिवसेनेत मोठी फूट पडली. आता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि शिवसेना (बाळासाहेब ठाकरे म्हणजे एकनाथ शिंदे गट) अशा प्रकारे दोन गट पडले आहेत. सध्या सर्वोच्च न्यायालयात हा वाद चालू आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्द :

**१. आघाडी :** अनेकपक्ष एकत्र येऊन निर्माण केलेले सरकार

**२. युती :** समविचार पक्षाची आघाडी

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्न :

**स्वयं अध्ययन प्रश्न - १ :**

**अ) गाळलेल्या जागा भरा.**

१. राजकीय पक्षाचे ............ प्रकार आसतात.

२. राजकीय पक्षांना ................... मान्यता देते.

३. राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची स्थापना ............... साली झाली.

४. भारतीय जनता पक्षाचे पक्षचिन्ह ............... आहे.

५. बहुजन समाजवादी पक्षाची स्थापना .......... यांनी केली.

**स्वयं अध्ययन प्रश्न – २ :**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा .**

१. राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे पक्ष चिन्ह काय आहे?

२. बहुजन समाजवादी पक्षाचे चिन्ह काय आहे?

३. महाराष्ट नवनिर्माण सेनेची स्थापना कोणी केली?

४. भारतात पहिले बिगर काँग्रेस सरकार कधी स्थापन झाले?

५. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे नेतृत्व कोण करत आहे?

## १.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न – १ :**

१. दोन (राष्ट्रीय, प्रादेशिक)

२. निवडणूक आयोग

३. १८८५

४. कमळ

५. कांशीराम

**स्वयं अध्ययन प्रश्न – २ :**

१. पंजा

२. हत्ती

३. राज ठाकरे

४. १९७७

५. नरेंद्र मोदी

## १.७ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) दिर्घोतरी प्रश्न :**

१. राजकीय पक्षाची म्हणजे काय सांगून राजकीय पक्षाची वैशिष्टे लिहा.

२. राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची भारतीय राजकारणातील वाटचाल लिहा.

३. भारतीय जनता पक्षाची भारतीय राजकारणातील वाटचाल लिहा.

४. भारतातील आघाडी सरकारचे राजकारण स्पष्ट करा.

५. भारतातील आघाडी सरकारचे परिणाम स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा :**

१. महाराष्ट्र नवनिर्माण सेना

२. शिवसेना

३. युती सरकार

४. राष्ट्रवादी काँग्रेसपक्ष

## १.८ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१. डॉ. भा. ल. भोळे : भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण

२. डॉ. वाय. बी. कुलकर्णी : भारतीय संविधान शासन व राजकीय प्रक्रिया

३. प्रा. शु. दि. राठी : राज्यशात्रातील मुलभूत संकलना

४. प्रा. शांताराम भोगले : आधुनिक राज्यशास्त्र

५. संपादक : डॉ. प्रकाश पवार : राजकीय अर्थकारण

५. संपादक : डॉ. प्रकाश पवार : समकालीन राज्यशास्त्र

६. प्रा. बी. बी. पाटील : भारतीय शासन आणि राजकारण


❍❍❍

घटक २

# दबाव गट

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

  २.२.१ दबाव गटाचा अर्थ आणि व्याख्या

  २.२.२ दबाव गटाचे प्रकार

  २.२.३ दबाव गटाची तंत्रे

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.५ स्वयं अध्ययन प्रश्न

२.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला,

१. दबावगटाचा अर्थ समजून घेता येईल.

२. आपल्याला दबावगट म्हणजे काय? समाजातील विविध दबाव गटाची आवश्यकता का आहे? येईल पाहता येईल.

३. दबावगटाच्या कार्यामुळे सरकार अधिक प्रभावीपणे धोरण बनवू शकते तसेच समाजातील जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी दबावगटाची भूमिका कशी महत्त्वपूर्ण आहे, हे सर्व जाणून घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

अधुनिक राजकीय व्यवस्थेत दबावगटाच्या अभ्यासाला अधिक महत्व प्राप्त झालेले आहे. प्रत्येक राष्ट्रातील राजकीय व्यवस्थेत दबाव गटाचा प्रभाव दिसून येतो.समाजामध्ये असलेले अनेक घटक हे आपल्या हितसंबंधाचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करतात. या विविध घटकातील समान हेतू, उद्धीष्ट्ये असणारे लोक एकत्र येवून आपला गट स्थापन करतात. या गटाच्या माध्यमातून आपले प्रश्न, समस्या व्यवस्थेपुढे मांडतात. ते सोडविण्यासाठी सरकार/शासनावर दबाव आणतात व आपले प्रश्न सोडविण्यास भाग पाडतात. हे गट आपले हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे ते हितसंबंधी गट म्हणून ओळखले जातात.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ दबाव गटाचा अर्थ आणि व्याख्या :

आधुनिक काळात राजकीय पक्षांबरोबरच दबाव गटाचे महत्त्व ही तितकेच वाढलेले दिसून येते. जगातील कोणत्याही राष्ट्राच्या शासनावरती दबाव गटाचा प्रभाव दिसून येतो. गट म्हणजे फक्त एकत्रित आलेल्या लोकांचा समूह असे म्हणता येणार नाही. जेव्हा सारखेच हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी लोक गटाने किंवा समूहाने एकत्रित येतात तेव्हा हितसंबंधी गट किंवा दबाव गट निर्माण होतो. लोकांच्या गरजेतून असे गट निर्माण होत असतात. दबाव गटाशी किंवा हितसंबंधी गटाची निर्मिती सामाजिक संबंध किंवा समाजातील गरजेतून निर्माण होतात. धर्म, भाषा, व्यापार, व्यवसाय व जातीव्यवस्था या घटकांच्या आधारे समाजात विविध हितसंबंधी गट निर्माण होतात. जसे की समाजात गरजेनुसार गट निर्माण होतात. उदा. विद्यार्थ्यांच्या प्रश्नासंदर्भात विद्यार्थी संघटना, व्यापाऱ्यांच्या प्रश्न संदर्भात व्यापारी संघटना, वाहतूक प्रश्न संदर्भात वाहतुकांची संघटना, उद्योग व्यवसाय संबंधात व्यावसायिक संघटना, नागरिकांच्या प्रश्न संदर्भात नागरी संघटना, धार्मिक संघटना जातीच्या संघटना असे अनेक हितसंबंधी गट आढळून येतात. हितसंबंधी गटाकडून आपले हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न केला जातो. हे हितसंबंधी गट आपले प्रश्न, मागण्या किंवा समस्या शासनाकडे मांडतात. आपल्या मागण्यांसाठी शासनावर प्रभाव पाडण्याचा किंवा दबाव टाकण्याचा प्रयत्न करतात तेव्हा हितसंबंधी गटाचे रूपांतर दबाव गटात होते. हे गट शासनावरती प्रभाव टाकत असल्याने दबाव गटाला प्रभाव गट असेही म्हटले जाते.

**दबाव गटाची व्याख्या :**

दबाव गटाची विविध विचारवंतांनी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे –

**१. झिगलर :** जे हितसंबंधी गट आपल्या सदस्यांना औपचारिक स्वरूपाची शासकीय पदे मिळवून न देता शासनावर प्रभाव पाडण्याचा सतत प्रयत्न करतात त्यास दबाव गट असे म्हणतात.

**२. के :** दबाव गट म्हणजे शासनाचे ध्येयधोरण आणि निर्णयांवरती प्रभाव निर्माण करणारी खाजगी स्वरूपाची संघटना होय.

**३. व्ही. बी. के. :** शासनाच्या धोरणावर प्रभाव टाकण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या खाजगी संघटना म्हणजे दबाव गट होय.

**४. लिझरसन :** यांच्या मते दबाव गट म्हणजे समाजातील लोकांच्या पक्षनिर्देश संघटना ज्यामध्ये लोक एकत्र येतात आणि आपल्या अस्तित्व, आदर्श यांचे संरक्षण करण्याचा व आपली उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करतात.

वरील प्रकारे विविध विचारवंतांनी दबाव गटाची व्याख्या केलेल्या आढळतात. आपल्या समान उद्दिष्टांसाठी एकत्रित आलेल्या गटाची अंतर्निरहित शक्ती आणि शासनाच्या ज्या क्रिया प्रक्रिया यावर दबाव टाकत असतात आणि आपले हितसंबंध जोपासतात तेव्हा ते दबाव गट म्हणून कार्य करतात.

**दबाव गटाची वैशिष्ट्ये :**

१. आपल्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठी मर्यादित असणाऱ्या संघटनेकडून राजकीय पक्ष निर्माण करता येत नाही. त्यावेळी ती पोकळी दबाव गटाची निर्मिती करून भरून काढण्याचा प्रयत्न केला जातो.

२. आपल्या हितसंबंधाला प्रोत्साहन देणे किंवा धार्मिक राजकारणात सहभागी होऊ शकत नाहीत अशा वेळेला प्रोत्साहन देते.

३. अधिकांश दबाव गट आर्थिक लाभ किंवा नफा मिळविण्याचे उद्धिष्ट न ठेवणारे असतात.

४. विशिष्ट हित साध्य करण्यासाठी काम करीत राहणे.

५. सामाजिक जीवनात संसाधनांचा तुटवडा जाणवल्यामुळे दबाव गट निर्माण केले जातात. समाजातील विविध घटकांकडून संसाधनांवर नेहमीच दावे-प्रतिदावे, प्रतिक्रिया होत राहतात.

भारतातील दबाव गटांप्रमाणे महाराष्ट्रातील दबाव गट असलेले आढळतात. देशपातळीवर काम करणारे विविध दबाव गट हे स्थानिक पातळीवरील काम करणाऱ्या दबाव गटाच्या शाखांवरती, उपशाखांवरती आपले नियंत्रण ठेवतात. महाराष्ट्रातील दबाव गटही आपल्या मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी शासनावरती प्रभाव पाडतात.महाराष्ट्रातील दबाव गट हे विविध घटकांवरती आधारित म्हणजेच आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी स्वरूपाचे आढळतात.

## २.२.२ दबाव गटाचे प्रकार :

महाराष्ट्रातील दबाव गटांचे स्वरूप विविध घटकांवरती आधारित आढळतात.

**१. विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या संघटना :**

या दबाव गट म्हणून कार्य करीत असतात. महाराष्ट्रात सुमारे चार हजारांपेक्षा अधिक नोंदणीकृत कामगार संघटना असून त्यातील कामगारांच्या संख्या चाळीस लाखांच्या जवळपास आहेत. हे दबाव गट कामगार वर्गांच्या हिताच्या संदर्भातील, त्यांचे वेतन, भत्ते सवलती, सोई इ. बाबत कार्य करतात. वेगवेगळ्या पक्षांच्या कामगार संघटना दिसून येतात.

**२. पारंपारिक सामाजिक संबंधाशी निगडित असणारे दबाव गट :**

हे दबाव गट धार्मिक संघटना, संस्था, जातीय व पंथीय हितसंबंधाचे गट, भाषिक हितसंबंधावर आधारित असलेले गट, प्रादेशिक घटकांवर आधारित असलेल्या संघटना अशा प्रकारच्या पारंपारिक संबंधावर आधारित दिसून येतात.

**३. व्यावसायिक व व्यापारी संघटना :**

व्यापार उद्योग व्यवसायिक भांडवलदार यांनी आपल्या सुरक्षित आणि हितसंबंधांना जोपासण्यासाठी गट निर्माण केलेले आढळतात उदा. महाराष्ट्र मर्चंट्स ऑफ चेंबर, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, महाराष्ट्र बार कौन्सिल, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, व्यापारी, ग्राहक, वकील इंजिनिअर, डॉक्टर, कर्मचारी, शिक्षक इ. संघटना.

**४. शेतकरी संघटना :**

स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांच्या समस्या आणि प्रश्नांना वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. १९८२ ला श्री. शरद जोशी यांनी शेतकरी संघटना स्थापन करून शेतीमालांच्या भाव वाढीसाठी प्रयत्न केले. नंतर हेच नेतृत्व स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या राजू शेट्टी यांनी केले.

**५. महिलांच्या संघटना :**

भारतात महिलांच्या संदर्भात कार्य करणाऱ्या संघटना स्थापन झालेल्या दिसतात. स्त्री दर्जा, स्त्री शिक्षण, राजकीय सामाजिक प्रतिनिधित्व, समान हक्क, वारसा हक्क इत्यादी गोष्टींवरती आधारित असणारे महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटना निर्माण झाल्या. पुण्यात अखिल भारतीय महिला परिषद १९३७ मध्ये स्थापन झाली. मृणाल गोरे यांची श्रमजीवी महिला सभा, तारा रेडी यांची भारतीय महिला फेडरेशन, सुधा कुलकर्णी यांची महिला दक्षता समिती, कुंदा कदम यांची नारी अत्याचार विरोधी मंच, अहिल्याबाई रांगणेकर व प्रज्ञा कुलकर्णी यांची महिला दक्षता समिती, विद्यापीठ महिला संघटना अशा विविध महिला संघटना महाराष्ट्र भर निर्माण झालेल्या व महिलांविषयी कार्य करत असलेल्या आढळतात. स्त्री पुरुष समानता आणि स्त्रीचा दर्जा यासंदर्भात कार्य करून महिलांविषयी प्रश्न सोडविण्यासाठी शासनावर या महिला संघटना दबाव आणतात.

**६. शिक्षक संघटना :**

महाराष्ट्रात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाविद्यालय विद्यापीठ शिक्षकांच्या विविध संघटना निर्माण झालेल्या आढळतात शासनावर दबाव टाकून या संघटना वेळोवेळी आपल्या मागण्या मंजूर करून घेतात.

**७. विद्यार्थी संघटना :**

महाराष्ट्रात विद्यार्थ्यांनी आपले विविध शैक्षणिक प्रश्न सोडविण्यासाठी विद्यार्थी संघटना निर्माण केलेल्या आहेत, तसेच राजकीय पक्षांच्या सुद्धा विद्यार्थी संघटना असलेल्या दिसतात. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया, स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) बहुजन स्टुडंटस फेडरेशन इत्यादी विद्यार्थी संघटना संप, मोर्चे, घेराव अशा वेगवेगळ्या मार्गांनी आपल्या मागण्या किंवा प्रश्न शासनाकडून सोडविण्याचा प्रयत्न करतात.

**८. मानवता जोपासणारी गांधीवादी विचारांचे गट :**

महाराष्ट्रात गांधीजींच्या मानवतावादी, सत्य आणि अहिंसा, सहकार, ग्रामविकास, रामराज्य, ग्रामोद्योग, कुटीर उद्योग यांवरती आधारित विविध संस्था, संघटना स्थापलेल्या आढळतात. खादी मंडळ, ग्रामोद्योग मंडळ, चरखा संघ, सर्वोदय संस्था, आदिवासी कल्याण संस्था, भूदान चळवळ, गोसेवा संघ अशी विविध संस्था, संघटना गांधीजींचे विचार आणि कार्य प्रभावीपणे पुढे नेताना दिसतात. मात्र या संस्था दबाव गट म्हणून फारशा प्रभावी नसलेल्या जाणवतात. अशा स्वरूपाची विविध दबाव गट आहे महाराष्ट्रात कार्यरत असलेली दिसून येतात.

## २.२.२ दबाव गटाचे प्रकार :

दबाव गटांची वर्गवारी ही त्यांच्या उद्दिष्टे आणि रचनेनुसार केली जाते. त्या श्रेणीनुसार दबाव गटाचे प्रकार आपल्याला दिसून येतात. दबाव गटाचे प्रकार पुढील प्रमाणे आहेत.

१. संस्थात्मक गट

२. कारण गट

३. संघटनात्मक गट

४. गैर संघटित गट

**१. संस्थात्मक गट :**

संसदीय शासनप्रणाली असलेल्या राष्ट्रात कार्यकारी विभागावर दबाव राहतो. संस्थात्मक गट हे औपचारिकपणे संघटित असतात. व्यावसायिकपणे नोकरी करणाऱ्यांचा हा गट असतो आणि तो शासकीय यंत्रणेचा भाग असतो. हा गट आपला प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करतो. उदा राजकीय पक्ष, कायदेमंडळ, सैन्य, नोकरशाही इत्यादी संघटना. हे गट निषेधही वैधानिक आणि कायद्याच्या चौकटीत राहून करतात.

**२. कारण गट :**

कारण गट हे समाजातील घटकाचे प्रतिनिधित्व करतात त्यांचा उद्देश हा समाजातील विशिष्ट कारण किंवा मूल्यांच्या अनुषंगाने प्रोत्साहित करणे यावर भर देणे असा असतो. विशिष्ट कारणांना म्हणजे मानवाचे हक्क, भ्रष्टाचार, प्राण्यांचे कल्याण साधणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे, यांसाठी प्रोत्साहन देऊन शासनावर दबाव टाकणारे गट हे कारण गट असतात.

**३. संघटनात्मक गट :**

ठराविक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संघटित होणारे विशेष गट म्हणजे संघटनात्मक गट म्हणता येईल उदा. शिक्षक गट, व्यापारी गट, वाहतूक संघटना इ. या गटांचे स्वरूप सामाजिक व आर्थिक हितसंबंधावर आधारलेले दिसतात.

**४. गैर संघटित गट :**

विशिष्ट मुद्यापुरते कार्य करण्यासाठी तयार झालेला गट म्हणजे गैर संघटित गट होय. वंश, प्रादेशिकता, वर्ग याच्याशी संबंधीत गट. अशा गटात अनौपचारीक संघटनांचा समावेश असतो. उदा. औद्योगिक कारणासाठी भूसंपादन करण्याच्या विरोधात जाणारा गट, जातीय गट, भाषा गट. हे गट पारंपारिक सामाजिक संबंधावर आधारलेले दिसतात. यामध्ये सामुदायिक संघटना यांचा समावेश असतो. जात, वर्ग आणि धार्मिक हितसंबंधाच्या आधारावरती हे गट अस्तित्वात येतात. उदा. मागासवर्गीय जाती महासंघ, उत्तर आणि दक्षिण भारत ख्रिश्चन परिषद, विश्व हिंदू परिषद अनुसूचित जाती महासंघ इ.

**५. ॲनोमिक गट :**

काही गट असंघटित आणि उत्स्फूर्त गट असतात. आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी जे अनेकदा निषेध संप किंवा निदर्शने करत असतात. उदा. विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त निदर्शने किंवा सार्वजनिक स्वरूपाची निदर्शने.

अशा प्रकारचे विविध दबाव गटांचे प्रकार दिसून येतात.

## २.२.३ दबाव गटाची तंत्रे किंवा साधने :

दबाव गट हे आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी परिस्थितीनुसार वेगवेगळ्या कार्यपद्धतीचा वापर करतात. निर्णय प्रक्रिया आणि शासनाची विविध धोरणे यावर दबाव गट हे आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करतात यासाठी विविध मार्गांचा साधनांचा किंवा तंत्रांचा वापर करतात. लॉबिंग, मीडिया, मोहीम, जनसंपर्क, याचिका, मतदान अशा मार्गांचा अवलंब करते.

दबाव गटाची तंत्र किंवा साधने यांची आपण विस्तृतपणे माहिती पाहू.

**१. लॉबिंग :** कायदेमंडळाचे सदस्य, शासकीय उच्च अधिकारी यांच्याशी चर्चा करून आपल्या मागण्या अपेक्षा कशा योग्य आहे हे जाणवून देण्यासाठी व कायद्यावर प्रभाव पाडण्यासाठी धोरणकर्त्यांशी थेट संवाद साधण्याचा प्रयत्न लॉबिंग या दबाव तंत्रात केला जातो.

उदाहरण : व्यवसाय-अनुकूल धोरणांसाठी FICCI लॉबिंग.

**लोकमत :** जे दबाव गट समाजातील नागरिकांना आपल्या मागण्या समस्या समजावून सांगतात व अनुकूल लोकमत तयार करतात. जनतेबरोबर प्रत्यक्ष संवाद साधतात. लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी वृत्तपत्रे, सभा, परिषद, दूरदर्शन इ. प्रचार माध्यमांचा वापर करतात. रॅली आणि जाहिरातीचा वापर केला जातो.

**खटला दाखल करणे :** सरकारी निर्णयांना आव्हान देण्यासाठी किंवा धोरणात्मक बदलांसाठी दबाव आणण्यासाठी शासनावर खटले दाखल करण्याचा मार्ग स्वीकारला जातो.

उदा : पर्यावरण गटांनी दाखल केलेली जनहित याचिका (PIL).

**निदर्शने :** दबाव गट हे आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी मोर्चे निषेध, आंदोलन, संप इत्यादी मार्गांचा अवलंब करतात. दबाव गट काही वेळेस तीव्र मार्गांचा वापर करतात, बहिष्कार टाकणे, काम बंद करणे, घेराव घालणे, संप करणे इ. उदा. शेती विषयक कायद्यांच्या विरोधात शेतकऱ्यांची निदर्शने.

**निवडणूक :** दबाव गट हे आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी लोकांशी संवाद साधून लोकांमध्ये जागरूकता निर्माण करून त्यांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करतात. त्याचबरोबर निवडणुकांमध्ये सक्रिय भाग घेतात.

**संशोधन आणि माहिती :** दबाव गट आपल्या धोरणांना पाठिंबा मिळविण्यासाठी तथ्यपूर्ण माहिती देण्याचा प्रयत्न करतात त्यासाठी संशोधन आणि माहितीचा वापर करतात ते धोरणात्मक माहिती तयार करतात ज्यामुळे शासनाला दबाव गटांच्या धोरणांबद्दल विचार करायला सुलभ होईल.

**सोशल ई मीडियाचा वापर :** दबाव गट जनमानसांवर प्रभाव टाकण्यासाठी वापर मोठ्या प्रमाणात करताना आढळतात. ज्यामध्ये व्हाट्सअप, ट्विटर, फेसबुक, इंस्टाग्राम व्हिडिओ अशा साधनांचा समावेश होतो.

दबाव गट आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी कायदेमंडळातील विविध समित्यांची संपर्क साधतात.

अशाप्रकारे दबाव गट विविध तंत्रांचा किंवा साधनांचा वापर करून आपला प्रभाव निर्माण करतो. आपल्या हितसंबंधांचे या मार्गांचा वापर करून संरक्षण करण्याचा प्रयत्न करतात. आपल्या मागण्या किंवा उद्दिष्टे कशी योग्य आहेत हे जनतेला आणि शासनाला पटवून देण्याचा प्रयत्न करतात.

## २.३ सारांश

दबाव गट हे लोकशाही प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण घटक बनलेला आहे. आजच्या गुंतागुंतीच्या काळात व्यक्तीला आपले हितसंबंध स्वतंत्रपणे साध्य करता येत नाही. व्यक्ती हीत साध्य करायचं असेल तर एकत्रित येऊन पाठिंब्याची गरज निर्माण होते आणि त्यामुळे हितसंबंधावर आधारित दबाव गटांची निर्मिती होते.

दबाव गट हे हितसंबंधाचे स्पष्टीकरण करते. राजकीय सामाजीकरणाचे प्रतिनिधित्व करते. कायदे प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत असतात. निवडणूक काळात जाहीरनाम्यापासून ते कायदे मंडळाकडून कायदे मंजूर होण्यापर्यंत तसेच कायदे निर्मितीपर्यंत नियम बनविण्याच्या प्रक्रियेशी दबाव गटजोडले जातात. दबाव गट हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी न्यायिक व्यवस्थेचा वापर करतात. नवीन प्रश्न, मुद्दे राजकीयअजेंडापर्यंत पोहोचविण्यास सक्षम असतात. सामाजिक एकता आणि राजकीय स्थिरता वाढविण्याचा प्रयत्न दबाव गटांचा

असतो. महत्त्वाचे म्हणजे दबाव गट मतदारांच्या प्रती निर्णय घेणाऱ्यांची जबाबदारी सुधारतात. जनतेमध्ये जागृतीचे काम करतात. सक्रिय रचनात्मक सहभाग, सामान्य हित आणि वैयक्तिक गट हितसंबंधांमध्ये एकसूत्रता आणण्याचा प्रयत्न करतात. काही वेळेला दबाव गट कार्य करताना संकुचित स्वार्थी हितसंबंध पाहतात. परिस्थितीनुसार त्यांच्या निष्ठेत बदल होत असतो. बऱ्याच वेळेला असंवैधानिक मार्गाचा वापर केला जातो. अशा प्रकारचे काही दोषही दबाव गटांमध्ये निदर्शनास येतात.

असे असले तरी आज दबाव गट हे लोकशाही प्रक्रियेतील एक महत्त्वपूर्ण घटक बनले आहे. आधुनिक काळातील गुंतागुंतीच्या व्यवस्थेत व राजकीय व्यवस्थेचे वाढते प्राबल्य यामुळे व्यक्ती आपले हित संबंध साध्य करू शकत नाही. अशावेळी हितसंबंधावर आधारित दबाव गट निर्माण होतात. व्यक्तींना आपले स्वातंत्र्य, अस्तित्व, आपले हित संबंध सुरक्षित राहण्यासाठी पाठिंब्याची गरज असते. आणि म्हणून राजकीय व्यवस्थेतील निर्माण झालेल्या दबाव गटांचे महत्त्व नाकारता येत नाही.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**दबाव :** प्रभाव पाडणे

**अनौपचारिक गट :** स्वेच्छेने किंवा सामुदायिक आवडीतून एकत्र आलेला गट

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्न :

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. दबाव गटाची निर्मिती का होते?

२. दबाव गट म्हणजे काय?

३. धार्मिक संघटना, जातीय, पंथीय गट हे कोणत्या दबाव गटात मोडतात?

४. स्वातंत्र्यपूर्व काळात शेतकऱ्यांच्या प्रश्नांना आणि समस्यांना कोणी वाचा फोडली?

५. तारा रेड्डी यांनी कोणती महिला संघटना उभी केली?

**(ब) टिपा लिहा.**

१. दबाव गटाची वैशिष्ट्ये

२. दबाव गटाचे स्वरूप

३. गैरसंगतीत गट

४. दबाव गटाचे तंत्रे -निवडणूक आणि निदर्शन

५. दबाव गटाचा अर्थ

**(क) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. दबाव गटाची व्याख्या आणि स्वरूप स्पष्ट करा.

२. दबाव गटाचे स्वरूप आणि प्रकार स्पष्ट करा.

३. दबाव गट म्हणजे काय सांगून दबाव गटाची तंत्रे स्पष्ट करा.

## २.६ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१. भोळे भा. ल., 'भारतातील गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

२. पाटील व्ही. बी., 'पंचायत राज व्यवस्था', प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

३. जैन अशोक, 'महाराष्ट्रातील शासन आणि राजकारण', सेठ पब्लिकेशन, मुंबई

४. पाटील बी. बी., 'भारतीय शासन आणि राजकारण', फडके प्रकाशन, कोल्हापूर


❍❍❍

### घटक ३

# राजकारणातील समकालीन प्रश्न

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ जात आणि राजकारण
- ३.२.२ सांप्रदायिक राजकारण
- ३.२.३ प्रादेशिक असमतोलाचे राजकारण
- ३.२.४ आरक्षणाचे राजकारण

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.५ सरावासाठी स्वाध्याय

३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासातून पुढील बाबी समजून येतील.

१) जातीय राजकारणाचे स्वरूप समजेल.

२) सांप्रदायिक राजकारणाचा अर्थ कळून येईल.

३) प्रादेशिक असमतोलाचे राजकारण समजून येईल.

४) आरक्षणाचे राजकारणाचा परिचय होईल.

## ३.१ प्रास्ताविक :

लोकशाही व्यवस्थेमध्ये जातीला महत्त्वाचे स्थान मिळालेले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतामध्ये लोकशाही व्यवस्था स्वीकारली गेली. भारतामध्ये सुद्धा जात हा भारताच्या राजकारणावर प्रभाव पाडणारा एक महत्त्वाचा घटक राहिला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात जातीच्या राजकारणाला फारसा वाव नव्हता. परंतू भारतात जातीव्यवस्था अस्तित्वात होती. त्यामध्ये चातुर्वर्ण व्यवस्था म्हणजेच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशी व्यवस्था होती. अश्पृश्यतेच्या नावाखाली शूद्रांना हिनतेची वागणूक मिळत होती. त्यातून जातिव्यवस्थेविरोधातील लढे उभे राहिले. आधुनिक वासाहतिक काळात शिक्षण, नोकरी आणि प्रशासन या तीन क्षेत्रांमध्ये ब्राम्हणांकडे सत्ता केंद्रित झाली होती. महात्मा फुले यांनी शेठजी-भटजींच्या सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक वर्चस्वाविरुद्ध जो उठाव केला. त्यांच्या विचारात आणि कार्यात शिक्षण आणि नोकरीविषयक संधी मिळण्याचा जो आग्रह अंतर्भूत होता. विसाव्या शतकाच्या आरंभी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रेरणेने महाराष्ट्रात झालेली ब्राह्मणेतर चळवळ आणि दक्षिणेत झालेली ब्राह्मणविरोधी चळवळ या दोन्ही चळवळी म्हणजे उच्च (मुख्यतः ब्राह्मण) जातीच्या विरोधातील संघटित राजकारणाचीच उदाहरणं होती. १९२० नंतरच्या काळात जातीच्या राजकारणाचं हे स्वरूप बदललं. त्याला तीन कारणं आहेत. एक ब्राह्मण विरुद्ध ब्राह्मणेतर, दुसरं वसाहतवादी शासनाच्या विरोधात राष्ट्रवादाच्या आधारे उभा राहिलेला संघर्ष व तिसरं राष्ट्रवादी चळवळीमध्ये बहुजातीय लोकसहभागाचा वाढता प्रभाव होय. या सर्वांचा परिणाम म्हणून जातीच्या आधारे होणारी राजकीय स्पर्धा दुय्यम ठरत गेली. त्याऐवजी मराष्ट्रीय चळवळम हे राजकारणाचं स्वरूप सर्वमान्य बनत गेलं.

## ३.२ विषय विवेचन :

जातीव्यवस्था हे भारतीय समाजव्यवस्थेचे एक वैशिष्ट्य आहे. स्वांतत्र्यप्राप्तीनंतर जातीनिर्मुलनाचा प्रयत्न झाला. पण त्यास फारसे यश आले नाही. जेव्हा जातीच्या आधारावर राजकारण केले जाते व उमेदवार निवडताना जातीचा निकष लावला जातो, राजकारणाच्या सर्व प्रक्रियेत 'जात' हा घटक वापरला जातो, जातीची मते म्हणजे वोटींग बँक मानली जाते, तेव्हा जाती निर्मूलन होण्याऐवजी जातीय संस्था, संघटना, पक्षीय राजकारण यांचे महत्व दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते. प्रामुख्याने, उत्तरप्रदेश, बिहार, महाराष्ट्र या राज्यांत जातीच्या आधारे राजकारण केले जाते. बहुजन समाजाच्या नावाखाली राजकारण केले जाते. महाराष्ट्रात देखील मराठा लॉबी, ब्राह्मणेतर समाज, दलित दलितेतर, मराठा-मराठेतर इत्यादी पद्धतीने राजकारणाचे

डावपेच करताना जातीचा आधार प्रत्येक राजकीय पक्ष घेताना दिसतो. म्हणून जातीच्या आधारावर केल्या जाणाऱ्या राजकारणास जातीचे राजकारण हा शब्दप्रयोग वापरला जातो. भारतीय समाजव्यवस्था ही जगातील इतर समाजव्यवस्थेपेक्षा वेगळी आहे. याचे कारण भारतीय समाजव्यवस्थेची रचना जातीव्यवस्थेनुसार झालेली आहे. 'जात नाही ती जात' गोत्र आचारधर्म असलेल्या व्यक्तींचा समूह म्हणजे जात. रिस्ले हा समाजशास्त्रज्ञ जातीची व्याख्या अशी करतो, ''पुराणकाळातील दैवी अथवा मानवी पूर्वजांचा एक म्हणून सांगणारा, परंपरागत एकच व्यवसाय करणारा, एक विशिष्ट नाव धारण करणारा, अनेक कुट्यांचा एकजिनसी गट म्हणजे जात होय.'' जातीची व्याख्या करणे अवघड आहे, परतु त्याः व्यवस्थेची वैशिष्ट्ये वेगवेगळ्या विचारवंतांनी वेगवेगळ्या पद्धतीत मांडली आहे. जाती व्यवस्थेचा उगम कसा झाला याबाबतही वेगवेगळे मतप्रवाह आहेत. या व्यवस्थेनुसार जात ही जन्मावरून निश्चित होते. ही एक श्रेणीबद्ध समाजव्यवस्था असून एका जातीतून दुसऱ्या जातीत जाता येत नाही. जाती व्यवस्थेच्या श्रेणीनुसार उच्च जातींना जादा सवलती देण्याची तरतूद आहे. या व्यवस्थेनुसार जातीच्या बाहेरच्या व्यक्तीशी रोटी-बेटी व्यवहार वर्ज्य असतात. ही जातीव्यवस्था विषमता व भेदभावावर आधारित असून या व्यवस्थेच्या तळाशी असलेले शूद्र-अतिशूद्र यांना अमानवी वागणूक दिली गेली. समाज सुधारकांनी ही व्यवस्थाः नष्ट व्हावी म्हणून अनेक प्रयत्न केले. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज यांनी या व्यवस्थेवर प्रहार केले. या व्यवस्थेची वैशिष्ट्ये विषद करताना १) प्रत्येक जात हा समजाचा विभक्त गट असतो. २) जाती-जातीत उच्च-नीचता पाळली जाते. ३) रोटी-बेटी व्यवहारावर निर्बंध, ४) व्यवसाय स्वातंत्र्यावर बंदी.भारतात ब्रिटिशांनी आणलेल्या आधुनिकतेचा प्रभाव येथील सामाजिक सुधारणांवर होऊन त्यांनी जातिभेदाविरुद्ध परिणामकारकपणे कार्य केले. भारतीय राज्यघटनेने तर जातिभेद अमान्य करून अस्पृश्यता मानणे हा कायद्याने गुन्हा मानला आहे. तरी देखील राजकारण, अर्थकारण व समाजकारणात जातिचा प्रभाव कमी झालेला दिसत नाही.

### ३.२.१ जात आणि राजकारण :

भारतीय राजकारणात जातीय राजकारणाची समस्या ही एक संशोधनाची मानली जाते. भारतीय राजकारणावर जातीचे पडसाद कमी-अधिक प्रमाणात उमटलेले दिसतात.अगदी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीपासून ते लोकसभेच्या निवडणुकीपर्यंत जातीयतेचा प्रभाव आढळतो. ग्रामपंचायतीचा सरपंच कोणत्या जातीचा आहे? राज्याचा मुख्यमंत्री अमुक जातीचाच हवा! भारताचा राष्ट्रपती व उपराष्ट्रपती हे कोणत्या जातीचे आहेत अशी चर्चा अगदी राजरोसपणे जनमानसात चाललेली असते. निवडणुकीचे तिकीट वाटप करण्यापासून ते निवडणूक जिंकण्यापर्यंत, अगदी मंत्रिपद मिळविण्यापर्यंत जातीचा विचार केला जातो. भारतीय राजकारणाला जातीयतेची कीड लागलेली आहे असे म्हटले तर चूक ठरणार नाही. भारतीय राजकारणात जातीयतेचा प्रभाव किती आहे? त्याचे स्वरूप काय आहे? जातीयतेची समस्या कशी दूर करता येईल? इत्यादीविषयक अभ्यास करणे आवश्यक ठरते.

भारतात हिंदू, जैन, शीख, ख्रिश्चन, मुस्लिम, पारशी अशा विविध धर्मांचे लोक आहेत. या विविध धर्मात जाती, उपजाती, पंथ निर्माण झालेले आहेत. चातुर्वर्ण्यपद्धती आणि श्रमविभागणीपद्धती यावरून हिंदू धर्मात वर्ण, वर्ग व जाती निर्माण झालेले आहेत. हिंदू समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण निर्माण झाले. बौद्धिक कामे करणारा ब्राह्मण वर्ण, संरक्षणाचे कार्य करणारा क्षत्रिय वर्ण, व्यापार करणारा वैश्य वर्ण

आणि श्रमाची (कनिष्ठ) कामे करणारा शूद्र वर्ण असे चार वर्ण व्यवसायांवरून पाडण्यात आले. या चार वर्णात पुढे व्यवसायावरून, वास्तव्यावरून आणि सामाजिक दर्जावरून त्यांच्या जाती, उपजाती निर्माण झाल्या. नंतरच्या काळात व्यक्तीचा जन्म ज्या जातीत झाला तीच त्यांची जात मानण्यात येऊ लागली. सामान्यतः भारतीय समाजात व्यक्तीला प्रथम तिचा धर्म कोणता आणि नंतर तिची जात कोणती असा प्रश्न केला जातो. वर्णव्यवस्थेतील या चार वर्णात तीन हजार जाती व उपजाती निर्माण झाल्या आहेत. उदा. ब्राह्मण वर्गात देशस्थ, कोकणस्थ, कायस्थ, ऋग्वेदी, यजुर्वेदी, कहाडे अशा पोटजाती निर्माण झाल्या. मराठा जातीत शहाण्णव कुळ्या (पोटजाती) आढळतात. याशिवाय कुणबी व इतर जाती आढळतात. शूद्र वर्णातील लोक श्रमाची कनिष्ठप्रतीची कामे करीत असत. त्यांच्या कामावरून, व्यवसायांवरून विविध जाती, पोटजाती पडल्या. जैन धर्म, लिंगायत धर्म, शीख धर्म या धर्माच्या लोकांतही विविध जाती, उपजाती, पंच आढळतात. मुस्लिम समाजात, ख्रिश्चन समाजातही जाती, उपजाती निर्माण झालेल्या दिसतात.

जात घटकाचा विशेष प्रभाव भारतीय राजकारणावर पडलेला दिसतो. भारतात कोणत्याही जातीचा राजकीय पक्ष निर्माण झालेला नाही, परंतु विशिष्ट जातीचे हित साधणारे पक्ष दिसून येतात. काही राजकीय पक्षात विशिष्ट जातीच्या लोकांचा अधिक भरणा असलेला दिसतो. अर्थात, हा नियम सर्वच पक्षांना लागू पडणारा नाही. उदा. काँग्रेस पक्षात विविध धर्मांचे, जातींचे लोक आढळतात. याउलट भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, हिंदूमहासभा, मुस्लिम लीग, रामराज्य परिषद, मराठा महासंघ असे काही राजकीय पक्ष व संघटना विशिष्ट जातिधर्माच्या लोकांचे हित साधताना दिसतात, वास्तविक भारतातील सर्वच राजकीय पक्ष निवडणुकांत अधिक मते मिळविण्यासाठी विशिष्ट जाती-जमातीशी संगनमत करताना दिसतात. निवडणुकीच्या वेळी उमेदवार जातीयतेचा आधार घेतात. जाहीर सभा संमेलनात जातीयतेच्या निर्मूलनाची भाषा करणारे नेते निवडणुकीच्या वेळी विशिष्ट जातींची मते मिळवून निवडून येताना दिसतात. अर्थात, असे प्रतिनिधी जेव्हा राज्यकारभार करतात तेव्हा त्यांच्या कार्यात विशिष्ट जातीच्या हिताचाच अधिक विचार झालेला असतो.

**विविध राज्यांचे राजकारण आणि जातींचा विशेष प्रभाव :**

१. कर्नाटक राज्यात लिंगायत व ओक्कलिगा ह्या दोन जातींचा विशेष प्रभाव जाणवतो. सत्तास्पर्धा प्रामुख्याने या दोन जातीत चाललेली दिसते.

२. आंध्र राज्यात रेड्डी आणि कम्मा या दोन जाती राजकारणात प्रभावी आहेत. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत रेड्डी जातीने काँग्रेसला तर कम्मा जातीने कम्युनिस्ट पक्षाला पाठिंबा दिला होता. दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत स. का. पाटील यांच्या विनंतीवरून कम्मा जातीचे नेते प्रा. एन. जी. रंगा यांनी काँग्रेसला पाठिंबा दिला. पुढील निवडणुकात या दोन्ही जातींचा पाठिंबा मिळविण्यात काँग्रेस पक्षाला सातत्याने यश लाभले. परंतु १९८२ साली एन. टी. रामाराव यांचा तेलगू देसम् पक्ष उदयाला आला आणि या पक्षाने ह्या दोन्ही जातींच्या मतदारांना आकर्षित करून घेतले आहे.

३. केरळ राज्यात ब्राह्मण (नंबुद्रीपाद) नायर आणि इझवा ह्या जाती असून नायर जातींचा तेथील राजकारणावर विशेष प्रभाव आहे.

४. बिहार राज्यात राजपूत, ब्राह्मण, कायस्थ आणि आदिवासी ह्या प्रमुख जाती आहेत. तेथे कायस्थ

आणि ब्राह्मण जातीत सत्तास्पर्धा चाललेली आहे. राजपुतांनी जनता पक्षाला पाठिंबा दिला आहे तर आदिवासींनी झारखंड पक्षाचा आश्रय घेतला आहे.

५. उत्तर प्रदेशात राजपूत व जाट ह्या जातींचा राजकारणावर प्रभाव पडलेला आहे. याशिवाय तेथे गुजर व अहिर ह्या जातींचाही राजकारणावर काही प्रमाणात प्रभाव आहे.

६. तमिळनाडू राज्यात मुदलियार, गौडर व पदवाची ह्या जाती राजकारणात प्रभाव पाडताना दिसतात. स्वातंत्र्यपूर्व काळात ह्या जातींनी जस्टिस पार्टीला पाठिंबा दिला होता. आता त्यांचा पाठिंबा अण्णा द्रमुक पक्षाला असलेला दिसतो. ब्राह्मण जातीच्या वर्चस्वाला विरोध करून द्रविडी संस्कृती जतन करणाऱ्या ह्या जाती होत.

७. पंजाबमध्ये शीख धर्माचा राजकारणावर विशेष प्रभाव आहे. अकाली दलाचे तेथे वर्चस्व आहे. वास्तविक शीख हा हिंदू धर्माचाच एक पोटप्रकार (जात) आहे.

८. महाराष्ट्रात मराठा, ब्राह्मण, इतर मागसवर्गीय जाती (ओबीसी) यांचा राजकारणावर प्रभाव जाणवतो. मराठा जातीचा प्रभाव निवडणुकांवर आणि मंत्रिमंडळावर पडलेला आहे. विधिमंडळात मराठा आमदारांची एक लॉबीच आढळते. विधानसभेतील काही प्रतिनिधींना नेहमी मुख्यमंत्री मराठा जातीचा असावा असे वाटत असते. महाराष्ट्रातील मागासवर्गीय जातींसाठी रिपब्लिकन पक्षाची निर्मिती झालेली दिसते. महाराष्ट्रातील ब्राह्मण जातीचा राजकारण, प्रशासनावर, शैक्षणिक क्षेत्रावर विशेष पगडा आहे. त्यांचे संबंध भारतीय जनता पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदूमहासभा, पतितपावन संस्था यांच्याशी असलेले दिसतात. सामान्यतः महाराष्ट्रातील विविध जाती-जमाती आपापल्या उमेदवारांनाच मते देताना दिसतात. अशाच प्रकारे विविध राज्यांत जातीचे राजकारण चालू असलेले दिसते.

१९५० नंतरच्या सुमारे दहा-पंधरा वर्षांमध्ये जात व राजकारण यांच्या परपस्परांना आकार देणाऱ्या तीन प्रक्रिया घडून आलेल्या दिसतात.पहिली गोष्ट म्हणजे, आधुनिक सामाजिक चौकटीला साजेशा पद्धतीने जात हा घटक आधुनिक हितसंबंधांचा पाठपुरावा करण्यासाठी वापरला जाऊ लागला. ही प्रक्रिया स्वातंत्र्यपूर्व काळातच सुरू झाली होती, ती आता आणखी दृढ झाली. म्हणजे वरवर पाहता, 'जात' हा आपल्या सार्वजनिक व्यवहारांमधला एक मोठा हिस्सा राहिला. पण त्याच्या पारंपरिकतेपेक्षा आधुनिक समाजजीवनामधील त्याची भूमिका जास्त महत्त्वाची बनली. पुढच्या काळात जात ही एक महत्त्वाची राजकीय शक्ती बनण्याच्या प्रक्रियेची ही पायाभरणी होती. शिक्षण, विकास, संधी आणि इतरांशी स्पर्धा यांच्यावर भर दिला जाऊ लागला. आपल्या जातीच्या विकासासाठी जात नावाच्या परंपरागत घटकाला आधुनिक संघटनात्मक आकार दिला जाऊ लागला. जातींच्या संघटनांनी यात महत्त्वाची कामगिरी बजावली.

**वर्चस्वशाली जातींचे राजकारण :**

स्थानिक पातळीवर एखादी जात आपली संख्यात्मक ताकद सांभाळून असते, तिच्याकडे आपल्या आर्थिक शक्तीला साजेशी प्रतिष्ठाही त्या जातीने कमावलेली असते. तिला 'वर्चस्वशाली जात' असं नाव प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ एम. एन. श्रीनिवास यांनी दिलं. अशा वर्चस्वशाली जातीकडे स्थानिक सत्तेची सूत्र येणं स्वाभाविकच होतं. पण १९५० नंतरच्या लोकशाही राजकारणात आणखी दोन गोष्टी घडून आल्या. एक

म्हणजे, अशा स्थानिक वर्चस्वशाली जाती स्थानिक परिसराच्या बाहेरही राजकारणात हात-पाय पसरण्यासाठी चाचपणी करू लागल्या. त्यांची स्थानिक सत्ता आणि साधन हे आधार त्यांना या राजकारणासाठी उपयोगी पडू लागले. शिवाय जाति समाजातल्या प्रतिष्ठेचं प्रतिक असल्यामुळे सत्तेसाठी दावा करणं त्यांना शक्य झालं.

दुसरी बाब म्हणजे, मर्यादित संख्याबळ असूनही स्वतःकडे नेतृत्व ओढून घेऊ शकणाऱ्या काही प्रबळ जातींचा या काळात उदय होऊ लागला. महाराष्ट्रातअनेक भागांमध्ये संख्याबळ असलेल्या मराठा जातीगटाकडेच सर्व प्रकारची साधनसामग्री एकवटल्यामुळे ती प्रबळ जात बनणं सोपं गेलं, पण अनेक राज्यांमध्ये एवढं संख्यात्मक बळ नसतानाही काही जाती राज्याच्या राजकारणात सूत्रधार बनल्या. त्यांच्याकडच्या साधनसामग्रीमुळे हे शक्य झालं. लिंगायत किंवा रेड्डी या जाती संख्येने मोठ्या खऱ्याच, पण त्यांच्या राजकीय वर्चस्वाचा मुख्य आधार हा ग्रामीण अर्थव्यवस्थेतल्या त्यांच्या ताकदीचा होता.

स्वातंत्र्यपूर्व काळात चळवळीला ताकद मिळवण्यासाठी काँग्रेसने मोठे समूह आपल्यामागे उभे केले होते. यात अर्थातच अशा वर्चस्वशाली जातींचा समावेश होताच. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या जातींचे स्थानिक नेते प्रादेशिक सत्तेवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न करू लागले. त्यातून स्थानिक व प्रादेशिक राजकारणाचं स्वरूप बदलू लागलं. ज्या ज्या राज्यांमध्ये भाषावार प्रांतरचनेच्या मोठ्या चळवळी झाल्या, तिथे तर स्वाभाविकपणेच या वर्चस्वशाली जातींकडे राजकारणाची सूत्रं गेली.

१९६० च्या दशकात सामाजिक संघर्षांनी आकार घेतला.भारताच्या ज्या भागांमध्ये जातीच्या प्रश्नावर पूर्वीच संघटन झालेलं होतं, अशा ठिकाणी ब्राह्मण-बनिया या उच्च जातींच्या जागी मध्यम शेतकरी जातींचं राजकीय प्रभुत्व प्रस्थापित झालं. अशा प्रकारे महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश, तमिळनाडू या राज्यांमध्ये १९६० नंतर ब्राह्मणेतर समाजांचं राजकीय नेतृत्व उदयाला आलं. अशा प्रकारे स्वातंत्र्यानंतर अवघ्या दोन दशकांमध्ये सामाजिक हितसंबंधांची गुंतागुंत वाढली. विशेषतः दक्षिणेत ती स्पष्टपणे व्यक्त झाली. उत्तरेत मात्र या विभिन्न हितसंबंधांना सांभाळण्याची काँग्रेसची कसरत १९६७ मध्ये धोक्यात आली. समाजवाद्यांच्या लोहियावादी गटाला जातलक्ष्यी समाजातल्या सत्ताकांक्षांचं भान होतं आणि त्याचा म ायदा घेत राजकारण करता येईल, हे व्यावहारिक शहाणपणही होतं.त्यांच्या या भूमिकेतूनच जातीच्या राजकारणाचा दुसरा टप्पा गाठला गेला.

**जात राजकारण विरुद्ध लोकानुरंजनवाद :**

काँग्रेसच्या परंपरेप्रमाणे त्यांनी कोणत्याही एका जातिसमूहाला मुद्दाम वगळण्यावर भर देण्याऐवजी समाजवाद व 'गरिबी हटाव'ची सर्वसमावेशक भाषा केली, तसंच उच्च जातींसह दलित व आदिवासींमध्ये काँग्रेसचा जनाधार जास्त पका करण्यावर त्यांनी भर दिला. मध्यम जातींचं आव्हान समोर उभं राहिल्यामुळे उच्च जातींचा पाठिंबा हा काँग्रेसमागे ठामपणे उभा राहिला; तर इंदिरा गांधींची प्रतिमा, त्यांचं लोकानुरंजनाचं (पॉप्युलिस्ट) राजकारण, यांमुळे दलित व आदिवासी समूह काँग्रेसचे समर्थक राहिले. १९६७ व १९७१-७२ या दोन्ही निवडणुकांना उत्तर भारतातल्या जातलक्ष्यी राजकारणाची ही पार्श्वभूमी होती; मात्र राजकारणाची भाषा भेट जातलक्ष्यी हितसंबंधांची नव्हती. जातीचा मुद्दा अजूनही आडपडद्याने वावरत होता, बिगरकाँग्रेसवाद, शेतकऱ्यांचे

हितसंबंध, गरिबी हटाव या मुद्द्यांच्या भाषेत हे राजकारण घडत होतं, पण त्यामागे उत्तर भारतातला जातीच्या राजकारणाचा संदर्भ अपरिहार्यपणे होता, हरित क्रांती आणि शेतकरी जातींचा राजकीय उदय या घडामोडी ढोबळमानाने एकाच कालखंडात घडून आल्या. त्यामुळे उत्तर भारतात जे 'पिछड्या' जातींचं राजकारण उभं राहू पाहत होतं, त्याला ताकद पुरवू शकणारा कनिष्ठ शेतकरी जातींचा समूह १९७२ नंतरच्या काळात काँग्रेसविरोधी राजकारणात सामील झाला, मात्र, ही राजकीय कृती करताना त्यांच्या सामाजिक चारित्र्यावर आधारित अशी त्या जनसमूहांची राजकीय ओळख साकारली नाही, जयप्रकाश नारायण यांची 'संपूर्ण क्रांती'ची भाषा, काँग्रेसेतर पक्षांची 'इंदिराविरोधी' व्यूहरचना आणि इंदिरा गांधींची आणीबाणीची घोषणा यांच्या गदारोळात या राजकारणाचे टोक हरवून गेले, जातीचा मुद्दा तर पार झाकोळून गेला.

**मंडल आयोगानंतरचे राजकारण :**

सन १९४७ ते १९६७ या काळात दबून-दबून होणारं जातीचं राजकारण १९६७ च्या आसपास सुस्पष्टपणे मागास जाती आणि पुढारलेल्या जाती यांच्या हितसंबंधांच्या चौकटीत होऊ लागलं. सन १९७७ ते २००७ या तीन दशकांमध्ये जातीच्या राजकारणात तीन प्रमुख बदल घडून आले. मात्र, ते भूमिगत बदल होते ते 'मंडल' किंवा 'ओबीसी राजकारण' या नावाने ओळखला जातो; पण त्याची सुरुवात बरीच आधीपासून झालेली होती.

एकाधिकारशाहीच्या पाडावाचे नगारे वाजले आणि त्या संपूर्ण काळात जातीच्या राजकारणाकडे दुर्लक्ष झालं. प्रत्यक्षात मात्र कनिष्ठ, मध्यम किंवा बिगरक्षत्रिय जातींच्या राजकारणाने उचल खाल्ली उत्तर भारतात. जिथे मध्यम जातींना सत्ता न मिळाल्यामुळे त्यांची राजकीय कोंडी झाली होती, अशा राज्यांमध्ये निवडणुकीत काँग्रेस भुईसपाट झाली, जनता पक्ष या नावाने तयार झालेल्या, पण प्रत्यक्षात विविध पक्षांची संयुक्त आघाडी असलेल्या 'नव्या' दिसणाऱ्या पण जुन्या राजकीय संघटनेने काँग्रेसचा पराभव केला, हा त्या बदलाचा दृश्य भाग होता; पण त्यामागे उत्तर भारतातील मध्यम व कनिष्ठ जातींची राजकीय महत्त्वाकांक्षा होती, हा भाग भूमिगत राहिला.हे राजकारण जेवढं चरणसिंग, कर्पूरी ठाकूर, राजनारायण वगैरेंचं होतं तेवढंच - त्याहून जास्त ते मुलायमसिंह, लालूप्रसाद, नीतिशकुमार, शरद यादव यांचंही होतं. १९७७ मध्ये हे सारे उगवते तारे होते, कदाचित तेही नव्हते. पण १९७७ मध्ये काँग्रेसचा पराभव होणं आणि १९७८ मध्ये अनेक राज्ये काँग्रेसच्या हातातून निसटणं, या घडामोडींमधूनच या 'नव्या' नेत्यांचं पुढचं राजकीय आयुष्य साकारलं.

**'मंडल'चे राजकारण :**

मंडल आयोग हा 'दुसरा मागासवर्गीय आयोग' होता. पहिल्या, कालेलकर आयोगाच्या शिफारशी संदिग्ध होत्या; त्याचे अध्यक्षच त्या शिफारशींबद्दल साशंक होते आणि सरकारला त्या शिफारशींबद्दल स्वारस्य नव्हते. बरोबर दुसऱ्या मागासवर्गीय आयोगाच्या शिफारशींचं काय आलं? मंडल आयोगाचा अहवाल सादर झाला, तो मंडल यांचा विरोधक असलेला काँग्रेस पक्ष सत्तेवर असताना. या आयोगाच्या शिफारशी स्पष्ट आणि आग्रही होत्या; पण सरकार त्या शिफारशींच्या विरोधात होते. इंदिरा गांधींच्या पाठीराख्यांमधल्या एका समूहाचा त्या शिफारशींना अर्थातच कट्टर विरोध होता, तर दुसऱ्या पाठीराख्या समूहाला (दलित-आदिवासी) या शिफारशींमधून काही मिळणार नव्हतं. उलटपक्षी, इंदिरा गांधींच्या विरोधकांना त्या शिफारशींमधून

बळ मिळणार होतं. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीच्या निर्णयाला दिल्ली व उत्तर भारतात कडाक्याचा विरोध झाला.

ओबीसी नावाची राजकीय शक्ती १९९० च्या आसपास अनेक राज्यांमध्ये सत्तेच्या जवळ पोचली. लालूप्रसाद व मुलायमसिंह यांच्या उदयाचा हा काळ. त्यांचं राजकीय अस्तित्व दीर्घ काळ टिकून राहिलं, हीच या नव्या राजकारणाची पावती म्हणायला हवी. पण नव्वदीच्या दशकात ही राजकीय ऊर्जा हिंदुत्वाच्या आवाहनाद्वारे स्वतःकडे वळवण्यात भाजपला यश आलं. भाजपचा १९९१-९२ नंतर मोठा विस्तार झाला. अनेक राज्यांमधला 'ओबीसी' समूहाचा एक हिस्सा भाजपमागे उभा राहिला. खुद्द भाजपचा याआधीचा सामाजिक आधार तसा कमीच होता. त्यामुळे नवजागृत 'कनिष्ठ' जातिसमूहांना आपल्या पक्षात व सत्तापदांमध्ये सामावून घेणं भाजपला शक्य झालं. या नवजागृत समूहांच्या असंतोषाला आक्रमक हिंदुत्वाचा हेतू चिकटवून राजकारण करण्यात भाजप यशस्वी झाला. भाजपला १९९६, १९९८ व १९९९ या तिन्ही निवडणुकांत जे यश मिळालं, त्यात या ओबीसी समूहांचा मोठा हिस्सा होता. हिंदुत्वाच्या रूपाने त्याची अभिव्यक्ती झाली. जातीच्या मुद्द्याला प्राधान्य मिळालं. जातीच्या राजकारणाला नाट्यपूर्ण कलाटणी देत त्या राजकारणाची ऊर्जा जमिनीत जिरवण्याची तिसरी प्रक्रिया २००७ नंतर मायावतींच्या नव्या राजकारणाद्वारे साकारली. जेव्हा उत्तर प्रदेशात दलितांकडे सत्तेची सूत्रे आली, तेव्हाच जातीच्या राजकारणाला बगल देणारी व्यूहरचनाही साकारली होती. त्यात जातीचे हिशेब जरूर असतील, पण जातलक्ष्यी राजकारणाचं सूत्र उरलं नव्हतं. उत्तर प्रदेशात प्रभाव वाढू लागल्यानंतर बसपपुढे दोन पर्याय होते. एक म्हणजे, १९८४ पासून देशभरातल्या दलित समाजाला सत्ताधारी बनण्याचं जे स्वप्न बसपने दाखवलं होतं, त्याचा पाठपुरावा करीत दलितसंघटन करून दलितांचा पक्ष म्हणून ताकद कमावणं. दिल्ली, पंजाब, हिमाचल, राजस्थान, मध्य प्रदेश या सगळ्या पट्ट्यात १९९९ ते २००४ या काळात बसपने ताकद कमावली होती. प्रस्थापित पक्षांमध्ये दरारा निर्माण केला होता. एवढं व्यापक दलितसंघटन स्वातंत्र्योत्तर काळात तरी प्रथमच घडत होतं; पण बसपने तो रस्ता सोडून दिला.उत्तर प्रदेशात मुलायमसिंहांच्या दादागिरीमुळे बसपला आणखी एक रस्ता उपलब्ध होता. तो म्हणजे, दलित आणि कनिष्ठ ओबीसी यांच्या राजकीय (व सामाजिक) युतीचा. हा रस्ता स्वीकारून वाटचाल करण्याच्या खूप जवळ बसप आली होती. ज्याला ९० च्या दशकात 'बहुजन राजकारण' म्हटले गेले, त्याचे हे प्रत्यक्ष व्यवहारातील रूप ठरले असते. मात्र, त्यासाठी इतर राज्यांमधील दलितांच्या संघटनाचा मार्ग सोडून द्यावा लागणार होता. या रस्त्यावरून बसपने वाटचाल देखील केली; पण जातीच्या या नव्या राजकारणाचा विस्फोट पुन्हा एकदा भूमिगत राहिला. त्याचं कारण म्हणजे, एकीकडे फक्त एकजातीय राजकारण चालवत असतानाच बसपने त्याला नाव मात्र सर्वजन समाजाचे दिले व त्यातील धार बोथट केली. फणस कापण्याच्या सुऱ्याला लोणी कापण्याची सुरी म्हणून वापरल्यामुळे जातीच्या राजकारणाचा स्फोट जमिनीत जिरून गेला. त्याचबरोबर 'सर्वजन' समाजाचे नाव घेऊनही शासनव्यवहार ना व्यापक व समावेशक झाला, ना प्रभावी व लोकहितकारक झाला. त्यामुळे २०१२ च्या विधानसभेत उत्तर प्रदेशात मायावती आपल्या पक्षाला विजय मिळवून देऊ शकल्या नाहीत.

एका अर्थी लालू-मुलायम आणि मायावती यांच्या राजकारणातून पुढे येणारा निष्कर्ष एकच आहे. निव्वळ जातीच्या घटकाभोवती दीर्घ काळ राजकारण घडवणं मुश्किल आहे. लालू-मुलायम यांनी हे पथ्य न स्वीकारल्यामुळे त्यांना धक्के बसले. त्याउलट, मायावतींनी जातीच्या राजकारणाची धार सौम्य करून ऐतिहासिक

विजय संपादन केला. या निष्कर्षाला आणखी एक पदर आहे तो असा की, जातीचं राजकारण प्रत्येक राज्यात एकसारखं असू शकत नाही. १९५० च्या आसपास जे राजकारण उभं राहिलं, त्याच्या नेमकी उलटी प्रक्रिया आज साकारते आहे. तेव्हा जातीबद्दल फार बोललं जात नव्हतं; आज जातीबद्दल-राजकारणातल्या जातीच्या स्थानाबद्दल-उघडपणे आणि सर्रास बोललं जातं. 'जात' हा एक राजकीय घटक आहे, हे आता मान्यता पावलं आहे. साठ वर्षांपूर्वी उच्च जातींचं राजकीय वर्चस्व सुस्थित होतं; आज हे उच्चजातीय वर्चस्व जवळपास संपुष्टात येऊ घातलं आहे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आज जातीबद्दल एवढं बोललं जात असतानाच जातीच्या राजकारणाला मात्र उत्तरोत्तर जास्त जास्त मर्यादा पडू लागल्या आहेत. 'जात' हा एक राजकीय घटक आहे, हे मान्य झालं आहे; पण राजकारणाला कलाटणी देण्याचं त्या घटकाचं सामर्थ्य संकोच पावलं आहे. जातीच्या राजकारणाचे विस्फोट भूमिगत राहिले, याचंही कारण हेच आहे.

**सारांश :**

जातीयतेचे राजकारण हे राष्ट्रीय ऐक्याला आणि एकात्मतेला घातक ठरू लागलेले आहे. भारतात जाती-जमातींमधील तणाव, संघर्ष वाढू लागलेले आहेत. राजकीय पक्ष मतांच्या स्वार्थापोटी जातीयतेला खतपाणी घालताना दिसतात. त्यामुळेच अधूनमधून जार्तीव दंगली उसळल्या जातात. अलिगढ, जमशेदपूर, मोरादाबाद, अलाहाबाद, मालेगाव, वाराणशी, भिवंडी, अहमदाबाद, हैद्राबाद इत्यादी शहरांत जातीय दंगली झाल्या, एवढेच नव्हे तर या जातीयवादी राजकारणात 'राजकीय हिंसाचार' घडून आले. भिवंडी दंगलीत हिंदू-मुस्लिम लोकांनी परस्परांवर हल्ले चढविले तर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराबाबत झालेल्या आंदोलनात सवर्ण जातींनी दलित जातींच्या लोकांवर हिंसाचाराचे हल्ले केले. ग्रामीण पातळीवरील जातीय राजकारणात राजकीय हिंसाचाराचे तंत्र वापरले जाते. विरोधकांचे मुद्दे आणि त्यांचा राजकीय विरोध दडपून टाकण्यासाठी राजकीय हिंसाचाराचा वापर केला जातो. एकंदरीत जातीयतेचे राजकारण भारताच्या लोकशाही पद्धतीला आणि एकात्मतेला मारक आहे, तेव्हा त्याला वेळीच पायबंद घालणे आवश्यक झाले आहे.

भारतीय घटनेने समाजातील जातीयता कमी करण्यासाठी काही घटनात्मक तरतुदी केलेल्या आहेत. दलित जातीवर होणारे अन्याय थांबविण्यासाठी अस्पृश्यता निवारणाचा कायदा संमत केलेला आहे. मागासवर्गीय जाती-जमातीच्या विकासासाठी अल्पसंख्याक आयोग नियुक्त करण्याची तरतूद केलेली आहे, राज्यकारभारात त्यांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी राखीव प्रतिनिधित्वाच्या जागा ठेवलेल्या आहेत. शिक्षण, नोकऱ्या, उद्योगधंदे यात त्यांना संधी मिळवून देण्यासाठी राखीव जागा व सुखसोयी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. शासनाने जातीयता कमी करण्यासाठी अजूनही प्रयत्न करणे गरजेचे आहे. शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे, आरोग्यकेंद्रे, शिरगणती, विविध उद्योगधंदे, संस्था, संघटना, कचेऱ्या यातून जी जातीची नोंद होते ती कटाक्षाने थांबविली पाहिजे. तसेच जातीयवादी पक्ष, संघटना यांच्यावर बंदी घातली पाहिजे. शिक्षणाद्वारे आणि प्रचारमाध्यमांद्वारे जनतेला सुशिक्षित, सुजाण बनविले पाहिजे. - सुशिक्षित, सुसंस्कृत जनता राष्ट्रीय एकात्मतेचे अंतिम उद्दिष्ट साध्य करून लोकशाही प्रस्थापित व यशस्वी करू शकते. जातीय दंगली होण्यापाठीमागे आर्थिक विषमता, दारिद्र्य, बेकारी, वैमनस्य हे घटक कारणीभूत असतात. तेव्हा जनतेच्या आर्थिक विकासासाठी केंद्र सरकारने - विविध उपाययोजना आखल्या पाहिजेत. निवडणुकीत जातीयतेचा फायदा घेणाऱ्या उमेदवारांना -

निवडणूक लढविण्यास बंदी घातली पाहिजे. अर्थात, केवळ अशा घटनात्मक तरतुदी करून जातीयतेचा प्रश्न सोडविणे शक्य होणार नाही. भारतीय समाजातील जातीयतेचा अडसर दूर - करण्यासाठी शासन, राजकीय व सामाजिक कार्यकर्ते आणि जनता यांनी जबाबदारीने, जाणिवेने प्रामाणिकपणे जातिनिर्मूलनाचे कार्य सातत्याने करणे आवश्यक आहे.

## ३.२.२ सांप्रदायिक राजकारण :

**प्रास्तावना :**

संविधानाच्या निर्मितीच्या वेळी धर्मनिरपेक्षतेशी आपली बांधीलकी फाळणीच्या क्लेशकारी अनुभवामुळे बळकट झाली होती. संविधानसभेतील चर्चामधून ती वारंवार व्यक्त झाली आहे. अल्पसंख्याकांना त्यांचा धर्म, संस्कृती, भाषा व लिपीही सुरक्षित राहतील अशी हमी संविधानाने दिली होती. पण प्रत्यक्ष कारभारातून राज्यसत्ता धर्मनिरपेक्षतेला बळकटी आणू शकली नाही. उलट अल्पसंख्याकांचा विश्वास संपादण्यासाठी तिने जे केले ते बहुसंख्याकांचा तिच्यावर रोष ओढवण्यास कारणीभूत झाले. राज्यकर्त्यांनी अल्पसंख्याकांचे आधुनिकीकरण करण्याऐवजी त्यांच्या धर्मप्रमुखांशी सौदेबाजी करणे पसंत केले. यातून पुराणमतवादी शक्तींची अल्पसंख्याक समूहांवरची पकड अधिक पक्की झाली. अल्पसंख्याकांचा अनुनय करण्यासाठी सरकार त्यांच्या प्रतिगामी मागण्याही मंजूर करते असा संदेश बहुसंख्याकांपर्यंत गेला. त्याचा परिणाम असा झाला की राजकीय आर्थिक सत्ता, सैन्य-पोलिस दले, शिक्षण, प्रसारमाध्यमे, व्यवसाय-व्यापार-उदीम, उद्योगधंदे या सर्वच क्षेत्रात निर्विवादपणे आघाडीवर असूनही हिंदू समाज भयगंडाने पछाडला. धर्माचे राजकारण करू पाहणाऱ्या राजकीय पक्षांच्या हे पथ्यावरच पडले.

संविधानाने देशात सुरू केलेल्या आधुनिकतेच्या क्रांतीमुळे पारंपरिक जन्मसिद्ध अस्मितांना आणि उतरंडवजा समाजव्यवस्थेला हादरे बसू लागल्याचे स्पष्ट झाले. कधीकाळी धर्माच्या संपूर्ण आधिपत्याखाली असलेली अनेक क्षेत्रे क्रमशः राज्यसत्तेच्या कार्यकक्षेत जाऊ लागल्यामुळे धर्ममार्तंड कासावीस होऊ लागले होते. पुढे ते आक्रमक होत गेले. राज्यसत्तेने समाजातील सांस्कृतिक क्षेत्राचे वर्चस्व गंभीरपणे कधीच आव्हानित केले नाही उलट त्याच्याशी गौणतेच्या पातळीवरून तडजोडीच केल्या. धार्मिक संस्था व त्यांचे व्यवहार राज्यसंस्थेच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली कधी आलेच नाहीत. त्यावरची राज्यसत्तेची सांविधानिक अधिसत्ता कागदोपत्रीच राहिली. धार्मिक दंगली, सांप्रदायिक उठाव किंवा उन्माद अशा प्रसंगी राज्यसंस्थेचे वर्तन बोटचेपेपणाचे, पडते घेण्याचे किंवा कातडीबचावू वृत्तीचेच निदर्शक असल्याचे दिसून आले आहे. राज्यसत्तेचा दरारा जमातवादी शक्तींवर दिसण्याऐवजी जमातवादी शक्तीच राज्यसत्तेला धाकात ठेवत आल्याचे आढळते.

सांप्रदायिक विचारप्रणालींची संमोहकशक्ती वापरून घेण्याचा मोह देशातील कोणताच मोठा राजकीय पक्ष टाळू शकला नाही. काहींनी आपली नाळ कायम एकाच धर्माशी ठेवली तर काहींनी प्रसंगोपात्त या किंवा त्या धार्मिक समूहांशी सलगता केली. त्यामुळेच भाजपाने भारतीयीकरण व हिंदूकरण यात फरक करण्याचेच नाकारले, तर काँग्रेस हिंदूंना मुस्लिमधार्जिणा आणि मुस्लिमांना हिंदू बहुसंख्याकांचा पक्ष वाटत राहिला. सत्तारूढ पक्ष सत्ता टिकविण्यासाठी, तर सत्तावंचित झालेला पक्ष सत्ता परत मिळवण्यासाठी धर्माचा आधार

घेताना दिसतात. 'धर्म हे राज्यकर्त्यावर्गाचे हत्यार असते आणि ते तो स्वार्थसाधनेसाठी पुरेपूर वापरून घेतो.' हे फार पूर्वीच मार्क्सने सांगितलेले राजकीय सत्य आहे. 'तबैका' म्हणून धार्मिक अभिजनांचा वापर सगळेच पक्ष करतात. पण पूर्वी तो करताना त्यांना थोडाफार जो अपराधगंड वाटायचा, काळाच्या क्रमात तोही नाहीसा झाला असून राजकीय पुढारी धर्माचे राजकारण राजरोसपणे व उजळ माथ्याने करू लागले आहेत. साधू, साध्वी, मौला, महंत, अवलिया, आचार्य, मौलवी व पाद्री प्रभूतींचा निवडणूक प्रचारातील सहभाग अभूतपूर्व प्रमाणावर वाढला आहे. राजकारणी नेत्यांएवढाच अवकाश या मंडळींना प्रसिद्धीमाध्यमेही देऊ लागली आहेत. अल्पसंख्याक बहुसंख्याक असा वाद या संदर्भात उपस्थित केला जात असला तरी खरे म्हणजे राज्यकर्ता वर्ग सगळ्याच धर्मवाद्यांचे लांगूलचालन करतात. सर्व धर्मप्रमुखांचे शुभाशीर्वाद मिळवतात. कुंभमेळा असो, की हजयात्रा असो करदात्यांच्या कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी ते बिनदिक्कत करतात.

यातून राजकीय पक्षांचे तात्कालिक स्वार्थ साधत असले तरी राज्यव्यवस्थेचे अतोनात नुकसान होते. सांप्रदायिक शक्तींचे बळ वाढते आणि धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व मागे पडते. समाजातील एकोपा भंग पावतो आणि धर्मपिसाट शक्तींच्या तर्कदुष्ट युक्तिवादांवर लोक विश्वास ठेऊ लागतात. 'आपल्या' व 'त्यांच्या'मधील अंतर्विरोधांच्या परिभाषेत सर्व प्रश्न मांडले जाऊ लागतात. 'आपण' 'त्यांच्या पेक्षा अव्वल, अधिकृत आणि अस्सल नागरिक आहोत असे दुराग्रह धरले जातात. शतकभराची सुधारणेची परंपरा असलेले आणि नसलेले सगळेच धर्मवादी असे बेताल वागताना आढळतात. देशातील अल्पसंख्याक समूह असुरक्षितताग्रस्त होणे हे येथील धर्मनिरपेक्षतेवरचे मोठेच गंडांतर असते. अल्पसंख्याकांना बहुसंख्याकांच्या द्वेषाचे, अविश्वासाचे आणि हिंसक आक्रमकतेचे वारंवार लक्ष्य व्हावे लागल्यामुळे त्यांचा भयगंड वाढतो. ते अधिकाधिक आत्मकेंद्री होतात आणि आपल्या धर्मपिसाट नेत्यांच्या आहारी जातात. अल्पसंख्याकांच्या भयग्रस्ततेच्या मुळाशी असलेली असुरक्षितता किमानपक्षी सकारण तरी असते पण बहुसंख्याकांच्या ठिकाणी प्रयत्नपूर्वक निर्माण केला जाणारा भयगंड हा मुळात कल्पितावर आधारित व कुरापतखोर असल्यामुळे अनाठायी व आक्रमक ठरतो. येथील अल्पसंख्याकांच्या अस्तित्वामुळे आपल्याला धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व स्वीकारावे लागले आहे अशा भ्रमातून ते त्या तत्त्वाचाच दुस्वास करू लागतात. धर्मनिरपेक्ष राज्यसत्ता हे मानवसमाजाच्या प्रगल्भ अवस्थेचे लक्षण आहे ते सोडून धर्मराज्याकडे जाणे हे घड्याळाचे काटे उलट्या दिशेने फिरवणे ठरते हे ते लक्षातच घेत नाहीत. 'बहुसंख्याकांचे हक्क' आग्रहपूर्वक मांडण्याच्या भरात ते बहुसंख्याकांना अल्पसंख्याकगंडाची बाधा जडवून मध्ययुगीन मनोवृत्तीकडे नेऊ पाहतात. त्यांनी परधर्मीयांविषयी परोपरीने पिकवलेली असहिष्णुता यत्किंचितही निमित्त मिळताच जमातवादी दंगलींच्या संहारसत्रात परिवर्तित होते. या दंगलींमध्ये सरकार, नोकरशाही व सशस्त्र दलेही बहुसंख्याकांचे पक्षपाती होतात असा अनुभव गुजरात हत्याकांडात आला तो भीषण भवितव्याची चुणूक दाखवणारा आहे.

धर्म, भाषा, जात, जमात यांच्यातील भिंती दूर करण्यावर भारतातील आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेचा कायम रोख राहिला आहे. त्याच दृष्टीने धर्मनिरपेक्ष राष्ट्र स्थापन करण्यावर भर देण्यात येत आला आहे. वसाहतवादी ब्रिटिश सरकारने भारतात आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू केली, हे इतिहासावर नुसता दृष्टिक्षेप टाकला, तरी लक्षात येते. विविध सामाजिक अडथळ्यांनी भारतीय समाज विभागला गेला असल्याचा 'शोध' ही याच वसाहतवादी सत्तेने लावला. उदाहरणार्थ, धर्माच्या आधारे केलेला हिंदू व मुस्लिम यांच्यातील फरक

किंवा हिंदू व आदिवासी यांच्यातील वेगळेपणा. हे समज वसाहतवादी सत्ताधाऱ्यांनी आपल्यावर लादले. म्हणूनच धर्मनिरपेक्षतेची संकल्पना जेथून आली, तेथूनच जमातवादाचे बीज पेरले गेले, हे लक्षात घेण्याची गरज आहे.

प्रत्यक्षात अनुभवाला न येण्यापलीकडचा एक दृष्टिकोन आधुनिक विचारात अंतर्भूत असतो आणि दैनंदिन जीवनातील अनुभवातून मिळालेल्या दृष्टीला तो जेव्हा मागे सारतो, तेव्हा जमातवाद निर्माण होण्यास पूरक स्थिती तयार होते. विवेक, वस्तुनिष्ठता यांवर आधुनिक समाजात भर दिला जात असतो. साहजिकच अशा समाजातील विवेकाधिष्ठित वस्तुनिष्ठता अविवेकी व्यक्तिनिष्ठेला दडपून टाकत असते. परंपरेच्या जोखडातून मुक्त झालेल्या समाजात (पोस्ट ट्रॅडिशनल सोसायटी) विवेकाचा धोका असतो आणि विवेक व विवेकाची दुसरी बाजू यांच्यात योग्य समतोल राखणे गरजेचे असते, असा सिद्धांत केनिची मिशीमा या जपानी अभ्यासकाने मांडला आहे. शीतयुद्धकाळात उभी राहिलेली व्यवस्था कोलमडल्यावर विवेकाधिष्ठित धर्मनिरपेक्षतेला महत्त्वाचे स्थान असलेले आधुनिकीकरणाचे उद्दिष्टही काहीसे धूसर दिसू लागले आहे. अशा परिस्थितीत विवेकशून्यतेच्या (नॉन रिझन) ठायी असलेल्या स्फोटक क्षमतेला वाव मिळाला की, जमातवाद डोके वर काढतो. ही समस्या भारतापुरतीच मर्यादित नसून ती जगभर बघायला मिळते. शीतयुद्ध संपल्यावर जगभर जमातवादाचे जे पुनरुज्जीवन झाले, त्यामुळे आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत पेचप्रसंग निर्माण झाला आहे. धर्मनिरपेक्षतेच्या संकल्पनेत विवेकाचे धर्मावर नियंत्रण असते आणि जमातवादात विवेकशून्यतेची स्फोटक क्षमता मुलतत्त्वाच्या पुनरुज्जीवनाच्या रूपाने प्रकट होते. या दोन्ही गोष्टी आधुनिक युगातील एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या दोन्ही संकल्पना आधुनिकतेतूनच निर्माण झाल्या आणि आधुनिक विचारविश्वाच्या चौकटीतच त्या आहेत. धर्मनिरपेक्षता आणि जमातवाद यांच्यातील जो संघर्ष आहे, त्याकडे विवेक आणि विवेकाची दुसरी बाजू यांच्यात समतोल साधण्याच्या प्रक्रियेतील चढउतार या दृष्टीनेही बघता येईल.

आज प्रदेशात घटना घडत असली, तरी चित्रवाणीच्या पडद्यावरील त्याची दृश्ये ही दैनंदिन आयुष्यातील अनुभवाएवढीच 'खरी' वाटतात. या 'खऱ्या' दृश्यांमुळे कधी कधी दैनंदिन आयुष्यातील जगण्यामुळे मिळालेली दृष्टी आणि अनुभवालायेण्यापलीकडचा दृष्टिकोन यांच्यातील सीमारेषा पुसट बनते. दैनंदिन आयुष्य जगण्यातील दृष्टी अशी प्रत्यक्षात न येणाऱ्या अनुभवापलीकडच्या दृष्टिकोनात सामावली गेली की जमातवाद दोन प्रकारे डोके वर काढतो. पहिल्या प्रकाराला विशिष्टतेची (कॅटगरायझेशन) जादू असे म्हणता येईल आणि मध्यमवर्गीय मानसिकतेतून पसरत गेलेला चंगळवाद, हा दुसरा प्रकार. 'विशिष्टतेची जादू' ही संकल्पना समजून घेण्यासाठी देशाच्या दूरच्या भागातील कोणत्याही एक समाजाचे उदाहरण घेता येईल. या समाजातील लोकांच्या दृष्टीने अयोध्या या गावाचा त्यांच्या दैनंदिन आयुष्याशी काही संबंध नव्हता. पण बाबरी मशीद पाडण्यात येत असल्याची दृश्ये चित्रवाणीवरून प्रक्षेपित करण्यात आल्यावर अयोध्या ही जागा परकी राहिली नाही. ही घटना म्हणजे हिंदू व मुस्लिमांतील जमातवादी संघर्ष असल्याचे जे विश्लेषण करण्यात आले, त्याचे सावट स्थानिक समाजावर पडले. एक समान सांस्कृतिक वारसा असलेले हिंदू व मुस्लिम या समाजात शतकानुशतके गुण्यागोविंदाने राहत आले होते. देशातील इतर ठिकाणच्या लोकांनीही हीच दृश्ये बघितली. म्हणजे अनुभवाला येण्यापलीकडच्या दृष्टिकोनात त्यांना दैनंदिन अनुभवातून मिळालेल्या दृष्टीचा समावेश केला गेला. अनुभवाला न येणाऱ्या दृष्टिकोनातून आपल्या दैनंदिन आयुष्याकडे बघण्याची संधी चित्रवाणीच्या प्रसारामुळे लोकांना

मिळाली आणि अशा दृष्टिकोनाची लोकप्रियता ही जमातवादाला पोषक ठरत आली आहे. याचा दुसरा अर्थ असा की, भारतीय समाज विकासाच्या अशा टप्प्यापर्यंत येऊन पोचला आहे की, जेथे ही 'विशिष्टतेची जादू' परिणामकारक ठरते.

बहुसंख्याकांच्या जमातवादावरचा उत्तम उपाय म्हणजे त्याच्यापासून दूर राहणे. पण सर्वसामान्यांना या जमातवादाच्या धोक्याची जाणीव होऊन ते त्यापासून दूर राहिले, तरी विवेक व विवेकाची दुसरी बाजू यांच्यात समतोल कसा राखावयाचा, हा प्रश्न उरतोच. तो सोडविण्यासाठी वस्तू व व्यक्ती यांना एकाच साच्यात बसविणारी जीवनदृष्टी बदलण्याची गरज आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास एकसाची व लवचिक नसलेली आपली ओळख आपण सोडून दिली पाहिजे. महात्मा गांधी यांच्या मनात बहुधा हेच असावे, म्हणूनच फाळणीनंतर नौखालीत दंगल भडकली असताना ते म्हणाले होते की, 'हिंदू मुस्लिमांना मारत आहेत आणि मुस्लिम हिंदूंना मारत आहेत, असे तुम्ही सांगता. मी हिंदू आहे. पण त्याचवेळी मी मुस्लिम, शीख व ख्रिश्चनही आहे. तुम्हीही हेच सगळे आहात'.

**सांप्रदायिक राजकारणातील टप्पे :**

१. स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाच्या संदर्भात पहिला टप्पा इ.स. १९४७ ते इ.स. १९६७ हा आहे. या कालखंडात सहमती-समावेशनाच्या सत्ताधारी काँग्रेस पक्षाच्या धोरणामुळे हिंदू-मुस्लिम-शीख ह्या तिनही धर्मातील उच्चजातवर्गीय अभिजनांचे काही समान मुद्यांवर ऐक्य होते. हे ऐक्य स्वधर्मातील निम्नजातवर्गीय घटकांच्या शोषणासाठी कार्यरत होते. मात्र जमातवादाच्या बदलत्या परिप्रेक्ष्यात क्वचित प्रसंगी ह्या ऐक्याला तडा जाण्याच्या घटना घडल्या.

२. इ. स. १९६७ ते इ. स. १९७७ ह्या कालखंडात स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवाद हा अल्पांशाने विकासमान झाला. कारण, सत्ताधारी कोंग्रेस पक्षाअंतर्गत काही तणावाचे मुद्दे उभे राहिले. ह्या मुद्यांना जात-जमातीय आणि प्रादेशिक भाषिक हितसंबंधांची पार्श्वभूमी होती. ह्या हितसंबंधांमधील विरोधाभास प्रादेशिक पातळीवर जात-जमातीय स्वायत्ततेच्या मागण्यांना हिंसक स्वरुप देणारा ठरला. परंतु सत्ताधारी काँग्रेस नेतृत्त्वाने प्रादेशिक जात-जमातीय अभिजनांना प्रासंगिक स्वायत्तता बहाल करुन प्रादेशिक स्तरावर जमातीय अस्मिता चुचकारण्याचे धोरण सुरु केले. त्यातून देश पातळीवर आणि प्रादेशिक पातळीवरही जमातवाद विकासमान व्हायला आरंभ झाला. ही प्रक्रिया पंजाब, हरियाणा, काश्मिर ह्या राज्यांच्या बाबतीत प्रकर्षाने दिसून आली. काश्मिर ह्या राज्यांच्या बाबतीत प्रकर्षाने दिसून आली.

३. इ. स. १९७७ ते इ. स. १९८४ हा कालखंड भारतातील जमातवादाच्या स्वरुपाला कलाटणी देणारा ठरला. जमातीय तणावाचे स्वरुप फक्त 'हिंदू विरुद्ध मुस्लिम' असे न राहता 'हिंदू विरुद्ध शीख' असे झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने वेळोवेळी पंजाब आणि शीख प्रश्नांसंदर्भात भूमिका बदलली. गुरुमुखी लिपी आणि पंजाबी भाषा विरुद्ध देवनागरी लिपी आणि हिंदी भाषा ह्या संघर्षाला शीख विरुद्ध हिंदू हे स्वरूप प्राप्त झाले. ह्या पार्श्वभूमीवर हिंदू जमातवाद्यांची फाळणीपासूनची पारंपरिक मित्रशक्ती असलेली शीख जमातवादी शक्ती हिंदू जमातवाद्यांपासून दूर जाऊ पाहत होती. प्रादेशिक आणि राष्ट्रीय राजकारणात सत्ताधारी काँग्रेस पक्षाने जमातवादाचा मतपेढीसाठी वापर केल्याने मोठे पेचप्रसंग उपखंडात उभे राहिले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा खून

आणि त्यानंतर भडकलेल्या इ. स. १९८४ च्या दिल्लीतील शीखविरोधी दंगली ह्या घटनांनी स्वातंत्र्योत्तर भारतात प्रथमच अभूतपूर्व वंशसंहार समोर आणला. इ. स. १९८४ च्या शीखविरोधी जमातीय दंगलीतील अभूतपूर्व बाब म्हणजे निम्नजातीय दलित समूहांनी भटक्या शीखांवर हल्ले केले. ही बाब दाता-आश्रित राजकीय संबंधांच्या संदर्भांत नवी समीकरण पुढे आणणारी ठरली. भटक्या शोख स्त्रियांवरील जमातीय दंगलीतील लैंगिक हिसा आंतरछेदिततेची नवी आणि दाहक वास्तवता पुढे आणणारी ठरली. आयोध्या प्रसंग ह्या घटनांसंदर्भात काँग्रेसी नेतृत्त्वाच्या जमातवादधार्जिण्या धोरणामुळे अप्रत्यक्षरित्या हिंदू आणि मुस्लिमांतील जमातवादी शक्तींना खुले प्रोत्साहन मिळाले. जमातीय ध्रुवीकरण तीव्र होऊन बाबरीविध्वंस घडला आणि भारतीय राजकारणात हिंदू जमातवादी शक्ती प्रबळ व्हायला सुरुवात झाली. मुंबईमधील जमातीय दंगली पोलीस आणि प्रशासन यंत्रणेचे जमातीकरण खुलेआम दर्शविणाऱ्या ठरल्या.

५. इ. स. १९९३ ते इ. स. २००२ हा कालखंड स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाच्या संदर्भात महत्त्वाचा आहे. कारण ह्या कालखंडात दलित, आदिवासी. स्त्रिया ह्या जमातवादविरोधी नैसर्गिक शक्तींचेच जमातीकरण घडले. हिंदू मध्यमवर्गीय स्त्रिया प्रथमच मुस्लिमविरोधी जमातीय हिंसेत सक्रियरित्या सहभागी झाल्या. हे जमातीकरण सांस्कृतिकरण-ब्राह्मणीकरण हिंदूकरण ह्या क्रमाने घडवून आणले गेले. समाज परिवर्तक जातीअंतक चळवळीची पिछेहाट ह्या जमातीकरणाला कारणीभूत होती. ह्या जमातीकरणाची फलश्रुती गुजरातमधील इ. स. २००२ च्या जमातीय हिंसाचारात दिसून आली. इ. स. २००२ पासूनचे भारतीय समाजातील जमातीय ध्रुवीकरण मुस्लिम आणि ख्रिश्चन ह्या अल्पसंख्यांक समुदायांसाठी सर्वोच्य असुरक्षेची भावना निर्माण करणार उरग्रे, त्याची परिणीती हिंदू जमातवाद्यांची झुंडीची हिंसा विरुद्ध मुस्लिम जमातवाद्यांची बायची हिंसा ह्या नित्याच्या झाल्या. भारतासह संपूर्ण उपखंडाने त्याचे परिणाम भोगले.

६. स्वातंत्र्योत्तर भारतातील जमातवादाच्या विकासात प्रथमदर्शनी परधर्मद्वेष हे कारण पुढे येते. इ. स. १९९२-९३ ची जमातीय दंगल (मंडल विरुद्ध कमंडल) यांत राजकीय भारतातील जमातवादी राजकारणाने त्यांची सिद्धता वेळोवेळी केली आहे.

७ भारतातील जातीय समीकरणे फक्त निवडणुकीपुरती मर्यादित नाहीत. ह्या जातीय समीकरणांना प्रदीर्घ काळाची सामाजिक प्रभुत्वाची परंपरा आहे. याचा परिणाम भारतातील जमातवादावर वळोवेळी दिसून येतो. जमातवादी पक्ष, संघटनांना निवडणुकीत यश तर मिळतेच. मात्र, त्यांची समाजमनावरील पकड बळकट होते.

८. जमातवादी शक्तींचे राजकारण, समाजकारण लैंगिकतेच्या मुद्यावर पितृसत्तासंवर्धनासाठी कार्यरत राहते.

९. परधर्मद्वेषाच्या जमातीय राजकारणासाठी जमातवादी शक्ती सामुहिक स्मृती, सामुहिक आघात, सामुहिक गौरव यांचा विपर्यस्त वापर करत असतात. यासाठी इतिहासाचे विकृतीकरण केले जाते. पाकिस्तानची निर्मिती हा इतिहास मुस्लिमांतील जमातवादी शक्तींसाठी सामुहिक गौरव म्हणून त्यांच्या मानसिकतेत कार्यरत असतो. तर त्याच वेळी हिंदूतील जमातवादी शक्तींसाठी हा सामुहिक आघात असतो.

१०. धर्म आणि संस्कृती ही जमातवादी शक्तींची हत्यारे आहेत. परंतु, धर्म आणि संस्कृतीचे व्यापक आकलन जमातवादविरोधी अभ्यासकांनी केले नाही. मार्क्सवादी अभ्यासप्रवाह जमातवादाकडे केवळ आर्थिक

संघर्ष म्हणून पहातो. तर जातीविरोधी अभ्यासप्रवाह केवळ जातीय शोषणाचा पैलू अधोरेखीत करतो. स्त्रीवादी अभ्यासक जमातवादाकडे केवळ स्त्रीविरोधी प्रकिया पितृसत्ताक प्रक्रिया म्हणून पाहतात. मात्र. भारतातील जमातवाद हा जातवर्गपितृसत्ता ह्या तिहेरी पायावर उभा आहे. भारतातील वर्गीनर्मिती ही जात आणि पितृसत्ता यांची अनन्यसाधारण वैशिष्ट्ये आणि हितसंबंध घेऊन कार्यरत आहे.

**सारांश :**

नागरी समाज या पाश्चिमात्य संकल्पनेवर आधारलेले धर्मनिरपेक्ष राष्ट्र-राज्य उभारण्याच्या मार्गात वास्तवात अनेक अडचणी कशा निर्माण होतात, हे जमातवादावरून दिसून येते. धार्मिक समाजगटांतील संघर्ष किंवा धर्माच्या नावाखाली प्रत्यक्षात हितसंबंधी गटांतील संघर्ष, अशा दुहेरी पद्धतीने जमातवादाचे विश्लेषण केले जात असते. जमातवाद समजून घेण्यासाठी, विविध धार्मिक गटांच्या हितसंबंधांतील संघर्ष या विद्यमान विश्लेषणाच्या पलीकडे जायला हवे आणि वसाहतीच्या काळापासून प्रभावी असलेल्या आधुनिक विचारांच्या मर्यादा जमातवाद रुजण्यास कितपत कारणीभूत ठरतात, याचा विचार व्हायला हवा. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत अपरिहार्यपणे उद्भवणाऱ्या विरोधाभासाचा परिपाक म्हणून जमातवादाकडे बघितल्यास त्यावर तोडगा काढण्याच्या दृष्टीने प्रयत्न करता येऊ शकतो.

## ३.२.३ प्रादेशिक असमतोलाचे राजकारण :

**प्रास्ताविक :**

भारताने संघराज्य शासनपद्धतीचा स्वीकार करुन राष्ट्रीय ऐक्य आणि प्रादेशिक अस्मिता यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. असे असले तरी भारतात आज प्रादेशिकवादाच्या समस्येने डोके वर काढले आहे. आपण ज्या प्रदेशात राहतो त्या प्रदेशाबद्दल प्रेम, अस्मिता असणे, जिव्हाळा वाटणे हा मानवी स्वभाव आहे. परंतु जेव्हा ही प्रादेशिक अस्मिता इतर प्रदेशांचा तिरस्कार करते आपल्या प्रदेशाचे हितानंतर राष्ट्रीय हिताला प्राधान्य ही भावना निर्माण होते. तेव्हा तिला प्रादेशिकवाद असे म्हणतात. राष्ट्रीय पातळीप्रमाणेच राज्य पातळीवरदेखील राज्यांतर्गत विभागीय संघर्ष निर्माण होत असतात. त्याला उपप्रादेशिकवाद असे म्हणतात. राज्यांतर्गत असंतुष्ट विभागातील लोक वेगळ्या राज्याची मागणी करतात. उदा. महाराष्ट्रातील स्वतंत्र विदर्भराज्याची मागणी, महाराष्ट्र राज्यात पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, कोकण असे चार प्रमुख प्रांत आहेत. या प्रांतामध्ये सामाजिक, सास्कृतिक, राजकीय, आर्थिक विषमता आढळते. तसेच या प्रांताचा विकाससारखा झालेला नाही. पश्चिम महाराष्ट्र व मुंबई शहराच्या तुलनेत विदर्भ आणि मराठवाडा हे प्राप्त मागासलेले आहेत. आर्थिक दृष्ट्या मागासलेले जिल्हे आजही विदर्भ-मराठवाड्यात पाहावयास मिळतात, यामुळे या प्रांतामध्ये विकासाचा प्रादेशिक असमतोल पहावयास मिळतो. यामुळे महाराष्ट्रात उपप्रादेशिकवादाची निर्मिती झाली आहे. विदर्भाला महाराष्ट्रातून वेगळे निघून स्वतःचे नवे राज्य स्थापन करावयाचे आहे.

या प्रकरणात आपण खालील मुद्यांचा अभ्यास करणार आहोत.

१) महाराष्ट्राची विभागवार रचना: कोकण, मराठवाडा, विदर्भ

२) दांडेकर समिती अहवाल

३) वैधानिक विकास मंडळ

**महाराष्ट्राची विभागवार रचना : कोकण, मराठवाडा, विदर्भ :**

१९५६ मध्ये द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना होण्यापूर्वी मराठी भाषिक प्रांत मुंबई राज्य, मध्य प्रदेश आणि निझामाच्या हैद्राबाद राज्यात विभागलेला होता. मुंबई राज्यात मुंबई शहर, पश्चिम महाराष्ट्र, कोकण या प्रांताचा समावेश होता. मध्यप्रदेशात वऱ्हाड व नागपूर तर मराठवाडा विभागाचा समावेस हैद्राबाद राज्यात करण्यात आला होता. परंतु या प्रांतातील काही मराठी भाषिक लोकांना स्वतःचे संयुक्त महाराष्ट्र नावाचे वेगळे राज्य हवे होते. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनानंतर १ मे १९६० रोजी मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. वास्तविक पाहता महाराष्ट्राचे चार विभाग पडतात.

१) कोकण, २) पश्चिम महाराष्ट्र, ३) मराठवाडा, ४) विदर्भ परंतु प्रशासनाच्या सोयीकरता राज्याची प्रादेशिक प्रशासकीय विभागात विभागणी करण्यात आली आहे. सुरुवातीला मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद असे चार प्रशासकीय विभाग होते. त्यानंतर पुणे व नागपूर विभागांची विभागणी करून अनुक्रमे नाशिक व अमरावती या प्रशासकीय विभागांची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे प्रशासकीय विभाग व त्यातील जिल्ह्याची माहिती खालीलप्रमाणे -

१) मुंबई विभाग - मुंबई शहर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग, पालघर (ठाणे जिल्ह्यातून विभाजित)

२) पुणे विभाग- पुणे. अहमदनगर, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापुर

३) नाशिक विभाग - नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार.

४) औरंगाबाद - औरंगाबाद, जालना, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातुर, परभणी, हिंगोली.

५) नागपूर विभाग - नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोदिया, वर्धा, गडचिरोली.

६) अमरावती विभाग - अमरावती, अकोला, वाशिम, बुलडाणा, यवतमाळ

या पैकी मुंबई विभागाचा समावेश कोकणात केला जातो. पुणे विभाग पश्चिम महाराष्ट्रात येतो. मराठवाडा प्रांतात औरंगाबाद तर नागपूर, अमरावती विभागाचा समावेश विदर्भ प्रांतात येतो. या ठिकाणी आपण कोकण, मराठवाडा आणि विदर्भ या प्रांतांची वैशिष्ट्ये आणि समस्या अभ्यासणार आहोत.

**कोकण विभाग :**

ठाणे, रायगड (पूर्वीचा कुलाबा) रत्नागिरी, पालघर या पाच जिह्यांचा समावेश कोकण विभागात होतो. वास्तविक पाहता मुंबई शहर देखील कोकणातच येते. परंतु महानगराचे असा धारण वैशिष्टये लक्षात घेऊन त्या विषयी स्वतंत्र विचार करावा लागतो. पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे कोकण प्रांत महाराष्ट्रातील प्रमुख घटक मानला जातो. या विभागाचा समावेश मुंबई प्रशासकीय विभागात केला जातो. याचे कारण म्हणजे कोकण मुंबईच्याजवळ आहे. कोकण विभाग मुंबई व पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत अत्यंत अविकसित आहे. कोकणातील अर्थव्यवस्था उदर निर्वाही स्वरुपाची आहे. कारण कोकणातून अनेक व्यक्ती उदरनिर्वाहासाठी मुंबईसह इतरत्र स्थलांतर करतात.

कोकण विभागाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे -

**१. भौगोलिक वैशिष्ट्ये :**

सह्याद्री पर्वत रांगा ते दक्षिणेला गोवा राज्य अशी ७२० कि. मी. लांबीच्या चिंचोळ्या किनारपट्टीला कोकण म्हणतात. कोकण प्रांताचे तीन भाग पडतात ते म्हणजेच उत्तर कोकण, ठाणे जिल्हा व मुंबई मध्य कोकण रायगड दक्षिण कोकण रत्नागिरी, सिंधुदुर्ग कोकणातील जमिन डोंगराळ व खडकाळ स्वरुपाची आहे. पर्जन्यमानाचे प्रमाण कोकणात सर्वाधिक असले तरी उतार असलेल्या भूपृष्ठ रचनेमुळे पाणी अरबी समुहात पाहून जाते. या विभागातील प्रमुख नद्या म्हणजे सूर्या, वैतरणा, दमणगंगा. उल्हास, कुर्ली, कुडलिका, काळ, सावित्री, वसिष्ठि, शारण, तेरेखोल इ. होय. या नद्यांच्या मुखाशी समुद्राचे पाणी आत आल्यामुळे खाड्यांची निर्मिती झाली आहे. वसई, धरमतर, महाड, चिपळूण, जयगड, राजापूर, विजयदुर्ग या महत्त्वाच्या खाड्या आहे. नद्यांची लांबी कमी, पावसाळ्यात पाणी भरपूर परंतु उन्हाळ्यात त्या कोरड्या असल्यामुळे जमिनीची धूप वाढते. आक्रमण आणि त्यातून जमिनीचे सारीकरण, जमिनीचे खचणे ही नैसर्गिक संकटे कोकणात नेहमीच ओढावतात. जांभ्यामुळे हे प्रमाण सर्वाधिक आहे.

**२) आर्थिक विकास :**

प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीमुळे कोकणचा आर्थिक विकास अत्यंत कमी प्रमाणात झाला आहे. जमिनीरेताड व हलक्या प्रतीची असल्यामुळे कृषी विकासास वाव मिळत नाही, उपलब्ध भौगोलिक परिस्थितीमुळे भातशेती केली जाते. डोंगराळ क्षेत्रात फळबागायत केली जाते. परंतु वाहतूक दळणवळणाच्या साधनांची कमतरता असल्याने फळशेती किफायतशीर ठरत नाही. फळबागायती शेतीत प्रामुख्याने आंबा, काजू. स्थानिकाच्या दारिद्र्याचा फायदा घेऊन विक्रो तसेच रायगड जिह्यातील लोणेरे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ सुरू करण्यात आले आहे. कोकणातील सर्व महाविद्यालये मुंबई विद्यापीठाशी संलग्न आहे. साक्षरतेच्या दृष्टीने कोकण विभाग हा प्रगतिपथावर आहे. सिंधुदुर्ग हा महाराष्ट्रातील सर्वांत साक्षर जिल्हा समजला जातो. साक्षरतेचा परिणाम म्हणजे सर्वसामान्य जनतेतील राजकीय जनजागृतीत वाढ झाली आहे.

**६) सामाजिक रचना :**

कोकणची सामाजिक रचना पश्चिम महाराष्ट्राप्रमाणेच आहे. मराठा कुणबी जातिसमुहाची संख्या ३८ टक्के आहे. त्याचप्रमाणे आगरी कोळी, भंडारी जातींच्या लोकांची संख्या जास्त आहे. ठाणे जिह्यात आदिवासी जमातींची संख्या सर्वाधिक आहे. त्यातही वारली, ठाकूर या आदिवासी जमातीचा भरणा अधिक आहे.

**७) पर्यटन :**

पर्यटन क्षेत्राचा विचार करता कोकणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. अथांग समुद्र किनारा, सुंदर निसर्ग सौंदर्यामुळे कोकणाला पर्यटनाचा समृद्ध वारसा लाभला आहे. रायगड जिह्यातील रेवदंडा, चौल, मुरुड-जंजिरा, अलिबाग याठिकाणी महत्त्वाचे किल्ले आहे. तसेच रत्नागिरी, सिंधुदुर्गाचाही पर्यटनामुळे विकास झाला आहे. महाराष्ट्र शासनाने पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी विविध उपाययोजना राबविल्या आहेत.

**८) सांस्कृतिक रचना :**

मुंबईतील नवे विचारप्रवाहाचे वारे कोकणात लगेच वाहतात. याचे कारण म्हणजे मुंबईतील कामगारवर्ग दरवर्षी गौरी-गणपती, दिवाळीच्या सणाला आपापल्या खेड्यांत जातात. खेड्यांशी असलेला सांस्कृतिक संबंध जपण्याचा ते प्रयत्न करतात. मुंबईत आपली अस्मिता टिकविण्यासाठी भजनी मंडळाद्वारे सतत धडपड सुरु असते. ही भजनी मंडळे म्हणजे त्या त्या खेड्यांची आठवण जपणारी व सांस्कृतिक बंध दृढ करणारी साधने आहेत. मराठवाडा आणि कोकण विभाग यांच्यात मागासलेपणाबाबत स्पर्धा असली तरी या दोन विभागात कोकण वरचढ आहे. याचे कारण म्हणजे साक्षरतेचे प्रमाण कोकणात सर्वाधिक आहे. तसेच कोकण मुंबई शहराजवळ असल्याने आधुनिकतेचा पाया कोकणात बऱ्याच अंशी घातलेला आहे. उपजीविकेचे माहेरघर म्हणून कोकण मुंबईकडे पाहते. असे असलेतरी प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती वाहतूक आणि दळणवळणाच्या साधनांची कमतरता लोकसंख्येचे स्थलांतर आणि कार्यक्षम नेतृत्वाचा अभाव यामुळे राज्याचा राजकीय प्रक्रियेत या विभागाचे स्थान दुय्यम आहे.

**मराठवाडा विभाग :**

मराठवाडा हा राज्यातील सर्वाधिक अप्रगत विभाग आहे. या भागाच्या मागासलेपणाची प्रमुख कारणे म्हणजे प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती आणि निझामी राजवटीची परंपरा होय. वास्तविक पाहता मराठवाडा हा महाराष्ट्राच्या केंद्रस्थानी आहे. पण अन्य भागांच्या तुलनेत तो अविकसित आहे. भौगोलिकदृष्ट्या केंद्रस्थानी विपुल जलसंपत्ती, प्राचीन इतिहास यांचा उपयोग झालेला नाही. निझामी राजवटीत मराठवाड्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. परंतु सद्य:परिस्थितीत या विभागाच्या विकासाकडे लक्ष देण्यात येत आहे. निझामी राजवटीपेक्षा मराठी राजवट बरी. अशी येथील जनतेची धारणा आहे. मराठवाडा विभागात औरंगाबाद, उस्मानाबाद, बीड, परभणी, नांदेड आणि नव्याने निर्माण केलेल्या जालना, लातुर आणि हिंगोली अशा आठ जिल्ह्यांचा समावेश होतो. १९४८ पर्यंत मराठवाडा निझामाच्या राजवटीखाली होता. त्यानंतर हा प्रांत संयुक्त महाष्ट्राच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रात सामील झाला. महाराष्ट्राच्या एकूण प्रदेशापैकी २० टक्के भूभाग आणि १८ टक्के लोकसंख्या मराठवाडा विभागात येते. औरंगाबाद हे मराठवाडा विभागाचे मुख्यालय आहे. मराठवाड्याची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीप्रधान असून लागवडीखालील क्षेत्र बऱ्याचअंशी कोरडवाहू आहे. पाऊसाच्या पाण्यावर शेती अवलंबून असल्याने मराठवाड्यांतील काही प्रदेश कायम दुष्काळाच्या छायेखाली असतो. औद्योगिकरणाचे प्रमाण देखील कमी आहे.

**१. भौगोलिक वैशिष्ट्ये :**

मराठवाड्यातील जमिन अत्यंत सुपीक आणि काळीभोर आहे. तसेच विपुल जलसंपत्तीची देणगी मराठवाड्याला लाभली आहे. परंतु शासनाद्वारे जलसिंचन प्रकल्प या भागात उभारले गेले नाही. त्यामुळे कृषी व्यवसाय पूर्णत: पावसाच्या पाण्यावर अवलंबून असतो. पर्जन्यमानाची अस्थिरता आणि अनिश्चितता असल्याने बराचसा भाग अल्पग्रस्त असतो. नाशिक जिल्ह्यात उगम पावणारी गोदावरी नदी औरंगाबाद, जालना, नांदेड या जिल्ह्यातून वाहते मांजाही गोदावरीची उपनदी बीड जिल्ह्यात तर पूर्णानदी परभणी जिल्ह्यात उगम पावते, लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचे जलस्रोत उपलब्ध नाही. यामुळे या भागातील शेती कोरडवाहू प्रकारची आहे. या भागावर कायम दुष्काळाची छाया पसरलेली असते. परिणामी लोकसंख्येचे स्थलांतर

राज्याच्या इतर भागात होत असते. १९५६ नंतर गोदावरी पूर्ण नद्यांवर अनुक्रमे जायकवाडी आणि भंडारधरा धरणे झाल्यामुळे औरंगाबाद, जालना, परभणी आणि नांदेड जिल्ह्यातील काही भागसिंचनाखाली खाली आला आहे. उपलब्ध जलसंपत्तीचा योग्य वापर केल्यास या भागात कृषी विकासाला चालना मिळू  शकेल, महाराष्ट्र शासनाचा जलसंवर्धन कार्यक्रम मराठवाड्याचा कायापालट ठरू शकेल.

**२. आर्थिक विकास :**

निझामी राजवटीत या भागाच्या आर्थिक विकासाकडे पूर्णत दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे मराठवाडा प्रांताचा विकास होऊ शकलेला नाही. त्याचप्रमाणे मराठवाड्यांतील बरीच गावे असल्याने सर्वसाधारणपणे मराठवाड्याचा कृषी विकास होऊ शकलेला नाही. परंतु मराठवाड्याला महाराष्ट्राचे धान्याचे कोठार असे म्हटले जाते. या भागात ज्वारी, कापूस, कडधान्यांची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. तसेच तेलबिया आणि ऊसाची लागवड ही मोठ्या प्रमाणात केली जाते. जायकवाडी आणि एलदरी प्रकल्पा व्यतिरिक्त मराठवाड्यांत ३० मध्यम आणि ११५ लघुपाटबंधारे प्रकल्प उभारण्यात आले आहे. १९६३ च्या बर्वे आयोगाने आपल्या अहवालात असे म्हटले आहे की, मरठावाड्यात ७० मध्यम आणि ७०० लघुपाटबंधारे प्रकल्पांची क्षमता आहे. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील पाटबंधारे खाते मराठवाड्यांच्या नेत्यांकडे बराच काळ होते. परंतु प्रादेशिक नेतृत्वाच्या अंतर्गत भांडणांमुळे त्या भागाचा जलसिंचन क्षेत्रात विकास झाला नाही.

**३. औद्योगिक विकास :**

मराठवाडयाची अर्थव्यवस्था कृषीप्रधान असल्याने या भागात औद्योगिकरणाचे प्रमाण अत्यल्प आहे. औरंगाबाद, लातूर, नांदेड, या शहरातच औद्योगीकरण घडत आले आहे. इतर जिल्ह्ये मात्र औद्योगिकदृष्ट्या मागास आहे. नवनवीन कारखाने आज या भागात सुरू होत आहे. पर्यटनाच्या दृष्टीने विचार करता औरंगाबाद शहराला महत्त्व प्राप्त झाले आहे. पैठण येथे जायकवाडी धरण (नाथ सागर) प्रकल्प उभारण्यात आला आहे. तसेच वेरुळ अजिंठा येथे प्राचीन बुद्धकालीन लेण्या आहेत. त्यामुळे जगभरातील पर्यटक अजिंठा बुद्ध लेणी, वेरूळ लेण्यामुळे औरंगाबाद शहराला भेट देतात. परिणामी येथे हॉटेल व पर्यटन व्यवसायाचा विकास घडून आला  आहे.

**४. वाहतूक आणि दळणवळण :**

कोकण, प्रांताप्रमाणेच मराठवाडा ही वाहतुक दळणवळणाच्या दृष्टीने मागासलेला आहे. रेल्वेमार्ग कमी असले तरी रस्त्यांचे जाळे या भागात मोठ्या प्रमाणात पसरलेले आहे. मराठवाड्यात आजघडीला ४१९२ कि. मी. लांबीचे पक्के डांबरी रस्ते असून महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या आणि खासगी बससेवा उपलब्ध आहे. नांदेड व औरंगाबाद येथे वायू वाहतूक सेवा उपलब्ध आहे.

**५. शिक्षण :**

स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाडा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला होता. मराठवाडा विभागात औरंगाबाद येथे फक्त एकच इंडरमीजियट विद्यालय होते. आजघडीला मराठवाड्यात एक विद्यापीठ आणि १५० च्या वर विद्यालये आहे. तसेच तंत्रशिक्षणाची सोयदेखील उपलब्ध आहे. १९७३ मध्ये परभणी येथे कृषी विद्यापीठाची

स्थापना करण्यात आली. १९६० मध्ये मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. त्याचेच नामांतर नंतर १४ जानेवारी, १९९४ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे करण्यात आले. याशिवाय त्याचवेळी नांदेड येथे स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना करून औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय सुरू केले असे असले तरीही साक्षरतेच्या दृष्टीने मराठवाडा अविकसित आहे. आजही मराठवाड्यात शैक्षणिक मागासलेपण बघण्यास मिळते.

**६. सामाजिक रचना :**

पश्चिम महाराष्ट्र व कोकण प्रांताप्रमाणेच मराठवाड्यात मराठा कुणबी जातिसमूहाचे संख्याबळ जास्त आहे. त्यांची लोकसंख्या ३७ टक्के आहे. इतर मागासवर्गीयांचे प्रमाण ३२ टक्के आहे. अनुसूचीत जातींचेप्रमाणे लक्षणीय असून अनुसूचित जातींपैकी अनेक जणांनी बौद्धधर्माचा स्विकार केला आहे. तसेच नवबौद्धगट समाजातील महत्वाचा घटक ठरला आहे. त्याचप्रमाणे मुस्लिम धर्मियांचे प्रमाण ११ टक्के आहे.

**७. राजकीय सहभाग :**

महाराष्ट्राच्या राजकारणात मराठवाड्याला नगण्यस्थान आहे. राजकीयदृष्ट्या मराठवाडा कॉंग्रेसशी निष्ठावंत आहे. असे सर्व साधारण म्हणता येईल. सेना-भाजपयुतीनेही अनेक ठिकाणी कॉग्रेसच्या विधान सभेतील जागा जिंकल्या आहेत. मराठवाड्यातील अग्रगण्य नेते म्हणून शंकरराव चव्हाण यांचा उल्लेख केला जातो. महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद त्यांनी दोनदा भूषवले, केंद्रातही त्यांनी महत्त्वपूर्ण पदे भूषवले आहेत. चव्हाणांनी १९८५ मध्ये राजीनामादिल्यानंतर शिवाजीराव निलंगेकर हे मराठवाड्यातील नेते मुख्यमंत्री झाले. परंतु पश्चिम महाराष्ट्राच्या नेत्यांच्या तोडीसतोड असा नेता मराठवाड्यात निर्माण झालेला नाही. परंतु गोपीनाथरावजी मुंडे, विलासराव देशमुख राजकीय आकांक्षांच्या बाबतीत मराठवाडा पूर्णता वेगळा आहे. मराठवाड्याला स्वतंत्र राज्याची अभिलाषा नाही. १९९५ मध्ये मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापनाझाल्याने मराठवाड्याच्या विकासाला चालना मिळेल, अशी आशा आहे. मागास प्रदेशांचा मुख्य आक्षेप त्या प्रदेशाच्या विकासाकडे सरकारचे झालेले दुर्लक्ष असा असतो. असा दावा विरोधक करतात तर सत्ताधारी पक्ष आपल्या धोरणाची समर्थन करतात.

**विदर्भ प्रांत :**

१९५६ पूर्वी विदर्भ प्रांत हा मध्य प्रदेश सेंट्रल प्रॉव्हित्सेन एॅन्ड ठेरारसी. पी. बेरार आणि विदर्भ प्रांताचा भाग होता. या प्रांताची राजधानी नागपूर शहर होती. ज्या मराठी भाषिक विभागाला आपण विदर्भ म्हणतो. तो विभाग ऐतिहासिकदृष्ट्या वऱ्हाड आणि नागपूर या दोन क्षेत्रात विभागलेला होता. १८६० पर्यंत बऱ्हाडचे अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलडाणा हे चार जिल्हे निझामाच्या राजवटीखाली होते. १८६० मध्ये इंग्रजांनी ते भाडेतत्त्वावर घेतले. १९०३ मध्ये सी. पी. एॅन्ड बेसरमध्ये त्यांचा समावेश केला. तर १८४८ पर्यंत नागपूर क्षेत्र पेशव्याचे सुभेदार भोसल्यांकडच्या नियंत्रणाखाली होता. लॉर्ड डलहौसीने दसकविधि विधानाच्या नावाखाली १८४८ मध्ये हे संस्थान खालसा करून मध्यमांतात त्याचा समावेश केला. मध्य प्रांतातील

बहुसंख्य भाग हिंदी भाषिक असल्याने, नागपूर क्षेत्राची इतर भारतीय भाषिक भागांतून वेगळी अस्मिता निर्माण झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेपूर्वी विदर्भातील त्यांनी स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी केली. आजही कधीतरी वेगळ्या विदर्भ राज्याची मागणी केली जाते. परंतु निदर्भ प्रांतएक संध नाही. व्हाळ आणि नागपूर क्षेत्राची अस्मिता वेगवेगळी आहे. आज विदर्भात नागपूर, नार्ग, चंद्रपूर, गढ़चिरोली (चंद्रपूरमधून विभाजीत), भंडारा, गोंदिया, यवतमाळ, अकोला, वाशिम, अमरावती, बुलढाणा, या ११ जिह्यांचा समावेश होतो. प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने शासनाने नागपूर व अमरावती अशा दोन प्रशासकीय विभागांची निर्मिती केली आहे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी २८ टक्के लोकसंख्या विदर्भात आढळते. महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळापैकी ३० टक्के क्षेत्र या विभागाने व्यापले आहे. नागपूर हे विदर्भातील महत्त्वाचे शहर आहे.

**विदर्भ विभागाची वैशिष्ट्ये व समस्या खालीलप्रमाणे :**

**१. भौगोलिक परिस्थिती :**

महाराष्ट्राच्या उत्तर पूर्वेला सातपुडापर्वत रांगेत विदर्भ प्रांत वसलेला आहे. विदर्भातील जमिन अत्यंत काळीभोर व सुपीक असून कापसाच्या लागवडीस उपयुक्त आहे. पूर्णा, वर्धा, प्राणहिता, वैनगंगा, पैनगंगाया महत्त्वाच्या नद्या विदर्भातून वाहतात. थोडक्यात, सुपीक जमिन नियमित पर्जन्य मान आणि जलसंपत्तीची उपलब्धता असलेल्या विदर्भात भौगोलिक परिस्थिती अनुकुल आहे. या व्यतिरिक्त विदर्भात कोळसा, कच्चे लोखंड, मैंगनीज, बॉक्साईट, चुनखडी इ. खनिजे मोठ्या प्रमाणात आढळतात.

**२. वाहतूक व दळणवळणाची साधने :**

विदर्भातील वाहतूक व दळणवळणाच्या साधनांची उपलब्धता पश्चिम महाराष्ट्रांच्या तुलनेत खाली आहे. रेल्वे आणि बसद्वारे वाहतुक केली जाते. नागपूर शहरात हवाई वाहतुकीची सोय उपलब्ध असून याच शहरापासून दिल्ली, कोलकाता, चेन्नई, मुंबईला जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाची बांधणी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे अलिकडच्या काळात चंद्रपूर व गडचिरोली या आदिवासी क्षेत्रात रस्तेबांधणीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

**३. कृषी व्यवस्था :**

विदर्भातील जमिन सुपीक असल्याने आणि पाण्याची सोय मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने विदर्भातील काही भाग जलसिंचीत करण्यात आला आहे. विदर्भात प्रामुख्याने कापूस, ज्वारी, तुरडाळ इ. पिके घेतली जातात. नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात संत्री, केळी तर भंडार जिल्ह्यात ऊस आणि कलिंगडाची लागवड केली जाते. भंडारा, चंदपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात भाताचे पिक घेतले जाते. कापूस व्यापाराच्या निमित्ताने मारवाडी, गुजराती, पारशी व्यापाऱ्यांनी आपले व्यवसाय स्थापन केले. त्यात प्रचंड पैसा कमावला. त्यांनी कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जाऊ पैसे देऊन कर्जबाजारी केले. त्यांच्या जमिनी हडप केल्या. कोणताच मार्ग उपलब्ध न राहिल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आत्महत्या केल्या.

**४. औद्योगिकरण :**

संयुक्त महाराष्ट्रात सामील होण्यापर्यंत विदर्भ औद्योगिकदृष्ट्या मागासलेला होता. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर विदर्भात औद्योगिक वसाहतींची निर्मिती करण्यात आली. बल्लारपूर येथे कागद कारखाना, भारत सरकारचा वेस्टर्न कोलफिल्डस लि. हा उपक्रम, तसेच भद्रावती येथे चिनीमातीच्या भांड्यांचा कारखाना आहे. नागपूर हिंगणघाट, पुलगाव, यवतमाळ येथे कापसाचा व्यापार चालतो. तसेच येथे कापड कारखाने देखील आहेत. गडचिरोलीत सागवान लाकुड उच्च दर्जाचे आहे. भंडाऱ्यात पितळी भांड्यांचे उत्पादन घेतले जाते. याशिवाय भंडारा आणि भांडक येथे दारुगोळ्याचे सरकारी कारखाने आहेत. बापरखंडा व नागपूरशहराजवळ कोराडी येथे औष्णिक विद्युतनिर्मिती केंद्रे आहेत. चंद्रपूर व भंडाऱ्यात भात सडण्याच्या गिरण्या व विडी वळण्याचे छोटे उद्योग आहेत. गेल्या काही वर्षात विदर्भात औद्योगिकरण मोठ्या प्रमाणात घडून आले आहे.

**५. शिक्षण व्यवस्था :**

स्वातंत्र्यपूर्व काळात विदर्भात शिक्षणाच्या प्रचार-प्रसाराला सुरुवात झाली असली तरी, विदर्भ शिक्षणाच्या बाबतीत काहीशा प्रमाणात मागे आहे. विदर्भातील आदिवासी क्षेत्रात आजही साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. नागपूर येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ तर अमरावती येथे संतगाडगे बाबा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. याशिवाय अकोला येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे तांत्रीक शिक्षण व अनेक शिक्षण शास्त्र महाविद्यालयांची स्थापना केली आहे.

**६. सामाजिक रचना :**

पश्चिम महाराष्ट्रापेक्षा विदर्भाची सामाजिक रचना भिन्न आहे. तेली. कोष्टी, कोमटी या जातीची लोकसंख्या विदर्भात लक्षणीय आहे. विदर्भात दलित आणि आदिवासींची संख्या ३४ टक्के आहे. गडचिरोली- चंद्रपूर भागात माडिया, गोंड आदिवासी जमातीची वस्ती आहे. मराठा-कुणबीजाती समुहाची संख्या कमी असून, विदर्भातील जमिनदार व श्रीमंत देशमुखवर्ग स्वत:ला उच्च वर्ग समजतो. गरीब शेतकरी कुणबी वर्गाशी सामाजिक संबंध ठेवण्यात देशमुख वर्गाला कमीपणा वाटतो. नागपूर विभागात अमराठी भाषिकाचे प्रमाण कमी आहे.

**७. स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी :**

संयुक्त महाराष्ट्र स्थापन होण्यापूर्वीपासूनच विदर्भातील काही नेत्यांची स्वतंत्र नागविदर्भ राज्य स्थापन करण्याची मनिषा आहे. राज्य पुनर्रचना आयोगानेही स्वतंत्र विदर्भ राज्य स्थापन करण्याची तयारी दर्शविली होती. परंतु स्वतंत्र विदर्भ अस्तित्वात आला नाही. पश्चिम महाराष्ट्राला अग्रमान देण्याची तयारी विदर्भाने कधीच दाखवली नाही. पश्चिम महाराष्ट्राच्या राजकारण्यांवर स्वतंत्र विदर्भाच्या मागणीची टांगती तलवार ठेवून वेळ प्रसंगी दबावाचा वापर करून विदर्भातील नेत्यांनी सत्तेत भागीदारी मिळवली. या सर्वांचा परिणाम म्हणून कधी-कधी स्वतंत्र विदर्भाची मागणी केली जाते. पश्चिम महाराष्ट्र व मुंबई प्रांताच्या तुलनेत विदर्भप्रांताचा विकास पाहिजे तितक्या प्रमाणात झालेला नाही. त्यामुळे विदर्भ मागास आहे. त्यामुळे विदर्भाच्या स्वतंत्र विकासासाठी काही नेतेमंडळी स्वतंत्र विदर्भाची मागणी करतात. त्यासाठी नागविदर्भ समिती स्थापण्यात आली. बापूजी अणे, ब्रिजलाल बियाणी यांनी स्वतंत्र विदर्भाचा पुरस्कार केला. नाशिकराव तिरपुडे यांनीही मधूनमधून स्वतंत्र

विदर्भाची हाक दिली आहे. त्याचप्रमाणे काहीने त्यांनी स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीला विरोध केला आहे. विदर्भाच्या मागासलेपणाचे आणखी एक कारण म्हणजे राजकीय उदासीनता. विदर्भातील नेत्यांकडे मुख्यमंत्रीपदाशिवाय अनेक वर्षे इतरही अनेक महत्त्वाची खाती होती. सरकारी सत्ता विदर्भातील काहीजणांच्या हातात असली तरी सामान्य जनता मात्र उपेक्षित राहीली. जनतेचा विकास झाला नाही. तेव्हा स्वतंत्र विदर्भाच्या मागणीचा साक्षेपाने विचारविनिमय व्हायला पाहिजे.

**१. कोकण विभागाची वैशिष्ट्ये व समस्या सांगा.**

**दांडेकर समिती अहवाल :**

भारतीय संघराज्यात सध्या २८ राज्यांचा समावेश आहे. प्रत्येक राज्याचा विकास वेगवेगळ्या स्तरावर झालेला दिसून येतो. याविकासात्मक असमतोलातून प्रांतीयवादाच्या समस्येने ठोके वर काढले आहे. प्रत्येक राज्याचे विविध विभाग पाळले आहे. या प्रत्येक विभागाचा विकास देखील कमी अधिक प्रमाणात घडून आला आहे. महाराष्ट्र राज्याचे प्रमुख चार विभाग पडतात. ते म्हणजेच कोकण, मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र. यातील पश्चिम महाराष्ट्राचा अपवाद वगळता इतर विभाग आजही मागासलेले आहे. त्यांचा सर्वांगीण विकास आजही झालेला नाही. राज्यातील विकासात प्रादेशिक असमतोल किती आहे. त्याचे नेमके मोजमाप कसे करावे व तो दूर करण्याचे उपाय कोणते हे जाणून घेण्यासाठी शासनाने १९८३ मध्ये काही निवडक अर्थतज्ञांची एक समिती नेमली. या समितीचे अध्यक्ष सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. वि. म. दांडेकर हे होते. त्यांच्या नावावरुन या समितीला दांडेकर समिती असे म्हटले जाते. त्यानंतर शासनाने विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि इतर प्रांतांमध्ये विकासात्मक समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी चार उपसमित्या नेमल्या. या समित्यांचे प्रमुख कार्य म्हणजे आपापल्या प्रांतातील विकासाचा अभ्यास करून त्यासंबंधीचा अहवाल दांडेकर समितीने शासनाला सादर केला. या अहवालांमध्ये आधारित दांडेकर समितीने प्रादेशिक असमतोलसंबंधी उपाययोजना शासनाला सुचवल्या.

दांडेकर समितीने खालील बाबी गृहीत धरुन त्याआधारे आपले कार्य सुरू केले.

१) विकासाच्या असमतोलाचे घटक निश्चित करणे.

२) त्या घटकांच्या आधारे १९६० ते १९८२-८३ मध्ये जिल्ह्यांचा विकासाचा क्रम लावणे.

३) १९६० पासून शासनाने जिल्हा विकासासाठी किती खर्च केला आहे हे तपासून त्यानुसार जिल्ह्याच्या विकासात्मक खर्चाचा क्रम लावणे.

४) शासनाची विकाससंबंधीची ध्येय धोरणे ठरवून त्यांच्या मर्यादा स्पष्ट करणे.

५) प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

वरील बाबींचा अभ्यास केल्यानंतर समितीने एकूण २८ विकासात्मक घटकांची निश्चिती केली. त्यात रस्ते, जलसिंचन ग्रामीण विद्युतीकरण, तांत्रिक शिक्षणाच्या सोयी, आरोग्याच्या सोयी, पाणीपुरवठा, पशुसंवर्धन अशा घटकांचा समावेश होतो. यासमितीने केवळ संख्यात्मक माहिती गोळा केली नाही तर प्रत्येक जिल्ह्याला

भेट देऊन जिल्ह्याच्या विकासाची पाहणी केली. एका वर्षाच्या काळात सभा घेतल्या. एप्रिल १९८४ मध्ये समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला.

**असमतोल व विकास :**

दांडेकर समितीच्या अहवालाची मुख्य वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे –

**१. नागपूर करार :**

१९५३ च्या नागपूर करारात प्रादेशिक असमतोलासंबंधी विचार विनिमय करण्यात आला होता. त्यामध्ये विदर्भ व मराठवाडा या प्रांताच्या विकासासाठी उपाय योजना सुचविण्यात आल्या होत्या. परंतु याबाबत कोणत्याही प्रकारचे पाऊल उचलले गेले नाही. समितीच्या मतानुसार, विदर्भ, मराठवाडा हे प्रांत अविकसित राहिले.

**२. जिल्हा विकासाचा घटक :**

नागपूर करारात असे म्हटले होते की, दरवर्षी मागासलेल्या प्रांताचा अहवाल राज्य विधिमंडळापुढे सादर केला जाईल. परंतु या विकासाचा वार्षिक अहवाल विधानसभेत सादर केला गेला नाही. नागपूर करारानुसार प्रदेश हा विकासाच्या मुख्य घटक मानला गेला तर तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी विदर्भ किंवा मराठवाडा या प्रदेशांच्या विकासाचा आग्रह न धरता जिल्हा हा घटक मानावा, असे म्हणून नाईक यांनी १९६९ मध्ये नागपूर करार गुंडाळून ठेवला. या घटनेवर कोणत्याही नेत्याने आवाज उठवला नाही.

**३. विकसित आणि अवकसित जिल्हे :**

राज्यातील एखाद्या जिह्याचा विकास कितपत झाला आहे? हे कोणत्या आधारावर ठरवावे? हा मोठा प्रश्न समितीसमोर होता. म्हणून जिल्ह्याच्या विकासासाठी समितीने २८ घटक निर्माण केले. उदा. रस्ते, वाहतूक व दळणवळणाची साधने, शिक्षणांची सुविधा इ. या घटकांच्या आधारावर समितीने असे मत व्यक्त केले की, मुंबई जिल्हा हा इतर जिल्ह्यापेक्षा विकसित जिल्हा आहे. विदर्भातील जिल्हे मराठवाड्यांतील जिल्ह्यापेक्षा थोडे बहुत विकसित आहे.

**४. विकासात्मक खर्च :**

विकसनशील जिल्ह्यांचा अधिक विकास व्हावा आणि जे जिल्हे अविकसित आहेत त्यांच्यात किमान सुधारणा व्हावी, यासाठी दांडेकर समितीने शासनाच्या विकासात्मक खर्चाचा अहवाल विधिमंडळा पुढे सादर केले. त्यानुसार १९८४ मध्ये ३.१८७ कोटी रुपये खर्च जिल्ह्याच्या विकासासाठी खर्च करण्याची गरज आहे असे नमूद केले होते.

**दांडेकर समितीच्या उपाययोजना :**

१. शासनातर्फे जो एकूण खर्च केला जातो, त्यापैकी किमान ४० टक्के खर्च जिल्ह्यांच्या विकासासाठी केला जावा.

२. शासनाने जिल्हापातळीवर विविध विकासात्मक योजना राबवल्या पाहिजे. ज्यात प्रत्येक जिल्ह्याच्या विकासासाठी शासनाने खर्च द्यावा.

३. जिल्ह्यात विकासात्मक प्रकल्प राबविले जात असतील तर त्यातील १५ टक्के खर्च शासनाने उचलला पाहिजे.

४. दरवर्षी शासनातर्फे जे अंदाजपत्रक तयार केले जाते. त्यामध्ये प्रत्येक विभागासाठी लागणारा खर्च नमूद करावा.

५. शासनाने प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा नियोजन आणि विकास समिती स्थापन करावी. या समितीचे मुख्य कार्य म्हणजे जिल्ह्याचा होणारा विकासात्मक खर्च ठरविणे व त्याबाबत सूचना शासनाला देणे.

६. जिल्हा नियोजन आणि विकास समितीद्वारे दरवर्षी एक कृती योजना (Action Plan) तयार केला जावा. त्यात जिल्ह्याच्या होणाऱ्या वार्षिक विकासाचा आढावा घेतला जावा.

७. जिल्ह्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे त्यानंतर त्याची फेरतपासणी करावी.

८. थोडक्यात आर्थिक आवक कमी आणि अपेक्षा फार जास्त अशी परिस्थिती महाराष्ट्राची आहे. त्यामुळे सर्व विभागांचा विकास ज्याप्रमाणात व्हायला पाहिजे होता तेवढा तो झाला नाही. प्रत्येक विभागाच्या विकासासाठी पैशाची आवश्यकता होती असे असले तरी पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत कोकण, मराठवाडा, विदर्भ हे प्रांत मागासलेलेच होत राहिले. कोणत्या विभागाचा अनुशेष किती? हे ठरविण्यासाठी दांडेकर समिती नेमली गेली. तिच्या शिफारशीप्रमाणे अनुशेष भरून काढण्याची तरतूद महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात होऊ लागली. असे असूनही विदर्भ, मराठवाडा आणि कोकण या विभागांचा विकासाचा अनुशेष तातडीने भरून काढणे आणि अल्पविकसित विभागाच्या विकासाकरिता उदार दृष्टीकोन स्वीकारणे ही काळाची गरज बनली आहे.

**१) प्रादेशिक असमतोल दूर करण्यासंदर्भात दांडेकर समितीने खालील उपाययोजना सुचवल्या आहेत**

**वैधानिक विकास (वैधानिक) मंडळे :**

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये नंतर मराठवाडा आणि विदर्भ हे विभाग विलीन झाले. प्रामुख्याने महाराष्ट्राचे चार विभाग पडतात. जे म्हणजे पश्चिम महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, मराठवाडा, या चारही विभागांची ऐतिहासिक जडणघडण, साधन सामग्री, हवामान, आर्थिक विकासाचा स्तर, मूलभुत सुविधा आणि राजकीय सहभाग आदि सर्वच बाबतीत भिन्नता आढळून येते. पायाभूत सुविधांमध्ये रस्ते, जलसंपत्ती, विद्युतकरण, रेल्वे मार्गाचे जाळे इ. चा समावेश होतो. या विभिन्न पार्श्वभूमीमुळे निर्मितीपासूनच महाराष्ट्राला प्रादेशिक विषमतेची समस्या भेडसावत आहे. ही विषमता दूर व्हावी व आपला विकास व्हावा, अशी मागणी मागासविभागांकडून सतत होत होती. म्हणूनच त्यांचा आर्थिक व औद्योगिक विकास व्हावा, यासाठी सरकारने विभागीय विकास (वैधानिक) मंडळांची स्थापना केली आहे.

**सांविधानिक तरतूद :**

भारतीय राज्यटनेच्या कलम ३७१ मध्ये असे स्पष्ट करण्यात आला आहे की, राज्याच्या विकास खर्चासाठी पैशाची योग्य वाटणी करणे आणि त्या क्षेत्राबाबत तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यासाठी राज्यशासनाच्या नियंत्रणाखाली सेवांमध्ये नोकरीची पर्याप्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी अलगअलग विकास मंडळाची स्थापना राष्ट्रपती करू शकतात. अशा विकास मंडळाची विशेष जबाबदारी राज्यपालांवर सोपविली जाईल.

अशा प्रकारे कलम ३७१ मधील उपकलमानुसार भारतातील इतर काही राज्यासंबंधी विशेष तरतुदी केल्या आहेत. महाराष्ट्राला देखील हे कलम लागू आहे.

**वैधानिक विकास मंडळांची निर्मिती :**

दि. १५ ऑगष्ट १९९० रोजी पंतप्रधान व्हि.पी. सिंग यांनी मराठवाडा आणि कोकण या मागासभागांसाठी वैधानिक विकास मंडळे स्थापण्यात येत असल्याचे स्वातंत्र्यदिनी जाहीर केले. पंतप्रधान म्हणाले की, आर्थिक विकासातील विषमता दूर करण्यासाठी केंद्र सरकार बांधील आहे. दि. १७ फेब्रुवारी १९९४ रोजी मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळांची स्थापना करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला या निर्णयामुळे महाराष्ट्रात वैधानिक मंडळे स्थापण्याचा मार्ग मोकळा झाला. दि. ९ मार्च १९९४ रोजी तीन वैधानिक विकास मंडळाची अधिसूचना राष्ट्रपती शंकरदयाळ शर्मा यांनी राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर यांना पाठविली. ही अधिसूचना १ मे १९९४ पासून अंमलात येणार असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर राज्यपाल पी.सी. अलेक्झांडर यांनी विकास मंडळाच्या निर्मितीचे आदेश काढले. त्यानुसार विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी प्रत्येकी एका स्वतंत्र विकास मंडळाची स्थापना केली गेली. विदर्भ विकास मंडळाच्या अधिकाराखाली नागपूर आणि अमरावती महसूल विभागाचे क्षेत्र येते तर उर्वरित महाराष्ट्राच्या विकास मंडळाच्या अधिकाराखाली कोकण, पुणे, नाशिक विभागाचे क्षेत्र येते. मराठवाड्यांच्या आठ जिल्ह्यांसाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळ अस्तित्वात आहे.

**वैधानिक विकास मंडळाची रचना :**

प्रत्येक वैधानिक विकासमंडळात एक अध्यक्ष आणि इतर सहा सदस्यांचा समावेश होतो. त्या सर्वांची नेमणून राज्यपाल करतात.

१. सर्वसाधारणपणे प्रत्येक विकास मंडळाच्या अधिकार क्षेत्रातील एक विधानसभा सदस्य त्या मंडळाचा सदस्य असतो.

२. एक सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांतून निवडला जातो.

३. नियोजन प्रक्रियेशी संबंधित शासकीय वित्त व लेखा व्यवस्थेतील विशेष ज्ञान असलेल्या एका सदस्याची नेमणूक केली जाते.

४. त्याचप्रमाणे पाटबंधारे, सार्वजनिक आरोग्य, बांधकाम, उद्योग, कृषी, शिक्षण, सेवायोजना या क्षेत्रातील विशेष ज्ञान असलेल्या व्यक्तींमधून दोन तज्ञ व्यक्तींची निवड केली जाते.

५. त्या त्या विभागाचे महसूल आयुक्त त्या मंडळाचे सदस्य सचिव असतात.

अशा रीतीने प्रत्येक विकास मंडळावर अध्यक्षासह एकूण सात सदस्य असतात. त्यांचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. वैधानिक विकास मंडळाच्या अध्यक्षाला कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा दिला गेला आहे.

**वैधानिक विकास मंडळाची कार्ये :**

१. संपूर्ण राज्यातील विभागाच्या विकासाच्या पातळ्यांच्या तुलनेत योग्य निर्देशांकांच्या आधारे मंडळाच्या क्षेत्रातील विविध विकास क्षेत्रांची विकासाची सापेक्ष पातळी ठरविणे.

२. विभागांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी तसेच त्या त्या विभागातील विकासाचा अनुशेष दर करण्यासाठी करण्यात आलेल्या विविध विकासाच्या परिणामांचे मूल्यमापन करणे.

३. वार्षिक तसेच पंचवार्षिक योजनांच्या कक्षेतील विकास मंडळाच्या क्षेत्रावरील विकासाच्या खर्चाच्या पातळ्या सुचवणे.

४. मंडळाच्या कार्याचा वार्षिक अहवाल तयार करुन ते राज्य विधिमंडळात सादर करण्यासाठी वित्तीय वर्षाच्या शेवटी राज्यपालांना सादर करणे.

५. विकासाच्या विभिन्न योजना राबविणे. शासनाच्या अनेक योजना आणि धोरणांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा म्हणूनही विकास मंडळे कार्य करतात.

६. तसेच वित्तीय तांत्रिक आणि शासकीय योजनांविषयी योग्य ते मार्गदर्शन ही मंडळे करतात.

७. आपल्या विभागाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी प्रत्येक मंडळावर असते.

**मंडळाचे निधी वाटप आणि सेवा योजनांची व्यवस्था :**

राज्याची एकूण गरज विचारात घेऊन वैधानिक विकास मंडळाच्या क्षेत्रावरील विकास खर्चासाठी समन्वयाने निधीचे वाटप करण्याची जबाबदारी राज्यपालांवर सोपविण्यात आली आहे. राज्याच्या अंदाजपत्रकात विकास मंडळांचा निधी निर्देशीत करण्यात येईल आणि निश्चित केलेल्या निधीतून संबंधित विकासकार्य राज्यशासनाकडून पूर्ण करण्यात येईल. अशी तरतूद करण्यात आली आहे. तसच तंत्रशिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणासाठी पर्याप्त सोयी उपलब्ध करून देणे व त्याच्या आधारे महाराष्ट्र शासनात नोकरीच्या पर्याप्त संधी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था व्हावी याची जबाबदारी देखील राज्यपालावर सोपविण्यात आली आहे. त्यासाठी राज्यपाल राज्य सरकारला वेळोवेळी योग्य ते निर्देश देतील. अशी तरतूद वैधानिक विकास मंडळाच्या कायद्यात करण्यात आली आहे.

**वैधानिक विकास मंडळांची उपयुक्तता :**

भारताच्या नियोजन आयोगाने वैधानिक विकास मंडळाबद्दल असे म्हटले आहे की, प्रादेशिक विषमतेत आणखी सामाजिक सांस्कृतिक वादांची भर पडून अनेकदा सामाजिक, राजकीय, ताणतणाव उफाळून आले आहे. त्यातून एक संघराज्य दुभंगण्याचे प्रकारही घडले आहे. या प्रकारची पुनरावृत्ती टाळण्यासाठी महाराष्ट्रातील वैधानिक विकास मंडळांचा प्रयोग देशाच्या अन्य भागातही सुरू करायला पाहिजे. वास्तविक पाहता सर्व

विभागीय विकास मंडळांनी आपल्या विभागाच्या औद्योगिक प्रगतीसाठी आपापल्या परीने प्रयत्न केले आहे. नियोजन आयोगाने देखील या विकास मंडळांना राज्याच्या नियोजन आणि निर्णय प्रक्रियेत निर्णायक भूमिका देण्याची शिफारस केली आहे. वैधानिक विकास मंडळांनी देखील आपापली कार्ये सद्सद्बुद्धीने पार पाडली आहेत. विकासाच्या असमतोलामुळे निर्माण झालेले सामाजिक राजकीय ताण बऱ्याचअंशी कमी झाले आहे. पण अजूनही त्यांचा परिणाम मात्र नगण्य म्हणावा लागेल. मराठवाडा आणि विदर्भ प्रदेश आजही मागासलेलाच आहे. म्हणूनच कधी कधी स्वतंत्र्य विदर्भ राज्याची मागणी जोर पकडते. पश्चिम महाराष्ट्राचा अपवाद वगळता आजही महाराष्ट्रातील काही भाग मागास आहे. रस्ते, दळणवरूण, वाहतूक मूलभुत सुविधा आजही कमी प्रमाणातच या भागात उपलब्ध झाल्या आहेत. वैधानिक विकास मंडळांमुळे ज्याचे पर्यायाने शासनाचे अधिकार कमी होतील, अशी भीती व्यक्त केली जाते. परंतु ती निरर्थक आहे. प्रत्यक्षात मंडळांची निर्मिती झाल्यानंतर ही पश्चिम महाराष्ट्राकडे जास्त निधी वळविला गेला. परिणामी मागासभागांना निधी कमी प्रमाणात मिळाला. खरे पाहता त्यांना त्यांच्या विकासासाठी जास्त निधीची गरज आहे. वैधानिक विकास मंडळांनी नियोजन आयोगाच्या शिफारशीनुसार काम करावे आणि महाराष्ट्र राज्य सरकारने देखील मंडळाच्या शिफारशींना योग्य न्याय दिला पाहिजे. अनुशेष शोधून काढून अहवाल तयार करणे. त्यावर शासनाने विचार विनिमय करून राज्य विधीमंडळाने विकासाचा अनुशेष दूर करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची वाट पाहत बसण्याची भूमिका मंडळांनी बदलली पाहिजे. असेमत नियोजन आयोगाने व्यक्त केले आहे. तसेच वैधानिक विकास मंडळांना अधिक अधिकार देण्याची शिफारस नियोजन आयोगाने केली आहे.

प्रादेशिकवाद राष्ट्रीय एकता आणि अखंडतेला धोका असून प्रदेश हिताला महत्त्व देण्याऐवजी राष्ट्रहिताला महत्त्व दिले पाहिजे. प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी दांडेकर समितीने सुचविलेल्या शिफारशी महत्त्वपूर्ण आहेत. त्याचप्रमाणे विदर्भ-मराठवाड्याच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळांनी या प्रदेशातील मागासलेपणा दूर करण्यासाठी हातभार लावला जात असल्यामुळे हे प्रांत आज विकासाच्या मार्गावर आहेत.

### ३.२.४ आरक्षणाचे राजकारण :

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नवे भारताचे संविधान अस्तित्वात आले. लोकशाही व्यवस्था स्वीकारल्यामुळे राजकीय व्यवस्थेमध्ये प्रत्येक व्यक्तीस कायद्याने समान लेखले आहे. कायद्याच्या दृष्टीने जरी सर्व व्यक्ती समान मानल्या असल्या तरी व्यवहारात मात्र असमानता आढळते. सामाजिक परंपरा व अन्य ऐतिहासिक कारणांमुळे समाजात नागरिकांचे काही वर्ग पराकोटीचे मागासलेले असून विकास व प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्याची कोणतीही संधी त्यांच्यासमोर उपलब्ध नाही. संविधानाचे उद्दिष्टच मुळात समता प्रस्थापित करण्याचे असल्यामुळे समाजात असलेली विषमता नष्ट करून समतेवर आधारलेला समाज निर्माण करण्यासाठी आरक्षणाची तरतूद त्यात करण्यात आलेली आहे.

भारतीय समाजात आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, स्त्री-पुरुष, प्रादेशिक, धार्मिक व जातीय अशा स्वरूपात विषमता आहेत. समाजातील विषमता नष्ट व्हावी आणि समता प्रस्थापित व्हावी, हे ध्येय भारतीय संविधानाने स्वीकारलेले आहे. समाजात नागरिकांचे काही वर्ग पराकोटीचे मागासलेले असून

विकास व प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्याची कोणतीही संधी त्यांच्यासमोर उपलब्ध नाही. हे लक्षात घेऊन भारतीय संविधानात मागासलेल्या नागरिकांसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. आरक्षण हा विषमता नाहीसा करण्याच्या अनेक मार्गापैकी एक मार्ग आहे. जे मागासलेले आहेत त्यांना विशेष सोयी, सवलती, संधी देऊन त्यांचा विकास घडवून आणण्याची जबाबदारी शासनावर आहे. हे शासनाचे कर्तव्य आहे, असा संविधानाचा उद्देश आहे.

भारतीय समाजातील जातीवर आधारित असलेली विषमता संपवून समाजात समता प्रस्थापित करण्याचे साधन म्हणून घटनाकारांनी आरक्षणाची तरतूद संविधानात केलेली आहे. आरक्षण समाजातील विषमता दूर करण्याच्या अनेक मार्गापैकी एक महत्त्वाचा मार्ग आहे. स्वतंत्र भारतात मागासवर्गीय लोकांना कायदेमंडळ, प्रशासन आणि नोकरीमध्ये प्रतिनिधित्व मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. म्हणून लोकशाहीमध्ये दुर्बल, वंचित घटकांना, प्रतिनिधित्व देण्याच्या दृष्टीने आरक्षण धोरण महत्त्वाचे आहे. आरक्षण धोरणामुळे समताधिष्ठीत समाजाची स्थापना करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू होईल आणि प्रस्थापित वर्गाच्या लोकांप्रमाणेच स्वतःचा विकास करणे शक्य होईल.

राजकीय स्वातंत्र्यास खरा अर्थ प्राप्त होण्यासाठी सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक बाबी देखील बळकट असाव्या लागतात. असा विचार घटना समितीने केला असल्याने भारतीय घटनेमध्ये १५ (४), १६(४), ४६, १६४, २४३, ३३५, ३४०, ३४१, ३४२ या अनुच्छेदानुसार दुर्बल असणाऱ्या घटकाचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक मागासलेपण दूर करण्यासाठी व सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी आरक्षणाची तरतूद त्यामध्ये करण्यात आली आहे. भारतातील लोकशाहीत 'कायद्यापुढे सर्व समान' हा सर्वात मोठा अधिकार लोकांना मिळालेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात १४, १५, ४६, ३३५, ३३८, ३४०, ३४१ व ३४२ इत्यादी कलमांचा समावेश केला. या कलमास अनुसरून मागास जातींची स्थिती जाणून घेण्यासाठी व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले वर्ग कोणते आहेत? याची पाहणी करून, त्याच्या अडचणी दूर करण्यासाठी व उपाय सुचविण्यासाठी संविधानाच्या ३४० अनुच्छेदानुसार आयोग नेमण्याची जबाबदारी राष्ट्रपतीकडे सोपविण्यात आलेली आहे.

भारतीय संविधानामध्ये धार्मिक, जातिभेदाचा निषेध करून धर्माच्या तुलनेमध्ये राज्याला सर्वोच्च स्थान दिले गेले. भारतीय संविधानामध्ये प्रथमच अशिक्षित, कमकुवत, गरीब, मागासलेले, दलित व स्त्रिया यांना सामाजिक, आर्थिक व राजकीय अधिकार प्राप्त करून दिले. संविधानात वर्णव्यवस्था, जातिभेद व लिंगभेद कालबाह्य ठरविले. अर्थात तेवढ्यानेही उद्देश सफल होऊ शकत नाही. निरोगी समाजरचनेच्या अनुकूल आर्थिक परिस्थितीने आणि योग्य वयात योग्य संस्कार केल्याने जन्मावर आधारलेली श्रेणीबध्द चौकट नाहीशी होऊ शकते. मनावरी योग्य संस्कार, शिक्षणाचा प्रसार आणि आर्थिक उन्नतीकरिता योग्य मदत यासारख्या उपायांनी वर्णव्यवस्थेचे अवशेष नाहीसे होऊन निरोगी समाजव्यवस्था निर्माण होऊ शकते यावर त्याचा विश्वास होता.

घटना निर्मितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अजोड कार्य केलेले आहे. नोकऱ्यांतील आरक्षण राखीव जागांचा प्रश्न जेव्हा घटना समितीने विचारासाठी घेतला तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविलेला प्रस्ताव एकमताने मान्य करण्यात आला. त्यापुढेही जाऊन बाबासाहेब

म्हणतात, जोपर्यंत सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात विषमता असेल तोपर्यंत आरक्षणाचे धोरण राबवावे लागेल, भारतीय राज्यघटनेच्या ३४० व्या कलमानुसार इतर मागासवर्गीयांना आरक्षण दिले आहे. त्याच्या अंमलबजावणीसाठी १९५३ साली काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली मागासवर्गीय आयोगाची नियुक्ती केली. या आयोगाने १९५५ साली आपला अहवाल दिला. या आयोगाने बहुमताने इतर मागासवर्गीयांना आरक्षण देण्याची शिफारस केलेली होती, परंतु स्वतः अध्यक्ष काका कालेलकरांनीच अहवालाच्या विरोधात राष्ट्रपतींना पत्र लिहून हा अहवाल फेटाळण्याची शिफारस केली. त्यानुसार हा अहवाल फेटाळला गेला. त्यानंतर १९७८ साली न्या. बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा मागासवर्गीय आयोग नेमण्यात आला होता. या आयोगाने आपला अहवाल १९८० साली सादर केला. दरम्यान सत्तांतर होऊन सत्तेवर आलेल्या काँग्रेसने पूर्वीप्रमाणेच इतर मागासवर्गीय विरोधी धोरण अवलंबून अहवाल अंधारातच ठेवला गेला. १९८९ साली व्ही. पी. सिंग यांचे सरकार सत्तेवर आल्यानंतर १९९० साली  मंडल आयोगाचा अहवाल सरकारने स्विकारला आणि १९९३ सालापासून मंडल आयोगाच्या अहवालाची अंशतः अंमलबजावणी सुरू झाली.

डॉ. बाबासाहेच आंबेडकरांच्या मते, 'Reservation, for those are not -dequately Represented' म्हणजेच 'ज्यांना पुरेसे प्रतिनिधीत्व मिळाले नाही. त्यांना आरक्षण' किंवा 'ज्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात पर्याप्त प्रतिनिधीत्व मिळाले नाही, त्यांना आरक्षण', भारतीय समाजात देण्यात येणाऱ्या आरक्षणाचा आधार हा आर्थिक मानला गेलेला नाही म्हणून संविधानात देखील त्याचा उल्लेख केलेला आढळून येत नाही. भारतीय समाजव्यवस्थेने स्वातंत्र्यानंतर आरक्षणाचे तत्त्व स्विकारलेले असले किंवा भारतीय संविधानात याचा समावेश केलेला असला तरी आरक्षणविषयक दृष्टीकोणात विभित्रता असलेली दिसून येते. ही शिथिलता समाजातील उच्च पदावर असणाऱ्या व्यक्तीमध्ये राजकीय आणि सामाजिक नेत्यामध्येही आढळून येते.

**संविधानसभा चर्चा आणि आरक्षण :**

१५ ऑगस्ट १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्राच्या भविष्यकालीन वाटचालीच्या आराखडा तयार करण्यासाठी डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली संविधान तयार करण्यासाठी लोकप्रतिनिधींची संविधान सभा निर्माण करण्यात आली. संविधान तयार करताना प्रमुख विषयासंबंधात १२ समित्या स्थापन केल्या गेल्या, त्यात प्रारुप समिती महत्त्वपूर्ण होती. तिला मसुदा समिती म्हटले गेले, २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समिती नेमण्यात आली. दोन वर्षे ११ महिने १८ दिवस या समितीने कार्य केले. या समितीने एकूण ११ बैठका घेतल्या. संविधान समितीने व्यापक विचार व चर्चा करून भारतीय परिस्थितीसाठी सर्वाधिक अनुकूल संसदीय शासन पध्दतीचा स्विकार करण्यात आला.

९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेची पहिली बैठक झाली. ११ डिसेंबर रोजी झालेल्या बैठकीत डॉ. राजेंद्रप्रसाद यांची संविधान सभेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. १३ डिसेंबरला पंडित जवाहरलाल नेहरूंनी 'उद्दिष्टांचा ठराव' मांडला होता. त्यात घटना समितीच्या कार्याचा व कार्यक्रमाचा कच्चा आराखडा व्यक्त झाला होता. भारतीय जनतेला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळवून देणे, विचार, अभिव्यक्ती, संघटन, उपासनेचे स्वातंत्र्य देणे, अल्पसंख्यांक व मागास विभागांसाठी, आदिवासी वस्ती असलेल्या प्रदेशासाठी तसेच बहिष्कृत वर्गासाठी व अन्य मागासलेल्या वर्गासाठी संरक्षक तरतुदी केल्या जातील असे अभिवचन दिले होते. १७ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेत भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, अल्पसंख्यांक

आणि मागासवर्गीयांसाठी केलेल्या तरतुदी पुरेशा असाव्यात तसेच शीख आणि अन्य अल्पसंख्यांक यांना त्या समाधानकारक वाटावयास हव्या. अल्पसंख्यांक समितीचे अध्यक्ष सरदार पटेल म्हणाले, एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात अल्पसंख्यांकाना प्रतिनिधित्व व आरक्षण असावे असा आम्ही निर्णय घेतला आहे. विशेषतः अँग्लो इंडियन आणि अनुसूचित जातीसाठी सरकारी जागा राखून ठेवाव्यात याबाबत आमचे एकमत झाले आहे. २१ फेब्रुवारी १९४६ रोजी डॉ. आंबेडकरांनी घटनेचा ३१५ कलमी सुधारित मसुदा राजेंद्रप्रसाद यांना सादर करताना लिहिले होते. विधानमंडळातील जागा आणि सार्वजनिक सेवामधील पदे अल्पसंख्यांकासाठी राखीव ठेवण्याबाबत संविधानसभेने आणि सल्लागार समितीने घेतलेले निर्णय मसुद्यात नोंद केले आहेत.

१९४७ साली त्यांनी घटना कशी असावी? याचा एक मसुदा सरकारला सादर केला तो 'राज्य आणि अल्पसंख्यांक' या नावाने आज ओळखला जातो. यातही आरक्षणाची मागणी त्यानी केलेली होती. घटना निर्मितीच्या काळात मसुदा समितीने अध्यक्ष म्हणूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अजोड कार्य केलेले आहे. नोकऱ्यातील राखीव जागांचा प्रश्न जेव्हा घटना समितीने विचारासाठी घेतला, त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविलेला प्रस्ताव एकमताने मान्य करण्यात आला. त्याही पुढे जाऊन बाबासाहेब म्हणतात, 'जोपर्यंत सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात विषमता असेल, तोपर्यंत आरक्षणाचे धोरण राबवावेच लागेल याचा अर्थ आरक्षण हे भिक, दया, माया नसून तो घटनात्मक अधिकार आहे हे त्यांनी जगाला पटवून दिले.'

२० नोव्हेंबर १९४८ ला संविधान सभेच्या बैठकीत कलम १० (३) वर जोरदार चर्चा झाली. कारण कलम १० (३) मध्ये नव्याने शब्द समाविष्ट करण्यासाठीची मुदत दहा वर्षाची होती, त्यानुसार हृदयनाथ कुंजरू यांनी 'मागास' या शब्दाची संज्ञा केलेली नाही, त्यामुळे त्याचा अर्थ अस्पष्ट आहे. तरी अजीम अहमद खान यांनी 'मागास' हा शब्द काढून टाकणारी दुरुस्ती सादर केली. यावर कलम १० (३) ची आवश्यकता विशद करताना संविधान सभेचे उपाध्यक्ष डॉ. एस. सी. मुखर्जी यांनी हे कलम भारतातील भूतकाळात ज्या लोकांशी समाजाने निर्दयतापूर्ण व्यवहार केला, त्यांना राज्याद्वारे भरपाई मिळावी यासाठी आपण तयार असले पाहिजे म्हणून संविधानात तरतूद केली आहे. या चर्चेवेळी डॉ. धर्मप्रकाश पी. कक्कन, टी चैन्नैया, शांतनुकुमार दास, टी कृष्णम्माचारी यांनी सकारात्मक मते मांडली. डॉ. आंबेडकरांनी यावर उत्तर देताना मागासवर्गासाठी केलेल्या तरतुदीचे समर्थन केले. अखेरीस कलम १० (३) मध्ये मागास शब्द वर्ग शब्दाशी जोडून संविधान सभेने मंजूरी दिली. तसेच संविधान सभेमध्ये कलम १६ (४) अंतर्गत अनुसूचित जाती व जमातीना सरकारी सेवेमध्ये आरक्षण देण्याच्या तरतुदीवरूनही विस्तृत चर्चा घडून आली होती, त्याचे समर्थन कलम १० (३) बाबत घेतलेल्या आक्षेपावेळी केले गेले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान स्वीकृत करण्याची घोषणा करण्यात आली व २६ जानेवारी १९५० रोजी 'भारतीय संविधाना'चा स्विकार करण्यात आला. राज्याच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक विकासासाठी काही निश्चित नियमांची आवश्यकता असते. त्या नियमांच्या सर्वमान्य समुच्चयालाच संविधान असे म्हटले जाते. भारतीय संविधानाच्या लिखित प्रतिज्ञापत्रातच आम्ही शपथ घेतलेली आहे की, सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता प्रस्थापित करण्यासाठी वचनबध्द आहोत, याचा अर्थ संधीची समानता व्यावसायिक गतिशीलता, सामाजिक न्याय, बंधूता इत्यादी बाबींना संविधानाने संरक्षण घेण्याची हमी दिलेली आहे. ज्यामुळे समाज परिवर्तन व गतिशीलता या तत्त्वाना पूरक वातावरण मिळेल, विषमतेने बरबटलेल्या

समाजात संधीची समानता ही संकल्पना वादाची ठरू शकते याची जाणीव संविधान निर्मात्यांना होती म्हणून भारतीय संविधानात ३३८, ३३८ क, ३३९ व ३४०, या अनुच्छेदाचा समावेश करण्यात आलेला आहे. या अनुच्छेदांतर्गत राष्ट्रपतींना आयोग नेमता येतो. संविधानातील तरतुदीनुसार राष्ट्रपतींनी विविध आयोग नेमले. संविधान सभेचे कामकाज चालू असताना इतर मागास वर्गीयांच्या आरक्षणासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक मसूदा तयार केला. या मसुद्यानुसार ३०१ व्या अनुच्छेदाने, राष्ट्रपतींना घटना अंमलात आल्यावर दहा वर्षाने, मागासलेले विभाग व जाती यांच्या परिस्थितीवर रिपोर्ट तयार करण्यासाठी एक कमिशन नेमण्याचा अधिकार दिला. केंद्र सरकार आपल्या अधिकारात, प्रांताना त्या विभागातील मागासलेल्या जातीच्या उन्नतीबद्दल योजना तयार करण्यास मार्गदर्शन करील. मूळ अनुच्छेद फक्त प्रांतानाच लागू होणार होते पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सूचनेवरून त्यात संस्थानांचाही समावेश करण्यात आला. यानंतर सभागृहाने अनुच्छेद ३०१ मंजूर केले. या अनुच्छेदाचा अर्थ असा आहे की, राष्ट्रपतींनी एक कमिशन नेमून भारतामधील सामाजिक व शैक्षणिक बाबतीत मागासलेल्या जातींच्या परिस्थितीचे संशोधन करावे. त्यांच्या अडीअडचणी व त्या दूर करण्याचे उपाय, त्याकरिता घ्यावयाची मदत, ती मदत देण्याचे नियम यावरही आपले संशोधन करून कमिशनने ते राष्ट्रपतींला द्यावे. राष्ट्रपतीने या रिपोर्टची एक प्रत व अहवाल सभागृहासमोर मांडावे. याप्रकारे दिनांक १६ जून १९४९ ला अनुच्छेद ३०१ संविधानाचे अंग बनले. नंतर संविधानाला अंतिम रूप देत असताना ३०१ या अनुच्छेदाला ३४० या अनुच्छेदामध्ये परावर्तीत करण्यात आले.

आरक्षणाच्या बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदामंत्री असताना, आरक्षणामधील पोट कलमाच्या भाषेतच 'सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले वर्ग' अशी उपसूचना मांडली. तेव्हा या उपसूचनेस जवाहरलाल नेहरूंनी 'सामाजिक' या शब्दावर आक्षेप घेऊन विरोध दर्शविला. त्याऐवजी 'आर्थिक' हा शब्द घालावा असे सुचविले होते. डॉ. आंबेडकरांनी त्यांची सूचना फेटाळताना 'सामाजिक' हा शब्द अधिक व्यापक आहे, त्यात 'आर्थिक' घटकाचाही अंतर्भाव होतो असे स्पष्टीकरण दिले. भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वातंत्र्य, समता, बंधूता व सामाजिक न्यायाच्या हेतूने लोकशाहीचे तत्त्व अवलंबिले, लोकशाही व्यवस्था स्विकारल्यामुळे राजकीय व्यवस्थेमध्ये प्रत्येक व्यक्तीस 'एक व्यक्ती-एक मत-एक मूल्य' असा अधिकार मिळाला. यामुळे सर्वांना कायद्याने समान लेखले आहे. कायद्याच्या दृष्टीने जरी, सर्व व्यक्ती समान मानल्या असल्या तरी, व्यवहारात त्या समान आहेत का? या प्रश्नाचे उत्तर आपणास रक्कीच नकारार्थी द्यावे लागते. कारण जर त्या व्यावहारिक पातळीवर समान असत्या, तर त्यांना 'आरक्षण' देण्याचा प्रश्नच निर्माण झाला नसता. यामुळे राजकीय स्वातंत्र्यास खरा अर्थ प्राप्त होण्यास सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक बाबी देखील बळकट असाव्या लागतात हे स्पष्टच होते. अन्यथा, लोकशाही असूनही ती हुकूमशाहीच ठरू शकते. असा विचार घटनासमितीने केला असल्याने आरक्षण योजना मान्य करण्यात आली. असा विचार केल्याने भारतीय घटनेमध्ये १५ (४), ४६, २४३, ३३५, ३४०(१), ३४१(१), ३४२(१) या कलमानुसार दुर्बल असणाऱ्या घटकांचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक मागासलेपण दूर करण्यासाठी तसेच असणारी सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी शासनाने आरक्षणाची तरतूद मान्य केली.

### ३.२.२ आरक्षणाच्या घटनात्मक तरतुदी :

भारतीय संविधानातील आरक्षणाच्या बाबतीत संविधानिक तरतूदी असलेल्या अनुच्छेदांची माहिती

प्रस्तुत मांडणीचा विषय आहे. कायद्यापुढे भारतातील प्रत्येक व्यक्ती समान आहे अशी हमी घटनेतील अनुच्छेद १४ आम्हाला देते. याशिवाय घटनाकारांनी याच्या जोडीला अनुच्छेद १६ ची निर्मिती केलेली आहे. १६(४) या अनुच्छेदानुसार राज्यातील शासकीय नोकऱ्यांमध्ये सर्वांना समान संधी मान्य करण्यात आली व ३३५ अनुच्छेदानुसार संघराज्य व राज्यातील शासकीय नोकऱ्यांमध्ये पदोन्नतीसाठी आरक्षणाची तरतूद केलेली आहे. अनुच्छेद १५ (४) व अनुच्छेद ३४० नुसार शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या 'मागासलेले वर्ग' कोण आहेत. त्यांच्या प्रगतीसाठी कोणते खास उपाय योजावेत. त्यांची पाहणी करून त्यांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी आयोग नेमण्याची जबाबदारी राष्ट्रपतीवर सोपविण्यात आलेली आहे. या आयोगाने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करणे ही जबाबदारी केंद्र सरकारवर असून त्यानुसार ज्या क्षेत्रात इतर मागासवर्गीयांना पुरेसे प्रतिनिधीत्व नाही त्या क्षेत्रात राखीव जागा ठेवण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. अनुच्छेद ४६ नुसार 'दुर्बल घटक' यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील आणि सामाजिक अन्याय व सर्वप्रकारचे शोषण यापासून त्यांचे संरक्षण करील. अनुच्छेद १६४ नुसार राज्यातील एका मंत्र्याकडे इतर मागासवर्गीयांचे कल्याण कार्य किंवा अन्य कोणतेही काम यांचा प्रभार असेल. अनुच्छेद २४३ नुसार शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला व मागासवर्गीय लोकांकरिता आरक्षणाची तरतूद केलेली आहे. संविधानातील अनुच्छेदांद्वारे प्रस्थापित जाती व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यासाठी व विषमता नष्ट करण्यासाठी आरक्षण हातूदी महत्वाच्या ठरतात.

**भाग ३ : मुलभूत अधिकार :–**

**अनुच्छेद (१४) :**

राज्य, कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानत्ता अथवा कायद्यांचे समान संरक्षण नाकारणार नाही,

**अनुच्छेद (१५) :**

(१) राज्य, केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही.

(२) केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणताही नागरिक –

क) दुकाने, सार्वजनिक उपाहारगृहे, हॉटेल आणि सार्वजनिक करमणुकीची स्थाने यात प्रवेश अथवा,

ख) पूर्णतः किंवा अंशतः राज्याच्या पैशाने राखलेल्या अथवा सर्वसाधारण जनतेच्या उपयोगाकरिता समर्पित अशा विहिरी, तलाव, स्नानघाट, रस्ते आणि सार्वजनिक राबत्याच्या जागा यांचा वापर, याविषयी कोणतीही निःसमर्थता, दायित्व, निर्बंध किया शर्ती यांच्या अधीन असणार नाही.

(३) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, स्त्रिया व बालके यांच्याकरता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(४) या अनुच्छेदातील किंवा अनुच्छेद २९ चा खंड (२) यातील कोणत्याही गोष्टीमुळे नागरिकांपैकी

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकारता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(५) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे किंवा अनुच्छेद १९ खंड (१) उपखंड (छ) यातील कोणत्याही गोष्टीमुळे नागरिकांपैकी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या उन्नतीकारेता, कोणतीही विशेष तरतूद करण्यास कायद्याने, त्यांच्या शैक्षणिक संस्थामधील प्रवेशांच्या संबंधाने, अनुदानित किंवा विनाअनुदान खाजगी शैक्षणिक संस्थामधील प्रवेशांसहित, अनुच्छेद ३० खंड १ मध्ये नमूद अल्पसंख्यांक समाजाच्या शैक्षणिक संस्था वगळता, कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

**अनुच्छेद (१६) :**

(१) राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावरील सेवायोजन किंवा नियुक्ती यासंबंधीच्या बाबींमध्ये सर्व नागरिकांस समान संधी असेल.

(२) कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान निवास या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतेही सेवायोजन किंवा पद यांच्याकरता अपात्र असणार नाही अथवा त्यांच्याबाबतीत त्याला प्रतिकूल असा भेदभाव केला जाणार नाही.

(३) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, एखादे राज्य किंवा संघ राज्यक्षेत्र यांच्या शासनाच्या अथवा त्यांच्यातील कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील एखाद्या वर्गाच्या किंवा वर्गाच्या पदावरील सेवायोजन किंवा नियुक्ती यांच्या संबंधात अशा सेवायोजनाच्या किंवा नियुक्तीच्यापूर्वी त्या राज्यातील किंवा संघ राज्यक्षेत्रातील निवासाविषयी एखादी आवश्यकता विहित करणारा कोणताही कायदा करण्यास संसदेला प्रतिबंध होणार नाही.

(४) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याच्या सेवांमध्ये नागरिकांच्या ज्या कोणत्याही मागासवर्गाला राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधीत्व नाही अशा वर्गाकरता नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(४क) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये ज्या अनुसूचित जातींना किंवा अनुसूचित जनजातींना त्या राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधीत्व देण्यात आलेले नसेल त्यांना राज्याच्या नियंत्रणाखालील सेवा संबंधातील कोणत्याही वर्गामध्ये किंवा वर्गामध्ये परिणामस्वरूप ज्येष्ठतेसह पदोन्नती देण्यासंबंधात आरक्षण करण्यासाठी राज्याला कोणतीही तरतूद करण्यास प्रतिबंध होणार नाही.

(४ख) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याला, खंड (४) किंवा (४क) अन्वये आरक्षणासाठी केलेल्या कोणत्याही तरतुदीनुसार भरण्यासाठी म्हणून एखाद्या वर्षांत राखून ठेवलेल्या परंतु त्या जागांचा एक स्वतंत्र वर्ग म्हणून विचारात घेण्यास प्रतिबंध होणार नाही आणि अशा वर्गातील रिक्त जागा, ज्या वर्षामध्ये त्या भरण्यात येतील त्या वर्षातील रिक्त जागांच्या पन्नास टक्के इतकी

आरक्षणाची मर्यादा ठरविण्याकरिता, त्या वर्षातील इतर रिक्त जागांबरोबर जमेस धरल्या जाणार नाहीत.

(५) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टींमुळे, एखाद्या धार्मिक किंवा सांप्रदायिक संस्थेच्या कारभाराशी संबंधित असलेल्या पदाचा किंवा तिच्या शासक मंडळाचा कोणताही सदस्य म्हणजे विशिष्ट धर्माची अनुयायी असणारी किंवा एखाद्या विशिष्ट संप्रदायाची व्यक्ती असली पाहिजे, अशी तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही.

**अनुच्छेद (१७) :**

'अस्पृश्यता' नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरुपातील आचरण निषिध्द करण्यात आले आहे. अस्पृश्यतेतून उद्भवणारी कोणतीही निःसमर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध आहे.

**अनुच्छेद (२३) :**

(१) माणसांचा अपव्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरुपातील वेठ यांना मनाई करण्यात आली आहे आणि उपबंधाचे कोणत्याही प्रकारे व्यतिक्रमण करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

(२) सार्वजनिक प्रयोजनाकरिता सक्तीने सेवा करायला लावण्यास राज्याला या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही व असे सेवाबंधन लादताना केवळ धर्म, वंश, जात या वर्ग या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून राज्य कोणताही भेदभाव करणार नाही.

**अनुच्छेद (२६) :**

सार्वजनिक सुव्यवस्था, नितीमत्ता व आरोग्य यांच्या अधिनतेने, प्रत्येक धार्मिक संप्रदायास अथवा त्यांच्यापैकी कोणत्याही गटास–

(क) धार्मिक व धर्मादायी प्रयोजनाकरिता संस्थांची स्थापना करून त्या स्वखर्चाने चालविण्याचा;

(ख) धार्मिक बाबीत आपल्या व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचा.

(ग) जंगम व स्थावर संपत्ती मालकीची असण्याचा व ती संपादन करण्याचा, आणि

(घ) कायद्यानुसार अशा संपत्तीचे प्रशासन करण्याचा अधिकार असेल.

**अनुच्छेद (२९) :**

(१) भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या ज्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वतःची विभिन्न भाषा, लिपी वा संस्कृती असेल त्याला ती जतन करण्याचा अधिकार असेल.

(२) राज्याच्या खर्चाने चाललेल्या किंवा राज्याच्या पैशातून साहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

**अनुच्छेद (३०) :**

(१) धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या सर्व समाजाला आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार असेल.

(१क) खंड (१) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे एखाद्या अल्पसंख्यांक समाजाने स्थापन केलेल्या व प्रशासिलेल्या शैक्षणिक संस्थेच्या कोणत्याही संपत्तीचे सक्तीने संपादन करण्याचा उपबंध करणारा कोणताही कायदा करताना, राज्य हे अशा संपत्तीच्या संपादनाबद्दल अशा कायद्याने निश्चित केलेल्या किंवा त्याखाली ठरवलेल्या रक्कमेमुळे त्या खंडाखाली हमी दिलेला अधिकार निर्बंधित किंवा निराकृत होणार नाही अशा प्रकारची ती रक्कम असेल अशी खात्रीलायक तजबीज करील.

(२) शैक्षणिक संस्थांना सहाय्य देतांना राज्य, एखादी शैक्षणिक संस्था ही धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या एखाद्या समाजाच्या व्यवस्थापनाखाली आहे या कारणावरून तिला प्रतिकूल होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही.

राखीव जागांबाबतच्या प्रश्नांचा विचार स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच अस्तित्वात होता. मोर्ले-मिंटो करार, पुणे करार, १९३५ च्या कायद्यामुळे यांचा सविस्तर विचारही करण्यात आला होता, मात्र राज्यघटना तयार करण्याचे काम घटना समितीला सोपविण्याचे निश्चित करण्याबराबेर भारतीय शेडयूल्ड फास्ट फेडरेशनच्या कार्यकारी मंडळाचे मागासवर्गीयांच्या हक्काबाबतचे निवेदन तयार करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर सोपविण्यात आले होते ते निवेदन पुढे 'स्टेट ॲन्ड मायनॉरिटीझ' या नावाने परिचित झाले. या निवेदनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षणाचा सविस्तर आणि अत्यंत तांत्रिक पध्दतीने विचार केला होता. त्याचाच प्रभाव राज्यघटनेतील तरतूदींवर पडलेला दिसून येतो.

## ३.३ सारांश :

भारतीय समाजाचे जातीच्या आधारे विभाजन झालेले आहे. तसे झाले नसते तर जातीच्या आधारे आरक्षण देण्याचा प्रश्नच उद्भवला नसता. भारतातील सर्व सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विकास हा जातीच्या आधारे झालेला आहे. त्यामुळे शिक्षण, संरक्षण, प्रशासन, व्यापार व राजकारणात इतर मागासवर्गीयांना संधीच नव्हती. यातून समाजात अज्ञान, दारिद्र्य, विषमता आणि शोषणावर आधारलेली चिरेबंद समाजव्यवस्था निर्माण झाली. या व्यवस्थेला बदलण्यासाठी इतर मागासवर्गीयांना सहभागी करून घेणे आवश्यक आहे. अशा सहभागासाठी जातीच्या आधारे आरक्षण देणे आवश्यक आहे. संविधानामध्ये शैक्षणिक व सामाजिक मागासलेपण हा शब्दप्रयोग आर्थिक निकष वगळून केलेला आहे. समाजातील कोणत्याही घटकास आर्थिक निकषाच्या आधारे आरक्षण देता येत नाही. अशी संविधानात स्पष्ट तरतूद आहे. जगात भेदभावात एका बाबतीत समानता आहे. ती बाब म्हणजे यश किंवा जात, भेदभाव, आर्थिक आधारावर केला जात नाही. म्हणून भारतीय संविधानामध्ये आरक्षणाची तरतूद फक्त सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्यांच्या विकासासाठी आहे. काका कालेलकर मागासवर्गीय आयोगाने देखील असे म्हटले आहे की, आमची इच्छा आर्थिक निकषाच्या आधारे आरक्षण द्यावे अशी शिफारस करावयाची होती परंतु सामाजिक वास्तव लक्षात घेता 'जात' हा घटक

आरक्षणासाठी आवश्यक व उचित आहे. मंडल आयोगाने अथक प्रयत्न करून जातीनिहाय आरक्षण देणे कसे आवश्यक व समर्थनीय आहे ते स्पष्ट केलेले आहे.

### ३.५ सरावासाठी स्वाध्याय :

१. जातीचे राजकारण स्पष्ट करा.

२. सांप्रदायिक राजकारणाचा आढावा घ्या.

३. प्रादेशिकतेच्या राजकारणाची चर्चा करा.

४. वैधानिक विकास मंडळ म्हणजे काय? ते सांगून वैधानिक महामंडळाचे कार्य स्पष्ट करा.

५. आरक्षणाचे राजकारण स्पष्ट करा.

### ३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१. य. दि. फडके, २००७, विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड सहावा, मौज प्रकाशन मुंबई.

२. य. दि. म डके २००७, विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड आठवा, मौज प्रकाशन, मुंबई.

३. सिरसीकर व. म. २००८, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

४. व्होरा राजेंद्र, सुहास पळशीकर, महाराष्ट्रातील सत्तांतर, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

५. सदानंद मोरे, लोकमान्य ते महात्मा, खंड १ व खंड २, राजहंस प्रकाशन, पुणे.

६. Jayant lele, 1982, Elite Plurlism and Class Rule: Political Development in Maharashtra, Popular, Bombay.

७. Lele Jayant (Conversation), Prakash Pawar (Edited) Yashawantrao Chavan Reflection India: Society and Politics, Diamond publicatio, pune.

८. पळशीकर सुहास, २००७, काँग्रेस वर्चस्वाची जडणघडण आणि पडझड, महाराष्ट्राचे राजकारण (संपा. सुहास पळशीकर, नितीन बिरमल), प्रतिमा प्रकाशन, पुणे.

९. जैन अशोक, १९९८, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, सेठ पब्लिकेशन, मुंबई.

१०. सिंह ब्रिजेश, २०१८, महाराष्ट्र वार्षिकी, महाराष्ट्र शासन.

घटक ४

# राजकीय चळवळी

## (Political Movement)

---

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ शेतकरी चळवळ **(Peasant Movement)**
- ४.२.२ सहकार चळवळ **(Co-operative Movement)**
- ४.२.३ दलित चळवळ **(Dalit Movement)**
- ४.२.४ स्त्रीवादी चळवळ **(Feminist Movement)**

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## ४.० उद्दिष्टे :

राजकीय चळवळी या घटकांच्या अभ्यासाची उद्दिष्ट्ये खालील प्रकारे सांगता येतील.

१. शेतकरी चळवळीचा ऐतिहासिक आढावा व विकास, विविध आंदोलने आणि परिणाम इत्यादी बाबींचा अभ्यास करता येईल.

२. महाराष्ट्रातील सहकार चळवळ उदय, विकास, वैशिष्ट्ये, राजकिय प्रभाव, आव्हाने इत्यादींचा अभ्यास करता येईल.

३. दलित चळवळीचा उदय, प्रश्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्व, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कालीन व सध्यकालीन दलित चळवळ व आंदोलने, राजकिय प्रभाव, आव्हाने इत्यादींचा अभस करता येईल.

४. स्त्रीवादी चळवळीचा उदय, विकास, नेतृत्त्वं, आंदोलन, प्रभाव, आव्हाने इत्यादींचा अभ्यास करता येईल.

## ४.१ प्रास्ताविक (Introduction) :

महाराष्ट्र हे राज्य भारतातील सर्व घटक राज्यामध्ये वैचारिकदृष्ट्या प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. या महाराष्ट्र राज्यातून भारताच्या स्वातंत्र्याची चळवळ अधिक वेगाने व मजबूत झाली. स्वातंत्र्य चळवळीला अधिक आक्रमक करणाऱ्या म. गांधी, आगरकर, लो. टिळक, गोखले, स्वा. सावरकर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींचे योगदान खूप मोठे होते.

स्वातंत्र्यानंतर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ हि तर अनेक वर्ष संघर्ष करून मुंबईसहीत भारतातील सलग मराठी भाषिकांचे संयुक्त महाराष्ट्र निर्माण केले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या आंदोलनामध्ये १०६ हुतात्मे झाले.

महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकऱ्यांसाठी मोर्चे, आंदोलन करून खोत पद्धती विरुद्ध लढे देऊन शेतकऱ्यांना एकत्र केले. स्वातंत्र्यानंतर शरद जोशी यांनी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर आंदोलन करून शेतकरी संघटना मजबुत केली. मात्र या चळवळीमुळे शेतकऱ्यांच्या मागण्या, प्रश्न शासनदरबारी मांडले व सोडविल्या मात्र नंतरच्या काळात शेतकरी संघटना राजकारणात निवडणुकीत उतरली व काही शेतकरी नेते बाहेर पडले. शेतकरी संघटनेचे गट पडले. आज राजू शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी चळवळ, मा. बी. जी. पाटील (काका) इस्लामपूर यांनी बळीराजा शेतकरी संघटना तर सदाभाऊ खोत यांनी रयत क्रांती शेतकरी संघटना स्थापन केले.

महाराष्ट्राच्या विकासात ''विना सहकार नही उद्धार'' या घोषणेप्रमाणे सहकाराशिवाय विकास नाही यासाठी सहकारी संस्थेची व सहकारी संस्थांची स्थापना केली. सहकार चळवळीची मुहुर्तमेढ अहमदनगर जिल्ह्यात विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकारी साखर कारखाना काढून केली. त्यानंतर विविध कारखाने, सहकारी सुतगिरणी, सहकारी दूध संघ, सहकारी पतसंस्था, सहकारी बँका सुरू झाल्या. आज महाराष्ट्राच्या विकासात सहकारी चळवळीचे खूप मोठे योगदान आहे. मात्र जागतिकीकणाच्या प्रभावामध्ये सहकारी चळवळीसमोर आव्हाने येत आहेत.

दलित चळवळ हि खरंतर गेल्या हजारो वर्षाच्या भारतीय समाजातील विषमतेने बरबटलेल्या शोषणाधिष्ठित चातुवर्ण्य पद्धतीमधून आकाराला आली. चातुवर्ण्य पद्धतीमध्ये ब्राह्मण, क्षेत्रीय वैश्य, शुद्र या चार वर्णाच्या नंतर अतिशुद्ध हा वर्ण म्हणजे अस्पृश्य समाज, आजच्या अनु. जाती जमाती (SC, ST) या अस्पृश्य वर्गाला कोणतेही हक्क, अधिकार व न्याय दिले नाहीत, हजारो वर्ष अन्याय केला. सुधारणा काळात म. फुले, शाहु महाराज यांनी या दलित समाजासाठी कार्य केले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध आंदोलने केले. या दलित समाजाला अधिकार व न्याय हक्कांची जाणीव करून दिली. लोक एकत्र होऊन सरकारकडे स्वातंत्र्य, समता व न्याय बंधुत्वाची मागणी करू लागले. दलित चळवळ यामुळे मजबूत झाली. मात्र डॉ. बाबासाहेबानंतर दलित चळवळीत फूट पडली.

महिला, स्त्रीया या घटकांवर सुद्धा मनुस्मृतीने स्वातंत्र्य समता, न्याय हक्क नाकारून सर्व प्रकारची विकासाची दारे बंद केली होती. या विरोधात विशेषत: म. फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहु महाराज, धोंडो केशव कर्वे, र. धो. कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे व महत्त्वाचे म्हणजे सर्वांत जास्त घटनात्मक पद्धतीने काम करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाजसुधारकांनी प्रचंड योगदान दिले आहे. यातूनच पुढे स्त्रीवादी संघटना, चळवळी, उभ्या राहिल्या.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ शेतकरी चळवळ (Peasant Movement) :

**प्रस्तावना :** भारत हा कृषीप्रधान देश असून भारतामध्ये ७०% लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. यांचा अर्थ शेतकरी, शेतमजूर, धान्य व्यापारी, शेतीपूरक व्यवसाय, शेती माल प्रक्रिया उद्योग, व्यवसाय, शेतीमाल आयात निर्यात, भाजीपाला प्रक्रिया व्यवसाय इत्यादीवर अवलंबून लोक आपली उपाजिवीका करीत आहेत. भारतातील शेतीमधील काही सिंचनाखाली तर बहुतांश शेती पावसाच्या, हवामानाच्या लहरीवर असणारी जिरायत शेती आहे. त्यामुळे अनेक वेळा शेती क्षेत्रावर बदलत्या हवामानामुळे वाढत्या तापमानामध्ये, वाढत्या औद्योगिकीकरणामुळे विविध संकटे, आपत्ती व आव्हाने येत आहेत.

शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या प्रमाणात अन्नधान्याला किंवा उत्पादनाला हमी भाव मिळाला पाहिजे. यासाठी शेतकरी संघटना स्थापन होऊन शेतकरी चळवळ उभी राहिली.

व्यापारी वर्गाकडून होत असलेल्या शोषणा विरोधात आणि दुष्काळात मग तो ओला दुष्काळ असो की कोरडा दुष्काळ असो शासनाकडून मदत मिळविण्यासाठी, शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी, शुद्ध बी-बियाणे, किटकनाशके मिळण्यासाठी, शेतकऱ्यावरील अन्याय व शोषणा विरोधात शेतकरी चळवळ उभी राहिली.

#### ४.२.१.१ (अ) शेतकरी चळवळीची पार्श्वभूमी :

भारतामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्याच्या विविध प्रश्नाचा समग्र अभ्यास आवाज उठविला तो म्हणजे महात्मा फुले यांनी. महात्मा फुले यांनी ''शेतकऱ्यांचा आसूड'' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकात म. फुले यांनी सावकारी व भट भिक्षुकशाही यांच्यावर कोरडे ओढले. ते शेतकऱ्यांना कशा प्रकारे फसवितात,

लुबाडतात याविषयी वास्तविक मांडणी केली. याशिवाय शेती सुधारणा, आधुनिक शेती यांचा स्विकार केल्याशिवाय शेतकरी सुधारणार नाही याची जाणीव म. फुले यांनी करून दिली.

या काळात इंग्रजांनी शेतसारा वसुली पद्धत सुरू केली होती जी अन्यायकारक होती या विरोधात म. फुले यांनी आवाज उठविला.

न्या. महादेव गोविंद रानडे यांनी शेतीक्षेत्रात भांडवली सुधारणा व आपत्तीच्या प्रसंगी सरकारने शेतकऱ्यांना सहाय्यता व मदत केली पाहिजेत तसेच शेती सुधारणा, शेतकऱ्यांचे दारिद्र्य, कर्जबाजारीपणा यांचा विचार त्यांनी सार्वजनिक सभेच्या माध्यमातून मांडला.

राजर्षी शाहू महाराज यांनी शेतकऱ्याच्या समस्याचा व विविध अडचणी व संकटाचा अभ्यास केला. नैसर्गिक संकटामुळे शेती व्यवसाय अडचणीत येत असल्यामुळे धरणे बांधण्याचे कार्ये केले. तसेच शेतकऱ्याच्या मालाचे खरेदी-विक्री केंद्रे सुरू केले. संकटात, दुष्काळात शेतकऱ्यांना मदत केली. बी-बियाणाचे वाटप गरजू शेतकऱ्यांना केले. शेतकऱ्यांच्या विकासासाठी आपल्या राज्यात कायदे केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकरी व शेती विषयक व्यापक अभ्यास करून विचार मांडले. त्यांच्या मते, शेती पारंपरिक पद्धतीपेक्षा आधुनिक तंत्रज्ञान आणि जलव्यवस्थापन यांचा विचार करून केली पाहिजे. यामुळे शेतीची उत्पादकता व धान्य उत्पादन वाढेल. यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामुदायिक शेती आणि कृषी आधारीत उद्योग व्यवसायांना प्रोत्साहन देण्याचा विचार मांडला. त्यांच्या मते, सरकारने शेतकऱ्यांना शेती उद्योगासाठी कर्ज व आर्थिक सहाय्य मोठ्या प्रमाणात केले पाहिजे. तसेच सर्व राजकिय पक्ष व राज्यकर्ते यांनी शेती क्षेत्रातील विकास व शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले पाहिजेत. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर नुसते विचार मांडून थांबले नाहीत तर त्यांनी भारतीय राज्यघटनेत ह्या तरतुदी केल्या. त्यामुळेच आज शेतकऱ्यांना विकास योजनेद्वारे मदत होत आहे. शेतकऱ्यांसाठी राज्यघटनेद्वारे आपल्या हक्क व न्याय्यासाठी संघटीत होऊन संघर्ष करण्याचा, न्याय मागण्याचा हक्क व शेतकरी संघटना व चळवळी उभी करण्याचा अधिकार दिला. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शेतकऱ्यांचे उद्धारकर्ते म्हटले जाते.

३ ऑगस्ट १९४८ मध्ये भाई केशवराव जेधे, भाई उद्धवराव पाटील आणि प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली भारतीय शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. डॉ. एन. डी. पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी शेतकरी विजबील माफी, शेतकऱ्यांना शेती मालाला किफायतशीर दर मिळाला पाहिजे. जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणाविरुद्ध लढा. एन्रॉन प्रकल्पाविरुद्ध लढा, सेझ (SEZ) विरुद्ध लढा तासगाव साखर कारखाना बचाव आंदोलन अशा हजारो मागण्यांसाठी आंदोलने झाली. त्यामुळे भाई एन. डी. सरांना शेतकऱ्याचा खरा नेता, शेतकऱ्याचा आवाज म्हणून संपूर्ण महाराष्ट्रभर ओळखले जाते.

थोडक्यात, फुले, शाहू आंबेडकर यांना अपेक्षित असलेली कृषी अर्थव्यवस्था निर्माण होणार नाही तोपर्यंत शेतकरी संकटातून बाहेर येणार नाही.

**४.२.१.२ (ब) भारतातील शेतकरी आंदोलन आणि चळवळी :**

१) स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतकरी आंदोलने व चळवळी –

(अ) संन्थालचे बंड

(ब) चंपारण्य चळवळ

(क) खेडा शेतकरी संघर्ष

(ड) पंजाबमधील शेतकरी उठाव

(इ) बार्डोली सत्याग्रह

२) स्वातंत्र्यानंतरची शेतकरी आंदोलन व चळवळी –

(अ) तेलंगणा शेतकरी संघर्ष आंदोलन

(ब) नक्षलवादी शेतकरी संघर्ष आंदोलन

(क) भारतीय शेतकरी कामगार पक्ष

(ड) भारतीय किसन संघ

(इ) कर्नाटक राज्य रयत संघ

(ई) तमीळनाडू शेतकरी संघ

(उ) शेतकरी संघटना (शरद जोशी प्रणीत)

(ऊ) स्वामितानी शेतकरी संघटना

बळीराजा शेतकरी संघटना याशिवाय अनेक संघटना शेतकऱ्यांसाठी स्थापन केलेल्या आहेत. मात्र आजही शेतकरी संकटात आहे. उत्पादन खर्चाच्या प्रमाणात उत्पादनाला किफायतशीर व रास्त दर मिळत नाही.

**४.२.१.३ (क) शेतकरी संघटनेची वैचारिक भूमिका :**

**१) शेती मालाला रास्त भाव :**

शेतकऱ्याच्या शेतमालाच्या उत्पादन खर्चाचा अभ्यास करून त्यामध्ये शेतकऱ्यांचे श्रम, शेतकऱ्याचा नफा विचारात घेऊन मग रास्त भाव शासनाने ठरवावा. हा शेतमालाला रास्त व किफायशीर भाव मिळत नसेल तर शेती व्यवसाय तोट्यात जातो व शेतकरी कर्जबाजारी होतो.

**२) सर्व शेतकऱ्याचा विचार :**

शेतकरी संघटना मोठे, मध्यम व लहान, सिमांत शेतकरी यामध्ये फरक करीत नसून सर्व शेतकरी वर्गाचा विचार करून लढा उभा करीत असते. वेगवेगळ्या शेतीमालाच्या रास्त व किफायतशीर भाव मिळण्यासाठी वेगवेगळी आंदोलने सरकार दरबारी केले. त्यांना काही प्रमाणात यश सुद्धा आले.

**३) ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या प्रश्नाला वाचा फोडणे :**

ग्रामीण भागातील होणाऱ्या अन्यायाविरोधात व त्यांच्या न्याय हक्कासाठी विविध आंदोलने करून सरकारचे लक्ष वेधले आहे.

**४.२.१.४ (ड) शेतकरी संघटनेची विविध आंदोलने :**

**१) कांदा दर आंदोलन :**

महाराष्ट्रात शेतकरी संघटनेची आंदोलनाची सुरुवात १९७८ मध्ये झाली. नाशिक लासलगाव, पुणे चाकण, लोणंद इत्यादी परिसरात कांदा बाजारपेठ आहेत. शेतकऱ्याकडे कांदा उत्पादन आले की कांदा दर खुपच कोसळतात. त्यांना वाहतुक खर्च सुद्धा गाडीतील कांदा विकून मिळत नाही. त्यामुळे शासनाने किमान १ रुपया किलो दराने कांदा विकत घ्यावा यासाठी शरद जोशी यांनी आमरण उपोषण केले. पुणे-नाशिक रस्ता जाम केला. यामुळे आंदोलनाला हिंसक वळण लागले. पुलोद (शरद पवार) तत्कालीन सरकारने कांदा किंमती पडल्यामुळे शेतकऱ्याची नुकसान मान्य करून शेतकरी संघटनेची मागणी मान्य केली व शेतकरी संघटनेची ताकद व बळ वाढले. त्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात शेतकरी संघटनेला पाठिंबा दिला आणि शेतकरी संघटनेचा विस्तार वाढण्यास सुरवात झाली.

१९८० मध्ये लासलगाव येथेही असेच कांदादर वाढविण्याविषयक आणि कांदा निर्यात करण्यासाठी शेतकरी संघटनेने व्यापक आंदोलन केले आणि शासनाने मागणी मान्य करून नाफेडमार्फत कांदा हमी भावाने खरेदी करण्याचे काम चालू केले.

**२) ऊस दर आंदोलन :**

महाराष्ट्र शासनाने ठरविलेला ऊस दर योग्य नाही. ऊस दर वाढविला पाहिजे. नाशिक जिल्ह्यासह प. महाराष्ट्रात व मराठवाड्यात शेतकरी संघटनेने १९८०-८१ मध्ये खूप मोठे आंदोलन केले. या आंदोलनात खेरवाडी या रेल्वेस्टेशनला आंदोलकांनी आग लावली. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ठप्प केली. तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांनी संघटनेच्या नेत्याला चर्चेसाठी बोलविले. काही मागण्या मान्य केल्या. २००३ साली स्वाभिमानी शेतकरी संघटना स्थापन झाल्यानंतर या संघटनेने ऊसाला १२००/- रुपये प्रती टन दर मिळाला पाहिजे, यासाठी मोठे आंदोलन प. महाराष्ट्रात सांगली, कोल्हापूर, सातारा या ठिकाणी केले. यावेळी सुशिलकुमार शिंदे सरकारने शेतकरी संघटनेच्या नेत्यांशी चर्चा करून ऊसाला १००० रुपये टन दर देण्याचे मान्य केले. यासाठी राजू शेट्टी यांच्या नेतृत्त्वाखाली स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्य प्रभावी व व्यापक प्रमाणात चालू होते. शेतकऱ्यांचा स्वाभिमानी शेतकरी संघटनेला प्रचंड पाठींबा मिळू लागला. पुढे हि संघटना राजकारणात उतरली व शेतकऱ्यांनी राजू शेट्टी यांना खासदार बनविले. मात्र २०१४ मध्ये राजू शेट्टी यांनी भाजपप्रणीत राष्ट्रीय विकास आघाडीला पाठींबा दिला व सदाभाऊ खोत हे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते आमदार झाले व राज्यमंत्री झाले. ते पक्षातून बाहेर पडले व अनेक नेते बाहेर पडल्यामुळे आज स्वाभिमानी शेतकरी संघटना कमकुवत झाली आहे. मात्र आजही स्वाभिमानीला शेतकऱ्यांचा मोठा पाठींबा असून

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर महाराष्ट्रभर आंदोलन करत आहे. आज ती एकमेव शेतकऱ्यांची संघटना सक्रियपणे शेतकरी प्रश्नावर आवाज उठवणारी संघटना आहे, हे वास्तव आहे.

**३) तंबाखू उत्पादकांचे आंदोलन :**

निपाणी हे महाराष्ट्र व कर्नाटकाच्या सीमा भागालगत गाव तंबाखू उत्पादनासाठी सुप्रसिद्ध आहे. निपाणीसह कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक गावांत तंबाखू उत्पादन शेतकरी घेऊ लागले. मात्र तंबाखू व्यापारी तंबाखूला योग्य व रास्त भाव देत नाहीत, शेतकऱ्यांची पिळवणूक करतात. त्यामुळे शेतकरी संघटनेचे अध्यक्ष शरद जोशी यांच्या नेतृत्त्वाखाली तंबाखुला योग्य दर मिळाला पाहिजे, शेतकऱ्यांची पिळवणूक थांबली पाहिजे, शासनाने तंबाखू खरेदी हमी दराने खरेदी केली पाहिजे यासाठी ५ हजार शेतकऱ्यांनी आंदोलन केले. यावेळी आसपासच्या परिसरातील अनेक लोक सहभागी झाले व आंदोलनाची धार तीव्र झाली. २० ते २५ हजार आंदोलक सहभागी झाली. यावेळी पोलीसांनी आंदोलन नियंत्रणात आणण्यासाठी लाठीमार केला, अश्रुधूर, पाण्याचे फवारे व हवेत गोळीबार केला. या गोळीबारात २० शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. अनेक आंदोलक शेतकरी जखमी झाले. यावेळी शासनाने आंदोलन थांबविण्याचे व चर्चा करण्याचे आश्वासन दिले. शेतकरी संघटनेच्या नेत्यांना बोलावून चर्चा करून तंबाखू दर वाढविण्याची आणि तंबाखू खरेदी विक्री संघ स्थापन करण्याचे आश्वासन दिले आणि आंदोलन मागे घेण्यात आले.

**५) कापूस उत्पादकांची आंदोलने :**

महाराष्ट्रातील विदर्भाला पांढऱ्या सोन्याचा प्रदेश म्हणतात. प्रामुख्याने विदर्भात सर्वात जास्त कापूस पिकविला जातो. त्यानंतर मराठवाड्यात कापूस या पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. मात्र शासनाचे वस्त्रोद्योगाचे धोरण कापूस उत्पादकाच्या नुकसानीस कारणीभूत ठरले. त्यामुळे १९८६, १९८८ या काळात कापसाला योग्य व किफायतशीर भाव मिळाला पाहिजे. व्यापाऱ्याकडून शेतकऱ्याची फसवणूक व लुटमार थांबली पाहिजे. शेतकऱ्यासाठी कापूस खरेदी विक्री संघामार्फत कापूस खरेदी शासनाने करावी. तसेच परदेशातून कृत्रीम धागा आयात करू नये या मागणीसाठी शरद जोशी यांनी शेतकरी संघटनेच्या वतीने मोठी आंदोलने केली. केंद्र सरकारच्या कृत्रीम धागा आयात धोरणाला राष्ट्रीय पातळीवर विरोध कारण्यासाठी कामगार नेते कॉ. दत्ता सामंत यांनी शेतकरी संघटनेला पाठींबा देऊनही शेतकऱ्यांची जन चळवळ मोठी केली.

त्यानंतर विदर्भात कापूस दर आंदोलने म्हणावी तेवढी प्रभावी झाली नाहीत. अनेक आंदोलन मागे घेतली. त्यामुळे शेतकरी वर्ग नाराज झाला. शेतकरी संघटना राजकारणात उतरली. शरद जोशी खासदार झाले. कृषी आयोगावर गेले. मात्र दुसऱ्या बाजूला शेतकरी संघटनेमध्ये फूट पडली.

**६) दूध दर आंदोलन :**

महाराष्ट्रामध्ये धुळे जळगाव हे दोन्ही जिल्हे प्रामुख्याने दुध उत्पादनासाठी सुप्रसिद्ध आहेत. मात्र प. महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर या जिल्ह्यात सुद्धा सहकार क्षेत्राच्या विकासाबरोबर दुग्धव्यवसाय प्रचंड वाढला आहे. आज प. महाराष्ट्र दुध उत्पादन व दुध प्रक्रिया

उद्योगात मागे नाही. महाराष्ट्रातील राजारामबापू दुध संघ, वारणा दूध संघ, गोकुळ दूध संघ, चितळे दूध संघ हे प्रमुख दूध संघ आहेत. जे महाराष्ट्रात मुंबई, पुणे शहरात दुधपुरवठा करतात.

मात्र दुग्धव्यवसायात उत्पादन खर्च पशुपैदास, चारा, औषधे इ. खर्चापेक्षा दूध दर कमी मिळत आहे. त्यामुळे दुध संघाकडून दुध उत्पादक शेतकऱ्यांची पिळवणूक होत आहे. त्यामुळे शेतकरी संघटनेने दुधाला उत्पादन खर्चाच्या प्रमाणात योग्य व रास्त दर मिळाला पाहिजे अन्यथा हा व्यवसाय संकटात येईल. यासाठी १९८२ मध्ये सांगली, पुणे, नाशिक व औरंगाबाद येथे शेतकरी संघटनेने आंदोलन केले. या आंदोलनामध्ये शहरातील दुध पुरवठा थांबविणे, शासनाला, दुध संघाला दुध विकू नये असा आदेश शेतकऱ्यांना दिला. मात्र दुध उत्पादकांनी हा आदेश मानला नाही व हे आंदोलन प्रभावी झाले नाही. मात्र या झालेल्या विविध दुध दर वाढविण्याच्या आंदोलनामुळे शासनाने दुधाचे दर वाढविलेले आहेत हे शेतकरी संघटनेच्या आंदोलनाचे फलीत आहे. हे तितकेच वास्तव आहे.

अशा प्रकारे शरदर जोशी यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढा देण्यासाठी व शेतकऱ्यांना त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्यासाठी शेतकरी संघटना काढली व विविध आंदोलन करून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य केले.

मात्र हे ही तितकेच महत्त्वाचे आहे की शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणावर भारतीय शेतकरी कामगार पक्षाने डॉ. एन. डी. पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली महाराष्ट्रात विविध आंदोलन केले. SEZ (विशेष आर्थिक क्षेत्र) तसेच एन्रान प्रकल्प, जागतिकीकरणा विरोधी लढे, शेतकऱ्यांच्या जमीनी वाचविण्यासाठी लढे, शेतकऱ्याच्या जमीनी उद्योगपतीच्या घशात जाऊ नये यासाठी विविध आंदोलने केले आहेत.

साखर कारखाने हे सभासदाच्या मालकीचे असावेत त्यांची खाजगी मालकीला विरोध करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षानी प्रा. डॉ. एन. डी. पाटील सरांच्या नेतृत्त्वाखाली चळवळी व आंदोलने उभी केली.

### ४.२.१.५ शेतकरी संघटनेचे राजकारण :

शेतकरी संघटना स्थापन झाली तेव्हा शेतकरी संघटना शेतकऱ्याचे आर्थिक व कृषीविषयक हितसंबंध केंद्रस्थानी मानून कार्य करेल. तसेच शेतकरी संघटना कोणत्याही सार्वजनिक लोकसभा, विधानसभा किंवा पंचायत राज संस्थेच्या निवडणुकीत सक्रिय सहभाग घेणार नाही. शेतकरी संघटना निवडणूकीच्या राजकारणापासून अलिप्त असेल आणि कोणत्याही राजकीय पक्षाला पाठींबा देणार नाही, असे ठरविण्यात आले.

परंतु नंतरच्या काळात शेतकरी संघटनेच्या आर्थिक मागण्या शासनाकडून पूर्ण करून घेण्यासाठी निवडणुकीत राजकिय पक्षाला पाठींबा देण्याचे धोरण ठरले आणि शेतकरी संघटनेने १९८४ च्या लोकसभा व १९८५ च्या विधानसभा निवडणूकीत पुरोगामी लोकशाही दल (शरद पवार) यांना पाठींबा दिला.

१९८० नंतर राजकिय पक्षांनी आपल्या जाहीरनाम्यात शेती मालाला रास्त व किफायतशीर भाव देण्याचे आवश्वासन दिले आणि संघटनेच्या जाहीर सभेत अनेक राजकिय पक्षाचे नेते सहभागी झालेले होते.

**शेतकरी संघटनेची राजकारणात भूमिका :**

शेतकरी संघटनेचे नेते शदर जोशी यांनी निवडणूकीच्या राजकारणात सक्रिय सहभाग घेण्यासाठी 'स्वतंत्र भारत पक्षाची' स्थापना केली. परंतु कोणतेही यश मिळाले नाही. स्वत: शरद जोशीचा निवडणुकीत पराभव झाला. त्यानंतर जातीयवादी व हिंदुत्ववादी शिवसेना भाजपच्या युतीला पाठींबा देऊन खासदार झाले.

**४.२.१.६ शेतकरी संघटनेत गटबाजीचे राजकारण :**

नवीन आर्थिक धोरण १९९१ नंतर आले तेव्हा डंकेल प्रस्ताव आणि गॅट करारांना शेतकरी विरोधी असूनही संघटनेने खुल्या आर्थिक धोरणाचे व जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाचे स्वागत केले. या धोरणामुळे शेतकऱ्यांची सबसीडी (अनुदान) पूर्णपणे रद्द केले. बाहेरिल शेती मालाची आयात वाढली. शेतकरी हवालदील झाले, कर्जबाजारी झाले. किंबहुना शेतकरी आत्महत्तेचे प्रमाण वाढले. या नवीन धोरणाला समर्थन दिल्यामुळे शेतकरी देशोधडीला जाईल. या संघटनेच्या भूमिकेला अनेक नेत्यांनी विरोध केला. भारतातील व महाराष्ट्रातील अनेक नेते बाहेर पडले. राजू शेट्टी यांनी बाहेर पडून स्वाभिमानी शेतकरी संघटना स्थापन केली. शरद जोशींचे नेतृत्त्व कमकुवत झाले.

नंतरच्या काळात राजू शेट्टींच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेने भाजप-सेना महायुती व राष्ट्रीय लोकशाही आघाडी (भाजप एन. डी. ए.) ला पाठींबा दिला. त्यामुळे या पक्षातून सदाभाऊ खोत, बी. जी. पाटील काका व अन्य पदाधिकारी बाहेर पडले.

अशा प्रकारे संघटनेच्या चुकीच्या भूमिकेमुळे शेतकरी संघटनेत मोठी गटबाजी होऊन संघटना कमकुवत झाली आहे.

**४.२.१.७ शेतकरी संघटनेचे मूल्यमापन :**

शेतकरी संघटना स्थापन झाल्यानंतर शेतकरी प्रश्नावर, शेतकऱ्यांच्या एकजुटीवर व उत्पादन खर्चाच्या प्रमाणात योग्य, रास्त व किफायतशीर भाव मिळाला पाहिजे, यासाठी शासनावर दबाव आणण्यासाठी विविध आंदोलने, धरणे, उपोषण, रास्ता रोको इत्यादी मार्गांद्वारे प्रचंड कार्य केले.

शेतकऱ्यांचा पाठींबा प्रचंड प्रमाणात मिळाला. मात्र प्रारंभी राजकारणापासून अलिप्त राहण्याची भूमिका नंतर बदलून राजकीय पक्षात रूपांतर करून निवडणूकीचे राजकारणात सक्रिय सहभाग घेतला त्यामुळे संघटनेच्या ताकदीला ग्रहण लागण्यास सुरवात झाली.

**शेतकरी संघटनेचे यश :**

१) शेतकरी वर्गात प्रश्नासाठी लढा देण्यासाठी जनजागृती घडवून आणली.

२) सर्व शेतकरी वर्गात एकजूट घडवून आणली.

३) शेतकऱ्यातून राजकीय नेतृत्त्व उभे राहिले.

४) शेतीमालाला रास्त व किफायतशीर भाव ही मागणी शासन दरबारी मांडली.

५) संघटनेमुळे शेतकऱ्यांचे अनेक शेतीप्रश्न सोडविले.

**शेतकरी संघटनेचे अपयश :**

१) मोठ्या, सधन, ऊस, दूध उत्पादक, कांदा, कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठीच कार्य, अल्पभूधारक जिरायत शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले.

२) शेतकऱ्याचे प्रश्न सुटण्याऐवजी नवीन प्रश्न जागतिकीकरणामुळे निर्माण झाले ते सोडविता आले नाहीत. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करू लागले.

३) शेतमजूरांच्या प्रश्नाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले.

४) नव्या धोरणाला जागतिकीकरण, उदारीकरण खाजगीकरण, सेझ या धोरणाला चुकीचे समर्थन दिले.

**सारांश :** शेतकऱ्याच्या शेतीमालाला रस्त व किफायतशीर भाव मिळवून देण्यासाठी व शेतकऱ्यांचे हित जोपासण्यासाठी शेतकरी संघटनेने अतिशय महत्त्वाचे कार्य केले आहे. शेतकरी संघटनेच्या कार्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यास व शासन दरबारी मांडण्यात मदत झाली.

शेतकरी संघटना म्हणजे, ''शेतकऱ्यांचा आवाज'' असे म्हटले तर वावगे होणार नाही. मात्र पक्षातील नेत्यांच्या राजकिय स्वार्थामुळे संघटना कमकुवत होण्यास सुरवात झाली. पक्षातील अनेक नेते राजकीय लाभासाठी बाहेर पडले, काही नेते इतर राजकिय पक्षात गेले. मात्र शेतकऱ्यांची एकजूट, संघटन असलेली भारतातील एकमेव संघटना म्हणजे शेतकरी संघटना आता कमकुवत झालेली दिसून येते.

### ४.२.२ सहकार चळवळ (Co-operative Movement) :

**सहकार चळवळ – अर्थ व्याख्या :**

स्वातंत्र्यापूर्वी महाराष्ट्रात व देशात सहकार चळवळीचा उदय झाला. महाराष्ट्रात सहकारी संस्थांचे राजकारण लोकशाहीवर आधारलेले असते. समान हित असणार अनेक लोक एकत्र येतात. सहकार तत्त्वावर संस्था स्थापन करतात. प्रत्येक सभासदाला निर्णय प्रक्रियेत सहभाग घेता येतो. तसेच सहकारी संस्थांच्या निवडणूकीत मतदान करणे, वेगळे पॅलन उभे करणे, निवडणूकीत उभे राहणे, प्रचार करणे आणि सहकारी संस्थांचे पदाधिकारी म्हणून नेतृत्त्व करणे.

सहकारी संस्था हि राजकारणाची पाठशाला असलेली दिसून येते. सहकारी संस्थांचे नेते स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा व लोकसभेत उमेदवार म्हणून उभे राहून निवडून आले आहेत.

**सहकाराची व्याख्या :**

सहकाराची व्याख्या अनेक विचारवंतांनी केल्या असून काही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) हेन्री कॅलव्हर्ट** यांच्या मते,

''सहकार हा संघटनेचा असा प्रकार आहे की ज्यामध्ये अनेक व्यक्ती मानवी भूमिकेतून स्वइच्छेने एकत्र येतात आणि आपल्या आर्थिक हितसंबंधाच्या उन्नतीसाठी समानतेच्या तत्वावर संघटना स्थापन करतात.''

२) **श्री. मेहता वैकुंठलाल** यांच्या मते,

''सामाजिक आशय असलेली आर्थिक व्यवस्था म्हणजे सहकार होय.''

३) **सी. आर. के.** यांच्या मते,

''सभासदाचे कर्तव्य मानण्यास तयार असणारी, नि:स्वार्थी भूमिकेतील चालविलेली सभासदाच्या गुंतवणुकीनुसार त्यांना लाभांश देणारी संस्था म्हणजे सहकार होय.''

वरील व्याख्येवरून सहकार अशी संस्था आहे की, ज्यामध्ये व्यक्तीचे संघटन असते. सभासद स्वच्छेने सहभागी होतात. किंबहुना बाहेर पडू शकतात. अशा प्रकारे सामुहिक प्रयत्नातून स्थापनन झालेली संस्था होय.

### ४.२.२.१ सहकारी संस्थांची वैशिष्ट्ये :

**१) व्यक्तीला प्राधान्य (व्यक्तींचे संघटन) :**

सहकारी संस्था हे व्यक्तीचे संघटन असून इतर साधनसामग्रीपेक्षा व्यक्तीला प्राधान्य अधिक असते. सहकारी संस्थाचे सभासदत्व ऐच्छिक असून सक्ती केली जात नाही. सहकारी संस्थेची उद्दिष्ट्ये, नियम, अटी मान्य असणाऱ्या व्यक्ती सभासद होत असतात.

**२) लोकशाही स्वरूप :**

सहकारी संस्थांचे कामकाज व कारभार लोकशाही तत्त्वानुसार चालतो. प्रत्येक सदस्याला एकच मत देण्याचा अधिकार असून सर्व सभासदांना समान हक्क असतात. पदाधिकारी निवड लोकशाही मार्गाने निवडणूकीद्वारे ५ वर्षासाठी केली जाते.

**३) सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे साधन :**

सहकारी संस्थाचा हेतू नफा कमविणे हा नसून समाजातील गरजू लोकांना व सभासदांना किफायतशीर दरात दर्जेदार वस्तू व सेवा सुविधा उपलब्ध करून देणे हा उद्देश असतो. म्हणजे सहकार चळवळीला सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे साधन म्हणून पाहिले जाते. सहकारी संस्थेमुळे रोजगार मिळतो. त्यामुळे लोकांचा सामाजिक विकास व आर्थिक प्रगती होते. लोकांचा सामाजिक व आर्थिक दर्जा सुधारण्यास मदत होते.

**४) दारिद्र्य व शोषणातून सहकारी संस्थेचा उदय :**

ग्रामीण भागातील जनतेच्या दारिद्र्यातून व आर्थिक शोषणातून सहकारी चळवळीचा उदय झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात १९०४ साली भारतात पहिला सहकारी पतपुरवठा व पतसंस्था कायदा मंजूर केला. या कायद्यामुळे शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्था स्थापन झाल्या. १९४९ मध्ये अहमदनगर जिल्ह्यात लोणी येथे विठ्ठलराव विखेपाटील यांनी पहिला सहकारी साखर कारखाना स्थापन केला. नंतर महाराष्ट्रात विविध राजकीय नेत्यांनी सहकारी साखर कारखाने व विविध सहकारी संस्था स्थापन केल्या.

महाराष्ट्रात १९६० मध्ये महाराष्ट्र सहकारी कायदा मंजूर केला. महाराष्ट्रात सहकार क्षेत्राचा प्रचंड विकास झाला.

**५) रोजगार निर्मितीचे साधन :**

महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, सहकारी बँका, दुधसंघ, विविध सहकारी संस्थेमध्ये रोजगार निर्मिती झाली व लाखो लोकांना सहकारी संस्थेत रोजगाराची संधी मिळाली. आज देशातील एकूण सहकारी संस्थांपैकी २३.८% संस्था महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात उद्योगक्षेत्रानंतर रोजगार देणारे साधन म्हणजे सहकारी संस्था होय, हे नाकारता येत नाही.

**६) शेतकऱ्यांचा सभासद म्हणून उत्पादन प्रक्रियेत सहभाग :**

सहकारी साखर कारखाने, सहकारी दूध संघ, सहकारी सूतगिरणी, सहकारी शेती माल प्रक्रिया उद्योग इत्यादी सहकारी संस्थात सभासद म्हणून भाग भांडवल गुंतवून उत्पादन प्रक्रियेत सहभाग शेतकऱ्यांचा वाढला आहे.

**७) सहकारी संस्था राजकारणाचे प्रवेशद्वार :**

महाराष्ट्रातील राजकारणात सहकारी संस्थातील पदाधिकारी सक्रीय होतात. मग ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा निवडणूकीत प्रभाव निर्माण करून लॉबी तयार करून निवडणूकीत उभे राहतात व राजकारणात प्रवेश करतात.

४.२.२.२ **महाराष्ट्रातील महत्त्वाच्या सहकारी संस्था :**

**१) सहकारी साखर कारखाने :**

आज पश्चिम महाराष्ट्रात साखर कारखान्याचे जाळे उभे राहिले असून संपूर्ण महाराष्ट्राचे राजकारण पश्चिम महाराष्ट्रभोवती फिरत असल्याचे दिसून येते. विठ्ठलराव विखे पाटील, वसंतदादा पाटील, राजारामबापू पाटील, बाळासाहेब देसाई, यशवंतराव मोहिते, रत्नाप्पा कुंभार, शंकरराव कोल्हे इत्यादी सहीत अनेक राज्यकर्त्यांनी सहकारी साखर कारखाने सुरू केले.

**२) सहकारी दुध संघ :**

ज्या परिसरात सहकारी साखर कारखाने सुरू झाले त्या परिसरात शेतीला पाणीपुरवठा झाला व पशुसंवर्धन सुरू होऊन सहकारी दुध संघ सुरू झाले. उदा. राजारामबापू दुध संघ (कृष्णा दूध), वारणा दूध, चितळे दूध संघ, हुतात्मा दुध संघ, थोटे दुध संघ, गोकुळ दुध संघ इत्यादी सहीत महाराष्ट्रात विविध सहकारी दूध संघ सुरू झाले.

**३) सहकारी सूतगिरणी :**

कापूस हे विदर्भातील प्रमुख पीक असून विदर्भाला पांढऱ्या सोन्याचा प्रदेश म्हटले जाते. तसेच मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर कापूस उत्पादन होते. मात्र सूतगिरण्या विदर्भ मराठवाड्यापेक्षा प. महाराष्ट्रात सर्वाधिक आहेत. पाहिजे त्या प्रमाणात विदर्भ मराठवाड्यात सुतगिरण्या दिसत नाहीत.

**४) सहकारी पतसंस्था :**

मराठवाडा विदर्भ व कोकण पेक्षा पश्चिम महाराष्ट्र व मुंबई परिसरात सहकारी पतसंस्था जास्त प्रमाणात आढळतात.

**५) सहकारी बँक :**

महाराष्ट्रात सर्वच जिल्ह्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, इतर सहकारी बँका स्थापन झालेल्या आहेत.

**६) इतर उद्योग :**

शेतीमाल व अन्नप्रक्रिया सहकारी उद्योग व्यवसाय आज ग्रामीण भागात वाढतच आहेत.

### ४.२.२.३ महाराष्ट्रातील सहकार चळवळीचे मुल्यमापन :

ग्रामीण भागातील लोकांच्या आर्थिक व सामाजिक हितसंबंधांची जोपासना करण्यासाठी सहकार चळवळीचा उदय झाला. मात्र या सहकार चळवळीमुळे महाराष्ट्रात विविध सहकारी संस्थांचा उदय झाला तसेच यशवंतराव चव्हाण व वसंतदादा पाटील यांच्या सरकारने या सहकारी संस्थांना खूप मोठा हातभार लावला आणि विविध सेवा सुविधा देऊन सहकारी संस्थांचा विकास केला. या सहकारी चळवळीतून कृषी औद्योगिक समाजाच्या उभारणीस प्रोत्साहन मिळाले. मात्र गेल्या ६५ वर्षामध्ये महाराष्ट्रातील सहकारी संस्थांत राजकारणाचा शिरकाव झाल्याने सहकारी संस्थेसमोर फार मोठी आव्हाने उभी राहिली.

नव्या आर्थिक धोरणामुळे जागतिकीकरण, खाजगीकरण उदारीकरण स्विकारल्यामुळे सहकारी संस्था व चळवळीपुढे फार मोठी आव्हाने उभी राहिली.

आज खाजगी साखर कारखाने, खाजगी दूध संघ, खाजगी सुतगिरणी, खाजगी बँका, खाजगी पतपुरवठा करणाऱ्या मायक्रो फायनान्स कंपनी उभ्या राहिल्या. त्यामुळे सहकारी संस्थेसमोर आव्हाने उभे राहिले. आज राज्यकर्ते सहकारी संस्था कर्जबाजारी करून खाजगी कंपन्यांना अतिशय कमी किंमतीत निविदा काढून विकत आहेत.

आज सहकारी संस्था ह्या राजकारणाचे अड्डे झाले आहेत. त्यामुळे तेथे सहकारापेक्षा सत्तेचा, निवडणूकीचा विचार होऊन सहकारी संस्थाचे राजकियीकरण झाले. त्यामुळे सहकारी संस्था राजकारणाच्या आणि राज्यकर्त्यांच्या दावणीला बांधल्या आहेत. यामुळे सहकारी संस्था मोडीत निघत असून आता सहकारी संस्थेच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे हे वास्तव आहे.

### ४.२.३ दलित चळवळ (Dalit Movement) :

**प्रस्तावना :**

प्राचीन काळापासून भारतीय हिंदू समाजव्यवस्था हि मनुस्मृतीच्या सिद्धांतानुसार चातुवर्ण्य पद्धतीवर आधारित निर्माण केली. यामध्ये ब्राह्मण, क्षेत्रीय, वैश्य आणि शूद्र. परंतु शूद्र या वर्णात अतिशुद्र हा वर्ण तयार केला होता जो अतिशय खालचा, कनिष्ठ वर्ण होता. अतिशुद्ध या वर्णाला पुढे अस्पृश्य (Untouchobles) म्हटले गेले.

या अस्पृश्य असलेल्या वर्णाला कोणतेच अधिकार, स्वातंत्र्य व न्याय नव्हता. सर्व प्रकारचे अधिकार यांना नाकारले होते. अस्पृश्यांना उपजिवीकेचे कोणतेही साधन नव्हते. या अस्पृश्यांना रोटी किंवा बेटी व्यवहार करू नये किंवा इतर ब्राह्मण क्षेत्रीय वैश्य व शुद्र यांनी यांना स्पृश्य करू नये, त्यांना कोणतीही मदत करू नये असा नियम येथील ब्राह्मणी व्यवस्थेने केला होता.

हिंदू समाजातील सवर्णांनी अस्पृश्यावर म्हणजे आजच्या दलित (SC) व प्रचंड अन्याय अत्याचार, शोषण केले. अस्पृश्य लोकांना जनावरापेक्षा ही हीन वागणूक दिली आणि सर्व प्रकारचे हक्क स्वातंत्र्य व न्याय नाकारून गुलामापेक्षाही वाईट वागणूक दिली.

तत्कालीन ब्राह्मणी व्यवस्थेने येथील बहुजन समाजावर शिक्षणाची बंदी लादली व गुलाम केले मात्र यांची जाणीव अद्यापही बहुजनाना होत नाही. आजही धर्माचा व जातीच्या गुलामीत अडकून आहेत.

**४.२.३.१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व दलित चळवळ :**

मनुस्मृतीच्या काळात ब्राह्मणी व्यवस्थेने धार्मिक पवित्र, अपवित्र, उच्च निच्च, जाती, पोटजाती स्पृश्य-अस्पृश्य अशा भेदभावाच्या भावना वाढीस लावून भारतीय हिंदू समाजव्यवस्थेत विषमता निर्माण केली. त्यामुळे अस्पृश्य समाजावर प्रचंड अन्याय झाले.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सुद्धा म्हणतात, दलित समाज हा सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक व शैक्षणिक प्रगतीच्या अधिकारापासून प्रचंड मागे आहे. बाबासाहेबांच्या अगोदर दलित अस्पृश्य समाजाला मंदिर, सार्वजनिक पाणवटे, सार्वजनिक विहीर, तलाव, शाळा इत्यादी ठिकाणी प्रवेश नाकारला होता. तसेच शिक्षण घेण्यास व शेती व इतर व्यवसाय करण्यास बंदी घातली होती. तसेच नविन कपडे घालण्यासही बंदी घातली होती.

संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत चोखा इत्यादी संतांनी समाजात अस्पृश्यतेविरोधी प्रबोधन केले. म. गांधी, विठ्ठल रामजी शिंदे यांनी सुद्धा अस्पृश्यता निर्मुलनाचे काही प्रमाणात प्रयत्न केले मात्र म्हणावे तेवढे यश आले नाही.

परंतु म. फुले यांनी विचार न मांडता प्रत्यक्ष आपला पाण्याचा हौद अस्पृश्यासाठी खुला केला. त्यांच्या शिक्षणासाठी मुलीची पहिली शाळा काढली. यानंतर बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनीही अस्पृश्यता निवारणासाठी आपल्या संस्थानात आदेश काढले तसेच डॉ. बाबासाहेबांना परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली.

यानंतर कोल्हापूर संस्थानचे रयतेचे राजे, सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते छत्रपती राजर्षी शाहु महाराज यांनी आपल्या संस्थानात अस्पृश्यांना हॉटेल टाकून दिली व ते राजे शाहू महाराज दररोज चहा-नाष्टा त्या हॉटेलवर करीत. तसेच आपल्या संस्थानात अस्पृश्यांना शिक्षणासाठी स्वतंत्र वस्तीगृह शाळा काढल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती व मदत केली.

माणगाव येथे अस्पृश्य परिषदेला हजर राहून यापुढे अस्पृश्याचे नेते, कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर असतील असे जाहीर केले.

नागपूर येथील अस्पृश्य व बहिष्कृत हितकारीणी परिषदेला शाहू महाराज स्वत: हजर राहिले व अस्पृश्योद्धासाठी प्रत्यक्ष कार्य केले. तसेच १९०२ मध्ये आरक्षणाची सुरुवात केली.

### ४.२.३.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळातील दलित चवळवळ :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे डॉ. भिमराव रामजी संकपाळ बालवयात प्रचंड ज्ञानी, बुद्धिमान, चिकीत्सक बुद्धी, चाणाक्ष आणि दूरदृष्टी असणारे व अन्याय न सहन करणारे परंतु ज्ञानाची प्रचंड भूक असलेले. त्यांनी शाळेत प्रवेश घेतला. मात्र तेथे धर्मांध जात्यांध शिक्षक, विद्यार्थी असल्याने त्यांना शाळेबाहेर बसावे लागे. अनेक वेळा कोणीही इतर विद्यार्थी त्याला अस्पृश्य म्हणून हिणवत. शिक्षक सुद्धा त्याला दूर ठेवत अशा परिस्थितीत बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण झाले. मात्र परदेशात शिक्षणासाठी गेल्यावर तेथे अस्पृश्यता, जातीभेद, धर्मातील अनिष्ठ प्रथा, परंपरा दिसल्या नाहीत. परदेशात अतिशय मानसन्मानाने इतर विद्यार्थ्यांप्रमाणे विद्यार्थी व शिक्षक वागत त्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांनी "Origin of Caste" जातीचा उदय हे पुस्तक अभ्यास करून लिहिले. त्यानंतर बाबासाहेब भारतात आल्यानंतर त्यांनी इंग्रजांना जातीभेद, अस्पृश्यता निवारण, पाणी पिण्याचा अधिकार, मंदिर प्रवेशाचा अधिकार, स्वतंत्र मतदार संघाचा अधिकार इत्यादी विषयी प्रश्न विचारण्यास व तोडगा काढण्यास चर्चा केली.

१९२० नंतर भारतातील अस्पृश्य उद्धाराचे कार्य व चळवळ त्यांनी हाती घेतली. या काळात दलित म्हणजे अस्पृश्य समाजाला जागृत करून संघटीत करण्याचे प्रयत्न केले. जात देवाने निर्माण केली नसून आपल्या स्वार्थासाठी धर्म जात, पोटजात चातुवर्ण्य व्यवस्था ब्राह्मणांनी निर्माण केली व त्याद्वारे बहुजनांना त्यांनी धर्मजात वर्णव्यवस्थेचे गुलाम बनविले, याविषयी ते अस्पृश्यांना जागृत करीत. त्यांनी अस्पृश्यांना नारा दिला की 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा.'

बहिष्कृत हितकारिणी सभा स्थापन करून अस्पृश्यांना कायदेशीर मदत केली व त्यांच्या न्याय हक्काविषयी प्रबोधन केले.

अस्पृश्य विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत या संस्थेमार्फत त्यांनी केली. परेल येथे क्रिडांगणे, क्रीडा मंडळे सुरू केली. बहिष्कृत विद्यार्थी संमेलनाचे आयोजन करून त्यांच्यात शिक्षणाविषयी व न्याय हक्काविषयी प्रबोधन केले. तसेच अस्पृश्यांच्या हक्क न्यायाविषयी सरकारशी चर्चा केली.

याच काळात १९२४ मधील बेळगावच्या काँग्रेस अधिवेशनात म. गांधींनी अस्पृश्यतेविरोधीची घोषणा करून काँग्रेस नेत्यांनी अस्पृश्यावरील सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी प्रयत्न करावे. अशा प्रकारचे आग्रहाचे आवाहन केले. मात्र म. गांधींनी चातुवर्ण व्यवस्थेचे, जातीव्यवस्थेचे समर्थन करून आंतरजातीय विवाहाना व स्नेहभोजनाला विरोध त्या काळात केला.

मलबार व कुलाबा येथील अस्पृश्यावरील होणाऱ्या जुलुमाविरूद्ध डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्यांना संघटीत होण्याचे आवाहन केले.

**चवदार तळे सत्याग्रह :**

जुलै, १९२७ मध्ये महाड, जि. रायगड येथील चवदार तळे सर्वांसाठी खुले करण्याचा नगरपरिषदेने ठराव

मंजूर केल्यानंतरही लोकांनी अस्पृश्यांना पाणी पिण्यास मज्जाव केला. त्यावेळी चवदार तळे अस्पृश्यांना खुले करण्यासाठी सत्याग्रह केला. डिसेंबर, १९२७ मध्ये इतर नागरिकाप्रमाणे अस्पृश्यही माणसे आहेत त्यामुळे त्यांनाही चवदार तळ्याचे पाणी पिण्याचे बरोबरीने हक्क मिळाले पाहिजेत, असा या परिषदेत निर्धार केला.

भारतीय हिंदू समाजातील ही जातीय व वर्णव्यवस्था मनुस्मृतीद्वारे तयार ब्राह्मणांनी केली. त्यामुळे मनुची अन्याय व गुलामी व्यवस्था आपण मानत नाही. अस्पृश्यांना जनावरापेक्षाही ही वागणूक देणारी मनुची व्यवस्था, मनुस्मृती अन्यायकारक असून ती नष्ट करून सामाजिक क्रांती घडविणे आवश्यक आहे, असे सभेत ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले.

२५ डिसेंबर, १९२७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबत डि. व्ही. प्रधान, जी. एन. सहस्रबुद्धे सहीत ५००० अस्पृश्यांच्या साक्षीने या मनुस्मृतीचे दहन केले. त्यामुळे २५ डिसेंबर हा दिवस मनुस्मृती दहन दिवस किंवा स्त्री मुक्ती दिवस साजरा केला जातो.

**काळाराम मंदीर प्रवेश सत्याग्रह :**

इंग्रज सरकारने विविध कायदे करून अनेक मंदिरे अस्पृश्यांना खुले केले. मात्र १९३० साली नाशिक येथील काळाराम मंदीर प्रवेश अस्पृश्यांना खुले करण्यासाठी सत्याग्रह केला. यावेळी सवर्णांनी अस्पृश्यांवर दगडफेक केला. मात्र प्रत्यक्ष अप्रत्यक्ष काँग्रसने सुद्धा पाठींबा दिला.

**अस्पृश्यांना स्वतंत्र प्रतिनिधीत्व :**

पहिल्या गोलमेज परिषदेत व दुसऱ्या गोलमेज परिषद (लंडन) येथे अस्पृश्यांना मुस्लीमाप्रमाणे स्वतंत्र प्रतिनिधीत्व द्यावे अशी मागणी केली. ब्रिटिश सरकारने बाबासाहेब आंबेडकरांची सर्व भूमिका एकूण घेतली आणि तिसरी गोलमेज परिषद १९३२ मध्ये झाली तेव्हा अस्पृश्यांना स्वतंत्र प्रतिनिधीत्व देण्यात यावे. परंतु म. गांधींच्या अस्पृश्यविरोधी भूमिकेमुळे म. गांधीजी अस्पृश्यांच्या स्वतंत्र प्रतिनिधीत्वाला विरोध केला व स्वतंत्र प्रतिनिधीत्व कोणत्याही परिस्थितीत अस्पृश्यांना मिळू नये यासाठी म. गांधीनी आमरण उपोषण केले.

शेवटी म. गांधींचे प्राण वाचविण्यासाठी स्वतंत्र मतदार संघाऐवजी राखीव जागा म्हणजे संयुक्त मतदार संघ देण्याच्या भूमिकेला स्विकारले. मात्र बाबासाहेबांना हा पुणे करार मान्य नव्हता.

शेड्युल कास्ट फेडरेशनची स्थापना करून लोकसभेच्या व प्रांताच्या निवडणूका लढविण्याची घोषणा केली. अस्पृश्यांचा राजकिय सहभाग वाढून निर्णय प्रक्रियेत सत्तेत बसण्याचे अस्पृश्यांना आव्हान केले.

**भारतीय संविधान व अस्पृशोद्धाराचे कार्य :**

भारतीय संविधानाच्या माध्यमातून कलम ५ ते ११ मध्ये नागरिकत्वाचा अधिकार बहाल केला. तसेच सर्व भारतीयामध्ये राजकिय समता निर्माण करण्यासाठी सर्वांना मतदानाचा अधिकार दिला.

तसेच संविधानाच्या तिसऱ्या भागात कलम १२-३५ मध्ये सर्व नागरिकांना मुलभूत अधिकार देऊन समतेचा आणि स्वातंत्र्याचा, शोषणाविरूद्धचा, धर्म स्वातंत्र्याचा, शैक्षणिक व जिवीताचा, मालमत्तेचा व

अन्यायाविरुद्ध न्यायालयात दाद मागण्यासाठी घटनात्मक पुनर्विलोकनाचा अधिकार बहाल केला. तसेच त्यांच्या सामाजिक आर्थिक विकासासाठी राज्याची मार्गदर्शक तत्त्वे तरतूद केली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरानंतरची दलित चळवळ :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या महापरिनिर्वाणापूर्वी बौद्ध धर्म लाखो अनुयायांसह स्विकारला व विषमतावादी हिंदू धर्माचा त्याग केला. तसेच त्यांच्या मृत्युनंतर १९५६ मध्ये भारतीय रिपब्लिकन पक्ष या राजकीय पक्षाची स्थापना झाली. १९५७ मध्ये विधान सभेच्या १३ जागा जिंकून चांगले यश मिळविले.

**४.२.३.३ भारतीय रिपब्लिकन पक्षाची फूट :**

भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्यानंतर संयुक्त महाराष्ट्र समितीला सहकार्य करण्याच्या प्रश्नावरून मा. बी.सी. कांबळे यांच्या नेतृत्त्वाखालील गट या पक्षातून बाहेर पडला आणि आर. पी. आय. प्रथमच पक्ष फुटला. पुढे या आर. पी. आय. बी. सी. कांबळे गट (दुरुस्त पक्ष) या गटाचे नेतृत्त्व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी केले. या गटाला यशवंतराव चव्हाण यांच्या बेरजेच्या राजकारणाचा भाग म्हणून काँग्रेसमध्ये सामील करण्याचे प्रयत्न केले. या पक्षाने स्थानिक निवडणूका काँग्रेससोबत आघाडी करून लढविल्या. १९७० मध्ये पुन्हा आर. पी. आय. पक्षात फूट पडली आणि कांबळे गटाने जनता पक्षाबरोबर युती करून खासदार लोकसभेवर झाले. यानंतर १९८० नंतर अनेकवेळा आर. पी. आय. मध्ये गटबाजी झाली. उदा. खोब्रागडे गट, मधाळे गट, आठवले गट, कवाडे गट, रा. सु. गवईगट तसेच प्रकाश आंबेडकर यांचा भारीप बहुजन महासंघ व सध्या वंचीत बहुजन आघाडी अशा प्रकारे स्वार्थी नेत्यामुळे समाज संघटीत ठेवण्याऐवजी आर. पी. आय. पक्षात वेळोवेळी फुट पडली. मात्र समाज आजही एकसंघ आहे तो म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या धाग्याने घट बांधणल्यामुळेच.

**दलित पँथरची स्थापना :**

१९७८ मध्ये औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव द्यावे. या नामांतराच्या प्रश्नावरून मराठवाड्यात सवर्ण लोकांनी जाणीवपूर्वक दलित विरोधी वातावरण निर्माण करून दलितांवर प्रचंड प्रमाणात अन्याय, अत्याचार केले. महिलांच्या नग्न धिंड काढल्या, घरे जाळली, दलित विरोधी दंगली केल्या. त्यावेळी दलितांचे संरक्षण करणे हे महत्त्वाचे मानून प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी दलित मुक्ती सेनेची स्थापना केली. अत्यंत आक्रमकपणे दलितांवरील अन्यायाविरोधात संघर्ष केला.

याच वेळी नामदेव ढसाळ व राजा ढाले, पवार यांनी दलित पँथरची १९७० मध्ये स्थापना करून दलितांना संरक्षण दिले. जिथे दलितावर अन्याय, अत्याचार झाले तेथे दलित पँथरचे कार्यकर्ते गेले व दलितांचे संरक्षण केले.

गायरान जमिनी दलितांना दिल्या पाहिजेत, शहरी भागात राखीव जागा दलितांना राहण्यास दिली पाहिजेत. नोकरीमध्ये राखीव जागा भरल्या पाहिजेत. राखीव जागाचा अनुशेष भरला पाहिजे. शिक्षण मोफत व सक्तीचे दिले पाहिजे. शिष्यवृत्ती दिली पाहिजे. शासकीय वस्तीगृहांची संख्या प्रत्येक तालुक्यात वाढली

पाहिजे. दलितांना अन्याय, अत्याचारापासून संरक्षण मिळण्यासाठी ॲस्ट्रासिटी ॲक्टची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजेत या आणि अशा अनेक मागण्या या पक्षाने शासनदरबारी मांडल्या त्यामध्ये काँग्रेसच्या काळात काही अंशी यश आले.

दलित पँथरने राज्यात अनेक ठिकाणी विविध प्रश्नावर आंदोलने केली आणि दलितांच्या विविध मागण्या मान्य करण्यासाठी प्रयत्न केले. दलितांच्या संरक्षण व न्याय हक्कासाठी दलित पँथरने प्रयत्न केले.

### ४.२.३.४ दलित चळवळीचे मूल्यमापन :

आज दलित चळवळ मंडल आयोग ओबीसीसाठी होता तरी मंडल आयोगाची अंमलबजावणी करण्यासाठी दलित चळवळीने भूमिका घेतली. आंदोलने केले. आरक्षण SC, ST, OBC, NT सर्वांना मिळाले पाहिजेत यासाठी दलित चळवळीने आंदोलने केली. दलितातील मातंग, चर्मकार किंवा ढोर समाज कोणावरही अन्याय झाला तर दलित चळवळ पुढे झाली, आंदोलने केली. महिलांवर कुठेही अन्याय झाला तरी दलित चळवळ आंदोलनात अग्रेसरच. मात्र आज अनु. जाती प्रवर्गाचे उपवर्गीकरण करण्याचे कट कारस्थान करून दलित चळवळीची ताकद कमी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. आज दलित चळवळीचे विविध गट काँग्रेस-शिवसेना, भाजप, राष्ट्रवादीसोबत जाऊन दलित चळवळ इतर पक्षाच्या दावणीला बांधली आहे.

आज भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट, तुकडे झालेले आहेत. आज रिपब्लीकन पक्ष राजकारणात अयशस्वी होत आहे. राजकारणातील जोगेंद्र कवाडे, रा. सू. गवई, प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले सहीत इतर गटानेही समाजाला वेठीला धरून स्वत:च्या स्वार्थासाठी, राजकीय सत्तेच्या लालसेपोटी स्वार्थापोटी सत्ताधारी पक्षाच्या वळणीला किंवा आधाराला बसले आहेत.

आज जातीयवादी पक्षाशी युती आघाडी करून आमदार, खासदार, मंत्रीपदं मागून घेत आहेत. मात्र आज दलित समाजाची संघटीत ताकद असूनही हे नेते समाजात फुट पाडण्याचे कार्य स्वार्थापोटी करीत आहेत.

रिपब्लिकन पक्षाचे व नेत्याचे ऐक्य होण्यासाठी समाजाने प्रयत्न केले. विनंती केली मात्र या रिपब्लिकन नेत्याने १९९८ ला ऐक्य केले आणि चार खासदार निवडून आले. मात्र त्यानंतर पुन्हा हे नेते फुटले व आपली वेगवेगळी चुल मांडली.

आज प्रकाश आंबेडकरांनी वंचीत बहुजन आघाडी स्थापन केली. मात्र इतर समुदायाला उमेदवारी देऊन निवडणूका २०१९ लोकसभा, विधानसभा निवडणूक लढविली. मात्र यशपाल भिगे (नांदेड), गोपिचंद पडळकर (सांगली) सहीत अनेक नेते इतर पक्षात गेले.

आता दलितांचे प्रश्न सोडविण्यासाठी मजबूत भारतीय रिपब्लीकन पक्षाची गरज आहे. नवीन नेतृत्त्वाची गरज आहे मात्र ते स्वच्छ, निर्मळ, नि:ष्पक्ष व सामाजिक बांधीलकी व उत्तरदायित्व असणारे दलित नेतृत्त्व निर्माण होणे काळाची गरज आहे.

कारण आज बहुजन समाज पक्ष सुद्धा कमकुवत झाला आहे. तोही मजबूत होणे आवश्यक आहे.

### ४.२.४ स्त्रीवादी चळवळ (Feminist Movement) :

**स्त्रीवादाचा अर्थ व स्वरूप :**

**प्रस्तावना :**

दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील अनेक देशात सुधाणाचे वारे जोमाने वाहू लागले. वशंवाद, जातीयवाद धर्मांधता, वसाहतवाद, यासोबतच स्त्रीयांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात सुधारणाविषयी चर्चा, संवाद, परिषदा सुरू झाल्या. स्त्रीयांचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटीतपणे सोडविण्यास सुरुवात झाली. याविषयी सर्व राष्ट्राचे एकमत झाली. स्त्री प्रश्न सोडविण्यासाठी विचारवंत व अभ्यासकांने विचार मांडले. त्यांना स्त्रीवाद म्हणतात. मात्र यास चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. त्या स्त्रीवादी चळवळ म्हणतात.

कॉ. शरद पाटील यांच्या शब्दात स्त्रीदास्यत्त्वाच्या विरोधातील लढाई म्हणजे स्त्रीवादी चळवळ होय. जगातील प्रत्येक देशातील स्त्रीयांचे प्रश्न कमी अधिक फरकाने वेगवेगळे असले तरी ते प्रश्न सोडविणे सोपे. मात्र भारतातील वेगवेगळ्या जातीतील स्त्रीयांचे वेगवेगळे प्रश्न असून या स्त्रीयामध्येही जातीय भेद व उच्चनिच्चता आढळून येते.

तरीपण जगातील सर्व पाश्चात्य स्त्रीवादी अभ्यासक स्त्री म्हणून जे जे तिचे प्रश्न समस्या असतील त्याचा अभ्यास करून मार्ग सुचविण्याचे कार्ये करीत आहेत. मात्र भारतात हिंदू स्त्रीवाद, आंबेडकरी स्त्रीवाद, आदिवासी स्त्रीवाद, मुस्लीम स्त्रीवाद आणि ख्रिश्चन स्त्रीवाद असल्याचे दिसून येतात.

#### ४.२.४.१ स्त्रीवादी चळवळीचे मध्यवर्ती कार्ये :

१) स्त्रीवादी चळवळीच्या मते स्त्री व पुरुष समानता असावी.

२) स्त्रीयांना पुरुषाप्रमाणे समान व सन्मानाची वागणूक मिळावी.

३) स्त्रीयाच्या शोषण व अत्याचाराविरुद्ध जगाच्या विचार मंचावर आवाज उठविणे, युनोमध्ये आवाज उठविणे.

४) कुटुंबात मुलगा व मुलगी असा भेद करू नये.

५) मुलांप्रमाणे मुलीलाही वडीलांच्या संपत्तीत वारसा किंवा वाटा मिळाला पाहिजे.

६) पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सर्वच क्षेत्रात सहभागी होण्याचा अधिकार.

७) स्त्री प्रतिष्ठेस बांधक, अन्यायकारक प्रथा, परंपरा नष्ट करणे.

८) स्त्रीयांच्या विकासासाठी, संरक्षणासाठी योग्य असे कायदे तयार करणे.

#### ४.२.४.२ स्त्रीवादाचे स्वरूप :

आज स्त्रीवादी चळवळीचे स्वरूप स्थानिक प्रश्नापुरते न राहता किंवा राष्ट्रीय प्रश्नापुरते न राहता आता आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्रीयांचे प्रश्न सोडविण्याचे कार्य चालू आहे. म्हणजेच स्त्रीवादाचे किंवा स्त्रीवादी चळवळीचे

स्वरूप आंतरराष्ट्रीय बनलेले आहे. उदा. भारतातील खैरलांजी प्रकरणाची आंतरराष्ट्रीय मानवी हक्क आयोग, राष्ट्रीय महिला आयोग व राज्य महिला आयोगाने दखल घेऊन चौकशी केली तसेच दिल्लीतील निर्भया प्रकरणाची दखल राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली व केंद्र सरकारला योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिला.

आज (Gender Sensitization) किंवा लिंगभाव हे मुद्दे युनोच्या पातळीवर चर्चा केले जात असून प्रत्येक देशामध्ये यावर चर्चा केली जात असून स्त्री-पुरुष विषमता कमी करून स्त्रीयांच्यावर होणारे अन्याय अत्याचार कमी करण्यासाठी व स्त्रीयांचे कामाच्या ठिकाणी व घराबाहेर संरक्षण करण्यासाठी विविध कायदे केले जात आहेत. स्त्रीवादी चळवळी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्रीयांचे प्रश्न मांडत असून स्त्रीयांना सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने हक्कांची मागणी करीत आहेत. तसेच शैक्षणिक, नोकरीमध्ये व विधीमंडळ, संसदेत व स्थानिक स्वराज्य संस्थेत आरक्षणाची मागणी करीत आहेत.

### ४.२.४.३ स्त्रीवादी चळवळीचे विविध टप्पे :

प्रामुख्याने स्त्रीवादी चळवळीचे स्वातंत्र्यपूर्व काळ आणि स्वातंत्र्योत्तर काळ तसेच तिसरा टप्पा जागतिकीकरणा नंतरचा स्त्रीवादी चळवळीचा कालखंड. अशा प्रकारे तीन टप्प्यामध्ये अभ्यास करणे आवश्यक आहे.

**१) पहिला टप्पा - स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रीवादी चळवळ :**

ब्रिटिश राजवटीमध्ये खऱ्या अर्थाने प्रबोधनाचा व धार्मिक अनिष्ट परंपरेच्या सुधारणेचा काळ सुरू झाला. ब्रिटिश सरकारनेही कायदेशीर पाठींबा दिला. भारतामध्ये मनुस्मृतीद्वारे स्त्रीयांवर अनेक प्रकारची बंधने लादली होती आणि स्त्रीयावर अनेक प्रकारची धार्मिक बंधने व गुलामगिरी लादली. ती आजही थोड्याफार फरकाने दिसून येते.

स्त्रीयांवरील धार्मिक अन्याय, अत्याचार व अनिष्ठ परंपरा, रुढी विरोधात व स्त्रीयांना अधिकार मिळाले पाहिजेत, स्त्री सुधारणा होण्यासाठी आगरकर, न्या. रानडे, पंडीता रमाबाई, महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी हिंदू धर्माच्या चौकटीत राहून सुधारणा करण्याचा प्रयत्न केला.

मात्र खऱ्या अर्थाने हिंदू धर्माच्या चौकटीबाहेर विचार करून वास्तववादी विचार करून महात्मा जोतिबा फुले यांनी स्त्रीयांना शिक्षण मिळाले पाहिजे तरच स्त्रीयांना त्यांच्या अधिकाराची जाणीव होईल म्हणून त्यांनी स्त्रीयासाठी पहिली शाळा पुणे येथे काढून सावित्रीबाई फुले यांना शिक्षक म्हणून शिकविण्यास सांगितले. ते म्हणतात,

*''विद्ये विना मती गेली। मती विना निती गेली।*
*निती विना गती गेली। गती विना वित्त गेले।*
*वित्ता विना शुद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले।''*

या सर्वांच्या मागे कारण अविद्या म्हणजे अज्ञान व निरक्षरता त्यासाठी त्यांनी महिलांसाठी शिक्षण, विद्या देण्याचे कार्य प्रत्यक्षपणे सुरू केले. तसेच कुमारी माता बालसंगोपनगृह, विधवा विवाह मंडळ स्थापन केले.

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी १८९८ मध्ये पुणे येथे विधवा महिलांसाठी 'महिलाश्रम' नावाची संस्था लेडी नॉर्थकोट, पंडीता रमाबाई व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या मदतीने सुरू केली. यानंतर कर्वे यांनी १९०७ मध्ये पुण्यातच महिला विद्यालय सुरू केले.

त्यांनी जपानी महिला विद्यापीठाचा १९१५ मध्ये अभ्यास करून १९१६ मध्ये मुंबई येथे स्वतंत्र महिला विद्यापीठ स्थापन केले. आज एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठे मुंबई या नावाने सुरू आहे. यामुळे स्त्री शिक्षणास गती मिळाली.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात मुलींना शिक्षण देण्यासाठी म. फुले हे गुरू मानून मुलींच्या शाळा काढल्या. शिक्षकांचा जास्त पगार देऊन नेमणूक केली. मुलीच्या शाळेत ज्या शिक्षकांच्या विषयांच्या जास्त मुली पास होतील त्यांना बक्षीस व पगार वाढ दिली जात असे. अनेक शाळा मुलींसाठी शाळा सुरू केल्या. विधवा महिलांचे विवाह करून दिले.

कौटुंबिक छळ कायदा १९१९ मध्ये केला. तसेच महिलांच्या विकासासाठी व उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती सुरू केली. तसेच आंतरजातीय १०० विवाह केले. स्त्रीयांना स्वातंत्र्य, समता, न्याय इत्यादीसाठी कठोर कायदे केले व त्यांची प्रभावी अंमलबजावणी केली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा येथे रयत शिक्षण संस्थेच्या वतीने मुलींसाठी शाळा, मुलींसाठी महाविद्यालय. तसेच आय. टी. आय. सुरू केल्या. त्या आजही आहेत. 'कमवा व शिका' योजना सुरू करून मुलींना शिकण्यास प्रोत्साहन दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या मनुस्मृतीने स्त्रीयांना गुलाम केले. स्त्रीयांवर अन्याय, अत्याचार केले. स्त्रीयांचे शोषण करून हक्क व न्यायापासून वंचीत ठेवले त्या मनुस्मृतीचे २५ डिसेंबर, १९२७ मध्ये रायगडाच्या पायथ्याशी महाड येथे दहण केले व स्त्री मुक्ती चळवळीला दिशा खऱ्या अर्थाने दिली.

स्त्रीयांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्त्रीयाच पुढे आल्या पाहिजेत यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भर होता. त्यांनी २५ मार्च, १९३४ मध्ये अस्पृश्य महिला परिषद, १६ जून १९३६ मध्ये देवदासी, मुरळी, जोगतिणी, पोतराज परिषद (परळ), १९४४ मध्ये महिला परिषद (कानपूर) तर १९४५ मध्ये महिला परिषद, मुंबई या परिषदा घेऊन खऱ्या अर्थाने महिलांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकासासाठी ठराव मंजूर केले. त्यामध्ये मुलींना विशेष व ज्यादा सवलती शाळा, कॉलेज, विद्यापीठात मिळाव्यात, असा ठराव मंजूर केला व शासनाला पाठविला.

स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने समतेचा, मालमत्तेचा, पुनर्विवाहाचा, वडीलोपार्जित मालमत्तेचा, शिक्षणाचा, स्वातंत्र्याचा, न्याय मागण्याचा, राजकीय सहभागाचा, मतदानाचा, राजकीय प्रतिनिधित्व, विधीमंडळ, संसद व पंचायतीमध्ये प्रतिनिधित्व मिळविण्याचा तसेच कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षणाचा आणि शासकीय सेवेत नोकरीचा हक्क मिळविण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. तसेच पोटगी मिळविण्याचा, दत्तक मुल घेण्याचा हक्क मिळाला पाहिजे. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रचंड कार्य केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांच्या हक्क, स्वातंत्र्य, न्यायासाठी व त्यांच्या विकासासाठी भारतीय

राज्यघटनेत मुलभूत हक्कांची तरतूद केली तसेच त्यांच्या विकासासाठी व पुरुषांच्या बरोबरीने न्याय हक्क मिळविण्यासाठी राज्यघटनेत मार्गदर्शक तत्त्वांची तरतूद केली.

मात्र हिंदू कोड बील स्त्रीयांच्या विकासासाठी तयार केले परंतु ते संसदेत नामंजूर झाले. त्यामुळे स्त्रीयांसाठी कायदेमंत्री पदाचा राजीनामा देणारे जगातील पहिले मंत्री आहेत.

म. गांधी यांनी स्वातंत्र्य चळवळीत स्त्रीयांना सहभागी केले होते. म. गांधींच्या प्रेरणेने १९२७ मध्ये अखिल भारतीय महिला परिषद स्थापन केले. या परिषदेने स्त्री शिक्षणाचा प्रसार केला. म. गांधी यांच्या स्वातंत्र्य आंदोलनातील स्त्रीयांनी स्त्रीयांसाठी विविध संस्था स्थापन करून स्त्रीच्या प्रश्नावर त्यांच्यात जागृती करण्याचे कार्य केले.

अशा प्रकारे स्वातंत्र्यपूर्व कालखंडात स्त्रीवादी चळवळीचा पाया भक्कम उभा राहिला.

**स्वातंत्र्योत्तर स्त्रीवादी चळवळ :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रीकेत सर्व नागरिकांस (स्त्री-पुरुष) स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता प्रस्थापीत करण्याचे वचन दिले. तसेच राज्यघटनेत मूलभूत हक्क, मार्गदर्शक तसेच घटनात्मक पुनर्विलोकनाचा अधिकार याद्वारे स्त्री सुधारणेस, स्त्रीसबलीकरण, स्त्री सक्षमीकरणास आपोआपच संधी प्राप्त करून दिली. त्यासाठी विविध तरतुदी केली.

भारत सरकारने स्त्रीयांवरील अन्याय, अत्याचार प्रतिबंधक कायदे केले. विकासासाठी व त्यांच्या हक्क, स्वातंत्र्य, समता व न्यायासाठी विशेष तरतुदी केल्या. स्त्रीयांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विकासाची दारे खुली केली.

**स्त्री मुक्ती संघटनाचे कार्ये :**

स्वातंत्र्यानंतर १९७० च्या दशकामध्ये जगभरात स्त्रीमुक्ती, स्त्री सक्षमीकरणाचे वारे वेगाने वाहू लागले. मात्र सरकारने म्हणावे तेवढे कायद्याची अंमलबजावणी प्रभावी केली नाही. भारतात व विशेषत: महाराष्ट्रात प्रमीला दंडवते, अहिल्याबाई रांगणेकर, मृणाल गोरे या समाजवादी महिलांनी विविध आंदोलने केली.

याच काळात महिलावरील पोलीस कोठडीत पोलीसाकडून बलात्कार घटनेच्या विरोधात मोर्चे काढून IPC आणि CRPC कायद्यात सुधारणेची मागणी केली.

शासनाने महिलांचा, स्त्री प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी विविध विद्यापीठात स्त्री अभ्यास केंद्रे स्थापन केले. संयुक्त राष्ट्र संघटनेने जगाचे लक्ष स्त्रीयांच्या प्रश्नाकडे वेधण्यासाठी १९७५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून घोषीत केले. स्त्रीयांच्या प्रश्नाच आढावा घेवून स्त्रीयांच्या विविध प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावे, असे घोषीत केले आणि ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा करण्याचे जगाला आवाहन केले.

याच काळात महिला संघटना भारतात व महाराष्ट्रात स्थापन झाल्या. विविध महिला परिषदा झाल्या. स्त्रीवादी चळवळीला अधिक ताकद मिळाली. महिलांसाठी काम करणाऱ्या विविध संघटनांना कार्य करण्यास शासनाने अनुदान देण्यास सुरवात केली.

विविध क्षेत्रातील, विविध जातीतील, धर्मातील, संस्कृतीमधील महिला वेगळ्या असल्या तरी स्त्री म्हणून जे जे प्रश्न आहेत ते सोडविण्यावर स्त्रीवादी विविध संघटनांनी भर दिला.

### ४.२.४.४ १९८० नंतर स्त्रीवादी चळवळीला गती :

खरतर भारतीय राजकारण हिंदूत्ववाद, अस्थिरतेचे राजकारण, प्रादेशिक असमतोल इत्यादींमुळे प्रभावित झाले होते. मात्र स्त्रीयांचे प्रश्न याच काळात वाढत गेले. १९८० मध्ये स्त्री प्रश्नावर एस. एन. डी. टी. विद्यापीठात महिला परिषद घेतली. वाढते बलात्कार व अत्याचार यावर चर्चा झाली. खासदार प्रमिला दंडवते यांनी लोकसभेत याविषयी आवाज उठविला. राष्ट्रीय महिला आयोग स्थापन व्हावा, यावर चर्चा झाली. ठराव मंजूर झाला.

कॉ. गोविंद पानसरे यांनी मोलकरणींच्या प्रश्नावर तसेच बाबा आढाव यांनी देवदासी प्रथेविरोधात तर सीमा साखरे यांनी परितक्त्या स्त्रीयांवर अन्याय-अत्याचार विरोधात आवाज उठवून आंदोलन केले.

**जागतिकीकरण आणि स्त्रीवादी चळवळ :**

जगात १९९१ मध्ये रशियाची महासत्ता कोसळली व अमेरिकेच्या नेतृत्त्वाखाली जगात एकच भांडवलशाही राष्ट्राची सत्ता निर्माण झाली. अमेरिकेने जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण जगातील सर्व देशावर सक्तीने लादले. यास भारतही अपवाद नव्हता.

या धोरणामुळे देशातील स्त्री सुधारणेला कात्री लागली. आरक्षणाला कात्री लागली. तसेच देशातील सार्वजनिक उद्योगधंदे, महामंडळ यांचे खाजगीकरणास सुरवात झाली.

भांडवलशाही व्यवस्थेत भोगवाद व चंगळवादी संस्कृती निर्माण झाल्यामुळे स्त्रीयांकडे वस्तू म्हणून पाहिले गेले. त्यामुळे पुन्हा स्त्रीयांवर अन्याय-अत्याचार वाढले. त्यामुळे पुन्हा स्त्रीयांना पंचायत राजमध्ये ३३% आरक्षण देण्याची मागणी मंजूर झाली. ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. स्त्रीयांचे सक्षमीकरण, स्त्री सबलीकरणासाठी स्त्रीवादी चळवळी एकत्र येऊन शासनापुढे आंदोलने केली. यामुळे शासनाने स्त्रीयांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपाययोजना करण्यासाठी विविध योजना मंजूर केल्या.

### ४.२.४.५ स्त्रीवादी चळवळीचे मुल्यमापन व निष्कर्ष :

भारतीय राज्यघटनेमुळे स्त्री सुधारणेला व स्त्रीयांच्या हक्क, स्वातंत्र्य व न्याय व समता याला घटनात्मक स्थान मिळाले. त्यापूर्वी विविध समाजसुधारकांनी स्त्रीसुधारणा व विकास करण्यासाठी प्रयत्न केला. यामुळे आज स्त्रीयांच्या अन्याय, अत्याचार निवारणासाठी स्त्रीवादी चळवळी स्थापन झाल्या आहेत. या स्त्रीवादी चळवळी व विविध स्त्रीवादी संघटनेने स्त्रीप्रश्नावर आवाज उठवून सरकार विरोधात आंदोलने केले. त्यांना यश काही प्रमाणात आले. शासनाने कठोर कायदे केले. स्त्रीवादी संघटना व चळवळीला न्यायालयाने फार मोठा हातभार लावला. न्यायालयाने वेळोवेळी स्त्री अत्याचाराच्या घटनेवर स्त्रीयांना न्याय देण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे आज मग तालुका, जिल्हा न्यायालय असो की उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालय असो किंवा कौटुंबिक न्यायालय असो तिथे स्त्रीयावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराची दखल घेऊन स्त्रीयांना न्याय देण्याचे प्रामाणिकपणे कार्य केले आहे.

स्त्रीयांचे प्रश्न सोडविण्याचे अन्याय-अत्याचाराच्या जेथे घटना घडतील तेथे जाऊन सर्व चौकशी करून शासनाला शिफारस करण्याचे कार्य राज्य महिला आयोग व राष्ट्रीय महिला आयोग सातत्याने करीत आहे. त्यामुळे शासनाने नेहमी महिला आयोगाच्या शिफारशीचा स्विकार करून महिलांसाठी कठोर कायदे केलेले आहेत. मात्र स्त्रीवादी चळवळीसुद्धा सत्ताधारी पक्षाशी तडजोड करीत असल्यामुळे स्त्रीयांचे प्रश्न, दलित, आदिवासी, भटक्या जातीच्या स्त्रीयांचे प्रश्न म्हणावे तेवढे सुटलेले नाहीत हे वास्तव आहे.

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**१. शेतीमालाला रास्त भाव :** उत्पादन खर्चाच्या प्रमाणात श्रमाचे मूल्य गृहीत धरून शेतीमालाचा दर, मूल्य किंमत.

**२. सहकार :** दोन किंवा अनेक व्यक्ती आर्थिक लाभासाठी एकत्र येऊन भांडवल गुंतवितात व सहकारी तत्वावर संस्था स्थापन करतात.

**३. दलित :** समाजातील अतिशूद्र किंवा अस्पृश्य लोकांच्या समुहासाठी वापरला जाणारा शब्द. आज (SC) अनुसूचित जाती असे म्हटले जाते.

**४. स्त्रीवाद :** स्त्रीयांच्या प्रश्नाचा अभ्यास करणारा विचार किंवा स्त्री प्रश्नाचा विचार होय.

**५. घटनात्मक तरतुदी :** भारतीय राज्यघटनेत केलेल्या तरतुदी होय.

**६. मनूस्मृती :** हिंदू धर्माच्या विषमतावादी, अन्यायकारक स्त्रीयांना गुलाम करणारा, स्त्रीयांचे अधिकार नाकारणारा ग्रंथ होय.

**७. स्त्री सक्षमीकरण :** स्त्रीयांचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकिय क्षेत्रात विकास करण्यासाठी केलेला विकास योजना होय.

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे :

**१. सहकार चळवळीची महाराष्ट्रात मुहूर्तमेढ कोणी रोवली?**

**उत्तर :** विठ्ठलराव विखे-पाटील यांनी प्रवरानगर येथे सहकारी साखर कारखाना सुरू करून मुर्हूमेढ रोवली.

**२. 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ कोणी लिहिला?**

**उत्तर :** म. फुले यांनी शेतकऱ्याच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी शेतकऱ्याचा आसूड ग्रंथ लिहिला.

**३. शेतकरी संघटना कोणी स्थापन केली?**

**उत्तर :** शरद जोशी यांनी शेतकरी संघटना सुरू केली.

**४. महाराष्ट्रात जागतिकीकरण, सेझ (SEZ) व एन्रॉन विरोधात शेतकऱ्यांसाठी लढा कोणी दिला?**

**उत्तर :** प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने हा व्यापक प्रमाणात लढा दिला.

**५. स्वभिमानी शेतकरी संघटना २००२ मध्ये कोणी स्थापन केली?**

**उत्तर :** राजू शेट्टी यांनी शेतकरी संघटनेतून बाहेर पडून स्वाभिमानी शेतकरी संघटना स्थापन केली.

**६. सहकार चळवळीमुळे कोणते फायदे झाले?**

**उत्तर :** महाराष्ट्रात सहकार चळवळीमुळे कृषी, औद्योगिक क्षेत्राचा विकास झाला, रोजगारनिर्मिती झाली.

**७. दलित चळवळीचा काय फायदा झाला?**

**उत्तर :** दलित समुदायाला त्यांचे हक्क व स्वातंत्र्य व न्यायाची जाणीव जागृती झाली व त्यांचे प्रश्न सोडविण्यास मदत झाली.

**८. दलित चळवळीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान काय आहे?**

**उत्तर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्यात माणूस म्हणून जगण्याचे, गुलामी जीवन नाकारण्याचे, त्यांचे हक्क, अधिकार व न्याय मिळविण्याचे व त्यांना संघटीत करण्याचे व घटनात्मक तरतुदीद्वारे विकासाची संधी निर्माण करण्याचे कार्य केले.

**९. दलित चळवळीसाठी कोणता पक्ष स्थापन झाला?**

**उत्तर :** भारतीय रिपब्लिकन पक्ष स्थापन झाला. ज्यांनी दलितावरील अन्याय-अत्याचार विरोधात लढे दिले.

**१०. महिलांना कोणत्या ग्रंथामुळे अन्याय-अत्याचार सहन करावे लागले?**

**उत्तर :** मनुस्मृती या हिंदूधर्म ग्रंथामुळे महिलांवर बंधने लादली.

**११. महिलांच्या विकासात भारतीय घटनेचे काय स्थान आहे?**

**उत्तर :** भारतीय राज्यघटनेने मुलभूत हक्काची, मार्गदर्शक तत्त्वाची मतदानाची तरतूद केल्यामुळे महिलांच्या विकासाची दारे खुली झाली.

**१२. म. फुले यांनी महिलांच्या शिक्षणासाठी काय केले?**

**उत्तर :** म. फुले यांनी पुण्यात १८४८ मध्ये महिलासाठी शाळा काढली.

**१३. आंतरराष्ट्रीय महिला दिन केव्हा साजरा करतात?**

**उत्तर :** ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो.

**१४. राजर्षी शाहू महाराजांनी कुटुंबातील अत्याचार प्रतिबंधक विरोधात कोणता कायदा केला?**

**उत्तर :** कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा (कौटुंबिक अत्याचार प्रतिबंधक कायदा १९१९ मध्ये स्थापन केला.

## ४.५ सारांश :

सदर प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील राजकिय चळवळीचा आढावा घेतला आहे. यामध्ये शेतकरी चळवळी सविस्तर अभ्यास केलेला असून शेतकऱ्यांचे प्रश्न, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला उत्पादन खर्चाच्या प्रमाणात रास्त व किफायतशीर भाव, तसेच जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणात शेतकऱ्यांच्या समस्या, शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा व आत्महत्या तसेच शेतकरी संघटनेचे विविध मागणीसाठी झालेली आंदोलने, शासनाने केलेली विविध कायदे, आयोग, पणन महासंघ किंवा महामंडळे इत्यादींचा आढावा घेतलेला आहे.

महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीचा आढावा घेताना सहकारी संस्थांची स्थापना, त्याचे उद्देश, वैशिष्ट्ये, आव्हाने व सहकारी चळवळीची जागतिकीकरणात वाताहत, सहकारी संस्थांची दिवाळखोरी, आजारीपणा, यावर शासनाची उपाययोजन व सहकार चळवळीचे मूल्यमापन इत्यादीविषयी चर्चा केली आहे.

महाराष्ट्रातील दलित चळवळीविषयी मांडणी करताना भारतीय विषम सामाजिक व्यवस्था, चातुवर्ण्य पद्धती, यातील अदृश्य पाचवा अस्पृश्य वर्ण, अतिशुद्र वर्ण यांचे अधिकार हक्कांची पायमल्ली प्रबोधन काळात म. फुले यांनी केलेले उद्धाराचे कार्य, महर्षी वि. रा. शिंदे, म. गांधींचे दलितांसाठी कार्य, राजर्षी शाहू महाराजांचे आरक्षण धोरण, अस्पृश्यता निर्मूलन कार्य, शैक्षणिक कार्य, कमवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य, कर्मवीर भाऊराव पाटील यांचे अस्पृश्यता निवारण्याचे कार्य व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मंदीर प्रवेश, चवदार तळे सत्याग्रह, तसेच घटनात्मक तरतुदीद्वारे कार्ये, धर्मांतर आणि भारतीय रिपब्लिकन पक्ष दलित पँथरचे कार्य व आंदोलन इ. ची सविस्तर चर्चा केली आहे.

त्यानंतर शेवटी स्त्रीवादी चळवळ, स्त्रीयांची सामाजिक स्थिती, स्त्रीयांविरोधी हिंदूधर्मातील अनिष्ठ प्रथा, परंपरा, त्याविरोधात समाजसुधारणांचे कार्य. म. फुलेंची पहिली मुलींची शाळा, धोंडो केशव कर्वे यांचे एस. एन. डी. टी. विद्यापीठ स्थापना, छ. शाहू महाराजांची स्त्री शिक्षण चळवळ, कर्मवीर भाऊराव पाटील यांची स्त्री शिक्षणासाठी कार्ये आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले विविध महिला परिषदा, न्याय, हक्क जाणीव जागृती परिषदा व घटनात्मक तरतुदी, तसेच हिंदू कोड बील इ. तसेच विविध स्त्रीवादी संघटना, त्यांचे आंदोलन आणि स्त्रीवादी चळवळीचे जागतिकीकरणाच्या संदर्भासह मूल्यमापन इ. विषयी थोडक्यात आढावा घेतला आहे.

### ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) दिर्घोतरी प्रश्न :**

१. शेतकरी चळवळीविषयी माहिती स्पष्ट करा.

२. शेतकरी चळवळीत शेतकरी संघटनेची भूमिका विशद करा.

३. सहकार चळवळीचे मूल्यमापन करा.

४. महाराष्ट्रातील सहकार चळवळीविषयी सविस्तर माहिती लिहा.

५. दलित चळवळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान स्पष्ट करा.

६. डॉ. बाबासाहेबानंतरची दलित चळवळ स्पष्ट करा.

७. स्त्रीवादी चळवळीविषयी सविस्तर माहिती लिहा.

८. स्त्रीवादी चळवळीत महिला संघटनेची भूमिका स्पष्ट करा.

९. महिलांना हक्क व न्याय मिळवून देणारी स्त्रीवादी चळवळ याविषयी सविस्तर माहिती लिहा.

**ब) टिपा लिहा :**

१. स्वाभिमानी शेतकरी संघटना

२. शेतकरी संघटनेतील गटबाजी
३. सहकार चळवळीसमोरील आव्हाने
४. सहकार चळवळीची वैशिष्ट्ये
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरपूर्व दलित चळवळ
६. दलित पँथर
७. स्त्रीवादी संघटना
८. स्त्रीवादी चळवळ

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१. डॉ. सुनिता बोर्डे, प्रा. संतोष खडसे : 'ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रीया', शुभम पब्लिकेशन, पुणे
२. प्रा. मुळीक आर. जी. : 'महाराष्ट्र शासन आणि राजकारण', सिंधुताई मुळीक प्रकाशक, सांगली
३. डॉ. बोबडे प्रकाश : 'कोलाज' (आर्थिक व सामाजिक चळवळी), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर
४. डॉ. शिरगावे दादासाहेब, डॉ. शिंदे वसंत : 'स्थानिक स्वराज्य संस्था आणि महाराष्ट्रातील चळवळी', निराली प्रकाशन, पुणे.
५. प्रा. पाटील बी. बी. : 'महाराष्ट्रातील राजकारण आणि चळवळी', फडके प्रकाशन, कोल्हापूर
६. डॉ. सुनिता बोर्डे खडसे : 'महाराजा सयाजीराव गायकवाड यांची स्त्रीसुधारणा', महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन, समिती, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.
७. मून मिनाक्षी : 'फुले, आंबेडकरी स्त्री चळवळ', समता प्रकाशन, नागपूर
८. पाटील विजय, रत्नपारखी संजय : 'महाराष्ट्राचे राजकारण आणि सामाजिक चळवळी', दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
९. प्रा. पानसकर विजय : 'नवसामाजिक चळवळी व महाराष्ट्राचे राजकारण', दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (२०१२).


 OOO